क्रा. ९५०४

# संध्या



साने गुरुजी

# संध्या

साने गुरुजी

संध्या / साने गुरुजी

अभिनंदन प्रकाशन

नवीन आवृत्ती २०११

© सर्व हक्क सुरक्षित

प्रकाशिका – सौ. नेहा त्रिभुवननाथ जोशी
१४९५ 'बी', इंदुमती अपार्टमेंट, गुलाब गल्ली, मंगळवार पेठ,
कोल्हापूर – १२.
दूरध्वनी : (०२३१) ३२९६९०९, मो.: ९४२३०४१९६५

मुखपृष्ठ : अविनाश कुंभार

अक्षरजुळणी – वैभव ग्राफिक्स

मुद्रक – मयूर

## दोन शब्द

'संध्या' कादंबरीचा शेवटच्या प्रकरणापर्यंतचा भाग मी १९४१ साली धुळ्याच्या तुरुंगात लिहिला होता. पुढे १९४२ साली ऑगस्टच्या १० तारखेस मी सुटलो. १९४३ एप्रिलपर्यंत बाहेर होतो. शेवटचे प्रकरण त्या १९४३ च्या मार्च-एप्रिल महिन्यातल्या घाईत मी लिहून ठेवले होते. मी तुरुंगात असताना ही कादंबरी छापण्याचा बाहेरच्या मित्रांकडून प्रयत्न केला गेला; परंतु अनेक अडचणी येत व काम अर्धवट राही. मित्रांनी हे हस्तलिखित वाचून अनेक ठिकाणी काटछाट केली. मला पुन्हा लिहायला आज वेळही नाही. ही आता जशी संध्या आहे, तशीच प्रसिद्ध होवो असे मनात म्हटले. ही कादंबरी मला अतिप्रिय आहे. या कादंबरीतील साऱ्या व्यक्ती काल्पनिकच समजाव्या. कोणीही स्वत:ला काही लावून घेऊ नये. ही कादंबरी आहे, हे सर्वांनी ध्यानात धरावे.

**– साने गुरुजी**



साने गुरुजी

१...

# आजी, संध्या आता लहान नाही

त्या गावचे नाव उडगी. भीमेच्या तीरावर ते वसले होते. गावची वस्ती चार–पाच हजार असेल. त्या गावात कर्नाटकी यांचें घर मोठे प्रसिध्द होते. त्या घरात तिघे भाऊ एकत्र राहात होते. वडीलभाऊ नारायणराव मोठे कर्तबगारी होते. सारा गाव त्यांना मान देई. सारे भाऊ चांगले लिहिणारे–वाचणारे होते; घरी वर्तमानपत्रे येत, मासिके येत; चांगली पुस्तकेही भरपूर होती. एक प्रकारचे सुसंस्कृत वातावरण त्या घरात होते.

या त्रिवर्गाचे आईबाप लहानपणीच निवर्तले होते. त्यावेळी मोठी आणीबाणीची स्थिती होती. घरात कोणी कर्ते पुरुष माणूस नव्हते. विधवा चुलती भागीरथीकाकू हीच काय ती घरात. परंतु तिने धैर्याने घर सांभाळले. या मुलांना तिने वाढविले. शेतीभाती तिने पाहिली. आता मुले मोठी झाली होती. तिघांची लग्ने झाली होती. घरात तीन सुना वावरत होत्या. त्यांची मुलेबाळे होती. घराला भरल्या गोकुळाची शोभा होती. भागीरथीबाईला हे सारे भाग्य पाहून धन्य वाटे. केल्या कष्टाचे चीज झालेले पाहून कृतार्थ वाटे.

भागीरथीकाकूचे नारायणरावावर विशेष प्रेम होते, जणू तिला तो स्वत:चा

मुलगा वाटे. ती आता थकली होती. म्हातारी झाली होती. तरीही स्वयंपाक तीच करी. आपल्या हातची भाजीभाकर नारायणाला मिळावी असे तिला वाटे.

एके दिवशी नारायणराव तिला म्हणाले, ''काकू, तू आता म्हातारी झालीस. तू स्वस्थ का बसत नाहीस? विश्रांती का घेत नाहीस? घरात आता तुझ्या सुना आहेत. त्या करतील सारे काम. त्या करतील स्वयंपाक. तू कशाला चुलीजवळ बसतेस? तू आम्हाला वाढवलंस, लहानाचं मोठं केलंस. आईबापांची आठवण तू आम्हाला होऊ दिली नाहीस. तळहाताच्या फोडाप्रमाणं तू आम्हाला जपलंस. काकू, तुझे किती उपकार, किती प्रेम! किती कष्ट तू काढलेस. आता नको हो श्रम. तू आमच्या मुलांना खेळव. त्यांना गोष्टी सांग. रामनाम म्हण. तुझा आशीर्वाद आम्हाला दे. तू प्रेमानं आमच्याकडे पाहिलंस की आम्हाला सारं मिळतं. तू काम करू लागलीस, दुपारवेळी चुलीजवळ बसलीस, म्हणजे मला कसं तरी होतं. नाही ना करणार आता काम, नाही ना बसणार चुलीजवळ?''

''नारायणा, अरे स्वयंपाक केल्यानं मला त्रास का होतो? वेडा आहेस तू! तुम्हाला माझ्या हातचं वाढताना मला आनंद होत असतो. माझा हा आनंद दूर नको करू . तू घरी नसलास म्हणजे काही मी नाही करीत स्वयंपाक. त्यावेळी माझी विश्रांती असते. परंतु तू घरी आलास म्हणजे मीच करीन स्वयंपाक. माझ्या हातच्या भाकरीचा तुला कंटाळा का आला?''

''काकू, असं काय विचारतेस? जन्मोजन्मी तुझ्या हातची भाकर मिळाली तरी कंटाळा येणार नाही. अमृताचा का कधी वीट येतो? परंतु चुलीजवळ तू बसलीस म्हणजे मला वाईट वाटतं. जन्मात थोडी तरी विश्रांती नको का?''

''नारायणा, काम केलेल्या माणसाला विश्रांतीच कंटाळवाणी वाटते. रिकामं बसणं म्हणजे त्याला मरण वाटतं. काम म्हणजेच त्याची विश्रांती.

काम म्हणजेच राम. पण तुला वाईट वाटत असेल, तर नाही हो मी करणार स्वयंपाक. तुला आनंद वाटो. माझं काय?''

''काकू, आपण तडजोड करू. जर तुला नाहीच राहावलं, तर दुपारचा स्वयंपाक तू कर, पण रात्रीचा तरी करू नकोस.''

''बरं हो; तुझ्या म्हणण्याप्रमाणं.''

त्या दिवसापासून भागीरथीकाकू चुलीजवळ फारशी बसेनाशी झाली. तिचे नारायणावर विशेष प्रेम असले, तरी दुसऱ्या दोघा भावांवर नव्हते असे नाही. सर्वांवर तिचा लोभ. सर्वांच्या मुलांबाळांचे ती कोडकौतुक करी. मुलांना घेऊन तुळशीच्या अंगणात बसे. त्यांना गोष्टी सांगे. कृष्ण–यशोदेची गाणी शिकवी. लहान मुलांना आंदुळी, त्यांना ओव्या म्हणे.

सर्व मुलांत संध्येवर तिचे फार प्रेम. संध्येचे तिला वेड. संध्या भीमरावांची मुलगी. मोठी खेळकर, चपळ. दिसेही गोड गोमटी. भागीरथीकाकू कधी कधी मुलांना घेऊन मळ्यात जाई. मळा मोठा सुंदर होता. मळ्यांत विहीर होती. मोट चालत असे. फुलांचे ताटवे होते. भाज्या होत्या. फळझाडे होती. मळ्यात काम करणारी गडीमाणसे भागीरथीकाकू येताच प्रेमाने तिच्याभोवती जमत, फुले आणून देत. फळे आणून देत.

त्या दिवशी शाळेला सुट्टी होती. मुलांना घेऊन भागीरथीकाकू मळ्यात गेली होती. गडीमाणसे जवळ आली.

''आजी, तुम्ही आता म्हाताऱ्या झाला. इतक्या लांब कशाला येता? वाटेत दगडधोंडे, काटेकुटे.'' मोटकरी प्रेमाने म्हणाला.

''अरे, शेतावर आलं म्हणजे मी माझं म्हातारपण विसरते. या मुलांबाळांना घेऊन येण्यात एक प्रकारची मौज असते. मला इथं अनेक आठवणी येतात. पूर्वीचे दिवस आठवतात. हा मळा म्हणजे माझं रामायण. खरं ना? काय रे,

कोबी केव्हा होईल तयार? संध्येला कोबी फार आवडते.''

''होईल लौकर तयार. कुठं आहे संध्याताई?''

''ती बघ, त्या झाडावर बसली आहे. क्षणभर स्वस्थ नाही बसायची; खारकुंडीप्रमाणं इकडे उडी मारील, तिकडे पळेल. भारीच हो अचपळ.संध्ये, उतर खाली. घरी नाही का जायचं? चला रे सारी.''

''मी नाही खाली येणार. माझं नाव संध्या. मी संध्याकाळी घरी येईन, तोपर्यंत या झाडावर बसून राहीन. इथं मजा आहे.''

''वर खायला कोण देईल?''

''पाखरं देतील. ती का माझ्याशिवाय खातील? मीही पाखरूच. हसतेस काय, आजी?''

''पुरे चावटपणा. उतर खाली. घरी जायला उशीर होईल.''

आजी रागावली असे पाहून संध्या खाली उतरली. तिने आजीचा हात धरला. सर्व मुले घरी निघाली.

''आजी, तू नेहमी संध्येचा हात धरतेस. आमचा कोणाचा का नाही धरीत? ती तेवढी तुझी लाडकी!'' दुसरी मुले म्हणाली.

''अरे, ती इकडेतिकडे पळून जाईल म्हणून हो मी तिचा हात धरते. तुम्ही सारी माझी आवडती, सारी लाडकी. मी सर्वांना खाऊ नाही का देत? सर्वांना गोष्टी नाही का सांगत?''

''आजी, तू रस्त्यात पडू नयेस म्हणून मी तुझा हात धरते, खरं ना?'' संध्येने हसून विचारले.

''होय हो संध्ये. मुलं म्हणजे म्हाताऱ्याची काठी.'' आजी म्हणाली.

भागीरथीकाकू रोज भीमेवर स्नानासाठी जायची. पंढरपुराहून वाहत आलेली पवित्र भीमा. उडगी गावची तीच गंगा. ती चंद्रभागा. आजीबरोबर

कधीकधी संध्याही जावयाची व पाण्यात डुंबावयाची.

''संध्ये, तू आज गंगेवर येऊ नकोस. फार आहे थंडी.''

''आजी, तुला थंडी लागत नाही, मग मला कशी लागेल? मला तर भीमेच्या पाण्यात मौज वाटते. जणू मी आईच्या कुशीत शिरत आहे असं मला वाटतं. संध्येला थंडी-ऊन बाधत नाही. पाऊसपाणी बाधत नाही. तहानभूक लागत नाही. भीमेचं पाणी पिऊन माझी तहानभूक नाहीशी होते.''

''काही तरी बोलतेस. गंगेवरून आलीस की दुप्पट खातेस. पाण्यात डुंबून भूक मरते वाटतं? बरं, चल; तू काही ऐकायची नाहीस.''

त्या दिवशी भीमेच्या पाण्यात डुंबता डुंबता संध्या जणू देहभान विसरली. तिकडे भागीरथीकाकू स्तोत्रे म्हणत होती, अभंग म्हणत होती. संध्येलाही गाण्याची स्फूर्ती आली.

''आजी, बाबांचं ते आवडतं गाणं मी म्हणू?''

''हं, म्हण; छान आहे ते गाणं.''

संध्या गाणे म्हणू लागली:

(चाल: दिन खूनके हमारे...)

भीमे वहा वहा गे
जन सर्व उद्धरावे ।।भीमे०।।
तव गोड गोड नीर
तव धन्य रम्य तीर
सेवून लोक-माते
निष्पाप सर्व वाटे ।।भीमे०।।
शेतें तुझ्या तटीची

समृद्ध शत पटीची
देती अपार पीक
संसार हा सुखावे. ।।भीमे० ।।
घोडे तुझ्या थडीचे
होती गडी विजेचे
अटकेस दौड गेली
इतिहास नव घडावे ।।भीमे० ।।
देशी स्वराज्य माते
देशीहि मुक्ति माते
परमार्थ अन प्रपंच
दोन्हीहि हाती द्यावे ।।भीमे० ।।
बाळे तुझी अम्ही गे
आम्हांस वाढवी गे
दे प्रीती नी विरक्ती
मग जीव हा विसावे ।।भीमे० ।।

पाण्यात गाणे म्हणत संध्या नाचू लागली. भीमेच्या पाण्यावर ती हात मारीत होती. ताल धरीत होती. मध्येच पाण्यात बसे, मध्येच उभी राही. मध्येच गिरकी घेई. मध्येच टाळ्या वाजवी.

''संध्ये, पोरी, बाधेल हो पाणी . नीघ बाहेर.''

''भीमेचं पवित्र पाणी. चंद्रभागेचं पाणी. ते का बाधेल? वेडी आजी !''

''एवढीशी चिमुरडी आहेस, पण वाद घालीत बसतेस. बॅरिस्टर नवरा हवा मिळवून द्यायला. साध्या नवऱ्याला तू रडवशील.''

''पण मला मुळी लग्नच नाही करायचं. मी आपली तुझ्याजवळ राहीन. तुझ्याजवळ गाणी शिकेन. शेतावर जाईन. फुलं वेचीन. मोट धरीन. मला मोट आवडते. कसं धो धो पाणी येतं; नाही, आजी?''

''वेडी आहेस अगदी!''

''मघा म्हणालीस की बॅरिस्टराला हटवशील, आणि आता म्हणतेस की वेडी आहेस म्हणून. आजी, खरं सांग, मी शहाणी की वेडी?''

''आधी अंग पूस. आणि शेवटी केस भिजवलेसच ना?''

''फार नाही काही भिजले. आजी, डोक्यात शिरूदे पवित्र पाणी, चंद्रभागेचं भक्तिप्रेमाचं पाणी. आजी, मी जनाबाई होऊ?''

''जनाबाई व्हायला पुण्य लागतं. सांगितलं होतं की डोकं बुडवू नकोस म्हणून.''

''तू तर तीनतीनदा बुडवतेस? आम्हा मुलांना मात्र आडकाठी.''

शेवटी एकदाची संध्या व भागीरथीकाकू घरी आली. संध्येचे ओले झालेले केस पाहून आईने तिला मारले. संध्या रडू लागली. आजीने तिला जवळ घेतले. तरीही तिचे मुसमुसणे चालूच होते.

''आजी, का गं आईनं मारलं? काय मी पाप केलं? जरा केस ओले झाले, की का चूक?''

''अगं, केस ओले झाले तर पडसं होतं; आणि तसेच ओले राहिले तर मग उवा पडतात. केसात जटाही होतात. आईचं का तुझ्यावर प्रेम नाही?''

''माझ्यावर कुणाचं प्रेम नाही. संध्या कुणालाच नको. बाबा माझ्याशी कधीसुद्धा बोलत नाहीत. इतर मुलं माझ्याशी भांडतात. आई मला मारते. मोठी काकू मलाच काम सांगते. रोज मीच आपली भाजी चिरायची.''

''संध्ये, उद्या सासरी नको का सारं करायला यायला? भाजी नीट

चिरता आली पाहिजे. सारं शिकायला हवं, बाळ. नुसतं पुस्तकं वाचून नाही हो संसार करता येत?''

''म्हणून वाटतं मला शाळेतून काढलंत?''

''अगं, आता आणखी किती शिकायचं? बी. ए. व्हायचं आहे वाटतं? नोकरी का करायची आहे? उद्या लग्न करायला हवं. तरी का शाळेत ठेवायची?''

''माझं नकाच लग्न करू. मी का सर्वांना नकोशी झाले?''

''संध्ये, तू वेडी आहेस. मुलींची लग्न व्हायचीच.''

''मग जिथं भाजी चिरावी लागणार नाही, तिथं द्या मला.''

''भाजी साऱ्यांनाच लागते.''

''गरिबांकडे कुठं असते रोज उठून भाजी?''

''तुला का गरीब नवरा हवा?''

''हो.''

''काही तरी बोलतेस.''

''थोबाडीत द्या एक. तुम्ही तिला लाडावून ठेवली आहे. फाजिलपणं बोलायला सांगा. ऊठ. ती पाणी पिण्याची भांडी आण घासून आणि सोप्याचा केर काढ. ऊठ.'' तिकडून आई रागाने बोलली.

बिचारी संध्या उठली. तिने भांडी घासली. नीट लख्ख नाही निघाली, म्हणून पुन्हा चिंच लावून तिने ती घासली. भांडी आरशासारखी हवीत असे तिला वाटे.

''झाली की नाही घासून? भांडी घास म्हटलं, तिथंच घाशीत बसली. दुसरी कामं आहेत की नाहीत? उद्या सासरी तुझं कसं बाई व्हायचं?''

''आई, भांडी स्वच्छ नकोत का? बघ तरी कशी घासली आहेत ती? माझं तोंड त्यात दिसत आहे.''

संध्या स्वच्छतेची भोक्ती होती. इवलीही घाण तिला खपत नसे. स्वत:चे कपडे ती स्वत: धुवी. ती आपले स्वत:चे भांडे घाशी. तिची एक उशी होती. त्या उशीचा अभ्रा ती स्वच्छ ठेवी. तिला कोणतेही काम सांगा. ती ते निर्मळ नीटनेटके करी. केर काढील, तर इवलासासुद्धा राहू देणार नाही. भाजी चिरील, तर सुंदर व्यवस्थितपणे चिरील. सारे कौशल्य त्या चिरण्यात ओतील. पालेभाजी असली, तर पाने नीट जुळून घेऊन मग चिरील.

''संध्ये, किती तुझी टापटीप!'' आजी म्हणायची.

''परंतु वेळ लावील खंडीभर!'' चुलती म्हणायची.

''चांगलं काम पटकन कसं करता येईल?'' संध्या उत्तर द्यायची.

''काम चांगलं करून ते पुन्हा लौकर झटपट करता आलं पाहिजे.'' आजी समजूत घालीत म्हणायची.

''फुलं वाटतं झटपट फुलतात, फळं वाटतं झटपट पिकतात? आजी, मला आपला वेळ लागतो.'' संध्या शांतपणे सांगायची.

आणि त्या दिवशी भाजी चिरायला तिनं असाच किती तरी वेळ लावला.

''संध्ये, केव्हा गं आटपणार तुझी भाजी?'' चुलती त्रासून म्हणाली.

''संध्ये, उद्या नवऱ्याकडे गेलीस म्हणजे कसं होईल? त्याला घाईनं नोकरीवर जावं लागेल. दहाला पानं वाढावी लागतील. तू जर तासन्‌तास भाजीच चिरीत बसलीस, तर कसं व्हायचं? नवऱ्याला उपाशी जायची पाळी यायची, नाही तर त्याची नोकरी जायची. घरच्या बायकोला प्रसन्न राखील तर साहेबाची मर्जी खप्पा होईल!'' आजी हसून म्हणाली.

''आजी, नेहमी उठून तुमचं आपलं एक बोलणं की सासरी कसं होईल? मला नकोच सासर. नकोच लग्न. आणि केलंतच लग्न, तर नोकरीवाला नवरा मला देऊ नका. म्हणजे साहेबाची मर्जी जायची भीती राहणार नाही.''

''नोकरीवाला नको, तर कोण हवा? एखाद्या राजाची राणी होणार

आहेस वाटतं?''

''न व्हायला काय झालं?''

''कोणत्या गं राजाची?''

''शेतात काम करणाऱ्या राजाची.''

''कामं करणारे ते का राजे?''

''होय हो, आजी. ते मागं कोण बरं आले होते आपल्याकडे, ते बाबांजवळ नव्हते का म्हणत पुढंमागं शेतकऱ्यांचंच राज्य होईल, कामं करणाऱ्यांचं राज्य होईल, गरिबांचं राज्य होईल म्हणून! आणि त्यांच्याजवळून मी ते गाणं टिपून घेतलं आहे. त्यात नाही का

'भविष्य राज्य तुमारा मानो

ऐ मजदूरों और किसानो'

आजी, त्यांचंच हो पुढं राज्य होईल.''

''काबाडकष्ट करणाऱ्या गरीब राजाची तू राणी होणार एकूण?''

''साहेबाच्या गुलामाची होण्यापेक्षा गरिबाची होणंच चांगलं.''

''संध्ये, तू वेडी आहेस; वाटेल ते बोलतेस; मुलींनी स्वतःच्या लग्नाच्या गोष्टी बोलू नयेत.''

''माझ्या लग्नाचं मी नये बोलू? आजी, मी वेडी की तू वेडी? आजी, तुझी संध्या आता लहान का आहे? मला सारं समजतं; मी वेडी नाही.''

''बरं, राहिलं. मी वेडी हो. मी आता म्हातारी झाले; साठी बुद्धी नाठी. मीच वेडी हो.'' असे आजी खिन्नपणे म्हणाली.

आजीचा खिन्न स्वर ऐकून संध्येला वाईट वाटले. तिने आजीकडे पाहिले. आणि नंतर आजीच्या गळ्याला तिने मिठी मारली. आजीने तिला प्रेमाने जवळ घेतले.

✦✦✦

२...

# कल्याण व संध्या

कल्याण मोठा हूड होता. त्याच्या सुपाणी गावात त्याच्यासारखा खेळकर मुलगा नव्हता. सुपाणी गावालाही भीमा होती. भीमेचे पवित्र पाणी त्या गावाला मिळे, म्हणून का सुपाणी नाव? कल्याणचे शरीर गोटीसारखे होते. त्याचा वर्ण काळासावळा होता. तोंड वाटोळे होते. डोळे मोठे व काळेभोर होते. त्याला पाहताच प्रेम वाटे. मोह वाटे. आरोग्याचे उत्कृष्ट सौंदर्य त्याच्याजवळ होते. गावातील मुलांचा तो म्होरक्या होता. तो नवीन नवीन खेळ शोधून काढी. मुलांना कवायत शिकवी. पोहण्यात तो पटाईत होता. भीमेला पूर यावा व कल्याणच्या हृदयालाही पूर यावा. तो लहान होता. परंतु भीती ही त्याला ठाऊक नव्हती. भीमेचे सहस्त्रावधी तरंग त्याला जणू नाचवीत. एखाद्या मुलाप्रमाणे तिच्या फेसाळ पाण्यावर तो तरंगे. भित्र्या मुलांना तो धीट करी, त्यांना उड्या टाकायला लावी. कल्याण म्हणजे भेकडांना शूर करणारा, रडक्यांना हसवणारा, दुबळ्यांना झुंजार करणारा. तो घरबश्या मुलांना बाहेर काढी, व खेळायला लावी. कल्याण म्हणजे मूर्तिमंत उत्साह; मूर्त स्फूर्ती, मूर्त ज्योती. नवभारताचा तो अभिनव युवक होता. उगवत्या भारतभाग्यसूर्याचा

तो अरुण होता.

उडगी गाव सुपाणी गावाहून फार दूर नव्हता. उडगी गावची मुले कल्याणला कवायत शिकविण्यासाठी बोलावीत. कल्याण जाई. तेथील मुलांचाही तो आवडता झाला. कधी कधी उडगी गावातील रस्त्यातून तो मुलांना कवायत करीत नेई. ती व्यवस्थित जाणारी तुकडी पाहून सर्व स्त्रीपुरुषांना आनंद होई. संध्याही रस्त्यावर येऊन बघे. कधी सुपाणी गावची मुले उडगी गावी येत व उडगी गावची मुले सुपाणीस जात. अशा वेळेस संयुक्त कवायत होई. रंग चढे. उडगी व सुपाणी गावांतील खेळाडूंचे कधी खेळ होत व पाहायला पुष्कळ मंडळी जमे.

असा हा कल्याण वाढत होता. त्याचे वय सोळा–सतरा वर्षांचे होते. तो कुस्ती छान खेळे. पळण्यातही तो पहिला येई. परंतु अलीकडे कल्याण बाहेर पडेनासा झाला. त्याच्या गावात इंग्रजी पाचवीपर्यंत शाळा होती. त्याची पाचवी इयत्ता झाली. पुढे पुण्याला शिकावयास जावे असे त्याच्या मनात होते; परंतु वडील पाठवीनात. तो दुःखी झाला.

गावातील मुलांना संध्या विचारी, की तो कल्याण का येत नाही?

''तो घरातून बाहेर पडत नाही,'' असे मुले सांगत.

असे काही दिवस गेले आणि एक प्रसंग आला. उडवी गावात मोठ्या प्रमाणात खेळ व कुस्त्या करण्याचे काही हौशी मंडळींनी ठरविले. कल्याणची स्वयंस्फूर्ती जागी झाली. त्याने अठरा वर्षांच्या आतील मुलांच्या कुस्त्यांत नाव दिले.

''संध्याताई, कल्याण कुस्तीसाठी येणार आहे. त्यानं नाव दिलं आहे.'' एका मुलाने सांगितले.

''खरंच?''

''हो.''

''कल्याण कुस्तीत विजयी होईल.''

''कशावरून?''

''मला आपलं वाटतं.''

''तू येणार आहेस खेळ पाहायला?''

''हो, शाळेतील मुली एका बाजूला बसणार आहेत. त्यांत मी जाऊन बसेन.''

''परंतु तुला बसू देतील का? तू शाळेत थोडीच आहेस?''

''मी बाईंना विचारलं आहे. त्या म्हणाल्या ये. मी का मोठी आहे? माझं लग्न थोडंच झालं आहे!''

तो मुलगा हसला व गेला. माझा कल्याण येणार, कल्याण येणार, असे म्हणत संध्याही नाचत नाचत निघून गेली. तिचा कल्याण? कल्याण तिचा केव्हा झाला होता? पण कुणाचे केव्हा होते, ते का ठरलेले असते? ते का त्या त्या व्यक्तींना तरी कळते?

''कल्याण, तू जाऊ नकोस. अलीकडे खेळायला तू जात नाहीस. घरात बघतोस; कुस्तीत पडशील.'' त्याची आई म्हणाली.

''कल्याण का कधी पडतो? कल्याण म्हणजे रामाचा अमोघ बाण. कल्याण पडेल तर जगाचं कसं होईल? कल्याण नेहमी विजयी होईल.'' तो हसून आईला म्हणाला.

''परवा तर वरती खिडकीत बसून रडत होतास!''

''काही तरीच. कल्याण कधी रडणार नाही. एके दिवशी सारी मुलं मला चिडवीत होती. मी रडेन असं त्यांना वाटलं. परंतु मी रडलो नाही. ते चिडवीत, तर मी हसे. शेवटी चिडवणारेच चिडले. आई, तुझा कल्याण रडका नाही.

मला नेहमी हसू येतं. बघ, तूसुद्धा हसलीस. कुस्तीत मी विजयी होईन. बक्षीस मिळवीन व तुला आणून दाखवीन.''

कल्याण पुन्हा पूर्वीसारखा आनंदी दिसू लागला. त्याच्या मित्रांना आनंद झाला. आणि त्या दिवशी ते सारे उडगी गावी गेले. हजारो लोक जमले होते. खेळ झाले. मोठमोठ्या वस्तादांच्या कुस्त्या झाल्या. शेवटी अठरा वर्षांच्या आतील मुलांच्या कुस्त्या होत्या. कल्याणच्या नावाचा पुकारा झाला. लंगोट कसून तो पुढे आला. तरुणांनी टाळ्या वाजविल्या. संध्या एकदम उभी राहिली. परंतु इतर मुलींनी तिला बसविले.

सलामी झाली. गडी भिडले. विजेचे पाते लवते न लवते तो कल्याणने गडी चीत केला. तो विजयी झाला. विजयी झालेल्या बालवीरांच्या पुन्हा कुस्त्या लावण्यात आल्या. असे करीत करीत शेवटच्या जोडीतही कल्याणच विजयी झाला. प्रेक्षकांनी त्याचे कौतुक केले.

बक्षीस–समारंभ झाला. कल्याणला चांदीची ढाल मिळाली. त्याला इतरही बरीच पदके मिळाली. उडगी व सुपाणी गावचे मित्र त्याच्याभोवती उभे होते. गर्दी जाऊ लागली. कल्याण आपल्या गावच्या मित्रांसह परत निघाला. इतक्यात तेथे संध्या आली. तिच्या हातात माळ होती.

''ही घ्या तुम्हाला माळ.'' ती म्हणाली.

''मला?'' कल्याणने विचारले.

''हो, विजयी वीराला. तुम्ही विजयी व्हाल असं मला आधींपासूनच वाटत होतं. तुम्ही कुस्तीत नाव दिलं आहे असं मला कळलं, तेव्हाच मी म्हटलं की कल्याण विजयी होईल. म्हणून माळ करून आणली होती.''

''तुम्ही मला ओळखता?''

''हो, आमच्या गावात तुम्ही कवायत शिकवायला येत असू. रस्त्यातून

एक–दोन करीत गाणी गात जात असां. मी तुम्हाला पाहात असे. मला वाटे आपणही जावं कवायत करायला.''

''मग का नाही आलात?''

''लोक हसतील म्हणून!''

''भित्र्या आहात तुम्ही. भित्र्याजवळची माळ मला नको.''

''तशी मी शूर आहे.''

''चल रे कल्याण, पोरीबरोबर काय बोलतोस?'' मुले म्हणाली.

''पोरी म्हणजे, तुच्छ वाटतं, वाईट वाटतं?'' संध्येने विचारले.

''परंतु लोक नाव ठेवतील.'' कल्याण म्हणाला.

''तुम्हीही लोकांना भिता एकूण? कुस्ती करणारेही भितात तर?''

''जातो मी.''

''माझी माळ? ती परत ना देत होतेत?''

''ती मी ठेवीन.''

''वाळली तरी? सुकली तरी?''

''हो.''

''वेडेच दिसता.''

कल्याण व त्याचे मित्र हसत निघून गेले. संध्या तेथेच उभी होती. कल्याणने मागे वळून पाहिले. तरी संध्या तेथेच. कल्याणचे मित्र हसले. तो लाजला, रागावला, गंभीर झाला. तो बोलेना.

''कल्याण, बोलत रे का नाहीस?''

''तो आता कशाला बोलेल!''

''तो आजचा विजयी वीर आहे.''

''किती पदकं मिळाली.''

''–आणि ढाल!''

''–आणि शेवटीं सुंदरशी माळ!''

''कल्याण, काढ की ती माळ आता गळ्यातून.''

''अरे, ती काही लग्नाची माळ नाही.''

''परंतु कल्याणला लग्न मुळी करायचच नाही.''

''आणि एवढ्यात का लग्न?''

''कल्याणचं सोळा–सतरा वर्षांचं वय.''

''अभिमन्यू लग्नात सोळा वर्षांचाच होता.''

''कल्याण, बोल ना रे!''

''तू का खरंच पुण्याला जाणार आहेस?''

''सांग ना रे!''

''काय सांगू?'' कल्याण शेवटी एकदाचा बोलला.

''तू आम्हाला सोडून खरंच का जाणार?''

''होय, माझा हट्ट बाबा पुरवणार आहेत. चुलत्यांचीही शिकण्यासाठी मला ठेवायची इच्छा आहे. पुण्याला जाईन तर छान होईल.''

''काय करशील?''

''शिकेन. माझ्या मनात किती किती तरी येत असतं. कधी कधी वाटतं, देशासाठी मरावं.''

''आपण अजून लहान आहोत.''

''खुदीराम का मोठा होता? हसत फाशी गेला. माझा जन्म सफल झाला. असं गाणं म्हणत तो फाशी गेला.''

''कल्याण, तू गेलास म्हणजे आम्हाला कोण?''

''नवीन नवीन खेळ कोण शिकवील?''

''पुरात पोहायला कोण नेईल?''

''वनभोजनांचे बेत कोण करील?''

''दऱ्याखोऱ्यांतून फिरायला कोण नेईल?''

''कल्याण, तू नको जाऊस. तू आमचा नायक.''

''तू आमचा प्राण.''

''तू आमचा आनंद.''

''तू खरा सोबती.''

''तुझ्यावाचून सारं ओस होईल.''

''आम्हाला करमणार नाही.''

''कल्याणं, नको रे जाऊस!''

''वेडे आहात तुम्ही. अरे, मी पुण्याला जाईन, तर नवीन नवीन गोष्ट शिकेन. मला नवीन विचार मिळतील. इथं पहिलवान झालो. तिथं विद्वान होईन. डोकं मिळवीन. तुमचा बालमित्र बुद्धिमान व्हावा असं तुम्हाला नाही वाटत? मग मी सुट्टीत आल्यावर तुम्हाला नवीन विचार देईन. मग आपण विचारांचं वनभोजन करू विचारांचं वनभोजन. जाऊ दे मला पुण्याला. तिथं मोठे मोठे लोक पाहीन. मोठे मोठे पुढारी पाहीन. जवाहरलाल पाहीन. माझ्या मनात खूप खूप येतं; तुम्हाला काय सांगू, किती सांगू?''

''कल्याण, तू जा पुण्याला. मोठा हो तू. आमचा राजा हो व आम्ही तुझे वानर. करू मग लंकेची होळी, करू रावणांना दूर.''

''कुठं आहेत रावण?''



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरल)
नगर वाचनालय, सातारा.

''अरे, जे जे छळतात ते सारे रावणच. गरिबांना खायला नसताना जे बंगले बांधतात, ते रावण.''

''कल्याण, कुठं रे असं बोलायला शिकलास?''

''माझ्या मनाजवळ. मी डोळे उघडे ठेवून वागतो. आजूबाजूचं जग पाहतो. आपल्या गावातील गरिबांची दशा तुम्ही नाही का पाहिलीत? बिचारे मर मर मरतात. परंतु त्यांना खायला नाही.''

''आणि कल्याण, मागं मोठा पाऊस पडला तेव्हा महारवाड्यातील झोपड्या पडल्या. त्यांना ना आधार ना आश्रय. कधी रे ही अस्पृश्यता जाईल?''

''आपण दवडू तेव्हा. तुम्हा–आम्हाला धैर्य नाही. त्या दिवशी अस्पृश्य मित्रांना मी घरी आणलं म्हणून बाबांनी मला मारलं; ज्या घरात गरिबांची मुलं घेता येत नाही, त्या घरात राहू नये असं मला वाटतं. खरं म्हणजे माझ्या आईसाठी मी सारं सहन करतो. तिला वाईट वाटू नये म्हणून मी जपतो; बाबा दुष्ट आहेत.''

''कल्याण, वडिलांना असं का बोलावं?''

''वडील म्हणून मी त्यांचे पाय धरीन. पण गरिबांची बाजू जर ते घेणार नसतील, तर त्यांचा मी तिरस्कार करीन. नकोच इथं घरी राहणं कोंडमारा सारा; पुण्याला जाऊ दे.''

''पण पुण्याला तरी तुझे चुलते तुला मोकळेपणा देतील का?''

''न देतील तर मी मोकळा होईन; स्वतंत्र होईन.''

''राहशील कुठं, जाशील कुठं?''

''मोठ्या शहरात मित्र मिळतील. कुठं काम करीन नि खाईन.''

''कोणतं रे करशील काम?''

''पडेल ते.''

"तुला कुस्तीशिवाय काय येतं?"

"मला कल्हई लावता येते; भांडी घासता येतात; धुणी धुता येतात; पाणी भरता येतं."

"तू का कल्हई लावशील?"

"हो."

"असलं हलकं काम."

"कोणतंही काम हलकं नाही. दुसऱ्याला पिळून जगणं म्हणजे मात्र हलकटपणा. श्रमानं जगणाऱ्याला तुच्छ मानणं म्हणजे हलकटपणा. श्रम करणं हीच पवित्र वस्तू. प्रामाणिकपणाचा कोणताही उद्योग तुच्छ नाही. भीक मागण्यापेक्षा, दुसऱ्यांवर विसंबून राहण्यापेक्षा समाजाच्या उपयोगाचा कोणताही धंदा श्रेष्ठ आहे."

"कल्याण, तुला असं बोलायला कुणी शिकवलं?"

"तू अलीकडे खिडकीत एवढा बसत असतोस. त्यावेळी वाटतं हे ज्ञान तुला मिळालं?"

"मला नाही रे माहीत."

असे बोलत बोलत ते सारे मित्र आपल्या सुपाणी गावी आले. कल्याण आपल्या घरी गेला. त्याचा लहान भाऊ रंगा तेथे धावतच आला.

"दादा, तुला बक्षीस मिळालं?"

"होय रंगा. ही बघ ढाल, ही पदकं."

"मला देशील का एक पदक?"

"एक रे का? ही सारीच घे. माझं ते तुझंच आहे."

"आणि हे रे काय रुमालात?"

''फुलांची माळ.''

''तू पुढारी झालास वाटतं?''

''मी तुझा भाऊ आहे.''

''कोणी दिली माळ?''

''गर्दीत कोणी तरी घातली. माझं नव्हतं लक्ष.''

''आई, दादाला बघ किती पदकं!''

''आई, तुझा आशीर्वाद म्हणून मी विजयी झालो.''

''बाळ, तू पुण्याला गेलास म्हणजे कुस्त्या खेळत जाऊ नकोस. नदींत जाऊ नकोस. मला तुझी नेहमी काळजी वाटते.''

''आई. तुझा आशीर्वाद असला म्हणजे मी नेहमी सुखी असेन.''

''आई, दादा का खरंच पुण्याला जाणार?''

''होय.'' असे म्हणून आई रडू लागली.

''हे काय आई? रडू नकोस. मी पुण्याला जाऊन हुशार होईन.''

''कल्याण, तुझे चुलते कठोर आहेत. तुझी काकू निष्ठूर आहे. तिला स्वतःच्या मुलांबाळांचीही माया नाही.''

''अशी आई जगात का असू शकते?''

''जगात बाळ, सारे चमत्कार आहेत.''

''स्वतःच्या मुलांबाळांवर प्रेम न करणारा कधी कधी दुसऱ्याच्या मुलाबाळांवर प्रेम करतो. असाही चमत्कार होतो.''

''तुझ्या बाबतीत तो खरा ठरो.''

असे म्हणून आईने कल्याणच्या पाठीवरून हात फिरविला. त्या साऱ्या पदकांपेक्षा तो आईचा हात त्याला सहस्त्र पटीने अधिक मौल्यवान वाटला.

पुण्याला गेल्यावर कोण फिरवणार असा पाठीवरून हात, असे त्याच्या मनात आले. आई आता कामाला गेली. रंगा दादाची बक्षिसे घेऊन शेजारी दाखवावयास गेला. आणि कल्याण माडीवर गेला. तो त्या खिडकीत बसला. ती फुलांची माळ त्याच्या हातात होती. त्याने आतापर्यंत त्या फुलांचा वास घेतला नव्हता. आता त्याने त्यांचा वास घेतला. ती माळ त्याने आपल्या ट्रंकेत ठेवून दिली. गोड, सुगंधी, प्रेमळ माळ! कल्याण जाणार होता. म्हणून किती जणांना जरी वाईट वाटत होते. त्याची शाळा बंद झाल्यापासून तो नेहमी हिंडत असे. गरिबांच्या वस्तीत जाई. अस्पृश्यांच्या वस्तीत जाई. तेथील लहान मुलांना ती खोऊ देई. कल्याण दिसताच ती सारी मुले त्याच्याभोवती जमत.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले
नगर वाचनालय सातारा
दाखल ११८०१७ अनुक्रमांक ९१८४०४
किंमत २०७/- पाने ३५४

''काय आणलात खाऊ?''

''खारीक की वडी?''

''गूळ–खोबरं असेल नाही तर?''

असे ती मुले विचारीत. कल्याण त्या सर्वांचा आवडता होता.

एके दिवशी वडिलांनी त्याला हाक मारली.

''काय बाबा?''

संध्या / साने गुरुजी

''येत्या शनिवारी तुझी पुण्याला रवानगी करणार आहे. तिथं नीट अभ्यास कर. चुलत्यांचं ऐकत जा.''

''अभ्यास करीन, नीट राहीन.''

''फार उनाडू नकोस. नुसती तालीम करून पोट भरणार नाही.''

''मॅट्रिक होऊन तरी काय भरतं? मी काही नोकरीसाठी नाही शिकू इच्छित.''

''फाजिलपणं बोलू नकोस!''



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

''मनातील विचार तुमच्यापासून का लपवू?''

''तुझ्यापेक्षा मला अधिक समजतं. तयारी करून ठेव.''

''बरं.''

कल्याण आपल्या खोलीत गेला व त्या खिडकीशी बसला. भीमेचा रम्य प्रवाह त्या खिडकीतून दिसत होता. तो सारखा त्या खिडकीकडे पाहात होता. त्याला तेथे स्वतःच्या जीवनाचा प्रवाह का दिसत होता? भीमा पुढे कृष्णेला मिळाली. त्याप्रमाणे आपल्या जीवनाच्या प्रवाहाला कोणते प्रवाह उद्या मिळणार? या कल्याणचा जीवनप्रवाह असाच राहील की विशाल होईल? पुण्याला गेल्यावर कोण भेटणार, कोण नवीन मित्र मिळणार? पुण्याला आपले कसे होणार? कोणते अनुभव येणार? असे का त्याच्या मनात विचार येत होते?

त्याने आपली ट्रंक उघडली. सुगंध आला. सौम्य गोड सुगंध. वाळलेल्या फुलांचा सुगंध. काय बरे त्या मुलीचे नाव? माझे नाव तिला माहीत आहे. परंतु मला तिचे नाव माहीत नाही. मी विचारले होते का तिला नाव? काय बरे तिचे नाव? मला तिने हार दिला. का दिला? सहजपणे दिला? पूर्वजन्मीचे का ऋणानुबंध आहेत? हा का पूर्वजन्मीचा सुगंध? सोळा-सतरा वर्षांचा कल्याण खोल पाहू लागला. त्याने डोळे मिटले. पुन्हां डोळे उघडून त्या नदीकडे तो पाहू लागला.

शुक्रवारी दुपारी कल्याण आईला म्हणाला,

''आई, मी शेजारच्या उडगी गावी जाऊन येतो. तिथं एका मित्राला मला भेटायचं आहे. सायंकाळी परत येईन.''

''लौकर ये. रात्र करू नको. आज चांदण नाही हो.''

''आई, माझ्या मनात सदैव चांदणंच असतं.''

''शेवटपर्यंत असंच राहो. अवसेचा अंधार कधी न येवो.''

कल्याण उडगी गावी जायला निघाला. त्यानं दुसऱ्या कोणालाही सांगितले नाही. त्याच्या अंगांत पहिलवानी पेशाचा पातळ सदरा होता. हातात जाड सोटा होता. प्रेमळ पहिलवान गावच्या बाहेर पडला. किती तरी विचार त्याच्या मनात येत होते. तो जिच्यासाठी जात होता, तिचे नाव त्याला माहीत नव्हते. तिचे घर त्याला माहीत नव्हते. प्रेम आपल्याला रस्ता दाखवील या आशेने जणू तो जात होता. कोठे तरी ती दिसेल. ती नसेल का आपली वाट पाहात? कशी हसे! किती गोड! आणि पुन्हा कशी धीटपणे बोले.

कल्याण त्या उडगी गावात आला. तो निरनिराळ्या गल्ल्यांतून व रस्त्यांतून हिंडत होता. काही ओळखीची मुले त्याला भेटली. परंतु त्याचे लक्ष त्यांच्याकडे नव्हते. त्या मुलीविषयी तो त्यांना काय विचारणार? त्याला धैर्य झाले नाही. तो निरनिराळ्या मोठमोठ्या घरांकडे पाही. परंतु इच्छित वस्तू त्याला कोठेही दिसली नाही. शेवटी उडगी गावातील ओळखीच्या मुलांचा निरोप घेऊन तो गावाबाहेर पडला. कोठे तरी तो जाऊ लागला. त्याचे चित्त ठिकाणावर नव्हते. शेवटी एका झाडाखाली तो बसला. त्याला झोप येऊ लागली. झाडाच्या बुंध्यावर डोके ठेवून तो निजला. झोपेत त्याला स्वप्न दिसले, स्वप्नात त्याला ती मुलगी दिसली. तो गोड हसला व हळून त्याने डोळे उघडले. तो समोर खरोखरच ती मुलगी. हे स्वप्न का सत्यदर्शन? कल्याण बघतच राहिला!

'किती जाड व जड ही तुमची काठी?''

''तुम्ही ती कशाला उचललीत?''

''तुमची म्हणून.''

''मुला तुम्ही ओळखलंत?''

''विजयी वीराला कोण नाही ओळखणार? त्याला सारं जग ओळखतं, तो मात्र जगाला ओळखत नाही.''

''मी या गावी का आलो?''

''असेल काही काम.''

''कोणतं बरं?''

''कवायतीचं.''

''नव्हे.''

''मग कोणतं?''

''ओळखा; सांगा.''

''मला काय माहीत?''

''माझी काठी द्या.''

''माझ्याही हातांना तिची सवय होऊ दे.''

''ती काठी नुसती हातात धरायची नसते.''

''मग तिनं काय करायचं?''

''ती दुष्टांच्या डोक्यात घालायची असते.''

''कुठं आहेत दुष्ट?''

''सारं जगच दुष्ट आहे.''

''मीसुद्धा? तुम्हीसुद्धा?''

''जो जगाला छळतो, तो दुष्ट.''

''त्या दुष्टाला देव शिक्षा करील.''

''देव? कुठं आहे देव?''

''काय, देव नाही?''

''तुम्ही पाहिला आहे?''

''पाहिला नसला तरी तो आहे.''

''सारा भोळसटपणा. देवबीव सारं झूट आहे. देव काही करीत नाही. सारं बरंवाईट मनुष्यच करतो. देवाची ब्याद कशाला उगीच मध्ये?''

''देवाला नाव नका ठेवू. तुम्ही तरी नका ठेवू.''

''का?''

''मला वाईट वाटेल, रडू येईल.''

''गरिबांबद्दल तुम्हाला कधी रडू येतं का?''

''तशी अद्याप मी रडले नाही.''

''गरिबांसाठी ज्याला रडू येत नाही, तोच देवासाठी रडतो.''

''मला तुमच्यासाठी रडू येईल.''

''माझ्यासाठी?''

''हो.''

''का बरं?''

''की इतका चांगला मल्ल देवाला मानीत नाही म्हणून.''

''निरोगी मनुष्याला औषध नको. निरोगी मनाला देव नको. देव म्हणजे दुबळ्याची काठी.''

''काठी हाती असणं म्हणजे का दुबळेपणा?''

''नाही तर काय?''

''मग हा सोटा तुम्ही हातात घेता, तो दुबळेपणामुळं, भ्याडपणामुळंच का? भित्रे आहात एकूण तुम्ही? पहिलवान आणि भित्रे?''

''तुम्ही बसा ना.''



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

''मी का फार मोठी बाई आहे? मला 'तुम्ही' असं का म्हणता?''

''आणि मीही का फार मोठा आहे? सोळा–सतरा वर्षांचा मी!''

''चौंदा–पंधरा वर्षांची मी.''

''एवढ्याशा वयात तू बोलतेस फटाकडी!''

''आजी म्हणते की मी बॅरिस्टरला हटवीन.''

''मग माझी काय कथा?''

''तुम्ही इकडे कुठं आलेत आज?''

''मला का 'तुम्ही' म्हटलंस!''

''आपोआप तोंडातून 'तू' आलं तर त्यांत मौज असते. तुमच्या तोंडून 'तू' आलं. माझ्या तोंडून नाही असं येत. मला तुमच्याविषयी आदर वाटतो.''

''आणि मला तुझ्याविषयी काय वाटतं!''

''ते मी कशी सांगू?''

''तुझं नाव काय?''

''संध्या.''

''संध्या?''

''हो.''

''ते पाहा आकाश कसं रंगलं आहे.''

''संध्याकाळ होत आली म्हणजे आकाश रंगतं.''

''मी आता जातो.''

''कुठं?''

''घरी सुपाणीला.''

''आलेत का नि चाललेत का?''

''ज्या कामासाठी आलो होतो ते झालं.''

''कोणतं काम?''

''तुझं नाव विचारायचं.''

''या झाडाखाली झोपून माझं नाव कळणार होतं वाटतं?''

''सारा गाव भटकलो व इथ येऊन निराशेनं झोपलो.''

''आणि इथं आशा सफल झाली. या झाडाखाली आपली भेट झाली.''

''संध्ये?''

''काय?''

''आता आपण परत कधी भेटू?''

''असेच येत जा.''

''मी उद्या पुण्याला जाणार.''

''का?''

''शिकायला?''

''शिका, खूप शिका.''

''शिकून काय करू ?''

''ते मी काय सांगू ?''

''पुण्याला गेल्यावर काय होतं पाहावं. माझ्या मनात अनेक विचार येतात.''

''कसले विचार?''

''देशासाठी तुरुंगात जावं, देशासाठी मरावं.''

''देशासाठी जगा, देशासाठी झिजा.''

''कां जगावं, कसं झिजावं?''

''ते पुण्याला गेल्यावर तुम्हाला कळेल.''

''संध्ये?''

''काय?''

''माझं नाव काय?''

''कल्याण.''

''माझं नाव विसरणार नाहीस?''

''नाही.''

''खरंच?''

''हो; आणि माझं नाव?''

''तुझं नाव संध्या. मी ते विसरणार नाही.''

''आपण अजून लहान आहोत. तुम्ही लहान आहात.''

''पुढं मोठी होऊ.''

''कल्याण, तू पुण्याहून मला पत्र पाठव.''

''तुला वाचता येतं?''

''मी का अडाणी आहे? किती तरी पुस्तकं मी वाचली आहेत. मला मराठी येतं व कानडीही येतं. घरी लायब्ररी आहे, वर्तमानपत्रं येतात.''

''संध्ये, आता मी जातो.''

''एकटे जाल?''

''हातात हा सोटा आहे.''

''आणखी कोण आहे बरोबर?''

''मनात संध्या आहे.''

''कल्याण!''

''काय?''

''आपण लहान आहोत.''

''ते बघ संध्ये रंग; बहारीचे रंग.''

''कुठं?''

''अगं, आकाशात. तुला कुठं वाटले?''

''तुमच्या तोंडावरसुद्धा रंग आहेत.''

''आणि तुझ्या नाहीत वाटतं?''

''ते तुम्हालाच माहीत.''

''संध्ये!''

''काय?''

''मी तुला एक गंमत देऊ?''

''हं, दे.''

''ही घे!''

''फोटो.''

''कुणाचा?''

''कल्याणचा फोटो; किती छान आहे.''

''तुझा आहे का फोटो?''

''नाही; तुला काढता येतो?''

''हो.''

''मग काढ व ने.''

''तू डोळे मीट म्हणजे मी काढतो.''

संध्येने खरेच डोळे मिटले. कल्याण तिच्याकडे पाहात होता.

''उघडू का डोळे?''

''थांब जरा!''

कल्याण पाहात होता.



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

''किती वेळ मिटायचे तरी?'' असे म्हणून तिने डोळे उघडले.

''छान निघाला फोटो.''

''पण डोळे मिटलेले आले ना?''

''तू डोळे मिटले होतेस तरी तुला दिसत होतं की नाही?''

''हो.''

''काय दिसत होतं?''

''तुम्ही दिसत होतेत.''

''म्हणजे तुझे डोळे उघडे होते एकूण!''

''आत उघडे होते. परंतु माझा फोटो काढलात तो दाखवा ना? पाहू दे मला.''

''संध्ये, तू वेडी आहेस. अगं, मी तुझा फोटो माझ्या मनात काढला.''

''मनात?''

''हो.''

''वा, छान; म्हणजे फुटणार नाही, फाटणार नाही, मळणार नाही. तो दुसऱ्या कुणाला मिळणार नाही. त्याला फ्रेम करायची जरूर नाही. गंमतीचा फोटो. खरं ना कल्याण!''

''कशी छान बोलतेस.''

''आजीसुद्धा मला असंच म्हणते. तुम्ही पुण्याला गेलेत म्हणजे परत कधी याल?''

''मोठा होईन तेव्हा.''

''कधी व्हाल मोठे?''

''तू मोठी होशील तेव्हा.''

''मी आजच आहे मोठी.''

''काहीतरीच.''

''मी आता जाते. कल्याण, पत्र पाठव. लौकर नको हो मोठा होऊस.''

''तू सुद्धा लौकर नको मोठी होऊ. नाही तर जाशील सासरी. करतील तुझं लग्नं.''

''लग्न?''

''मोठी झालीस म्हणजे लग्न नाही का करणार?''

''माझं लग्न नाहीच होणार.''

''वेडी आहेस.''

''तुमचंसुध्दां होईल का लग्न?''

''माणसं मोठी झाला म्हणजे त्यांची लग्न होतात.''

''मग आपण लहानच राहू.''

''तें का आपल्या हातात असतं?वय वाढतं.''

''खरंच.''

''संध्ये, आता मी जातो. माझ्या पत्राचं उत्तर पाठवशील ना?''

''पाठवीन. माझं अक्षर छान आहे.''

''कोण म्हणतं?''

''आमचे काका म्हणतात.''

''संध्ये, तूं सर्वांची आवडती असशील?''

''आजीची आहे.''

''आणखी कोणाची?''

''ते नाही माहीत.''

''तूं मलाही आवडतेस.''

''एकदम का कुणी कुणाला आवडतं?''

''मग मी का खोटं सांगतो?''

''असं कुठं मी म्हटलं?''

''जातो आता मी. संध्ये, ते बघ आकाशात रंग.''

''रंग बघत बघत जा. शेवटी रंग जातील व अंधार राहील.''

''अंधारात लाखो नक्षत्रं दिसतील. अंधारातच आकाशाची खरी मौज. संध्ये, प्रकाशापेक्षा संध्याकाळ सुंदर व संध्याकाळापेक्षा रात्र सुंदर.''

''जा आता. जपून जा; अंधारांतून जपून जा.''

''तूही जा.''

''माझं घर जवळ आहे. तुला लांब जायचं आहे.''

''तुला घरी रागावतील.''

''मारतीलसुद्धा.''

''संध्येला मार?''

''त्यात काय आश्चर्य? तुम्हाला नाही कुणी रागं भरत?''

''बाबा तर नेहमी रागावतात.''

''जा मग लौकर घरी. तुमची बांधाबाध करायची असेल.''

''बाधांबांध करून ठेवली व इकडे आलो.'

''तुमची टंक असेल?''

''हो.''

''काय आहे त्या ट्रंकेत?''

''कपडे, पुस्तकं,पदकं,ती माझी माळ.''

''आणखी काय आहे?''

''माझे व माझ्या मित्रांचे फोटो.''

''आणखी काय आहे?''

''टाक, पेन्सिली, वह्या.''

''झालं सारं?''

''आणखी काय बरं आहे?''

''आणखी काही नाही?''

''हो. खरंच. एक आणखी जंमत आहे.''

''कसली जंमत?''

''तू त्या दिवशी मला माळ घातलीस, ती आहे. रुमालात बांधून ठेवली आहे. ट्रंक उघडताच अद्याप वास येतो.''

''अजून वास येतो?''

''मला तरी येतो.''

''कल्याण, जा आता. उशीर झाला.''

''तूही जा आता. मोठी होऊ तेव्हा भेटू. पोरकटपणा जाईल तेव्हा भेटू. आज लहान आहोत.''

संध्येकडे पाहात कल्याण गेला व कल्याणकडे मागे वळून पाहात संध्या गेली. कल्याणच्या जीवनात संध्येचा तारा चमकू लागला व संध्येच्या जीवनात कल्याणचा.

◆◆◆

३...

## शाळेवर झेंडे

१९३० चा सत्याग्रह सुरू होता. देशभर प्रचंड चळवळ सुरू झाली होती. खेडीपाडीही उठली. मग पुण्यासारख्या शहरात किती उत्साह असेल त्याची कल्पनाच करावी. एक प्रकारचे नवतेज राष्ट्रांत संचरले होते. पुण्याला पेठापेठातून स्त्री–पुरुषांच्या, मुलांमुलींच्या प्रचंड प्रभातफेऱ्या निघत होत्या.

''विश्वास, माझ्या शाळेवर आज मी झेंडा लावणार आहे. काय होईल ते होवो. येऊन जाऊन काय करतील, शाळेतून काढून टाकतील, टाकू दे काढून. त्याची कशाला हवी भीती.''

''कल्याण, तुझ्या शाळेवर तू लाव. माझ्या शाळेवर मी लावीन.''

''विश्वास, तू नकोस या फंदात पडू. तुझ्या घरी कळलं तर वडील तुला बोलतील, मारतील.''

''बोलणी ऐकायची व मार खायची मला सवयच आहे. त्यावरच हा विश्वास पोसला आहे. त्यात नवीन काय आहे.?

''विश्वास , किती रे तुला कष्ट! सकाळी चार वाजता उठायचं; गाईम्हशींचं

शेण काढायचं. दुधं काढायची. ती वाटायची. क्षणाची तुला विश्रांती नाही. ज्या वयात वाढायचं, त्या वयातच तुझी आबाळ. शेणाचे डाग पडलेले कपडेच अंगात घालून तुला शाळेत जावं लागतं. ना रिठे, ना साबण. विश्वास, तू बंड का करीत नाहीस?''

''बंड करून कुठं जाऊ?''

''आणि त्यात पुन्हा तुझी सावत्र आई.''

''कल्याण, माझी आई सावत्र असली, तरी सख्ख्या आईपेक्षा ती माझं अधिक करते. तिला नको नाव ठेवू. ती आधी मला खाऊ देते व मग स्वत:च्या मुलांना देते. ती माझ्यासाठी रडते. वडील मला मारू लागले तर तिच्या डोळ्यांत धारा लागतात. सावत्र आईला कोणी नावं ठेवली तर मला संताप येतो. सावत्र आईची निंदा करायची रुढीच पडली आहे!!''

''विश्वास, तुझी सावत्र आई अपवाद समजू. दुसऱ्यांच्या मुलांवर प्रेम करणं सोपं नाही. आपल्या मुलांच्या इस्टेटीत उद्या भागीदार होणारी सावत्र मुलं कोणाला बघवतील? हा मनुष्यस्वभाव आहे. मनुष्यस्वभावाला ओलांडून पलीकडे जाणारी तुझ्या आईसारखी एखादीच थोर स्त्री असते. परंतु तो नियम नाही ''

'' ते जाऊ दे. माझी कर्मकथा पुरे. शाळेवर आज झेंडे लावायचे.''

'' विश्वास, मी लावीन. परंतु तू नको लावूस. हेडमास्तरांनी मारलं तर मी डरणार नाही. मी तालीमबाज आहे. तुला मार सोसवणार नाही.''

''परंतु घरी मार खायची सवय असल्यामुळ माझं हे लहानसं शरीर माराला कधी भीत नाही. आणि कल्याण, मी आज झेंडा लावायची प्रतिज्ञाच केली आहे. हरिणीजवळ मी तसं म्हटलंसुध्दा.''

''केव्हा?''



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

''आज सकाळी दूध घालायला हरिणीकडे गेलो तो तिच्या हातात झेंडा होता. मी तिच्याजवळ मागितला. तिनं विचारलं, कशाला? सांगीतलं, की शाळेवर लावायचा. तिनं पटकन दिला.''

'' मुलींच्या प्रभातफेरीत हरिणी पुढं असते, ती भित्री नाही. ती हाती झेंडा धरते., गाणी सांगते.''

''तिचे वडील तिचं फार कौतुक करतात. मी जर झेंडा लावला नाही, तर ती उद्या हसेल. तिचे वडील मला भित्रा म्हणतील. मी लावणारच झेंडा. काय व्हायचं असेल ते होवो.''

कल्याण काही बोलेना. त्याचे लक्ष एकदम कोठे तरी गेले. त्याचे डोळे चमकले. विश्वास त्याच्याकडे पाहात राहिला.

''कल्याण, काय रे झालं? काय आठवलं? असा एकदम गंभीर का झालास?''

''एक आठवण आली.''

''सुखाची की दुःखाची?''

''एका माणसाची, हरिणी प्रभातफेरी काढते. आणखीही एक मुलगी काढीत असेल.''

''कुठल्या पेठेत?''

''तिकडे लांब !''

''तुझ्या गावी?''

''माझ्या गावाजवळच्या उडगी गावी.''

''काय त्या मुलीचं नाव?''

''संध्या.''

''किती सुंदर नाव !''

''तिला मी लिहीन की प्रभातफेरी काढ. झेंडा हाती घे. गाणी गा. तीही निर्भय मुलगी आहे. हरिणीपेक्षा ती थोडी मोठी आहे. खेड्यातील मुलगी. परंतु मोठी हुशार; कशी बोलते, कशी हसते.''

''कल्याण, हिंदुस्थानातील मुलीही निर्भय होऊ लागल्या आणि आपण मुलांनी का भीत बसायचं? तिकडे कुठंसं एका आठ वर्षाच्या मुलीनं लाठीमार सहन केला म्हणतात आणि शाळेत मार बसला तर काय करायचं याची आपण चर्चा करीत बसलो आहोत ! ते काही नाही. मी लावणारच झेंडा. पुण्यातील विद्यार्थी का भित्रे? पुण्याचं नाव जाता कामा नये. कल्याण, मी जातो. ठरलं हं.''

दोघे मित्र गेले. कल्याण व विश्वास यांची अभेद्य मैत्री जमली होती. त्यांची मैत्री कशी जमली त्याचा इतिहास मोठा करुणगंभीर आहे. एके दिवशी ओंकारेश्वराच्या घाटावर विश्वास बसला होता. लहान चौदा–पंधरा वर्षांचा तो मुलगा. तो त्या दिवशी अतिखिन्न होता. एकाएकी त्याचे डोळे भरून आले व तो रडू लागला, मोठा हुंदका आला. त्याने कष्टाने ते पाणी आवरले व घाबरून सभोवती पाहिले. तो त्याला तेथे एक तरुण दिसला. तो तरुण त्याच्याकडे सहानुभूतीने पाहात होता. त्या दृष्टीने विश्वासच्या हृदयाला स्पर्श केला.

''मला रडताना तुम्ही पाहिलंत? माझे अश्रू पाहिलेत?''

''हो.''

''का पाहिलेत माझे अश्रू? दुसऱ्याचं दुःख पाहू नये.''

''ते जर कोणी न पाहील, तर ते दूर तरी कसं करता येईल? तुम्ही का बरं रडत होतेत? मला सांगा. मलासुद्धा मधूनमधून रडू येतं.''



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय, सातारा.

''तुम्हीसुद्धा रडता?''

''एखाद वेळ.''

''का बरं?''

''इथं चुलत्यांकडे त्रास होतो. काकू नेहमी बोलते. रोज शिळंपाकं खायला. तिकडे लांब घरी होतो तर तिथं वडीलही असेच सदा रागावत, मारीत. म्हणून एखाद वेळेस डोळे रडतात. मला रडण्याचा राग येतो. मी मल्ल आहे. मल्लानं का मुळमुळू रडावं? परंतु डोळे ऐकत नाहीत. येतंच पाणी.''

''आपण दोघे मित्र होऊ. रडण्यासाठी नाही, तर हसण्यासाठी, एकमेकांना हसविण्यासाठी. मला हसवायला कोणी नाही. तुम्हाला पाहून मी हसेन, आनंदेन, सुखी होईन.''

''हो, होऊ या मित्र.''

''तुमचं नाव काय?''

''कल्याण.''

''आणि माझं नाव विश्वास.''

''परंतु तुम्ही का रडत होतेत?''

''मला माझ्या आईची आठवण झाली. मला माझी आई आठवत नाही. मी पाळण्यात असतानाच ती गेली. परंतु तिच्या मरणाच्या गोष्टी मी ऐकल्या आहेत. आई मेली तेव्हा माझ्या पाळण्याची दोरी तिच्या हातात होती. आईची करुण कहाणी माझी सावत्र आई सांगते. शेजारी सांगतात. माझे वडील म्हणजे जमदग्नी. ते सर्वांना मारतील. किती मारतील त्याला सुमारच नाही. एके दिवशी संध्याकाळी आई कुठं तरी हळदीकुंकवाला गेली होती. तिला घरी यायला जरा उशीर झाला. तर वडील त्या हळदीकुंकवाच्या घरी गेले. व त्यांनी आईला मारीत मारीत घरी आणलं! जणू गरीब गाय ! घरी रोज

मारीतच. पण आज रस्त्यांतून मारीत आणलं. घरी मारते तर नित्याप्रमाणं आई सहन करती. परंतु त्या दिवशीची ती विटंबना आईला सहन झाली नाही. तिला फणफणून ताप आला. तरीही ती काम करीतच राहिली, शेवटी निरुपाय झाला, तेव्हा ती अंथरुणावर पडली. तिला वात झाला. ती मेली, गेली. किती करुण कथा ! कल्याण, हिंदुस्थानातील स्त्रियांच्या दुःखाला सीमा नाही. असे कसे हे नवरे, असे कसे हे कसाब? स्त्रिया म्हणजे का गुरं, ढोरं? गुराढोरांनाही जरा आपण बरं वागवतो. कल्याण, आईच्या मरणाची एखाद वेळेस मला आठवण येते व कसंसच होतं. मरताना 'माझं बाळ, माझं बाळ' असं ती वातात म्हणे. माझ्या पाळण्याची दोरी तिनं हातात घट्ट धरून ठेवली होती. परंतु तिच्या आयुष्याची दोरी तुटत होती. ती आपलं आयुष्य आपल्या बाळाच्या आयुष्याच्या दोरीत का घालीत होती? कल्याण, काय सांगू? त्या आठवणींनी का नाही भरून येणार डोळे?''

गोष्ट सांगता सांगता विश्वास गहिंवरला. त्याला अपार हुंदका आला. त्याने कल्याणच्या खांद्यावर मान ठेवली. त्या अश्रूंनी ते दोघे मित्र बनले. त्या अश्रूंनी मैत्रीचे बीज अंकुरले. विश्वास हाडापेराने मजबूत नव्हता. बारीक होता. त्याचे डोळे चमकदार होते. त्यांत एक विशेष तेज होते. नाक तरतरीत होते. तो तेजस्वी, स्वाभिमानी दिसे. जणू नागाचे तल्लख पिल्लू. वडिलांचा रागीट स्वभाव थोडासा त्याच्या रक्तातही आला होता. परंतु विश्वासचा राग दुसऱ्याच्या दुःखासाठी असे, जगातील अन्यायासाठी असे. झेंडा लावण्याचे ठरवून ते दोघे मित्र शाळेत गेले. ते आज जरा आधीच शाळेत गेले. विश्वासने सुंदर तिरंगी झेंडा बरोबर आणला होता. त्याने तो शाळेवर चढविला. शाळेचा शिपाई कुरकूरु करू लागला. परंतु विद्यार्थ्यांनी त्याला गप्प बसविले. शाळेच्या बाहेरच्या पटांगणात विद्यार्थी जमले होते. शाळेवर तिरंगी झेंडा फडकत होता. पटांगणात गाणे सुरू झाले.

''नव हिंद राष्ट्र–झेंड्या

प्रणामा घे या''

विश्वासच गाणे सांगत होता. त्याचा देह लहान होता. परंतु आवाज पहाडी होता. त्यावेळचे दृश्य गंभीर होते. आज ज्ञान कृतार्थ होत होते. ज्ञान स्वतंत्र होत होते. शाळेत शिकविला जाणारा इतिहास जिवंत होत होता. मुले आज स्वतःच इतिहास निर्मित होती.

शाळेची वेळ झाली. घंटा झाली. मुले वर्गात गेली. हेडमास्तर चवताळले होते, संतापाने लाल झाले होते. त्यांनी विश्वासला बोलावून घेतले. तो नम्रपणे येऊन उभा राहिला.

''तू का रे लावलास शाळेवर झेंडा?''

''हो.''

''का लावलास?''

''माझ्या मनात आले म्हणून. मला राहवेना म्हणून. आपल्या शाळेचा मला अभिमान वाटतो म्हणून. आपल्या शाळेवर झेंडा लावला असं वर्तमानपत्रात येऊन दुसऱ्या शाळातील मुलांना स्फूर्ती यावी म्हणून.''

''तुम्हा मुलांना काडीची अक्कल नाही. संस्था उभारण्यासाठी आम्हाला शंभर ठिकाणी भीक मागावी लागते. आणि तुम्ही एकदम काही तरी करता व संकट आणता. शाळेच्या बाहेर दाखवा देशभक्ती. शाळेचं वातावरण पवित्र असू दे.''

''झेंडा आला म्हणून का वातावरण अपवित्र झालं? सर्व राष्ट्राला स्वातंत्र्य देऊं पाहणारा झेंडा, तो का अपवित्र?''

''अरे, तू झेंडा लावलास. परंतु आता समजा पोलिस आले शाळेच्या आवारात. तर ते चांगलं का? आपल्या घरात पोलिस शिरले तर ते कुणाला

आवडेल का?''

''लोकमान्यांच्या वाड्यात पोलिस गेले म्हणून का तो वाडा अपवित्र झाला होता? पोलिस आल्यावर घरी आले तर घर पवित्र झालं. चोरी पकडण्यासाठी ते थोडेच येणार आहेत? देशाच्या कामात भाग घेतल्यामुळं पोलिस आले, तर त्यात आनंद मानावा.''

''तुझ्याजवळ वाद करायला मला वेळ नाही. तुम्ही फाजील पोरं आहात. तू अक्षम्य चूक केली आहेस. पुन्हा असं करू नकोस. क्षमा माग व या शाळेला अकरा प्रदक्षिणा घाल.''

''मी चूक केली नाही. मी क्षमा मागणार नाही आणि शाळेवर झेंडा ठेवाल तर अकरा सोडून अकराशे प्रदक्षिणा मी घालीन. ते हिंदमातेचं स्वातंत्र्यमंदिरच मी मानीन.''

''झेंडा तर मी कधीच काढला. पोलिस चौकी जवळ आहे. हे बघ. कबूल करीत नसशील, तर तुझ्या घरी मी चिठ्ठी पाठवून पालकांना बोलावून घेतो. तुझं नाव शाळेतून कमी करतो. पाठवू घरी चिठ्ठी? की क्षमा मागतो व अकरा प्रदक्षिणा घालतोस?''

वडिलांचं नाव निघताच विश्वास भांबावला. तो घाबरला. आईला रस्त्यातून मारीत नेणारे वडील. ते मलाही मारीत नेतील. मागे एकदा रस्त्यात पायातील वहाणेनेच त्यांनी त्याला मारले होते. वडिलांची क्रोधी मुद्रा त्याच्या डोळ्यांसमोर उभी राहिली. त्याचे डोळे बावरले. तोडावरचे तेज नरमले, कोमेजले. त्याची दृष्टी खाली झाली.

''बोल, पाठवू चिठ्ठी?''

''नका पाठवू.''

''तर मग क्षमा माग व अकरा प्रदक्षिणा घालून ये.''

''शाळेच्या शिस्तीच्या दृष्टीनं मी चुकलो, म्हणून मी क्षमा मागतो.''

''जा, प्रदक्षिणा घाल!''

विश्वास बाहेर गेला. तो सिंहाचा छावा तडफडत होता. रागाने मुठी वळीत होता. तो शाळेभोवती प्रदक्षिणा घालू लागला. त्याच्या डोळ्यातून दुःख संतापाने पाणी गळू लागले. मधूनमधून तो दातओठ खाई. त्याने वर पाहिले. हेडमास्तर गॅलरीतून बघत होते. त्याने प्रामाणिकपणे अकरा प्रदक्षिणा घातल्या. तो पुन्हा वर गेला.

''झाल्या का प्रदक्षिणा?''

''हो.''

''पुन्हा असं करू नकोस. शाळेशी कृतघ्नपणा करू नकोस. जा वर्गात!''

विश्वास वर्गात जाऊन बसला. त्याचा गोरा गोरा चेहरा लालबुंद झाला होता. मुलांनी त्याच्याकडे पाहिले. परंतु त्याने कोणाकडेही पाहिले नाही. वर्गातील मास्तर हसले. कोणाला ते हसले? मुलांच्या सद्भावनांना हसणं. शिक्षक देशाचे हसे करीत असतात, प्रभूचा अपमान करीत असतात.

ते शिक्षक हसूनच थांबले नाहीत. ते म्हणाले, ''देशभक्ती अशा रडणाऱ्याकडून होत नसते. झेंडा लावणाऱ्यांची मरणाची तयारी हवी. माफी मागणारानं झेंडा लावू नये. तो झेंड्याचा अपमान होतो.''

ते शब्द म्हणजे दुःखावर डागणी होती. विश्वास ताडकन उभा राहिला व म्हणाला, ''हा विश्वास देशासाठी तुरुंगात गेला असं एक दिवस तुम्ही ऐकाल.'' त्या संस्फूर्त शब्दांचा विलक्षण परिणाम झाला. शिक्षक नरमले, विरमले. मुले गंभीर झाली. वर्गात सारी स्तब्धता होती. मुले विश्वासकडे बघत राहिली. इतक्यात घंटा झाली. तास संपला. शिक्षक निघून गेले.

विश्वासच्या शाळेत असा प्रकार झाला. तिकडे कल्याणच्या शाळेत

कोणता झाला? त्यानेही शाळेवर झेंडा लावला होता. मुले जमली. वन्दे मातरम् घोष गगनात गेला. रस्त्यावर जाणाऱ्या-येणाऱ्यांची गर्दी जमली. कल्याण तेथे व्याख्यान देऊ लागला.

'' आपण पुण्याचं नाव गमावता कामा नये. हे लोकमान्यांचं पुणं. येथील विद्यार्थी का केवळ पुस्तकं घोकीत बसणार? पुण्यातील मुलं करतील त्याप्रमाणं महाराष्ट्रातील मुलं करतील. पुण्याची स्फूर्ती सर्वत्र जाईल. आपण मागं नये राहता कामा. ज्या शाळेत आपण शिकतो, तिच्यावर का झेंडा नसावा? आपणाला लाज वाटली पाहिजे. तो पाहा आज शाळेवर झेंडा फडकत आहे. तसा मनात फडकू दे. हृदयात फडकू दे.''

असे कल्याणचे भाषण सुरू होते. तो हेडमास्तर आले. ''हा काय तमाशा? जा सारे वर्गात.'' ते रागाने गरजले. मुले पळाली. घंटा झाली.

''निघा सारे. घंटा झाली ना? बघता काय? तुम्हाला छड्या दिल्या पाहिजेत.'' ते संतापून म्हणाले.

''मग पोलिसांत व तुमच्यात का फरक? झेंड्यासाठी पोलिस लाठीमार करतात. तुम्ही शिक्षक काठीमार करता. शिक्षक म्हणजे का सरकारचे पोलिस?'' कल्याण रागावून म्हणाला.

''वर ऑफिसात चल. तिथं काय ते सांगतो'' असे हेडमास्तर गरजले. मुले वर्गात गेली. कल्याण ऑफिसात गेला. तो तेथे उभा राहिला. आणि हेडमास्तर आले. क्षणभर कोणी बोलले नाही. हेडमास्तर थोड्या वेळाने म्हणाले,

''काय रे कल्याण? अद्याप तुझी मान ताठच. चूक करून पुन्हा मान वर?''

''राष्ट्राचा झेंडा राष्ट्रातील लोकाची मान उंच होण्यासाठीच आहे. तो

झेंडा लावणाऱ्याची मान खाली कशी होईल? मी का पाप केलं? चूक केली? मी चूक केली असं मला वाटतं तर माझी मान आपोआप खाली झाली असती. मी चूक केली आहे असं खरोखर तुम्हाला तरी वाटतं का?''

''कल्याण?''

''काय?''

''तू मला आवडतोस हे तुला माहीत आहे. तुझी पाणीदार मुद्रा मला आवडते. आंतरशालेय खेळांत तू शाळेला मोठेपणा दिलास. आणि आज तूच ही गोष्ट करावीस का? तुला शिक्षा करणं माझ्या जिवावर येतं. मी तुला छडी मारणार नाही. क्षमा माग, असं म्हणणार नाही. कल्याण, आम्हा शिक्षकांना, शाळाचालकांना स्वाभिमान नाही असं का तुला वाटतं? आम्हीही माणसं आहोत. देशाची मान उंच व्हावी असं आम्हाला का वाटत नाही? परंतु सारं मनात ठेवावं लागतं; तुम्ही आमची हृदयं समजून घेत जा. मला संस्था चालवायची आहे. शाळेत नका काही करू; त्यामुळं आमची चमत्कारिक परिस्थिती होते; मनाची कुचंबणा होते. कल्याण, जा वर्गात. तू माझी संस्था सांभाळ.''

हेडमास्तरांचे प्रांजळ, प्रेमळ शब्द कल्याणच्या हृदयात गेले. त्यांचे त्याच्यावर प्रेम होते. परंतु त्यांनाच तो सरकारी पोलिस म्हणाला. त्याला वाईट वाटले. देशभक्ती म्हणजे का अहंकार? परंतु कल्याण अल्लड तरुण होता. त्याला कोठला एवढा पोच? त्याने हेडमास्तरांकडे क्षमायाचक दृष्टीने पाहिले. त्या पाहण्यात त्याचे निर्मळ हृदय होते. तो आपल्या वर्गात गेला. शाळेवरचा झेंडा दूर करण्यात आला. रस्त्यावरून कोणी 'शेम शेम' म्हणून ओरडले!

रोजच्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळी विश्वास हरिणीकडे दूध

घालावयास गेला होता. ती दारातच होती. 'लावलास का रे झेंडा?' तिने विचारले.

''लावल्याशिवाय राहीन वाटतं?'' त्याने उत्तर दिले.

''शाबास, विश्वासची शाबास' ती टाळ्या वाजवून म्हणाली. पुढील हकीकत कोणी विचारू नये, म्हणून विश्वास पटकन निघून गेला. कल्याणने हे सारे झेंडाप्रकरण संध्येला कळविले. ''मी भाषण केलं, मुलांनी टाळ्या वाजवल्या, रस्त्यावर गर्दी जमली, 'वन्दे मातरम्, महात्मा गांधी की जय' वगैरे घोषणांनी दशदिशा दुमदुमल्या'' वगैरे किती तरी त्याने लिहिले होते. संध्येने ते पत्र कितीदा तरी वाचले. तिलाही उत्साह आला. आपणही काही करावे असे तिला वाटले. ती प्रभातफेरी रोज काढीतच असे. ती गाणी सांगे, मुलेमुली म्हणत. वडील मंडळीही हसतखेळत जरा भीतभीत त्यांच्या मागून येत.

परंतु त्या दिवशी सकाळी संध्येने प्रभातफेरी शाळेकडे नेली. शाळेजवळ सारी आली. संध्या उभी राहिली. ती म्हणाली,

''शाळेवर आज आपण झेंडा चढवू या. मोठमोठ्या शहरांतून जिकडे तिकडे झेंडेच झेंडे होत आहेत. आपला गाव मागे नये राहता कामा. लावायचा झेंडा?''

''हो. हो.'' सारी मुले गरजली.

शाळेवर झेंडा चढला. झेंडागीत झाले. गर्जना दुमदुमल्या. गावातील स्त्री-पुरुष झेंडा पाहण्यासाठी जमले. झेंड्याला प्रणाम करीत व निघून जात.

''आजी, तू चल ना झेंडा पाहायला? कसा छान दिसत आहे. चल, नमस्कार करून परत येऊ.'' संध्या म्हणाली.

''चल.'' आजी बोलली.



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

आजीला घेऊन संध्या आली. आजीने तो तिरंगा झेंडा पाहिला. तिने प्रणाम केला.

''महात्मा गांधींना देव यश देवो.'' आजी म्हणाली.

''आजी, तुमच्या संध्येला आता तुरुंगात घालतील. तुम्हालाही घालतील.'' कोणी तरी हसत म्हणाले.

''होय का गं आजी?'' संध्येने विचारले.

''मी जिवंत आहे तोपर्यंत कोण येणार आहे आपल्या घरात? पोलिसाला पायरी चढू देणार नाही.'' ती तेजस्वी आजी बोलली.

''महात्मा गांधी की जय, वन्दे मातरम्!'' मुलांनी गर्जना केली.

✦✦✦

४...

# दु:खापाठीमागून दु:खे

संध्येचे वडील भीमाराव हे चमत्कारिक वृत्तीचे होते. ते फार बोलत नसत. फार हसत नसत. ते नेहमी एकटे एकटे असायचे. त्यांच्या मनात काय चाले ते त्यांचे त्यांनाच माहीत. स्वत:ची मन त्यांना तरी नीट कळले होते की नाही, देव जाणे. ते स्वत:च्या पत्नीशीही कधी बोलत नसत. एवढेच नव्हे, तर स्वत:च्या मुलांशीही प्रेमळपणे कधी बोलत नसत. संध्या आता सोळा वर्षांची होती. तिची लहान पाठची भावंडे होती. परंतु पित्याने त्यांना कधीही जवळ घेतले नाही, मांडीवर खेळवले नाही.

''संध्ये बाळ, इकडे ये.'' त्या दिवशी पित्याने प्रेमाने हाक मारली.

''काय बाबा?'' तिने जवळ जाऊन विचारले.

''तू शाळेवर झेंडा कशाला लावलास?''

''त्यात काय झालं, बाबा?''

''पोलिस आपणाला धरून नेतील. तू लहान म्हणून तुला सोडतील; परंतु आम्हाला नेतील. तुझे काका तुरुंगांत गेले तर ते बरं का? मग काकू

रडत बसेल. मुलं रडतील. तुझी आजी रडेल. असं नको करीत जाऊ, बाळ.''

''बाबा, हल्ली तर पुष्कळच लोक तुरुंगात जातात ना?''

''हो.''

''त्यांच्या घरीही रडत असतील सारी?''

''मला नाही माहीत, बाळ?''

''बाबा, आज मला तुम्ही बाळ म्हटलंत?''

''वाटलं की, बाळ म्हणून आज हाक मारावी.''

''परंतु मी काही आता बाळ नाही.''

''मग का मोठी झालीस? करून टाकू लग्न?''

''नको. लग्न नको. मी लहानच आहे. बाबा, तुम्ही आम्हाला कधीसुद्धा जवळ घेत नाही. पाठीवरून हात फिरवीत नाही. काका माझ्या केंसांवरून हात फिरवत म्हणतात रेशमासारखे संध्येचे केस. तुम्ही का नाही कधी आमचं कौतुक करीत? काका आपल्या मुलांना मांडीवर घेतात. तुम्ही का नाही आपल्या लहान शरदला घेत? आम्ही तुम्हांला आवडत नाही?''

''आवडता हो.''

''पण तुमचं प्रेम तर दिसत नाही.''

''माझं प्रेम मनात असतं. मी मनात म्हणतो, देवा, माझी मुलं सुखी ठेव. त्यांना सद्‌बुद्धी दे. तुमच्यासाठी मी सारखा जप करीत असतो हो संध्ये.''

''बाबा, देव आहे का हो?''

''हो, आहे.''

''कल्याण म्हणे, की देव नाही.''

''हा कल्याण कोण?''

''तो आपल्या गावातील मुलांना मागं कवायत शिकवायला येत असे. कुस्तीत त्याला ढाल मिळाली. तो आता पुण्याला आहे. जवळच्या सुपाणी गावचा तो. ते असो. पण खरंच का देव आहे? कुठं राहतो तो? कोणाला भेटतो?''

''भक्ताला भेटतो.''

''आजपर्यंत किती जणांना भेटला?''

''मी काय सांगू, संध्ये?''

''परंतु कोट्यवधी लोकांना तर नाही भेटला. त्याच्या आवडत्या लोकांना भेटला. असा कसा पक्षपाती देव? आई का अशी असते. काही तरीच. त्या देवाचं घर कुठं आहे? त्याचे कपडे कसे असतात? रंग कोणता? सांगा ना!''

''संध्ये, मला काही माहीत नाही. मी राम राम म्हणतो. मला बरं वाटतं.''

''बाबा, मी जाऊ?''

''जा.''

संध्या निघून गेली. ती आजीजवळ आली. आज चुलते नारायणराव घरी नव्हते. त्यामुळे आजी चुलीजवळ नव्हती. भिंतीजवळ माळ घेऊन ती रामनाम जपत होती. संध्याही रामराम म्हणू लागली. मध्येच तिने आजीकडे पाहिले. तो आजीच्या डोळ्यांतून पाणी घळघळत होते.

''आजी, रडतेसशी?''

''तू मोठी झालीस म्हणजे समजेल.''

थोड्या वेळाने आजीने संध्येला एकदम जवळ घेतले. तिच्या डोक्यावरून तिने हात फिरविला. तिला कुरवाळले.

''संध्ये, नीट जपून वागत जा. देवाला विसरू नकोस. तुझं पुढं लग्न होईल. सासरी सांभाळ. उल्लू नको होऊ. उतू नको, मातू नको. सर्वांशी गोड बोलावं, हसावं, खेळावं. होईल ती दुसऱ्याला मदत करावी. रागावत नको जाऊ, रुसूही नको फार. एखाद वेळ रुसणं, फुगणं गोड असतं. कोणतीही स्थिती येवो. संपत्ती व विपत्ती. समाधानानं राहा. कसेही दिवस येवोत. आनंदी राहा. कामाला कंटाळू नये. काम म्हणजे राम. चांगली राहा.''

''आजी, तू आज असं का सांगतेस, असं का बोलतेस? ही कसली निरवानिरव? तू का कुठं जाणार आहेस?''

''बोलावणं आलं तर तयारी असावी.''

''कुठलं बोलावणं?''

''देवपूरचं.''

''मी येऊ तुझ्याबरोबर?''

''इतक्यात नको. तुझी कशाला घाई?''

''कुठं आहे हे देवपूर? कोण आहे तिकडे आपलं?''

''देवपूर तिकडे वर आहे.''

''वर म्हणजे कुठं? पुण्याच्या बाजूला?''

''किती बोलशील व विचारशील?''

''आजी, मी येईन हो. इथं कंटाळा आला आहे. कुठं तरी दूर पुण्याकडे जावं असं वाटतं. आजी, मी अजून आगगाडीसुद्धा पाहिली नाही. आगबोट पाहिली नाही. तू देवपूरला. कशातून जाणार?''

''विमानातून.''

''तू थट्टाच करतेस. मी बोलतच नाही मुळी. तुझ्या मांडीवर मी डोकं ठेवून निजू?''

''नीज हो बाळ.''

संध्या आजीच्या मांडीवर डोके ठेवून झोपली. दुपारची वेळ झाली. जेवायची तयारी होऊ लागली. संध्या उठली व आजीला म्हणाली, ''आजी, चल.''

''नको, आज जेवण नको. आज रामनामाचं भोजन करीन.''

''त्याने का पोट भरतं? चल ना गं?''

''नको बेटा. तू जा.''

सारी लहानमोठी माणसे जेवली. परंतु आजी आज जेवली नाही. नारायणराव घरी नव्हते म्हणून का आजी जेवली नाही? परंतु असे आजपर्यंत झाले नव्हते. आजचे लक्षण काही निराळेच होते. मधूनमधून म्हातारी सद्गदित होई. तिचे डोळे ओले होते. मुलेमुली दुरून बघत. आजी आज रडते का, असे म्हणत.

''काय होतं तुम्हाला?'' सुनांनी येऊन विचारले.

''काही नाही; आनंद आहे.'' म्हातारी म्हणाली.

''काकू, सांगा ना काय होतं ते?'' संध्येचे वडील म्हणाले.

''काही नाही हो.''

''काकू, तू आमची आई, सर्व काही. सांग ना काय होतं ते. तू रडतेस का? काय दुखतं? कोणतं दु:ख?'' पुडलिकरावांनी विचारले.

''पुंडलिक, काही नाही हो. तुम्ही सुखात राहा.'' ती म्हणाली.

''आजीला त्रास नका देऊ. जा बाहेर सारी!'' भीमराव मुलांना म्हणाले. मुले निघून गेली. भीमराव आपल्या खोलीत गेले. पुंडलिक मळ्यात निघून गेला. सुना कामाला निघून गेल्या. आजी रामनाम जपत बसली. होता होता तिसरा प्रहर टळून गेला. सायंकाळ झाली. दिवे लागले. नारायणराव सायंकाळी

गावाहून येणार होते. का बरे अद्याप आले नाहीत! कोठे कामांत गुंतले, कोठे अडकले?

रात्री आठ वाजायची वेळ होती. एका गाडीतून नारायणराव घरी आले. ते वास्तविक पायी यायचे. परंतु आज गाडी का? ते घरी आले ते अत्यवस्थ स्थितीत आले. त्यांचा जीव घाबरत होता. हृदय उडत होते. काय झाले कळेना. अंथरुणावर त्यांना निजविण्यात आले. वैद्य आले. उपास सुरू झाले. परंतु रोगाचे निदानच होईना.

''काकू.'' नारायणरावांनी हाक मारली.

''काय बाळ?''

''माझ्याजवळ बस. तू आई, तू सर्व काही. माझे प्राण ओढले जात आहेत. सर्वांनी बोलल्याचालल्याची क्षमा करा. सारी आनंदांत राहा. काकू?''

काकूच्या मांडीवर त्याचे डोके होते. त्यांनी एकदा वर बघितले व ''राम'' म्हटला. ते जणू काकूच्या मांडीवर मरण्यासाठी घरी कसे तरी आले. घरात शोकपूर उसळला. मुले रडू लागली. सुना रडू लागल्या. नारायणरावांची पत्नी तर दुःखाने वेडी झाली. भीमराव व पुंडलिकही स्फुंदू लागले. आणि भागीरथीकाकू एकाएकी उठली.

''रडू नका. शांत राहा. मृतात्म्याला त्रास नका देऊ. तुम्ही सारी नीट राहा म्हणजे झालं.'' ती म्हणाली.

तिने एकदा तेथे सर्वांकडे पाहिले व ती मागील दारी गेली. एकटीच गेली. बाहेर अंधार होता. आजी एकटीच कोठे जात होती? हातात ना दिवा, ना काही. इकडे सोप्यात माणसांची गर्दी झाली. नारायणराव म्हणजे उदार दिलदार माणूस. त्यांच्याविषयी सर्वांना आदर वाटे. सारे हळहळले. अकस्मात मरण. काही कल्पना नाही. त्यांच्या पत्नीचे शेजारच्या आयाबाया समाधान

करीत होत्या. संध्येची आई जाऊबाईंच्या गळ्यात गळा घालून रडत होती.

परंतु आजी कोठे गेली? त्या वृद्धेला तेथे का रडवेना? तेथे का बसवेना? ती का एकटी अश्रू ढाळण्यासाठी बाहेर गेली? ती पाहा. भागरथीकाकू जात आहे. कोठे जात आहे? संध्याही हळूच अश्रू पुसत आजीच्या पाठोपाठ थोडीशी गेली. परंतु तिला भीती वाटू लागली. ती तेथेच अंधारात थबकली. आजी पुढे गेली. कोठे गेली? संध्येला काही दिसेना पुढे जाण्याचे तिला धैर्यही होईना. अंधार, सर्वत्र अंधार; डोळे भरून आल्यामुळे तो अंधार अधिकच अंधारमय होत होता.

कसला हा आवाज? धाड् असा आवाज झाला. कोण पडले, कोणी उडी घेतली? त्या विहिरीत का कोणी उडी घेतली? संध्या घाबरली. ती एकदम धावत घरात आली. तिच्याने बोलवेना.

''आई, आजी, अगं आजी–'' एवढेच ती म्हणाली.

सारी तिच्याकडे पाहू लागली. कोणाला उलगडा होईना.

''बाबा, धावा. आजीनं विहिरीत उडी घेतली. धावा, खरंच!–''

संध्या कसे तरी बोलली. घरातील एक प्रिय माणूस तेथे घोंगडीवर मरून पडले होते. कर्ता मनुष्य तेथे मरून पडला होता. तोच ही दुसरी वार्ता! भावाचा मृतदेह तेथेच टाकून दोघे भाऊ विजेप्रमाणे विहिरीजवळ आले. लोकही आले. भागीरथीकाकूचा देह वर काढण्यात आला. परंतु प्राण वर निघून गेले होते. ते खाली थोडेच राहिले होते? आजीचे प्राण आवडल्या पुतण्याच्या पाठोपाठ निघून गेले होते.

घरातील मंडळी शोकाने स्तंभित झाली. कोणाला रडूही येईना. सारे जणू दगडाप्रमाणं झाले. थिजले, घट्ट झाले. प्रेमळ आजीचा देह घरात आणण्यात आला. संध्या आजीजवळ बसली. आजी आता शांत झाली होती.



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

संध्या रडू लागली. आजीइतके कोणीही तिच्यावर प्रेम करीत नसे. आजीची कूस, म्हणजे तिचा आधार.

शेवटी ते दोन्ही देह उचलण्यात आले. सारी क्रिया झाली. तो दिवस गेला. दुसरे दिवस चालले. काळ थोडाच थांबतो! परंतु आता कर्नाटकींच्या घरात आनंद नव्हता. सारा आनंद आजी जणू घेऊन गेली. सर्वांना हसविणारी, खेळविणारी, धीर देणारी, पवित्र पावन वृद्ध काकू निघून गेली. घरातील कारभार आता पुंडलिक पाही. भीमराव मूळचेच विरक्त. ते अधिकच उदासीन झाले. ते एकदा जेवू लागले. सायंकाळी जेवत नसत. भीमेच्या तीरावर जाऊन या भंगुर संसाराचा विचार करीत. एखादे वेळेस ते अलीकडे बरोबर संध्येला घेऊन जात.

त्या दिवशी अशीच दोघे भीमातटाकी बसली होती. भीमराव म्हणाले,

''संध्ये, तू आजीची आवडती होतीस.''

''होय बाबा, आजीनं मला किती तरी शिकवलं. किती तरी दिलं. आजी देवमाणूस होती. बाबा, काकांवर आजीचं किती प्रेम! सख्ख्या आईचंही मुलांवर इतकं प्रेम नसेल. काकांच्या मागं आजीला क्षणभरही राहावलं नाही.''

''असं प्रेम या दुनियेत दुर्मिळ असतं. प्रेमाची ही परकाष्ठा. आपण प्रेम प्रेम म्हणून बोलतो. परंतु त्या प्रेमासाठी स्वत:ला शून्य कोण करील! प्रिय व्यक्तीच्या जीवनात स्वत:ला कोण मिसळेल? प्रेमासाठी प्राण कोण देईल?''

''माझा कल्याण देईल. तो म्हणतो, मी देशासाठी मरेन. त्याचे देशावर खरं प्रेम आहे. नाही, बाबा?''

''संध्या, हा कोण कल्याण आहे जो तुला इतका आवडतो?''

''कल्याण कोणाला आवडणार नाही?''

''संध्ये, तुझं आता लग्न करायला हवं.''

''नको बाबा. आजी गेली नाही तो लग्नाच्या गोष्टी काय करता?''

''संध्ये, मीही लौकरच जाईन. मलाही लौकरच बोलावण येईल.''

''असं का म्हणता, बाबा?''

''मनाला आतून वाटतं खर; संध्ये, तुझं लग्न पाहायला मी नसेन. परंतु जप हो. नीट राहा. तुझा संसार सुखाचा होवो.''

''बाबा, आज गंगा शांत दिसत आहे, नाही? आणि तिचं पाणी लालसर झालं आहे. सूर्याचे रंग तिच्यांत मिसळले आहेत.''

''संध्ये, दुसऱ्याच्या जीवनाचा रंग तुझ्या जीवनाच्या नदीत असाच मिसळेल. तुझं जीवन शांत सुंदर दिसेल; रंगीत, तरंगीत, रमणीय दिसेल. संध्ये, मलाही देवाकडचं लौकरच बोलावणं आलं तर? तर सावध राहा. सारी समाधानानं राहा. कदाचित तुम्हाला वेगळं राहावं लागेल. आनंद माना. संध्ये, तू काही आता अगदी लहान नाहीस. मुलींना लौकर समजतं. तुझ्याजवळ मी बोलत आहे अशा गोष्टी मुलांजवळ बोलायच्या नसतात. परंतु संध्या आता लहान मूल नाही. संध्या देवता आहे. संध्ये, तुझं लहान वय, परंतु किती तुला सॅमज, कसं तुझं बोलणं! देव तुला सुखी ठेवो. तुला अनुरूप पती देवो. ज्याला माझी संध्या मिळेल, त्याचं जीवन धन्य होईल. ये, जवळ बैस माझ्या.''

संध्या पित्याजवळ बसली. भीमरावांनी प्रेमाने तिच्या डोक्यावरून हात फिरवला. भीमा शांतपणे वाहत होती. खळखळ नाही, काही नाही. भीमेचे पात्र तेथे गंभीर होते. पिता व पुत्रीही गंभीर होती. जीवनाच्या व मरणाच्या गोष्टी त्यांच्या चालल्या होत्या.

''संध्ये, पाहा हे भीमेचं पात्र. इथं खळखळ नाही. कारण इथं पात्र उथळ नसून खोल आहे. तूही उथळ नको होऊस. धीरगंभीर हो. तुझ्या

हृदयाचा डोह अथांग असू दे. तिथं अनंत पाणी असू दे. ती पाहा संध्याकाळची शोभा. संध्याकाळची वेळ जरा गंभीरच असते. तुझं नाव संध्या. प्रात:संध्या सूर्याला जन्म देते. सायंसंध्या अनंत तारकांना जन्म देते. दोन्ही संध्या पवित्र, गंभीर व गूढ. अनंताचं दर्शन घडवणाऱ्या. संध्ये, तू अशीच हो. मर्यादित संसारात राहून अमर्याद हो. बंधनात राहून बंधनातीत हो. संसारात राहून संन्यासिनी हो. या लहानशा देहात राहून विश्वाला मिठी मारायला शीक. संध्ये, तुझ्याकडे पाहून कधी मला फार वाईट वाटतं, तर कधी अपार आनंद होतो. कां ते कळत नाही.''

पिता शांत राहिला. संध्या मुकेपणाने ते प्रवचन ऐकत होती. आजपर्यंत भीमराव तिच्याजवळ असे कधीही बोलले नव्हते आणि आज अशा खोल गोष्टी बोलत होते. दोघे स्तब्ध होती. आता अंधार होऊ लागला.

''संध्ये, चल घरी. काळोख होईल.''

''बाबा, तुम्ही तर आज मला प्रकाश देत आहात. तुम्ही मला देव देत आहात, दिवा देत आहात; ध्येय देत आहात. बाबा, तुमच्या मनात रोज कोणते विचार चालत असतील त्याची थोडी कल्पना मला अलीकडे येऊ लागली होती. तुम्ही जणू रोज देवाजवळ बोलत असता, होय ना? बाबा, मी अजून लहान आहे. तुमचं सारं बोलणं मला नीट समजत नसलं, तरी ते मला आवडतं. गाणं समजत नसलं तरी मला गोड वाटतं, ऐकावंसं वाटतं. नाही बाबा? बोला, मजजवळ बोला, खूप बोला. कुणाला माहीत की पुन्हा तुम्ही असं बोलाल की नाही ते?''

संध्येचा आवाज सद्‍गदित झाला होता. ती थांबली. भीमराव म्हणाले, ''चल बाळ, घरी जाऊ. घरची मंडळी वाट पाहात असतील. आधीच घरात दु:ख आहे. संध्ये, दुसऱ्याला आपल्याकडून फार तकलीफ होणार नाही,

असं वागावं या जगांत. दुसरं काय करता येईल?''

''होय बाबा; चला. आपण जाऊ. घरात कसं सारं शोकमय आहे. कोणी हसत नाही, बोलत नाही. आजी गेली. काका गेले. आणि घरातील सारा आनंद गेला. खावंप्यावंसं वाटत नाही. कांही सुचत नाही. आजी गेली असं अजून वाटतही नाही. काल रात्री मी अगणांत उभी होते. मी एकटीच होते. आजी येते का मी वाट पाहात होते. 'संध्ये, अशी अंधारात तू का उभी!'' असं आजी येऊन मला म्हणेल असं वाटलं होतं. परंतु कोणी आलं नाही बाबा, आजी कुठं गेली? काका कुठं गेले? कुठं असतील त्यांची मनं, त्यांचे आत्मे?''

''संध्ये, त्यांची मनं, त्यांचे आत्मे आपणांमध्ये मिसळून गेले असतील. तुझ्यात, माझ्यात आपणा सर्वांत त्यांची मनं शिरली असतील. कोणाला माहीत? सारे तर्क. त्यांच्या इच्छा, त्यांचे विचार, त्यांची ध्येयं आपणाजवळ आहेत. त्यांची स्मृती आपणांजवळ आहे. स्मृती म्हणजे मृतीवर विजय. स्मृतिरुपानं मनुष्य अमर होत असतो. आजीचं प्रेम जिवंत असताना तुम्हा सर्वांना मिळे. आता ते जगातील सर्वांना मिळेल. आजीचं मर्यादित प्रेम देह पडल्यानंतर अमर्याद झालं असेल. सर्वांच्या हृदयाला ऊब द्यायला गेलं असेल.''

''बाबा, प्रेमाची परीक्षा कशी करावी?''

''आजीनं तुला कसोटी दाखवली आहे. ज्याच्यावर आपलं प्रेम असतं, त्यांच्या सुखानं आपण सुखी होतो. त्यांच्यात आपण आपलं स्वत्व जणू विसरतो. आजीला स्वतःची इच्छा नव्हती. काकांची आवड ती जणू तिची. संध्ये, मी काय सांगू? परंतु एक सांगतो. आपल्या प्रेमानं जगाचं नुकसान होता कामा नये. एवढं जपलं पाहिजे.''


श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय, सातारा.

''बाबा, तुमचं आईवर प्रेम आहे?''

''संध्ये, खरं सांगू का, माझं कोणावरच तसं प्रेम नाही. एखाद्यावर प्रेम करणं म्हणजे संकुचित होणं. परंतु झाड कुठंच जर मूळ धरणार नाही तर त्याचा विकास तरी कसा होईल? प्रेम कुठं तरी खोल करावं, म्हणजे त्याचा विकास होईल; कुठं तरी ते बांधू, तरच ते वाढेल. ते पुढं शेकडोंना छाया देईल. फुलंफळं देईल. मला ही गोष्ट आज समजते आहे. परंतु पूर्वी हे समजत नव्हतं. पूर्वी मला वाटे की एका व्यक्तीवर प्रेम करणं म्हणजे आत्म्याचा अपमान आहे. जे प्रेम सर्वांसाठी ते एकाला कसं द्यायचं? पण एकाला पोटभर देऊ तरच पुढं अनेकांना देता येईल हो संध्ये.''

अशी बोलणी करीत दोघे घरी आली. पित्याचा हात धरून पुत्री आली. घरात सारी वाट पाहात होती. पुंडलीकराव केव्हाच घरी आले होते. भीमराव व संध्या यांनी उशीर केला म्हणून पुंडलिकाला राग आला होता.

''अप्पा, किती रे उशीर! काही काळवेळ आहे कीं नाही! घरात अशी परिस्थिती, आणि तुम्हाला फिकीर नाही. खुशाल आपली बाहेर गप्पा मारीत बसता. आणि अप्पा, घर–कारभारातही तू आता काही भाग उचलला पाहिजेस; मी एकटा काय करू?'' पुंडलीक म्हणाला.

''पुंडलीक काळवेळ मी ओळखली म्हणूनच आज फिरायला गेलो, व संध्येजवळ बोलून घेतलं. संसारांत माझं लक्ष नाही. कर्मांत पडणं म्हणजे डबक्यात पडणं; मर्यादित होणं, स्थानबध्द होणं. माझा आत्मा कर्मात रमायला भितो.''

''खाण्यापिण्याच्या वगैरे कर्मांना भीत नाही तो.''

''त्यांनाही भितो. त्यांचाही वीट आला आहे. ही देहाची खोळही आता मला जड झाली आहे. केव्हा पडेल असं झालं आहे. काकू गेली. नाना गेला.

आतां तिसरं कोणी तरी नको का जायला? पुंडलीक, मी फार दिवस नाही हो वांचणार; फुकट खायला फार दिवस नाही राहणार. रागावू नकोस. कर्माला भिणाऱ्या माणंसांनी जगण्यांत अर्थ नाही. कर्मवीरांनी जगावं. कर्मभीरूंनी मरावं. देवही त्यांना उगीच कशाला ठेवील?''

भीमरांवांचे शब्द ऐकून सारे दु:खी झाले. संध्येची आई रडू लागली. पुंडलीकरावांच्या पत्नीला वाटले की दिवे लागताना कशाला असलींबोलणी निघाली? शेवटी कशीबशीं जेवणे झाली. सारे लौकरच सामसूम झाले. परंतु संध्या कोठें आहे?''

''संध्ये.'' आईने हाक मारली. संध्या ओ देईना. कोठे गेली पोर? आई पाहू लागली. आई बाहेर आली. तो अंगणांत एका बाजूला संध्या उभी होती. तटस्थ होती. जणू भावमग्न होती.

''संध्ये?''

''आई, ती बघ आजी. ती बघ मला खूण करते आहे. दिसली तुला? ती बघ. आई, माझा हात धर. काय पाहिजे आजीला? काय मागते ती? हे काय, आजी रडू लागली, अरे हसली. आजी जवळ आली. आई...''

संध्या घाबरली. तिने आईला घट्ट मिठी मारली. आई संध्येला घेऊन कशीबशी घरात गेली. तिनें संध्येला निजविले. संध्या घाबरली होती. थरथरत होती. तिच्या अंगाला दरदरून घाम सुटला होता. आईने तिचा घाम पुसला. तिला थोपटले. संध्येला झोप लागली. तिच्या अंगावर पांघरूण घालून आई गेली.

भीमराव आज पत्नीला म्हणाले, ''मी फार दिवस जगणार नाही, काय असेल ते असो. तू मनांनं तयार होऊन राहा. जर मला देवाघरी जावं लागलं. तरं तू मुलं घेऊन निराळी राहा. पुंडलीकाशी घरात पटणं कठीण. समजलीस ना?''

''वेगळं व्हायचंच असेल, तर आताच व्हा ना. तुम्ही आहात तोच व्हा ना. आम्हा बायकांना काय कळतं? जे होऊ नये ते झालं, तर मुलांना घेऊन मी कुठं जाऊ? बायकांना सारे फसवतात. आणि शहाणी शहाणी माणसंही फसवायला कमी करीत नाहीत.'' पत्नी म्हणाली.

''भावाजवळून वेगळं निघायला मला धैर्य नाही.''

''तुम्हाला वाईटपणा नको आहे. परंतु पुढं मुलांचं कसं होईल?''

''देव सर्वांना आहे.''

''गरिबांना कोणी नाही,''

''गरिबांजवळ तर तो आधी असतो.''

''म्हणून गरीब रात्रंदिवस रडतात वाटतं?''

''तुझी श्रध्दा नाही. तुझ्याजवळ बोलण्यात अर्थ नाही.''

अशी रात्री त्यांची बोलणी झाली. भीमराव झोपले. परंतु संध्येच्या आईला झोप आली नाही. ती सचिंत झाली.

असे काही दिवस गेले व तो एक दिवस आला. भीमरावांनी ओळखलेली काळ–वेळ आली. ते नित्याप्रमाणें देवघरात पूजा करीत होते. आज फारच भक्तिभावाने पूजा चालली होती. भीमराव तन्मय झाले होते. डोळे स्त्रवत होते. शरीर रोमांचित झाले होते.

''संध्ये, बाळ, निरांजन लावून आण बरं. जरा अधिक तूप घाल हो आज.'' ते म्हणाले.

आजची पूजा फार सुंदर दिसत होती. शेवंतीची, गुलाबाची फुले किती खुलून दिसत होती. आणि मधून मधून दुर्वा, तुळशी, बेल यांची हिरवळी; मंगल मंगल दृश्य. संध्येने निरांजन आणिले. उदबत्तीचा घमघमाट सुटला होता. भीमराव निरांजन ओवाळू लागले व आरती म्हणू लागले.

''आरति नारायण
ओवाळितो करुणाघना ।।आरति० ।।
प्राणांचे निरांजन
तुला देवा ओंवाळून
चरणी जाइन मिळून
जन्म–मरण मरून ।।आरति० ।।
पुरे ही यातायात
नको संसाराची मात
धरी देवा माझा हात
तूच सदगुरू तात ।।आरति० ।।
आयुष्याचे सार तूप
घालुन ओंवाळीतो दीप
येऊं दे तुझ्या समीप
तूच माझा मायबाप ।।आरति० ।।

भीमराव ओवाळता ओवाळता समरस झाले. संध्या तो मंगल पवित्र देखावा पाहात होती. तीही डोळे मिटून व हात जोडून तेथे विरघळून उभी होती. भीमरावांनी निरांजन खाली ठेवले व देवासमोर डोके ठेवले. किती तरी वेळ झाला. ते डोके वर झालें नाही. डोके खाली वाकले, ते वाकले!

संध्या बघत होती.

'' आटपली की नाही पूजा?'' संध्येच्या आईने विचारले.

'' आई, इकडे ये!'' घाबरून संध्येने हांक मारली.

'' काय गं ?'' आई येऊन म्हणाली.

सारीच तेथे आली. तिकडे पाटपाणी घेतलेले होते. दुपारची जेवणाची वेळ. पुंडलीकरावही आले. ''अप्पा, अप्पा'' त्यांनी हाक मारली. परंतु अप्पा केव्हांच देवाघरी गेले होते. त्यांनी आपल्या पंचप्राणांचे निरांजन शेवटचे ओवाळले. ते चैतन्यात मिळून गेले. प्रकाशात विलीन झाले. परंतु घरात मात्र केवळ अंधार भरून राहिला. अधिकच अंधार, काळाकुट्ट निराशेचा व शोकाचा अंधार, अथांग अंधार! महिन्या-दोन महिन्यांत तीन मृत्यू! दुःखापाठीमागून दुःखे!

✦✦✦

५...

# माझे लग्न लागलेले आहे

संध्येला एका पाठीमागून एक प्रियजनांची मरणे पाहावी लागली. जणू मरणाशी तिचा परिचय होत होता. मरणाचे आघात सहन करण्याचा जणू तिला अभ्यास होत होता. संध्या अकाली गंभीर झाली. तिचे हास्य मंदावले. खेळकरपणा कमी झाला. ती दुःखीकष्टी चेहरा करीत नसे. परंतु तिचे हंसणे पूर्वीप्रमाणे खेळकर नव्हते. तिचे हसणेही जरा गंभीर वाटे.

भीमराव गेल्यावर काही दिवसांनी पुंडलीकराव वेगळे झाले. नारायणरावांचे कुटुंब मुले घेऊन माहेरी राहायला गेले. संध्येची आई उडगी गावातच राही. ते लहानसे स्वतंत्र घर होते. शेतीवाडी वाटली गेली. संध्येची आई सारें पाहू लागली. संध्येची आई हुशार व धोरणी होती. शेतीवाडी तिने खंडाने देऊन टाकली. खायलाप्यायला घरी काही कमी पडले नसते. संध्येला दोन लहान भावंडे होती. अनु व शरद. दोघे शाळेत जात. संध्या घरीच आईला मदत करी. दुपारी वाचून दाखवी. स्वतःही वाची.

बऱ्याच दिवसांत संध्येने कल्याणला पत्र लिहिले नव्हतें. घरातील मरणांनी राष्ट्राचे झेंडे ती विसरून गेली होती. ती आतां पुन्हा पूर्वीच्या जीवनात आली.



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

अंधार दूर गेला. धुके उडाले. पुन्हा प्रकाश येत होता. बाह्यत: ती कल्याणला विसरली होती. परंतु मनात तो वाढतच होता. पहिली वाट अंधारात होते. नकळत होत असते.

मरणाची दु:खे मागे पडली. पुन्हा कल्याण दिसू लागला. मल्लमूर्ती कल्याण! प्रेमळ व काळ्याभोर डोळ्यांचा कल्याण! तिने त्याला पत्र लिहिले.

''प्रिय कल्याण,

तुला नमस्कार लिहू, की काय लिहू? पूर्वी मी तुला नमस्कार लिहीत असे; परंतु नमस्कार दुरून करावा लागतो. मी का तुझ्यापासून दूर आहे? तू का माझ्यापासून दूर आहेस? कल्याण, तू अगदी माझ्याजवळ आहेस, तू माझ्याजवळ नसतास तर ह्या तीन–चार महिन्यांतील दु:खं मी कशी सहन केली असती? तुला माहीत नसेल, परंतु केवढाले प्रसंग आमच्यावर आले! माझे सर्वात वडील चुलते एकाएकी देवाघरी गेले. आणि माझ्यावर प्रेम करणारी आजी तीही गेली. काका तिकडे गेले व इकडे आजीनं विहिरीत उडी घेतली. किती प्रेम! जगात कुठं असेल रे असं प्रेम! कल्याण, मी मरेन का रे तुझ्यासाठी? तू मरशील का माझ्यासाठी ?

मरण का सोपं असेल? आजीनं विहिरीत नाही उडी घेतली, जणू प्रेमसागरात तिनं बुडी मारली. नारायणकाका गेले,आजी गेली, आणि कल्याण,थोड्या दिवसांनी माझे वडीलही गेले! तुझी संध्या पितृहीन झाली. मरणाआधी बाबा किती प्रेमळ झाले होते. ते मला बाळ अशी हाक मारीत. ते मला जवळ घेत, उपदेश करीत. एके दिवशी ते मला फिरायला घेऊन गेले भीमेच्या तीरावर किती तरी वेळ आम्ही बसलो होतो. किती तरी बोलत होतो. बाबांचे जीवन म्हणजे एक कोडं होतं. त्यांचं जीवन म्हणजे एक झगडा होता. या पृथ्वीवरची हवा त्यांच्या आत्महंसाला जणू सहन होईना. त्यांचा प्राणहंस उडून गेला. आणि आता आम्ही सारी वेगळी झालो. पूर्वी मोठ्या घरात आम्ही

राहात होतो. आता आई व आम्ही भावंडं एका छोट्या घरात राहतो.

कल्याण, पूर्वी त्या मोठ्या घरात आईचं प्रेम मला अनुभवता आलं नाही. तें आता भरपूर चाखता येतं. शरद व अनु शाळेत जातात. आई व मी दोघं घरी. पूर्वी आई मला रागे भरे, मारीही, परंतु आता कधी चुकूनही रागवत नाही. घरातील एका पाठीमागून एक झालेल्या मरणांनी माझी आई का प्रेमळ झाली? तापून लोखंडही मऊ होतं. मग माणसं का लोखंडाहून कठोर असतील?

आईच्या प्रेमाचा आस्वाद तुझी संध्या घेत आहे. आजीच्या प्रेमाला मुकलेली, आंचवलेली संध्या आईच्या प्रेमाची मालकीण बनली आहे. मी आईला पुस्तकं–पोथ्या वाचून दाखवते. आईला कठीण भाग समजावून देते. संध्या हुशार आहे. हसतोस काय, कल्याण? आजीनं मला हुशार केलं आहे. तूही हुशार झाला असशील. पुण्यातील कुत्रीसुध्दा सुंदर व्याख्यान देतात असं काका म्हणाले होते. नेहमी व्याख्यानं ऐकून कुत्रीसुध्दा हुशार का होणार नाहीत? आणि जिथली कुत्री इतकी हुशार, तेथील माणंस किती हुशार असतील?

कल्याण, बऱ्याच दिवसांत तुला मी लिहिलं नाही. काही सुचत नसे. लिहू तरी काय? किती तरी लिहावंसं वाटतं. स्वप्नात मी तुला पत्रं लिहिते. स्वप्नात ती छान लिहिता येतात. परंतु जाग आल्यावर तशी लिहिता येत नाहीत. ती आठवत नाहीत. माझी स्वप्नांतील पत्रं तुला स्वप्नांत मिळाली असतील, नाही? स्वप्नांमध्ये मनुष्य अधिक प्रेमळ व अधिक हुशार होतो कारे?

कल्याण, माझी उंची वाढली आहे. पूर्वी मी ठेंगणी होते. आई म्हणते, 'संध्ये आता बरी दिसतेस.' तू माझा पूर्वी फोटो काढला होतास. आता पुन्हा काढावा लागेल. तिथूनच येईल का रे काढता? मी इकडे डोळे मिटीन व तिकडे तू फोटो काढ.

तुला नवीन मित्र विश्वास हा मिळाला. चांगल झालं. आणि ती हरिणी खूप हुशार आहे का रे? मी पुण्याला आले तर मला का ती हसेल? ती इंग्रजी शाळेत जाते. परंतु मला इंग्रजी येत नाही; कल्याण, तू शिकवशील मला इंग्रजी? परंतु केव्हा शिकवणार तू? मी इथं व तू तिथं. पत्रांतून येईल का रे शिकवता? संध्येचं इंग्रजीत काय रे होईल? व कल्याणला इंग्रजीत काय म्हणतात? इंग्रजी ज्याला येत नाही,त्याला पुण्याकडे वेडा म्हणतात का रे? आजी म्हणत असे, संध्या हुशार आहे'. आई सर्वांजवळ म्हणत असते, 'संध्येची हुशारी काही निराळीच आहे'. कल्याण, बाबा एकदा म्हणाले,'माझी संध्या म्हणजे देवता आहे.' मी अभिमानानं नाही हो सांगत. तुला म्हणून लिहिलं; परंतु इंग्रजी न येणारी मुलगी का देवता? बाबा काही तरी म्हणाले. आईबापांना आपलं मूल हुशार वाटतं.

कल्याण, पुण्याला तू इंग्रजी शिकणाऱ्या मुली बघशील. तू म्हणशील, संध्या वेडगळ आहे. संध्या खेडवळ आहे. परंतु ही वेडगळ व खेडवळ संध्या प्रेमळ आहे. परवा आमच्या शेतावरचा खंडकरी आला होता. त्याला मी घरात जेवायला वाढलं. त्यासाठी आईजवळ भांडले आणि खंडू कुडतं काढून जेवायला बसला तर मी त्याचं तें कुडतं घेऊन, जिथं ते फाटलं होत तिथं पटकन शिवून ठेवलं. खंडूचं हृदय भरून आलं. पुण्यातील इंग्रजी शिकणाऱ्या मुली शेतकऱ्यांच्या फाटक्या कपड्याला ठिगळ लावीत असतील का? प्रेमानं त्याला घरात जेवायला वाढत असतील का? गरिबांना त्या देतील का प्रेम? मी पुण्याला येईन तेव्हा पाहीन. परंतु केव्हा येऊ मी पुण्याला? मी अजून कुठंही कधी गेले नाही. कल्याण, तू मोठा झालास म्हणजे तुझ्याबरोबर मी येईन. तू नेशील मला? पुणं-मुंबई दाखवशील?

तुझी काकू तुला अजून रागं भरते का? तू अजून त्या नदीवर जाऊन रडतोस का? तुला तिथं मायेचं कोणीच का नाही? मी तिथं असते तर तुझे

डोळे पुसले असते. आईने मला दिलेला खाऊ तुझ्या तोंडात घातला असता. मी मोठी झाले तरी आईजवळ खाऊ मागते. शरद व अनु दुपारी शाळेत जाताना आईजवळ खाऊ सांगतात. मीही हसत हात पुढं करते. आई हसते. शरद व अनु म्हणतात, 'ताईला कशाला खाऊ? ती शाळेत थोडीच जाते?' परंतु आई म्हणते, 'ती घरी असते. तिला काम पडतं. तिला तर अधिक हवा खाऊ. ती मला वाचून दाखवते. मला शिकवते.' कल्याण, आई माझं असं कौतुक करते. तुझं कोण करीत असेल कौतुक? तुझं कौतुक मी करीन हो.

तू पुन्हा दिलंस का कधी व्याख्यान? तुझं व्याख्यान मी कधी बरं ऐकेन? मला येईल का रे व्याख्यान देता? परंतु व्याख्यान द्यायची मला नाही आवड. दुसऱ्यांची व्याख्यान मी ऐकेन. ऐकून व वाचून मी शहाणी होईन. प्रेम करून शहाणी होईन. दुसऱ्यांच्या उपयोगी पडून मी शहाणी होईन. परंतु माझा होईल का रे कुणाला उपयोग? सध्या आईला तरी होतो आहे,

कल्याण, तू मागं लिहिलं होतंस की कविता केल्या आहेत म्हणून. मला पाठव त्यांतील काही. आजी होती ना, ती स्वत: गाणी रची. मलासुध्दा येतील का रे गाणी करायला? कल्याणला कविता करायला येतात, मला संध्येला कां येणार नाहीत? मीसुध्दां गाणी करून तुला पाठवीन. परंतु त्यांना हसू नको. नाव ठेवू नको. स्वराज्याची, झेंड्याची गाणी मला पाठव. तू बरीच पाठ केली असशील. तुला आवडतील ती मला पाठव.

आज आमच्याकडे आंबाडीची भाजी होती. मीच केली होती. वरती लसणीची फोडणी. मला पालेभाजी फार आवडते. आई म्हणते, 'संध्ये, मागच्या जन्मी का बकरी होतीस?' कल्याण, मला भाजी छान करता येते व भाकरीही छान करता येते. आजी म्हणायची, 'संध्येची भाकरी म्हणजे पौर्णिमेचा चंद्र.' माझ्या हातची भाजीभाकर खायला केव्हां येशील तू? परंतु तुझ्याजवळ पैसे


श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

नसतील. मी तरी आईजवळ कसे मागू? कल्याण,आईजवळसुध्दा मागायला संकोच वाटतो नाही? ज्याच्याजवळ आपण वाटेल ते, वाटेल तितकं व वाटेल तेव्हा नि:संकोचपणं मागू शकू असं असतं का रे कोणी? कोणाची भीती वाटते, कोणाची लाज वाटते, कोणाजवळ संकोच वाटतो; काही ना काही आड येतंच. नाही का?

कल्याण, तू आखाड्यात जातोस का? कुस्ती खेळतोस का? तुझं पीळदार शरीर सर्वांना आवडत असेल. परंतु तिथं नसेल दूध; नसेल चांगलं खायला; तू फार व्यायाम करूच नकोस. बेताचा कर. जप हो प्रकृतीला. मला पत्र पाठव. तुझ्या सर्व मित्रांना प्रणाम. हरिणीला प्रणाम. आता पत्र पुरे करायला हवं. शाळा सुटेल व शरद आणि अनु घरी येतील. दोन–तीन तास हे पत्र लिहीत आहे. परंतु वाचून होईल पाच मिनिटांत. माझं अक्षर छान आहे की नाही तें कळव. संध्याकाळ होत आली. आता कळशी घेऊन विहिरीवर जाईन. सायंकाळचे रंग पाहीन. तू बघतोस का रंग? तू आखाड्यात मातीनं रंगत असशील, होय ना? बरं तर. पुरे आता.

तुझी

**संध्या**

संध्येचं पत्र कल्याणला आवडले. तो आनंदला. अलीकडे त्याला कविता करायचा नाद लागला होता. तो गाणी गुणगुणे, कविता गुणगुणे. त्याच्या मनाला, बुध्दीला पंख फुटले होते. चुलत्यांकडे जरी कोंडमारा होत असे, तरी त्याला न जुमानता त्याचा उत्साह उचंबळून राही. जोरदार अंकुर कठीण जमिनीला फोडून वर येतो.जोरदार मुळे दगड फोडून पसरतात. वेगवान नदीला कोण विरोध करील? नर्मदेचा वेगवान प्रवांह दगडांना चिरून नाही का गेला? त्या दगडांचे आरसे नाही का तिने बनविले? त्या दगडामधील धवलत्व तिने

त्यांना नाही का दाखविले? भावना जोरदार व उत्कट असतील, तर सर्व कोंडमारा सहन करुनही त्या वाढल्याशिवाय राहणार नाहीत. देशभक्तांना तुरूंगात टाका,किसान कामगार कार्यकर्त्यांना वर्षानुवर्षे म्हणावे अटक करून ठेवा. त्या तुरुंगाच्या भिंती, ते लोखंडी गज त्यांचा आत्मा मारू शकणार नाहीत. आणि समजा, त्यांची शरीरे पडली, तरी विचार थोडाच मरणार आहे? बलिदानाने विचार अधिकच वाढतो. मानवी विचार शेवटी मुक्त होईल. सारी मारक साधने तुटून जातील. बुध्दी स्वतंत्र होईल. तिची प्रभा सर्वत्र फाकेल व या पृथ्वीवरील विविधतेत मनोरम स्वर्ग निर्माण होईल.

चुलता व चुलती कल्याणचा बलवान आत्मा गुदमरवू पाहात होती. परंतु कल्याणच्या पीळदार शरीरातील पीळदार मन कोण मारणार? कल्याण मुक्तपणे वागे. तो घरातील बोलण्याला भीक घालीत नसे. तो नदीत पोहायला जाई. टेकडीवर फिरायला जाई. मैदानात खेळायला जाई. तो अभ्यासमंडळात जाई. व्याख्यानांना जाई. विश्वासबरोबर ओंकारेश्वराच्या घाटावर बसून चर्चा करी. त्या पेटलेल्या स्मशानाची त्यांना कधीही भीती वाटत नसे. एके दिवशी तर त्यांनी कमालच केली. दोघे मित्र बराच वेळ रात्री घाटावर बोलत होते. अंगात नुसते सदरे. एकदम त्यांना हुडहुडी भरली. अंग थरथरू लागले.

''भयंकर थंडी!'' कल्याण म्हणाला.

''ही थंडी की दुसरी काही बाधा?'' विश्वास हसत परंतु जरा भीतीने म्हणाला.

''भुताची बाधा असं का तुझ्या मनात आलं?''

''तसं नाही रे.''

''ती बघ चिता जळत आहे. चल, तिथं शेकत बसू व पोटभर बोलू थंडीही पळेल.''

''चितेजवळ?''

''त्यात काय झालं?''

विश्वासचा हात धरून कल्याणने त्याला नेले. विश्वास भीत नव्हता. भित्रेपणाची त्याला चीड होती. परंतु त्याच्या सदभिरूचीला ते सहन होईना. विश्वासच्या भावना जरा कोमल का होत्या? दूध काढणारा विश्वास अधिक प्रेमळ का होता? कल्याणने त्याला ओढीत नेले. चितेपासून थोड्या अंतरावर ते बसले. दुरूनही धग लागत होती.

''गेली का थंडी ?'' कल्याणने विचारले.

''कल्याण, काही म्हण; पण मला इथं बसणं बरं नाही वाटत. दुसऱ्याच्या मरणाची ही थट्टा आहे. त्या मृताचे सखे–सोयरे काय म्हणतील? त्यांच्या भावनांना काय वाटेल?''

''विश्वास, अरे जगात जिवंतपणी हेंच सर्वत्र चाललं आहे. तू ते परवा कामगार पुढाऱ्याचं व्याख्यान नाही का ऐकलंस? या जगात श्रमणाऱ्यांच्या जीवनाच्या होळ्या पेटवून शेकत बसणं हा धर्म झाला आहे. त्यामुळं कोणाच्याही कोमल भावनांना धक्का बसत नाही. जिवंत असतील त्यांना मारणं व मेलेल्यांची कौतुकं करणं, असा हा धर्म आहे.''

''कल्याण, त्या दिवशीचं तें व्याख्यांन खरंच अपूर्व होतं. त्या व्याख्यात्यांची हुर्यो करावी म्हणून मी गेलो होतो. परंतु शेवटी माझे हात जोडले गेले. इतिहासावर कसा निराळाच प्रकाश त्यांनी पाडला. मराठ्यांच्या इतिहासांतील खरा अर्थ त्यांनी कसा दाखवला? त्यांनी दाखवलेले शिवछत्रपती कसे निराळे दिसले? त्यांच्या व्याख्यानांत त्वेष नाही, आदळआपट नाही, उगीच भ्रामक भावनांचं अकांडतांडव नाही. सरळ सरळ बुध्दिवाद, सरळ वस्तुस्थिती, सरळ अर्थशास्त्र!''

''विश्वास, आपण खूप अभ्यास केला पाहिजे. सारं सोडावं व अशा कार्यकर्त्याजवळ जाऊन राहावं व शिकावं असं मनांत येतं. शाळा–कॉलेजातील मरतुकड शिक्षण नकोसं वाटतं. पण खायचं काय, राहायचं कुठं? त्या कार्यकर्त्यावर आपला भार थोडाच घालायचा?''

''कल्याण, चल, आता जाऊ. मला पुन्हा पहाटे उठायचं आहे.''

दोघे मित्र निघून गेले. कल्याण घरी गेला. वाड्याला आतून कडी होती. त्यांने खूप हाका मारल्या. परंतु दार उघडेना. बऱ्याच वेळाने दार एकदाचे उघडले.

''तू रोज रोज रात्री असा उशीर करतोस. उद्यापासून कोणी दार उघडणार नाही. समजलास?'' चुलते रागाने म्हणाले.

कल्याण काही बोलला नाही. तो मुकाट्याने जाऊन अंथरुणावर पडला. त्याच्या मनात किती तरी विचार येत होते. संध्येची आठवण झाली. तिच्या पत्राचे उत्तर त्याने अद्याप लिहिले नव्हते. सकाळी उठल्यावर तो पत्र लिहायला बसला.

''प्रिय संध्याराणी,

पुष्कळ दिवस झाले. तुला पत्र लिहिलं नाही. रागावली असशील. आकाशातील संध्येप्रमाणं लाल झाली असशील.परंतु त्या लाल रंगातून शेवटी किती तरी सुंदर रंग प्रकट होतात. खरं ना? संध्ये, रागावू नकोस. येथील वेळ केव्हाच जातो. शाळा असते. अभ्यासमंडळ असतात. घरचं काम. आमची हिंडणीफिरणी, आखाडा आहेच. संध्ये, तुझ्यावर तर मोठीच आपत्ती आली. वडील गेले, चुलते गेले. प्रेमळ आजी गेली. मी काय लिहू, काय सांगू? माझ्यापेक्षा तुलाच पुष्कळ समजतं. आजीजवळ तू भावना व विचार याचं शिक्षण घेतलं आहेस. तुझं पत्र किती सुंदर! तुझ्यासारखं पत्र मला नाही

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय सातारा
दाखल नं ११७७१ ग्रंथानुक्रमांक ८५ ९५०४
किंमत २५०/- पाने ३८५

लिहिता येणार.

संध्ये, मी कविता करीत असे; परंतु काव्याचा मोसम संपत आला. प्रत्येकाच्या आयुष्यांत कविता करण्याचा एक हंगाम येऊन जातो. माझ्या आयुष्यात तो हंगाम पटकन येऊन गेला. शब्दांच्या कवितांचा आता कंटाळा आला आहे. मी हल्ली पुष्कळ वाचतो. ज्ञानाची मला तहान लागली आहे. नवीन ज्ञानाची, नवीन विचारांची, क्रांतिकारक तत्त्वज्ञानाची. मी क्रान्तिकारक होणार आहे. एखाद्या अधिकाऱ्याचा खून करण्याची क्रांती नव्हे, तर नवीन समाज बनवणारी क्रांती. श्रमणाऱ्यांचं राज्य स्थापण्याची क्रांती. हल्ली सभांतून मी बोलत नाही. गाणीं म्हणतो. इन्किलाबची गाणी. क्रांतीची गाणी. ती तुला पाठवीन.

संध्ये, इंग्रजी शिकून मनुष्य मोठा होतो असं नाही. इंग्रजी भाषा हे एक ज्ञानाचं साधन आहे. इंग्रजी भाषेत दुनियेतील विचार आहेत. जो जो इंग्रजी शिकतो, तो मोठा असं नव्हे. उलट हे इंग्रजी शिकलेले पुष्कळ वेळा अधिक लाचार व भिकार होतात. त्यांना नोकरी हवी असते. श्रमांना ते कंटाळतात. कोणतही काम ते करू शकत नाहीत. त्यांच्यापेक्षा गवंड्याच्या हाताखाली राहण्यात अधिक स्वतंत्रता व स्वाभिमान आहे. पुण्याला इंग्रजी शाळा पुष्कळ आहेत. इथं व्याख्यानंही रोज असतात. याचा अर्थ इथं माणुसकी अधिक आहे असं नाहीं. इथं जुने अहंकार आहेत. आजच्या नवीन युगातही बुरसटलेल्या धर्माची ढोलकी वाजवणारे आहेत. हिंदू-मुसलमानांचे द्वेष पेटवण्यात सार्थकता मिरवणारे कपाळकरंटे राष्ट्रघातकी लोक इथं आहेत. गरिबांच्या दुःखाची टिंगल करणारे परंतु हिंदुत्वाची पोकळ व बाह्यात्कारी शेखी मिरवणारे सकुंचित बुध्दीचे, डबक्यातील बेडूक इथं भरपूर आहेत. सारा फाजिलपणा इथं आहे. काही थोड्याशा तरुणांना विशाल दृष्टी आहे. बाकी सारे बिळांतील सरडे.

इथं मध्यंतरी एक थोर किसान कामगार कार्यकर्ते आले होते. त्यांची व्याख्यानं ऐकली. ते अभ्यासमंडळातही आले होते. ''श्रमजीवी-सत्ता स्थापन

झाली पाहिजे, संघटना आर्थिक पायावर हवी. पोटाचे प्रश्न हाती घेऊन चळवळ केली पाहिजे. लोकांनी स्वत:चं दैन्य मनात आणून संतापू नये म्हणून धर्माची थोतांडं निघाली. पूर्वकर्माची भ्रामक तत्त्वज्ञानं निघाली. धर्म म्हणजे सर्वांना सुखी करण्याचा प्रयत्न. तो धर्म आज कुठंच नाही. पूर्वीही नव्हता, खरा धर्म अद्याप यायचा आहे. सर्वांचा विकास झाला पाहिजे. सर्वांना संधी हवी. ना हिंदू–मुसलमान, ना स्पृश्य–अस्पृश्य. सारी माणसं. सर्वांची मान उंच असू दे.''

संध्ये, असं किती तरी त्यांनी सांगितलं. असा समाज बनवायचा आहे. थोर कार्य आहे. या कार्यासाठी लाखो उठायला हवेत. त्याग व बलिदान, संघटना व पराक्रम, स्वच्छ विचार व मोठी दृष्टी–यांची जरूर आहे.

आधी कामगार संघटित होतात. ते मोठमोठ्या शहरांत एकत्र काम करतात. त्यांना एकदम एकत्र जमवता येतं. कामगारांची सेना भांडवलवाल्यांनी आधी एकत्र आणलेलीच असते. तिला नवीन नेतृत्व व दृष्टी दिली म्हणजे झालं. कामगारांची सर्वांची सारखीच परिस्थिती. आगा ना पिछा. घर ना दार. असा हा कामगार क्रांतीच्या आघाडीवर उभा राहतो. तो क्रांती करतो. शेतकरी त्याला साथ देतो. शेतकरी मागून उठावणी करतो. शेतकरी गांवोगांव पांगलेला. त्यांची संघटना करणं कठीण असतं. परंतु कसणाऱ्याची जमीन, कर्ज रद्द करू, कर माफक करू, असे आर्थिक कार्यक्रम घेऊ तर शेतकरीही पटकन उभा राहतो, हे चीन देशात दिसून आलं आहे.

संध्ये, पुढंमागं मी कामगारांत जाईन, शेतकऱ्यांत जाईन. मुंबईला जाऊन कामगारांत राहीन. त्यांचे प्रश्न अभ्यासीन. कामगारांच्या चळवळींत पडेन.त्यात लढेन, मरेन; देशासाठी मरण म्हणजे कुणासाठी? देश म्हणजे शेवटी देशांतील ९० टक्के श्रमणारे लोक, त्यांच्यासाठी जो जगतो तो खरा देशभक्त. तो खरा धार्मिक.

संध्ये, मी तुझ्याकडे कधी येईन, मला काय ठाऊक? तू शरीरानं उंच झालीस. मनानंही हो. भावनांनी उंच हो. एक दिवस हा कल्याण तुझ्याकडे येईल. तुला मुंबई–पुण्याला घेऊन जाईल. पण आज सारं अशक्य आहे. अद्याप अवकाश आहे. आपण मोठी होऊ या. आणखी मोठी होऊ या. अजून आपण त्या दृष्टीनं लहानच आहोत. नाही का?

तुझ्या हातची भाजीभाकर खायला मी येईन. मिटक्या मारून मी खाईन. मलाही पालेभाजी आवडते. कच्चीही आवडते. मुळ्याचा पाला मी कच्चाच भराभरा खाऊ लागतो व काकू राग भरते. मी तुझ्याकडे आलो तर कच्ची पालेभाजी माझ्यापुढं ठेव. तुला त्रास नको. खरं ना? तुला तुझी आई खाऊ देते. मलाही इथं खाऊ मिळतो. शिव्यांचा खाऊ. आणि मी का आता लहान आहे, इतर खाऊ खायला? संध्ये, मी जवळजवळ वीस वर्षांचा होईन लौकरच. मी का लहान आता? परंतु मी लहान आहे, असचं मला अद्याप वाटतं.

तुला मी गाण्यांचं एक पुस्तक पाठवीन. संध्ये, आनंदात राहा. तुझ्या आईला प्रणाम. लहान भावंडांना आशीर्वाद. हें लहानस पत्र पुरे. मला मोठं पत्र लिहिता येत नाही. पत्रं नाही लिहू शकत. तूं मात्र मोठं पत्र लिहीत जा हो.

तुझा

**कल्याण**

संध्या व कल्याण एकमेकांना मधूनमधून पत्रे पाठवीत. आणि ते गाण्यांचे पुस्तकही संध्येला आले. संध्या त्यातील गाणी म्हणे.

''संध्ये, चांगली आहेत ही गाणी.''एके दिवशी आई म्हणाली.

''कल्याणनं पाठवली.''

''कल्याणचा फोटो तुझ्याजवळ आहे. होय ना?''

''तू केव्हा पाहिलास, आई?''

''पाहिला एकदा.''

''कल्याण आता मोठा झाला असेल.''

''तूही काही आता लहान नाहीस.''

''मी का फार मोठी आहे?''

''संध्ये, मोठी नाहीस तर काय? परवा भावजी आले होते. तू विहिरीवर धुणी धूत होतीस. ते म्हणत होते की संध्येचं लग्न करून टाकावं. चांगलं स्थळ आहे. अलीकडे मीही याच चिंतेत असते. भावजी व मी बराच वेळ बोलत होतो. त्यांना पुन्हा या असं सांगितलं आहे. ते येतील. संध्ये, त्यांना काय सांगायचं?''

''आई, मला लग्न नको. नकोत या भानगडी.''

''संध्ये, तुला आता सारं समजतं. लग्न नको काय? काही तरीच बोलावं. भावजींचं मन दुखवू नकोस. आहे तरी कोण दुसरं खटपटी करायला? तुझी आई कुठं जाईल स्थळ शोधायला?''

''आई, स्थळं शोधायला नकोत. आपोआप नेमानेमाच्या गोष्टी होतील. देवानं गांठी बांधून ठेवल्याच असतील.''

मायलेकींची अशी बोलणी चालू होती. तोंच पुंडलिकराव आले.

''काय वैनी, कसली चालली आहेत बोलणी?'' बसून ते म्हणाले.

''लग्नाचं बोलणं.''

''संध्ये, मी तुला सुंदर स्थळ आणलं आहे. नवरा मुलगा श्रीमंत आहे. घरी जमीनजुमला भरपूर. मोटारीतून हिंडशील, राजाची राणी शोभशील. वैनी, असं स्थळ हातचं गमावू नये. संध्येला काय विचारता? मुलींना काय कळतं? त्यांना विचारलं तर लाजतील. होय की नाही, संध्ये?''

''काका, माझं लग्न ठरवण्याची घाई नको. देव आपोआप सारं करील?''



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

''देव काय करणार आहे?''

''तुमचा देवावर विश्वास नाही ?''

''अगं, देवावर विश्वास म्हणजे आपण हातपाय न हालवणं? आपले प्रयत्न देवाला आवडले तर तो आशीर्वाद देईल, प्रयत्न सफल होतील. लग्न वेळीच झालं पाहिजे. पुढं मग जड जातं. लोक नाना शंका घेतात,तर्क चालवतात.''

''संध्ये, तुझ्या काकांना तू नाही म्हणू नकोस. आता त्यांचाच काय तो आपणाला आधार आहे. कोण आहे दुसरं?''

''आई, का तुम्ही सारी मला घालवू पाहता?''

''सुखात घालवत आहोत. वेल वृक्षावर चढवीत आहात. जीवनाचा तुला सोबती देत आहोत,'' चुलते म्हणाले.

''ज्याची ओळख ना देख, तो का सोबती?''

''संध्ये, उगीच काही तरी बोलू नकोस. ओळखदेख होते. शेकडो वर्षापासून लग्नं होत आली. ती का फुकट गेली? त्यांच्या संसारात का सुख पिकलं नाही, प्रेम फुलल नाही? आणि प्रेम जडून होणारे विवाह तरी का शेवटपर्यंत सुखाचे होतात? पहिला भर ओसरला म्हणजे कटकटीच सुरू होतात. संध्ये, सुख हे समजुतीनं संसारात निर्माव लागतं. तडजोड, सहकार्य हाच खरा सुखाचा मार्ग. प्रेम क्षणभर फुलतं. तो मार्ग चिरंजीव नाही. धोक्याचा आहे.'' चुलत्याने प्रवचन दिले.

''काका, मला काही समजत नाही. परंतु मी एक सांगते की माझ्या लग्नाची खटपट नको. तुम्ही या फंदात पडू नका.''

''संध्ये, माझं कर्तव्य म्हणून या फंदात मला पडावं लागतं. जर तुझ्या लग्नाची मी खटपट न करीन, जबाबदारी न उचलीन, तर लोक मला नावं

ठेवतील. संध्ये, मी स्थळ आणीन ते तू पसंत करशील ना? मी तुझं कदापि अहित करणार नाही. माझ्यावर विश्वास टाक. तुझा भावी संसार सुखाचा होऊ नये असं का तुझा चुलता इच्छील? मी का शत्रू आहे? सांग, काकांची फजिती नाही ना होऊ देणार? पाहू ना स्थळ?''

''काका, मी काय सांगू? मोकळेपणानं सांगेन तर संतापाल.''

''मोकळेपणानं सांग. तू कांही लहान नाहीस.''

''काका, संध्येचा विवाह तिला नकळत लागून गेला आहे.''

''काय, तुझा विवाह झाला?''

''हो.''

''काय सांगतेस, संध्ये?''

''सत्य ते सांगत आहे.''

''तू कुळाला काळिमा लावणार एकूण!''

''नाही काका, संध्या मूर्ख नाही; मोठ्या काकांचं, आजीचं नाव मी कलंकित करणार नाही संध्येनं कोणतही पाप केलं नाही. परंतु मनानं मी एकाला वरून ठेवलं आहे. त्याला माळ घातली आहे. लग्नाच्या गोष्टी अलीकडे आई मजजवळ बोलत असे. मी मनात पाहिलं. माझ्या जीवनात कोणी तरी शिरलं आहे. असं मला आढळलं, जो जीवनात सहजपणे राजाप्रमाणं नि:शंकपणं शिरला, तोच मी वरिला. त्याच्याशीच लग्न लावीन असं मी ठरवलं, मी त्याच्याशी लग्न करीन असं मला प्रथमपासूनच का नकळत वाटत होतं ? मला माहीत नाही. मनाचे अनंत खेळ, मनाची अनंत शक्ती , माझी त्याची सहज भेट झाली. ती भेट अमर झाली. तो माझा व मी त्याची. तो माझा होईल की नाही कुणी सांगावं ? परंतु मी स्वत:चं जीवन त्याला दिलं आहे.''

''कोण तो?''

''माझा कल्याण! नयनमनोहर कोमल कल्याण! सुंदर शरीराचा पवित्र मनाचा, उदार भावनांचा कल्याण! शेजारच्या सुपाणी गावचा. परंतु तो पुण्याला आहे. शिकत आहे. मला पत्रं पाठवतो. थोर दिलदार तरुण! संध्येचं त्या कल्याणशी लग्न लागेल. माझ्या जीवनातील राम म्हणजे तो शूर निर्भय प्रेमळ तरुण. क्रांती करू पाहणारा तो तरुण. मी गरिबांसाठी मरेन असं म्हणणारा तो तरुण. काका, आता संध्येच्या लग्नाचा विषय कृपा करून पुन्हा कोणी कधी काढू नका. तुमच्या संध्येचं लग्न–मानसिक लग्न केव्हाच लागून गेलं आहे. औपचारिक व्हायचं राहिलं आहे. ते योग असेल तेव्हा होईल.''

✦✦✦

६...

# पहिला तुरुंगवास

कल्याण व विश्वास मॅट्रिकच्या परीक्षेला बसले. परीक्षा झाली. महात्मा गांधींचा १९३२ सालातील दुसरा सत्याग्रह सुरू होता. कल्याण व विश्वास या दोघांनी त्यात सामील होण्याचे ठरविले; विश्वास कऱ्हाडच्या बाजूला गेला. कल्याण ठाणे जिल्ह्यात गेला. दोघांनी घरी कोणाला सांगीतले नाही. कल्याणला सत्याग्रहाबद्‌ल अटक झाली. त्याचा खटला सुरू झाला. खटल्याच्या वेळेला त्यांने तरुणाला साजेसा विक्षिप्तपणा दाखविला.

''तुमचा गाव कोणला ?''

''माझा अमुक एक गाव असा नाही. सारं हिंदुस्थान माझं. सात लाख गांवं माझीच गावं.''

''तुम्ही उनाडटप्पू दिसता.''

''हिंदुस्थानात चार कोटी बेकार आहेत. बेकारांना काम द्यायची जबाबदारी सरकारवर आहे. काम पुरवण्याचं कर्तव्य न करता बेकारांना पुन्हा उनाडटप्पू म्हणून पकडणं या चावटपणाला काय म्हणावं ते मला कळत नाही.''

''तुमचं वय काय?''

''मला काय माहीत?''

''तुमच्या वडिलांचं नाव काय?''

''मी सांगणार नाही.''

''सागीतलं पाहिजे. ''

''गांधीराम असं लिहा.''

''आणि तुमचं नाव?''

''मला कोणी अण्णा म्हणतात, कोणी भाई म्हणतात, कोणी कल्याण म्हणतात, कोणी कांही–''

''तुम्हाला नीट उत्तर द्यायचं आहे की नाही?''

''तुम्हाला नीट उत्तर काय म्हणून द्यावं?

''गांधीजींचा हा सविनय कायदेभंग आहे. सविनय शब्द ध्यानात घ्या.''

''महात्माजींच तत्त्वज्ञान तुमच्या तोंडून ऐकायची माझी इच्छा नाही.''

''तुम्ही तरुण आहात. हे फंद सोडा. माफी मागा. मी सोडून देतो,''

''मी तरुण आहे म्हणून तर कचेरीवर झेंडा लावायला प्रवृत्त झालो, हा सेवाफंद नाही. मी कर्तव्य केलं, माफी कसली? सोडून नका देऊ. जास्तीत जास्त शिक्षा द्या.''

कल्याणला एक वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा झाली. तुरुंगात त्याची रवानगी झाली. तेथे शेंकडो सत्याग्रही होते. त्यांत तो मिसळला. तो आनंदला. लौकरच तेथून दुसऱ्या जेलमध्ये सत्याग्रहींची तुकडी रवाना झाली. तीत कल्याण होता.

कल्याण तुरुगात गेला; परंतु विश्वास कोठे होता? त्याला पकडून

त्यांच्या घरी पोचविण्यात आले. जर तुमचा मुलगा असा फालतूपणा करील. तर तुम्हाला दंड होईल अशी त्याच्या वडिलांना समज देण्यात आली. विश्वास घरीच राहिला. तो मॅट्रिकच्या परीक्षेंत पास झाला. कल्याणही झाला. विश्वासचे वडील प्रसन्न झाले.

''विश्वास, तू पास झालास. कॉलेजात नाव घाल. खूप शीक. बी.ए. हो; नाव काढ.'' ते त्याला प्रेमाने म्हणाले. विश्वास आता चैन करू लागला. त्यांने सुंदर कपडे केले. तो आधीच गोरागोमटा होता. त्याने केस ठेवले.तो सुंदर भांग पाडी. तो रोज सिनेमा पाहू लागला. त्याला दर आठवड्याला वडील दोन रुपये खाजगी खर्चाला देत. विश्वास हॉटेलमध्ये जाई. चहा पिई. विश्वासने आतापर्यत कधी सुख भोगले नव्हते, स्वातंत्र्य भोगले नव्हते. आता तो स्वच्छंद वागू लागला. चैन करू लागला. त्याला कर्तव्याची का विस्मृती पडली? ओंकारेश्वराच्या घाटावरच्या कल्याणच्या व त्याच्या चर्चा, त्या का साऱ्या वाहून गेल्या? आता तो दुधे काढीत नसे. दुधे घालीत नसे. तो घरचे काम करीत नसे. तो कॉलेजातील ऐटबाज विद्यार्थी झाला होता!

''सुरुवातीला जेलमध्ये बरीच कामे देण्यात आली. पुढे वातावरण निवळले. पुस्तके मिळू लागली. कामाचा छकडा थोडा कमी झाला. रविवारी सारे एकत्र जमू लागले. चर्चा करू लागले.

''कल्याण आता वेळ मिळेल तेव्हा वाची. एक क्षणही तो फुकट दवडीत नसे. गांधीवाद, समाजसत्तावाद, हिंसा, अहिंसा सर्व प्रश्नांच्या तेथे चर्चा होत. खडाजंगी होई. तो सारे ऐके. समाजवादी तत्वज्ञान, मार्क्सचे तत्वज्ञान त्याला आकर्षू लागले. त्याच्या मनाचा तिकडे ओढा होताच. आता नीट शास्त्रीय व चिकित्सक दृष्टीने ते प्रश्न तो अभ्यासू लागला. महात्माजींचा ''विश्वस्तवाद'' त्याला अशक्य वाटे. आपणाजवळची संपत्ती ही गरिबांची ठेव आहे, ती त्यांना परत केली पाहिजे, असे कोणता सावकार, जमीनदार,

कारखानदार मानणार? साधूसंत व पैगंबर हजारो वर्षे सांगत आले. परंतु एकीकडे लक्षाधीश व एकीकडे भिक्षाधीश आहेतच. एकीकडे मेजवान्या व एकीकडे उपासमार आहेच. एकीकडे गोलपोट्ये व एकीकडे खोलपोट्ये आहेतच. उपदेशांनी काही होणार नाही. साऱ्या पिळल्या जाणाऱ्या श्रमणाऱ्यांची एकजूट करून उत्पादनसाधने समाजाची केल्याशिवाय यातून मार्ग नाही. हाच नवधर्म, हाच सर्वांच्या सर्वांगीण विकासाचा एकमेव पंथ.

''कल्याण अशा तऱ्हेने विचाराने वाढत होता. त्याला विश्वासची आठवण येई. तो कोठल्या तुरुंगात असेल, त्याचे हाल झाले असतील का, वगैरे त्याच्या मनात येई. परंतु विश्वास तिकडे घरी सुखात होता. मौज करीत होता. आणि संध्या? ज्या वर्तमानपत्रात कल्याणला शिक्षा झाल्याचे तिने वाचले, तो अंक तिने जपून ठेवला होता. ती रोज देवाला प्रार्थना करी व म्हणे, ''माझा कल्याण सुखरूप ठेव.'' तुरुंग! तुरुंग हा शब्द भयंकर आहे. तुरुंग म्हणताच मनासमोर भयानक चित्र उभे राहते. वर्तमानपत्रांतून तुरुंगातील हालांच्या हकीकती येत व संध्या रडे. ती देवाच्या पाया पडे.

एके दिवशी संध्या बाहेर गेली. फिरत फिरत ती त्या झाडाजवळ आली. ज्या झाडाखाली कल्याणची व तिची भेट झाली होती, जेथे कल्याण झोपला होता. संध्याही तेथे आज क्षणभर डोके ठेवून पडून राहिली. कधी येईल कल्याण तुरुंगातून बाहेर? कधी भेटेल मला? कल्याणला भेटायला जाऊ का? परंतु तो कुठल्या तुरुंगातून असेल? कसा भेटेल? संध्या उठली. खिन्न व दुःखी होऊन ती घरी आली. हातात जपमाळ घेऊन ती बसली. अल्लड, खेळकर संध्या! ती आज जणू योगिनी झाली होती!

संध्या देवाला आळवीत होती व नाशिकच्या तुरुंगात कल्याण मनातील असल्यानसल्या देवाला हदपार करीत होता.जड प्रकृतीतून कसा तरी व केव्हा तरी जंतू जन्मला. त्या जंतूंतूनच पुढे विकास होत होत शेवटी मनुष्य

जन्मला. जडातून चैतन्य निर्माण झाले. ते चैतन्य निर्माण झाल्यावर जडाची चैतन्यावर, जडावर क्रिया–प्रतिक्रिया होत विरोधविकासवादी पध्दतीने हे सारे विश्व पुढे चालले आहे. ह्या गोष्टी तो शिकत होता. व त्याला त्या पटत होत्या. इतिहासाकडे याच दृष्टीने तो पाहू लागला होता. विरोधविकासवाद सर्व विश्वात भरून राहिला आहे. मानवी जीवनांतही तो आहे. मानवी जीवनात पोटापाण्याचे प्रश्न आधी असतात. यामुळे मानवी इतिहासात अर्थशास्त्राचा धागा हाती घेऊन विरोधविकासवाद शोधीत गेले पाहिजे.

कल्याणच्या मनात शंका येत असत. तो झगडत होता. आपण सदैव विकासाकडेच जात आहोत का? जग अधिक उन्नत व सुंदरच होत आहे का? मनुष्य आहे तेथेच आहे,काय आहे त्याच्यात सुधारणा? अजून माणूस माणसाला छळत आहे, गुलाम करीत आहे, क्षूद्र भांडणे तो भांडत आहे. त्यांची वासना तशीच स्वैर आहे. तेच रागद्वेष थैमान घालीत आहेत. बैलगाड्या जाऊन विमाने आली. परंतु माणसाचे रागद्वेषादी विमानाच्या गतीने धुडगूस घालू लागले. साऱ्या जगाची होळी करू लागले. पूर्वी मनुष्य जवळच्या वस्तूला आग लावी आणि आता विमानातून साऱ्या जगाला आग लावतो. बाह्य परिस्थितीत मानवाने फरक केला, परंतु त्याच्या मनःसृष्टीत काय आहे फरक? निसर्गाला तो जिंकीत आहे. दुबळ्या लोकांना तो जिंकीत आहे. परंतु स्वतःच्या मनाला, स्वार्थाला त्यांने जिंकले आहे का? ते जोपर्यंत होत नाही, अखिल मानवी समाजाच्या कल्याणाची भावना जोंपर्यत मनात रूजत नाही, तोपर्यत हे शोधबोध काय कामाचे? उलट माकडाच्या हाती ते कोलित दिल्याप्रमाणे आहे.

परंतु जगात काहीच का सुधारणा नाही? तीन हजार वर्षाचा इतिहास पाहिला तर मानवी मनाचा काहीच विकास झालेला दिसणार नाही का? नुसते शिक्षांचे प्रकारच पाहिले तरी त्यात सुधारणा नाही का दिसत?

भिंतीत चिणून मारीत, डोळे काढीत, तेलात तळीत, तव्यावर भाजीत, चाकावर घालून भरडीत, पोत्यात विंचू, सरडे, उंदीर, घुशी घालून त्यात बांधीत, जिभा डागून त्यात लोखंडी वळी बसवीत, सुळावर देत, कुऱ्हाडीने तोडीत! काय हा मानव! परंतु थोडी नाही का सुधारणा?

मनुष्य अशा स्थितीतून वर येत आहे. क्रूरपणा कमी होत आहे. वाईट चाली कमी होत आहेत. थोडे स्वातंत्र्य वाढत आहे. अमेरिकेत निग्रोंची मान उंच होत आहे. गुलामगिरीची चाल बंद झाली. हिंदुस्थानातील अस्पृश्यता दूर होऊ लागली.

परंतु गुलामगिरी अन्य रूपाने येतच आहे. वसाहतीतील लोक गुलामच नाहीत का? हुकूमशहा एक प्रकारे स्वतःच्या लोकांनाही गुलामच नाही का करीत? कोठें आहे त्यांना बुध्दीचे स्वातंत्र्य? कोठे आहे त्यांच्या लोकांच्या विचाराला वाव? आणि एकदां बुद्धी बद्ध झाली, म्हणजे ज्ञान–विज्ञानाचा अस्त नाही का होणार? पुन्हा का अज्ञानयुग येणार?

विरोधविकासवाद! विरोधातून विकास.जगात विरोध तर पदोपदी दिसत आहेत. परंतु सारखा विकासच होत आहे का? मानवी मनाचा विकास आहे कां? कधी कधी तर समाज मागे गेल्याप्रमाणे वाटतो. आजची युरोपातील स्थिती पाहून असे नाही का वाटत? हिंदुस्थानांतील हिंदू–मुसलमानांचे झगडे पाहून असेच नाही का वाटत? परंतु विकासाची फार मोठी पायरी चढून जायच्यावेळी विरोधाचीही पराकाष्ठा होत असेल.

आणि इतिहास म्हणजे का केवळ अर्थशास्त्र? हिंदुस्थानात मांसाशन त्यागाचा महान प्रयोग झाला. तो मानवी मनाच्या विकासार्थ नाही का झाला? भूतदयेसाठी नाही का झाला? त्यात का आर्थिक दृष्टी होती? भगवान बुध्दांची चळवळ का आर्थिक होती? महाराष्ट्रातील संतांची चळवळ, ती का आर्थिक होती?परंतु त्या चळवळीतही खोल पाहू तर आर्थिक प्रश्न दिसतील.

हिंदूस्थानसारख्या सुपीक व समृध्द भूमीतच मांसाशनत्यागाचा प्रयोग शक्य वाटला असेल. शिवाय ज्यांना दूधदुभते भरपूर मिळू शके, ते मांशासन वर्ज्य करू लागले. गरीब लोक मिळेल ते खात होते. परंतु प्रश्न इतका सोपा नाही. इतिहास इतका सुटसुटीत नाही. अर्थ ही एक भूक आहे. मानवी मनाच्या दुसऱ्याही भुका आहेत. सर्व गोष्टीत आर्थिक संबंध पाहणे म्हणजे आततायीपणा आहे. काही मानसशास्त्रज्ञ लैंगिक भुकेला प्राधान्य देतात, तर हे मार्क्सवादी अन्नाच्या भुकेला महत्त्व देतात. विषय व उदर यांशिवाय दुसरे काही नाहीच कां?

माणसांजवळ अधिक काही असेल. परंतु त्याचे पोट नीट भरल्याशिवाय इतर विकास होणार नाही. भरल्या पोटातून तत्त्वज्ञाने जन्मतात. जगात आजपर्यंत जी संस्कृती जन्मली, ती प्रतिष्टित वर्गांनी निर्मिली. एका वर्गाने श्रमावे, दुसऱ्या वर्गाने कला फुलवाव्या, विद्या फुलवाव्या. ग्रीक संस्कृतीचे आपण गोडवे गातो. परंतु ग्रीक संस्कृतीसंवर्धकांना कोण पोषित होते? त्यांनी गुलामांचा एक मोठा वर्गच निर्माण केला. त्या गुलामांनी श्रमावे व प्रतिष्ठितांनी काव्ये रचावी, तत्त्वज्ञानाच्या चर्चा कराव्या. हिंदुस्थानात शेतकरी–मजूर राबत राहिले आणि पांढरपेशा लोकांनी संस्कृती उभी केली. अद्याप सर्व मानवांनी निर्माण केलेली अशी संस्कृती जन्मावयाची आहे. सर्व मानवांना फुरसत मिळेल, पोटाचे प्रश्न सुटून रिकामा वेळ मिळेल, तेव्हाच सारी मानवजात संस्कृतिसंवर्धनांत सामील होईल.

महात्माजीही म्हणाले होते, ''जोपर्यंत मला पोटभर भाकर सर्वांना देता येत नाही, तोपर्यंत मी देवाचे नाव कसे शिकवू ? भगवान बुध्दही म्हणाले,''आधी जेवायला द्या, मग धर्म शिकवा.'' मार्क्सवादी तेच सांगतो. तो मानवाला केवळ डुक्कर नाही मानीत. मनुष्याच्या अन्नवस्त्रादिक आवश्यक गरजा आधी भागल्या पाहिजेत. या गरजा भागवण्यांतच त्याचा सारा दिवस

जाता कामा. ज्या वेळी उत्पादनाची साधने ओबडधोबड होती, त्या काळी एक श्रमणारा वर्ग व एक सस्कृती निर्मिणारा वर्ग असे करावे लागले. त्या काळी ते योग्यही असेल. परंतु आज उत्पादनसाधने यांत्रिक झाली आहेत. थोड्या श्रमात भरपूर निर्माण होते. तरीही आज दिवसभर राबत ठेवण्याची जरुरी काय? ही उत्पादनसाधने समाजाच्या मालकीची केली गेली तर सर्व मानवांना रोज दोन-तीन तास काम करून आपल्या सर्व आवश्यक गरजा भागविता येतील, आणि संस्कृतिसंवर्धनाला सर्वांना भरपूर वाव मिळेल. खरी अखिल मानवांची अशी विविध संस्कृती निर्माण होऊ लागेल.

मार्क्सवादी म्हणतो, अर्थकामांच्या पायावर संस्कृती उभारली जाते. मानवाच्या या दोन गरजा नीट भागल्या तर त्याची वाढ नीट होते. मग विकृती निर्माण होत नाही. मनुष्याच्या पोटाला द्या. त्याच्या भोगवासनाही व्यवस्थितपणे तृप्त होऊ देत. म्हणजे मग मनुष्य बेताल होणार नाही. तो विकसल, नीट वाढेल; झाडाची मुळे खाली असतात, खाली जातात. परंतु यामुळेच त्याच्या डोक्यावर फुलेफळे शोभतात. मानवी मनाच्या विकासाचा फुलोरा दिसायला हवा असेल, तर अर्थकामाची मुळे नीट हवीत. या खालच्या वृत्ती असे म्हणू नका. या खालच्या वृत्तीतूनच पुढे सारी संस्कृती निर्माण होत असते. मनुष्याला खायला, प्यायला द्या. बेताचा श्रमही द्या. त्याची निराशा, अप्रतिष्टा, मानहानी, सदैव काबाडकष्ट, हे सारे कमी करा. म्हणजे मग संस्कृतीची नाना रंगांची व गंधाची फुलेफळे सर्वत्र दिसू लागतील.

मार्क्सवादी केवळ अर्थाला महत्व देतो असे म्हणणे म्हणजे मुद्दाम गैरसमज पसरविणे आहे. अर्थाच्या नीट व्यवस्थेतून खरी संस्कृती शक्य होईल, सर्व मानवांची अशी विशाल संस्कृती शक्य हाईल एवढेंच त्यांचे म्हणणें.

कल्याण मनात झगडत होता. त्याच्या मनात निश्चितता जरी येईना,

अमुकच मार्गाने सारा इतिहास घडत आला असे ठाम वाटेना, तरी इतिहासाकडे पाहण्याची एक स्वतंत्र दृष्टी त्याला मिळाली. थोर उदार हृदये, थोर विचारांना खेंचून घेतात. उंच पर्वत मेघांना ओढून घेतात. ज्याच्या जीवनात ओलावा आहे,दुसऱ्यांची जीवने सतेज व टवटवीत व्हावी म्हणून जो तडफडतो,त्याला उदार विचार आवडतात. त्याचा तो भक्त बनतो.

संध्येला काय माहीत की, ज्याच्या नावाचा जप ती करीत होती,त्या प्रभूंचे नाव ऐकून कल्याण तुरुंगात चिडत होता. आमची स्थिती सुधारण्यासाठी देवाची जरूर नसून आमच्या प्रयत्नांची जरूर आहे असे तो म्हणत होता.संध्ये तुला हे कळले तर काय वाटेल? तुझ्या हातातील ती जपमाळ कल्याणला दिसली,तर तो ती तोडून फेकून देईल. तू कल्याणशी विवाह लावू इच्छितेस. कसे जमेल तुझे त्याच्याशी? तू रामकृष्णांची पौराणिक गाणी म्हणतेस; क्रांतिकारक कल्याणला हे कसे आवडेल?

कल्याणला संध्येची आठवण येई. पण काय असेल ते असो. त्याने तिला पत्र लिहिले नाही. त्याने कोणालाच पत्र लिहिले नाही. विश्वास तुरुंगात असेल अशीच त्याची कल्पना. संध्येला पत्र लिहावे असे एखाद वेळ त्याच्या मनात येई. परंतु त्या विचाराला तो दडपी. कशाला संध्येचे स्मरण? मी क्रांतिकारक होणार. हातात शिर घेऊन लढणार. समोर कधी जन्मठेप, तर कधी फास! कधी हदपार तर कधी स्थानबध्दता. संध्येच्या गळ्याला आपण का फास लावावा? नको. लग्नाचा विचारच नको. लग्न म्हणजे विघ्न, वेडी. ध्येयाला मिठी मारण्यासाठी उंच उड्डाण करू पाहणाऱ्या जिवाला खाली खेचणारे जड वजन म्हणजे लग्न. माझ्या जीवनातून संध्या जाऊदे. ध्येयाचा धगधगीत मध्यान्ह सूर्यच माझ्या जीवनात तळपू दे. संध्येला माझ्या जीवनात स्थान नाही.

कल्याणची पहिली शिक्षा संपणार होती. ती शिक्षा संपल्यावर तो



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

पुन्हा ताबडतोब सत्याग्रह करून तुरुंगात जाणार होता. चळवळ आहे तो घर नको. कोणाची भेटगाठ नको. नाशिकलाच तो पुन्हा फेरी काढून सत्याग्रह करणार होता. त्याने तसे ठरवून टाकले होते.

एके दिवशी तो मुक्त झाला. तो नाशिक शहरात गेला. गोदावरी पाहून त्याला भीमेची आठवण झाली. तो मनमुराद पोहला, डुंबला. नंतर खादी भांडारात गेला. एक भला मोठा तिरंगी झेंडा त्याने विकत घेतला, आणि रस्त्यांतून गाणी म्हणत तो निघाला. हातात तिरंगी झेंडा होता. परंतु मुखाने लाल झेंड्याचे गाणे होते. कोपऱ्याकोपऱ्यावर उभा राहून तो छोटे व्याख्यान देई. पुढे जाई. परंतु एके दिवशी त्याला अटक झाली. खटला होऊन पुन्हा दोन वर्षांची त्याला सजा झाली. त्याला तुरुंगांत पाठविण्यात आले.

तुरुंगात त्याला चक्की मिळाली. परंतु कल्याण डरला नाही. त्याने चक्कीचा खेळ केला. तो इतर कैद्यांजवळ बसे, बोले. स्वराज्यात असे तुरुंग राहणार नाहीत असे सांगे. आधी तुरुंगच नकोत. आम्ही सर्वांना बाहेर नीट काम देऊ. तुम्ही वाईट नाही. तुम्ही चांगले आहात. परिस्थितीमुळे तुम्ही असे झालात, असे त्यांना तो म्हणे.

एखाद वेळ कल्याणला वाटे की, भारतीय तत्त्वज्ञानही मुळात मनुष्य सत् आहे असे मानते, आणि मार्क्सवादीही सामाजिक विषमतेमुळे मनुष्य गुन्हे करतो, मुळात त्याची प्रवृत्ती गुन्ह्याकडे नसते, असे मानतात. यातील थोडे साम्य त्याला मनोरंजक वाटले.

तुरुंगांतील हळूहळू पुष्कळ राजकीय कैदी सुटले, आणि आता थोडे राहिले होते. पुढे शेवटी कल्याण हा एकटाच राजकीय कैदी तेथे राहिला. त्याला तेथे कंटाळा येई. त्याला त्याच्या खोलीतच आता काही काम आणून देण्यात येत असे. तो कोणाजवळ बोलणार, कोणाजवळ हसणार?

एके दिवशी त्याला संध्येची तीव्र आठवण झाली. आईची, रंगाची आठवण झाली. आपण कोणालाही पत्र लिहिले नाही याचे त्याला वाईट वाटले. तो रडला, आपण कृतघ्न आहोत असे त्याला वाटले. त्याने पत्र लिहायला घेतले.

"प्रिय संध्ये,

तुला किती तरी दिवसांत मी पत्र लिहिलं नाही. मी तुला विसरू पाहात होतो. ध्येयाशी समरस होण्याची मी शर्थ करीत होतो. परंतु पक्षी सारखाच का अंतराळांत उड्डाण करतो? त्याला मधूनमधून खाली यावं लागतं. घरट्यात बसावं लागतं. चिवचिव करावीशी वाटते. संध्ये, एखाद वेळ वाटे की, पुढंमागं तू व मी विवाहबद्ध होऊन जाऊ. परंतु माझ्या जीवनातून तो विचार मी काढून टाकीत आहे. संध्ये माझ्यासारख्याचं जीवन म्हणजे होमकुंड. माझ्या संगतीत तुला कोणतं सुख मिळणार? खाण्यापिण्याची ददात पडेल. राहायला नीट जागा नसेल. तुझ्याजवळ बसायला–बोलायला मला वेळही होणार नाही. वर्षानुवर्ष मला तुरुंगात खितपत पडावं लागेल. संध्ये, तू माझी मैत्रीण हो. दुरून प्रेम व सहानुभूती दे. दुरून ओलावा दे.

मी तुरुंगात खूप वाचलं. माझ्या विचारांत क्रांती होत आहे. सारं निराळंच दिसत आहे. पूर्वीचा केवळ कुस्ती खेळणारा कल्याण आता मी राहिलो नाही, विषमतेशी कुस्ती करणारा मी होईन.

संध्ये, माझ्या घरी जा व आईला मी खुशाल आहे असे सांग. रंगा माझा भाऊ त्यालाही सांग. मी किती तरी लिहिणार होतो. परंतु काय लिहावं ते समजत नाही. तू सुखी हो. तुझ्या घरी सर्वांना अनुक्रमे प्रणाम व आशीर्वाद. संध्या, इथं मी एकटाच राजकीय कैदी आहे.

तुझा

**कल्याण**

ते लहानसे पत्र संध्येला मिळाले. ते पत्र लहान होतें. परंतु महान अर्थाने ते भरलेले होते. ते पत्र वाचून संध्या मुकाट्याने अश्रू ढाळीत बसली. ती का सुखासाठी आसावली होती? ती का खाण्यापिण्यासाठी, नटण्या-मुरडण्यासाठी हपापली होती? परंतु ती शांत झाली. मनात तर तिने स्वत:चा विवाह कल्याणशी कधीच लावून टाकला होता. त्याबाबतीत तिने काही न बोलण्याचे ठरविले.

ती कल्याणच्या घरी गेली. त्याचे घर विचारीत ती गेली. तो कल्याणच्या घरी विचित्रच प्रकार तिला दिसला. कल्याणची आई रडत होती. कल्याणचे वडील तेथे होते. लहान रंगा बाहेर आला.

''कोण पाहिजे?'' त्याने विचारले.

''तुमचं नाव का रंगा?''

''हो.''

''तुमच्याजवळ बोलायचं आहे, कल्याणचं पत्र आलं आहे.''

''थांबा, मी बाहेर येतो.''

रंगा व संध्या बाहेर बोलत बोलत भीमातीरी गेली. भीमा पाहात होती. रंगा खिन्न होता.

''तुमच्या बंधूचं तुरुंगांतून पत्र आलं आहे. त्यांची प्रकृती बरी आहे. तुमच्या घरी खुशाली कळवायला त्यांनी सांगितलं म्हणून मी आले.''

''दादाला घरून जाऊन आता तीन-चार वर्षे होतील. तो घरी आला नाही. मला त्याची फार आठवण येते.''

''सुटले म्हणजे बहुधा घरी येतील.''

''तुमची त्यांची काय ओळख?''

''अशीच मागं झाली. आमच्या गावी कुस्तीला आले होते. ते विजयी

झाले होते, मी त्यांना माळ घातली होती.''

''मला आठवते ती माळ. ती का तुम्ही दिली होती?''

''हो.''

''तुम्ही काय करता?''

''घरी असते, देवाची प्रार्थना करते.''

''कोणासाठी प्रार्थना?''

''तुमच्या दादासाठी.''

''माझ्या दादासाठी तुम्ही प्रार्थना करता! किती तुम्ही मायाळू, दयाळू.''

''तुमच्या घरी आज खिन्नता का होती? तुमची आई–ती तुमची आईच असावी, रडत का होती?''

''आईच ती.''

''का रडत होती ती? कल्याणचं पत्र नाही म्हणून. होय ना? मुलगा सारखा तुरूंगांत आहे याचं कुणाला वाईट वाटणार नाही? माझ्यासारखी दूरची मुलगी रडते. मग आई–बापांना किती वाईट वाटत असेल?''

''आईला दादाची आठवण येतेच. परंतु आज त्यासाठी नव्हती रडत. दुसरंच एक कारण आहे. माझे बाबा एका वेश्येवर प्रेम करतात, आणि उद्यापासून ते तिला घरीच आणून ठेवणार आहेत. आईच्या अंगाचा तीळपापड झाला. भांडण झालं. 'तुला नसेल सहन होत तर चालती हो घरातून' असं बाबा म्हणाले. आता ती वेश्या घरी येईल. आईला तिचं सारं करावं लागेल. तिची बोलणी खावी लागतील. काय काय नशिबी असेल ते खरं! मी तरी काय करू? मला सारखं वाईट वाटतं. दादा घरी असता तर तो काही करता. घर सोडून जावं असं मला वाटतं. प्रत्यक्ष डोळ्यांसमोर हे सारं बघवत नाही.''



श्री. छ. प्रतापसिंह (थोरले) नगर वाचनालय, सातारा.

''परंतु तुम्ही घरी आहात तेवढाच आईला आधार. तुम्ही नका जाऊ कुठं''

''तुमचं काय नाव?''

''संध्या.''

''संध्याताई, मी तुम्हाला एक विचारू?''

''विचारा.''

''तुमचं का दादावर प्रेम आहे? ''

''रंगा, काय सांगू मी? ''

''तुमची माळ ट्रंकेत घालून दादा घेऊन गेला होता.''

''खरंच का? ''

''मी का खोटं सांगेन?''

''रंगा, त्यावेळी आम्ही लहान होतो. चार–पाच वर्षापूर्वीची गोष्ट. लहानपणच्या त्या गंमती.''

''परंतु आज दादाचं तुम्हालाच पत्र आलं.''

''रंगा ,तुमचे दादा देशभक्त होणार. ते का लग्नाच्या फंदात पडतील?''

''सारे देशभक्त का अविवाहित होते?''

''विवेकानंद अविवाहित होते. सुभाषचंद्र अविवाहित आहेत.परंतु बहुतेक सारे विवाहितच दिसतात.''

''मग दादा का नाही होणार विवाहित?''

''ते क्रांतिकारक देशभक्त होणार आहेत.''

''क्रांतिकारकांचे महर्षि मार्क्स विवाहित होते. क्रांतिकारकांचा मुकुटमणी लेनिन विवाहित होता.''

''मग दादा का नाही लग्न करणार?''

''मला काय माहीत? मला आपलं वाटतं; ते जाऊ दे रंगा. मी आता जाते. तुम्ही कुठं निघून जाऊ नका. दादा येईपर्यंत आईला धीर द्या. जाते हं मी.''

संध्या माघारी गेली. तिच्या मनात किती तरी विचार खेळत होते. ती अशांत झाली होती. तिला काही सुचत नव्हते. शरद व अनु सायंकाळी खेळून आली. सर्वांची जेवणे–खाणे झाली. संध्या व आई दोघींनी मिळून भांडी घासली. संध्येने आईला काही वाचून दाखविले. नंतर सारी हळूहळू झोपी गेली. परंतु संध्येला झोप येईना. डोळ्यांसमोर तिला भविष्यकाळ दिसत होता. कल्याण चळवळीत पडणार? मला नाही का पडता येणार? मी नाही का तुरुंगात जाणार? मी का भित्री आहे? मी नाही कामगारांच्या बायात जाऊ शकणार? मी त्यांना त्यांची सुखदुःखे विचारीन. त्यांच्या मुलांचे फाटके कपडे शिवीन. कल्याणच्या जीवनाशी मला नाही का अंतर्बाह्य एकरूप होता येणार?

परंतु माझा स्वभाव चळवळ्या नाही असे मला वाटू लागले आहे. मला चळवळ जमणार नाही. घर स्वच्छ ठेवावे, स्वयंपाक नीट करावा, हसावे, प्रेम द्यावे. सेवा करावी, आजाऱ्यांची शुश्रूषा, हेच माझे ध्येय. कल्याणचे मित्र असतील त्यांना जेवायला वाढीन, त्यांची काळजी घेईन. मी सर्वांची दाई होईन, सेविका बनेन. मुकी सेवा हे माझे ध्येय. आदळआपट, चळवळ, ते नाही मला जमणार. खरेच, कोणता आहे माझा स्वभाव?

लहानपणी मी नदीत नाचे, झाडांवर चढे, अंगणात खेळे. कोकिळा कुठे कुऊ करते ते शोधीत मी रानोमाळ भटके. त्यासाठी मी मार खाल्ला. परंतु तो नाचरा बागडणारा माझा स्वभाव, आज कोठे आहे? ती संध्या संपली,

लोपली, मावळली. संध्येची आता गंभीर निशा झाली आहे. गंभीर रात्रीची पुन्हा मंगल उषा नाही का होणार? रात्र का अनंत, न संपणारी अशीच राहणार? होईल. निशेची उषा होईल, प्रात:संध्या होईल. घरट्यांतील पाखरे पुन्हा चिवचिव करीत नाचतील, उडतील. माझे मन पुन्हा पूर्वीप्रमाणे मोकळे होऊन सर्वत्र नाही का हिंडणार खेळणार?

असे विचार संध्या करीत होती. ती अंथरुणात तळमळत होती. ती हळूच उठून बाहेर आली. तुळशीच्या अंगणात बसली. आम्रवृक्षांच्या छाया चांदण्यात नाचत होत्या. तिच्या मनात भावना नाचत होत्या. तिला एकदम आजीची आठवण आली. तिने एकदम मागे पाहिले. आजी अगदी आपल्याजवळ आहे असा तिला भास झाला. ''भिऊ नको. बाळ,रडू नको. तुझा ठेवा तुला मिळेल.'' असे आजी आशीर्वादपर आश्वासन देत आहे असे तिला वाटले. कोणी तरी प्रेमाने डोक्यावरून हात फिरवत आहे, असा तिला भास झाला.ती आनंदली; परंतु बावरली,घाबरली. ती एकदम घरात गेली. अंथरूण घेऊन ती झोपली. तिकडे तुरुंगात कल्याणही अशाच विचारतंद्रीत तळमळत होता!

✦✦✦

७...

# घरी

संध्येने कल्याणला तुरुंगात पत्र पाठविले होते. त्या पत्रात तिने त्याच्या घराची सारी हकीगत लिहिली होती. आईची मन:स्थिती, रंगाची मन:स्थिती तिने वर्णिली होती. कल्याणने घरी यावे म्हणून तिने ते सारे लिहिले होते. कल्याण घरी आला म्हणजे उडगी गावी तिलाही भेटायला आल्याशिवाय कसा राहील? त्या पत्रात तिने स्वत:विषयी काही लिहिले होते का? तिने इतर सर्वांच्या सुखदु:खाची स्थिती लिहिली. परंतु स्वत:चे सुखदु:ख? तिने स्वत:विषयीच्या मौनानेच स्वत:चे अनंत हृदय जणू तिने कल्याणला कळविले. ते मौन सूचक होते. अती वक्तृत्वपूर्ण होते.

कल्याणला ते पत्र मिळाले. त्याने ते वाचले. वाचून तो दु:खी झाला. आतापर्यंत तो नवविचारांत होता. कल्पनासृष्टीत होता. भविष्यकालीन श्रमजीवीच्या राज्यांत होता. कामगारांच्या क्रांतीची त्याला स्वप्ने पडत होती. पुष्कळ वेळा असे होते. आपण विश्वाचा विचार करीत बसतो व समोर असलेले लहान कर्तव्य आपण विसरतो. मोठ्या गोष्टींच्या पाठीला लागून लहानही गमावून बसतो; आणि मोठं मिळत नाही ते नाही. याचा अर्थ मोठी ध्येये

डोळ्यांसमोर नसावीत, त्याच्यासाठी धडपड नसावी असा नाही,परंतु शक्य तो लहान कर्तव्याचीही उपेक्षा करू नये.

स्वत:च्या आईचा कल्याणला विसर पडला होता. परंतु आता तो विचार दुप्पट जोराने आला. आईची मानहानी वाचून त्याचे डोळे लाल झाले. केव्हा एकदा घरी जाईन असे त्याला झाले. बाबांना बोलेन, त्या बाजारबसवीला घरांतून बाहेर काढीन असे विचार त्याच्या मनात येत होते. तो आपले दिवस मोजू लागला. स्वत:च्या सुटकेची तारीख पाहू लागला.

आणि एके दिवशी तो सुटला. तो पुण्याला आला. विश्वासला भेटायला आला. विश्वास कॉलेजात शिकत होता. त्याचा तो जामानिमा पाहून कल्याण चकितच झाला!

''एकूण तुझे वडील तुझ्यावर खूश आहेत?''

''हो. कॉलेजमध्ये जाणाऱ्या स्वत:च्या मुलाचा त्यांना आता अभिमान वाटतो. मीं इतर काही वेडे ढंग करू नये एवढंच त्यांचं म्हणणं. मी हल्ली सारं सोडून दिलं आहे. खा, पी, गा, चैन कर, हा माझा कार्यक्रम. कशाला हवी जगाची चिंता? उगीच काल्पनिक ध्येये निर्माण करायची व त्याची चिंता उरावर बसवून घ्यायची? कोणी सांगितलं आहे? मैने सब कुछ छोड दिया है. हॉटेलमध्ये जावं, रात्री बोलपट बघावा, मजा करावी.''

''विश्वास, काय हे बोलतोस?''

''माझ्या मनात आहे ते मी बोलतो. लपंडाव काय कामाचा?''

''विश्वास, मी तुरुंगात पुष्कळ वाचलं. पुष्कळ ऐकलं. क्रांतीचा खंदा शिपाई व्हायचं मी ठरवलं. क्रांतीसाठी कामगार उठाव करीत आहेत, रस्त्यारस्त्यातून लढत आहेत. त्यांच्या झेंड्याखाली मी लढत आहे. माझ्या रक्तान मी लाल झेंडा रंगवीत आहे; अशी स्वप्नं मी रंगवीत असतो. ती स्वप्नं

सत्यसृष्टीत आणायची मला तळमळ आहे.आणि विश्वास, तू कुठं चाललास वाहावत? तू का केवळ सुखासीन होणार? डोळ्यावर पडदा ओढून बसणार? नाही, असं नाही होणार. हे धुकं जाईल. पुन्हा तू उभा राहशील,गरिबांसाठी उभा राहशील. आपण दोघे मित्र एकाच ध्येयाची पूजा करू. विश्वास तू कॉलेजात शिकत आहेस, हॉटेलात शिरा–पुरी खात आहेस, बोलपट बघत आहेस; परंतु ही परिस्थिती कितींना आहे? कोट्यवधी लोकांना पोटंभर खायलाही नाही. दुसऱ्यांचा विचारच तुझ्याजवळ उरला नाही कां? श्रमणाऱ्यांच्या जीवनाच्या होळ्या तुला का दिसतनाशा झाल्या?''

श्री. छ. प्रतापसिंह महाराज
नगर वाचनालय सा
दाखल नं ______ ग्रंथानुक्रमांक
किंमत ______ पाने ______

''कल्याण तू घरी केव्हा जाणार?''

''पैसे कुठं आहेत, घरी जायला?''

''काका नाही का देत?''

''काका म्हणाले, आता उतरायला आला आहेस तर राहा दोन दिवस. परंतु माझ्याकडे अत:पर तुझा संबंध नको. चळवळी पोरं आम्हाला नकोत. तुला शिकवलं ते का तुरुंगात जाण्यासाठी? तुला आमच्या खात्यात लावून देणार होता. परंतु तुम्हाला देशभक्ती हवी. करा देशभक्ती. हवेवर राहा, पाणी प्या, झाडाखाली झोपा; करा देशभक्ती. ते किती तरी बोलले, सारे ऐकून घेतलं. ते का पैसे देतील?''

''मग काय करणार तू?''

''तूं दे ना आणून.''

''मी कुठून देऊ? काय रे, तुझ्या संध्येला लिही ना! ती पाठवील पैसे. का तिला विसरलास?''

''तिला विसरायचा प्रयत्न करीत होतो. परंतु पूर्ण यश आलं नाही.''

''तिच्याजवळ माग पैसे. तिला आनंद होईल. प्रेमाच्या माणसाजवळ

मागितल्यानं त्याला आनंद होतो.''

''खरंच का मागू?''

''हो.''

कल्याणने संध्येला पत्र लिहिले व पैसे मागितले. तिला खरोखरच आनंद झाला. कल्याण मला आपली मानतो म्हणून त्याने पैसे मागितले. मी त्याला दूरची असते तर तो मागता ना असे तिला वाटले. कल्याणने दाखविलेला हा आपलेपणा तिला अमृताप्रमाणे वाटला. तिचे तोंड फुलले. तिच्या आशेला अंकुर फुटले. मनुष्याची आशा अमर आहे. जरा आधार, ओलावा मिळताच ती पुन्हा हिरवी हिरवी दिसू लागते. कल्याण माझाच आहे. तो माझाच राहील. कोणत्या का नात्याने असेना, तो माझा राहील. मी त्याच्याशी मनोमय वैवाहिक नाते जोडले आहे. कल्याण कोणतेही जोडो. तो मला स्मरतो, आपुलकी दाखवितो. किती छान, देवाला माझी दया आली एकूण. किती तरी कल्पना व भावना तिच्या हृदयात नाचू लागल्या. ती आईजवळ गेली व म्हणाली.

''आई, मला दहा रुपये देशील कुठून तरी?''

''दहा रुपये? कशाला ते?''

''हवेत; देशील का?''

''परंतु कुणाला द्यायचे आहेत?''

''कुणाला देणार? माझं दुसरं कोण आहे, आई?''

''कल्याणसाठी का?''

''हो.''

''कुठं आहे तो?''

''तुरुंगातून तो सुटला आहे. पुण्याला आला आहे. त्याला इकडे यायला पैसे नाहीत. कसा येणार तो घरी? कसा भेटणार आपल्या आईबापांना?

कसा भेटेल तुझ्या संध्येला? आई, देशील का?''

''संध्ये, मजजवळ तर नाहीत. भावजींकडून आणायला हवेत.''

''मग आज–''

''ते कशाला म्हणून विचारतील तर काय सांगू?''

''सांग काही तरी; किती गं आई आढेवेढे?''

संध्येच्या आईने दहा रुपये तिला दिले. तिने ते पाठविले. कल्याणला आनंद झाला. त्याच्या डोळ्यांसमोर संध्या नाचू लागली. तुरुंगात तो मनात म्हणे की, संध्येला आता काही दिवस तरी भेटायचे नाही. परंतु संध्येला केव्हा भेटू असे आता त्याला झाले. आणि त्यात काय वाईट झाले? लग्न म्हणजे का वाईट? उलट अधिकच सेवा हातून होईल. निराशेत धीर येईल. कोणी तरी आशा देणारे जवळ असेल. एकदम निराळे उमदे विचार कल्याण करू लागला.

कल्याण आगगाडीत बसून निघाला. तो प्रथम आपल्या घरी जाणार होता. अनेक विचार त्याच्या मनात येत होते. काय करावे, काय नाही ते तो ठरवीत होता. संध्येकडे तो जाणार होता. तिच्याकडे गेल्यावर काय बोलायचे? तेथे जेवायला राहायचे का? की उभ्या उभ्या निघून यायचे? संध्या जेवल्याशिवाय येऊ देणार नाही. ती रागवेल. ती काय विचारील, काय काय बोलेल? ती उंच झाली असेल. पूर्वीपेक्षा निराळी दिसेल. आणि मी कृश झालो आहे. संध्याही अशक्त झाली असेल का? तीही माझ्या आठवणी येऊन पोटभर जेवली नसेल. कदाचित माझे जेलमधील ते पत्र वाचून तिची निराशा झाली असेल. परंतु आता पैसे मागितल्यामुळे हसली असेल, आनंदली असेल. मागे तिने फुलांची माळ दिली. आता काय देईल? त्यावेळी मी विजयी बालवीर होतो. आज कोठली तलवार मारून जात आहे? तुरुंगात चक्की पिसून जात

आहे. देहावर, स्वार्थावर विजय मिळवून जात आहे. मी घरी खात-पीत नाही बसलो. तुरुंगांत गेलो. हाही विजयच नाही का? कमावलेले शरीर सेवेत झिजवून आलो. कोणते बक्षीस संध्या देईल? तिची आई काय म्हणेल? माझे तिच्याकडे जाणे तिच्या आईला आवडेल का? बाकी संध्येच्या आईला आता सारे माहीत असेल. संध्येने तिला सांगितले असेल. तिची आई मला काय म्हणेल? लग्न करण्याची गळ घालील का? जर मला विचारण्यात आले, तर मी काय उत्तर देऊ? संध्येची काय इच्छा असेल? ती मनात काय योजीत असेल? मी नकार दिला तर तिला वाईट वाटेल का? ती अशीच राहील का? तिने सारे जीवन का मला दिले आहे? परंतु मी माझे जीवन क्रांतीला दिले आहे. मी संध्येला काय देऊ? परंतु मी तिला विसरू शकेन का? माझे मन मला तरी कळते का? मी मला तरी ओळखतो का? समुद्राच्या तळाशी काय काय असते, याची समुद्राला जाणीव, की समुद्रात डोकावणाऱ्याला जाणीव? संध्येलाच माझे स्वरूप अधिक यथार्थपणे कळेल. ती माझ्या मानस सरोवरात डोकावील. मी नाही मला जाणू शकणार.

परंतु आम्ही लग्न केले तर राहायचे कुठे, पोट कसे भरायचे? मुंबईला कामगारांत मी राहू इच्छितो. साधी एक तरी खोली हवी. आम्ही दोघे राहणार. पंचवीस-तीस रुपये तरी हवेत. कशाची एजन्सी घेता येईल का? मिलमध्येच काम केले तर? जमेल का सारे मला?

किती तरी विचार कल्याणच्या मनात येत होते. शेवटी त्याचे स्टेशन आले. तो उतरला. आपल्या गावाला निघाला. जसजसे त्याचे घर जवळ येत होते, तसतसे त्याचे हृदय खालीवर होत होते. घरी काय असेल परिस्थिती? गावातील लोक कल्याणकडे पाहात होते. बाळपणचे त्याचे मित्र धावत आले. चार-पाच वर्षांत भेट नव्हती.

"कल्याण, तुरुंगांतून आलास?"

"बरा आहेस ना?"

"आता इथंच राहा हो."

"कल्याण, तुझ्या घरी भानगडी आहेत रे!"

"रंगा रडत बसतो."

"तुझी आईही रडते."

"आता नको रे त्याला सांगू. आधी त्याला घरी जाऊ दे. मग आपण बोलू. भीमेच्या तीरावर बसू."

घर जवळ आले. मित्र गेले. कल्याण घरात शिरला. रंगा दारातच होता.

"आई, दादा आला, दादा आला!" रंगाने आनंदाने घरात धूम ठोकली.

आई बाहेर आली. कल्याण आईच्या पाया पडला. तिने त्याला जवळ घेतले. तिच्या डोळ्यांतून पाणी आले. कल्याण सद्‌गदित झाला. आईने त्याच्याकडे व त्याने तिच्याकडे पाहिले. अश्रूच अनंत बोलले. वडील वरती होते. आणखीही कोणी वर होते. कल्याण जायला निघाला.

"वर नको जाऊ, दादा!" रंगा म्हणाला.

"जाऊ दे; बाबांच्या पाया पडून येऊ दे."

कल्याण वर गेला. मुलगा तुरुंगातून आल्याचे कळले तरी पिता खाली गेला नाही. तो वर हसत होता, बोलत होता. कल्याण एकदम वर जाऊन उभा राहिला; तो पित्याच्या पाया पडला. पिता काही बोलला नाही. पित्याच्या कपाळाला आठ्या पडल्या. आणि पित्याजवळ एक आशुक–माशुक होते. ते मिस्किलपणे हसले. कल्याणने रागाने पाहिले. तो नागाप्रमाणे फणफणत खाली गेला. आईजवळ जाऊन बसला.

"किती रे वाळलास, बाळ!"

 

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय, सातारा.

''आणि आई, तुझी काय दशा?''

''आम्हा बायकांचं असंच हो. पण तू कशाला तुरुंगांत गेलास? चांगलं शिकायचं सोडून कशाला ते गेलास?''

''आई, चांगलं शिकण्यासाठीच मी तुरुंगात गेलो. ज्यांच्याजवळ शिकण्यासारखं काही आहे, असे देशातील बरेच पुढारी तुरुंगात आले होते. जिवंत ज्ञान तुरुंगांत मिळालं. जिवंत शाळा तिथं होत्या. मोठ्या दृष्टीचे लोक तिथं होते. आई, तिथं माझ्या मनाची, बुद्धीची वाढ झाली. थोडे हाल झाले. पण हालांशिवाय काय आहे? आधी हालाहल, मग अमृत. आधी त्याग, मग स्वराज्य. पण आई, तुझी काय दशा? तुझे स्वतःच्या घरात हाल, स्वतःच्या घरी तुझा पदोपदी अपमान? स्वतःच्या घरात तू मोलकरीण झालीस! आई, देऊ का घालवून त्या सटवीला. हे पाप नको इथं. मला ते पाहवत नाही. आम्ही तुझी मुलं जिवंत असता तुझी विटंबना आम्ही होऊ देणार नाही. बाबांना बाहेर करू दे थेर. परंतु इथं घरात!...''

''हो, या घरात थेर करीन. हे घर माझं आहे; माझ्या पोरांचं नाही. तुम्हांला माझे थेर बघवत नसतील, तर चालती व्हा सारी.'' पिता वरून खाली येऊन एकदम रागाने म्हणाला.

''हे घर तुमचंच नाही. वाडवडिलांचे आहे. तुमच्या पैशांनी थोडंच तुम्ही बांधलं आहे? आमचाही या घरावर हक्क आहे. बाबा, मी आता मोठा झालो आहे. या घरात हे पाप मी होऊ देणार नाही. आईचा अपमान मी सहन करणार नाही.''

''कोणी केला अपमान?''

''घरात ती दुसरी आणणं म्हणजे का अपमान नव्हे?''

''राजे लोकांची हजारो अंगवस्त्रं असतात. श्रीमंतांची ही भूषणं मानली

जातात. तुम्हा निर्जीव तरुणांना पौरुषाची काय किंमत? पूर्वी या गावात अंगवस्त्रं नसणं म्हणजे नेभळटपणा मानीत.''

''पराक्रमाला तुम्हाला दुसरं स्थानच नाही उरलं. कुत्र्यांच्या लीलाच पराक्रम. हे पराक्रम करायचे तर बाहेर करा. मी तुम्हांला निक्षून सांगतो, याचा परिणाम नीट होणार नाही. त्या बाईला बऱ्या बोलानं इथून जाऊ दे. नाही तर मी हात धरून तिला बाहेर काढीन.''

''मी आपण होऊनच जाते. त्यांच्या अंगात पराक्रम असेल तर मला परत घेऊन येतील. मुलाच्या भीतीनं षंढ होणारा मला तरी कुठं हवा आहे? ही मी चालले–'' असे ती बाई एकदम तेथे येऊन म्हणाली.

''जा, चालती हो!'' कल्याण गरजला.

''ही निघाले. तुझ्या भीतीनं, तुझ्या धमकीनं नव्हे, तर यांची परीक्षा पाहण्यासाठी. यांच्या पौरुषाची परीक्षा करण्यासाठी.''

''खबरदार पुन्हा या घरात पाऊल टाकाल तर. याद राखा! हे घर तुम्हाला वर्ज्य आहे. हा बलभीम तुम्हाला बजावीत आहे.''

''बलभीमही कुठं तरी लाळ घोटल्याशिवाय राहात नसतात. मी जाते. यांची लाज घेऊन जाते. सत्त्व घेऊन जाते.''

ती बाई गेली. पिता वर गेला. मुलासमोर पिता अधिक बोलला नाही. त्या बाईला घरी ठेवण्याचे धैर्य त्याला झाले नाही. तो घाबरला, भ्याला. कल्याणचे स्वरूप प्रखर व तीव्र दिसत होते. त्याचा तो नैतिक संताप पाहून बाप भेदरला.

''गेली पिडा!'' रंगा आनंदाने म्हणाला.

''पुन्हा येणार नाही.'' कल्याण म्हणाला.

''जा, आंधोळी वगैरे करा.'' आई म्हणाली.

दोघे भाऊ आंघोळीला गेले. कल्याणची पाठ रंगाने चोळली. किती तरी

मळ निघाला. किती तरी दिवसांत आज अंगाला कल्याणने तेल लावले होते. निर्मळ स्नान झाले. दोघे भाऊ आंघोळी करून घरी आले. विहिरीवरून आले. पिता अद्याप वरच होता.

''बाबा, चला ना स्नानाला. मी पाणी काढलं आहे.'' कल्याण प्रेमाने म्हणाला. आणि काय आश्चर्य! पिता मुकाट्याने आंघोळीला गेला. त्याचे स्नान झाले.

''कल्याण, आज तूच पूजा कर.'' आई म्हणाली.

''रंगा करील, आई.'' तो म्हणाला.

''बऱ्याच दिवसांनी तू घरी आलास. तूच कर हो आज देवांची पूजा. नाही म्हणू नकोस.'' आई म्हणाली.

कल्याणला नाही म्हणवेना. देवाधर्मावरील त्याचा विश्वास उडाला होता. कोणी एखादी अतर्क्य शक्ती ह्या विश्वाचा पसारा चालवीत आहे हा विचार त्याला हास्यास्पद वाटे. परंतु तो आईला नकार देऊ शकला नाही. आईच्या श्रद्धेला मी का हसावे? ज्या दिवशी आईला देवाची जरूर वाटणार नाही, त्या दिवशी तिचा देव आपोआप दूर होईल. कल्याण उठला व पूजा करू लागला. तो भक्तीने पूजा करीत नव्हता, परंतु नीटनेटकी करीत होता. त्याने सुंदर रीतीने फुले लाविली. मधूनमधून दुर्वा, तुळशी ठेविल्या. त्या पूजेत सौंदर्यदृष्टी होती; कला होती. परंतु भक्तीचा आत्मा नव्हता.

पूजेनंतर सारी जेवायला बसली. पिता बोलत नव्हता. थोडे जेवून तो उठून गेला. रंगा व कल्याण बोलत जेवत होते. आईच्या हातची कढत कढत भाकरी खात होता. भाकरी तीच. परंतु भावनेला अर्थ आहे. तुरुंगातील भाकरी वजनाने अधिक असेल. परंतु आईच्या हातचे प्रेम मिसळलेली ती भाकरी, तिचे वजन किती असेल? तिच्याशी कोणत्या भाकरीची बरोबरी होईल?

भावनेने प्रचंड कार्ये होतात.

आई आता जेवायला बसणार होती. जेवायला बसण्याआधी ती देवाला फुले, तुळशी वाहायला गेली. किती सुंदर दिसत होती आजची पूजा! आईला समाधान वाटले. फुले वाहून ती जेवायला आली.

''कल्याण, किती मनापासून तू केली आहेस पूजा! नाही तर रंगा कशी तरी देतो फुलं ठेवून.'' आई म्हणाली.

''परंतु आई, दादानं नमस्कार नाही केला. पूजा करताना इन्किलाब जिन्दाबाद गाणं म्हणत होता! मी पूजा करताना स्तोत्र म्हणतो. नमस्कार करतो.''

''अरे, दादाचं गाणंही देवाचं असेल.''

''दादा, ते देवाचं होतं का रे गाणं?''

''लोकांचे संसार सुखी करायचा तो नवीन मंत्र होता.''

''मंत्र तर संस्कृतात असतात.''

''अरे, मंत्र सर्व भाषांतून असतात.''

''होय काय गं आई?''

''अरे, सर्वांचा धर्म असतोच. त्यांच्या त्यांच्या भाषेत असतीलच मंत्र.''

''आई, आता पोटभर जेव.'' कल्याण म्हणाला.

''बाळ, आधीच पोट भरलं आहे. तुला पाहून पोट भरलं. तू पत्रसुद्धा घरी पाठवलं नाहीस. पाठवलंस ते त्या संध्येकडे. ती मुलगी खुशाली सांगायला आली. घरी रे का नाही पत्र पाठवलंस?''

''बाबांनी ते तुला थोडंच वाचून दाखवलं असतं?''

''तुला माहीत होती वाटतं घरची स्थिती?''

''आई, संध्येलासद्धा खुशाली कळवायला हवी होती. तुम्ही कोणी

संध्येकडे गेला नसाल; पण ती तुमच्च्याकडे येईल अशी मला खात्री होती. शिवाय ही संध्या कोण वगैरे उगीच शंका घेत तुम्ही बसला असता. आई, तुझी का मला आठवण येत नव्हती?''

''कल्याण, कोण रे ही संध्या?''

''उडगी गावची मुलगी.''

''रंगानं थोडीशी सांगितली तिची हकीकत. तिचं अजून लग्न व्हायचं आहे वाटतं?''

''हो.''

''कल्याण, तू कधी करणार लग्न?''

''लग्न करून राहू कुठं, खाऊ काय?''

''इथं घरीच राहा.''

''नाही आई. मी इथं नाही राहणार. मी तिकडे मुंबईला जाणार. कामगारांत राहणार. चळवळ करणार.''

''मला नाही हो कल्याण तुमच्या चळवळी समजत. कुठंही राहा. सुखी असा म्हणजे झालं.''

''आई, मी जरा जाऊन झोपतो.''

''झोप; गाडीचं जागरण असेल.''

कल्याण झोपला. तिसऱ्या प्रहरी आईने काही खायला केले होते ते खाऊन रंगा व कल्याण फिरायला गेले. गावातील तरुण मित्रमंडळही बरोबर होते. कल्याण त्यांना तुरुंगांतील गोष्टी सांगत होता. नवीन विचार देत होता. क्रांती काय, संस्कृती काय ते सांगत होता. ते मित्र तृषिताप्रमाणे ते विचारांचे अमृत पीत होते. कुस्ती खेळणारा कल्याण असे बोलायला, सांगायला कसा लागला ते मनात येऊन त्यांना आश्चर्य वाटले.

''कल्याण, तू का आता पुढारी होशील?''

''तुझे किती विचार, किती वाचन–''

''आम्हाला काहीसुद्धा कळत नाही.''

''तू आम्हाला शिकवीत जा. सोपं करून सांगत जा.''

''कल्याण, आम्हीही तुझ्या क्रांतीत येऊ.''

''कधी होईल ही क्रांती?''

''अरे, ती का एकदम होत असते? असे लाखो कल्याण निघायला हवेत. नाही का रे?''

''कल्याण, तू का भाई झालास?''

''परंतु त्याच्या डोक्यावर अजून टोपी आहे.''

''टोपी नसणं म्हणजे का रे कल्याण, भाई होणं?''

मित्र बोलत होते. परभारे उत्तरे देत होते. कल्याण म्हणाला, ''भाई तो, जो दु:खी दरिद्री जनतेचा भाई झाला. त्यांच्यासाठी झगडायला, त्यांचे संसार सुखाचे करायला उभा राहिला. मग डोक्यावर टोपी असो वा नसो. धोतर असो, की पायजमा असो. विचार–आचार कोणते यांना महत्त्व आहे. पोषाखाला नाही. भाई व्हायची माझी इच्छा आहे. मी पुढारी नाही. गरिबांचं राज्य व्हावं म्हणून लढायची तळमळ असलेला मी एक सैनिक आहे. गावोगाव अशी नवयुवक मंडळं हवीत. जो कसील, त्याची जमीन; शेतसारे कमी करा. श्रमणारा तेवढा एक. ना हिंदू, ना मुसलमान; ना स्पृश्य, ना अस्पृश्य; अशा विचारांनी भरलेली तरुण पथकं गावोगाव पाहिजेत, अशी लाखो सेना तयार झाली पाहिजे. होईल. अशी सेना तयार होईल; अशा सेनेतील मी एक सैनिक. समजलं ना?''

''कल्याण, तू इथं नाही राहणार?''

''नाही; मी मुंबईला जाईन. तिथं क्रांतीचे धडे घेईन.''

''आम्हाला गाणी पाठवीत जा. पुस्तकं पाठवीत जा.''

''पाठवीन.''

अंधार पडू लागला व मित्र घरी जायला निघाले. कल्याण व रंगा घरी आले. आई वाटच पाहात होती. रात्रीची जेवणे झाली. मागील दारच्या अंगणात कल्याण, रंगा, आई, इतर मित्र सारी बसली होती. तुरुंगांतील काही गोष्टी आज सांगणार होता, म्हणून मित्रही आले होते. कल्याणला किती तरी करुणगंभीर अनुभव तुरुंगांत मिळाले होते. किती करुण कठोर दृश्ये. कल्याणच्या गोष्टी ऐकून मंडळी कधी रडू लागे, कधी संतापे. एक गोष्ट तर फारच हृदयद्रावक होती.

''आई, त्या वेळेला मी आजारी होतो. तुरुंगातील दवाखान्यात होतो. माझ्या खोलीपलीकडील एका गजांच्या खोलीत एक रोगी होता. तो क्रिमिनल होता. त्याला घटसर्प झाला होता. शस्त्रक्रिया करू. असं अधिकारी म्हणत होते. परंतु त्याला ना मिळालं औषधं, ना काही. त्याला गिळवत नसे, पिववत नसे. मरायच्या आधी दोन-चार दिवस त्याला दूध देऊ लागले. तो रोग स्पर्शजन्य असतो. म्हणून त्याला अलग ठेवण्यात आलं होतं. आमच्यातील एक राजकीय कैदी त्याच्या शेजारी रात्री असे; तो त्याला पाणी देई. आई, ती काळरात्र मी कधीही विसरणार नाही. त्या रोग्याला पाणीही पिववेना. घुट्र घुट्र असा सारखा आवाज होई. श्वासोच्छवासाची अडचण होई. मध्यरात्र असेल. तो घुट्र घुट्र आवाज आणि त्याच वेळेला तिकडे एक बोका मांजरीची पिलं मारीत होतो. मँव, मँव, गुर्र असा त्या बोक्याचाही भेसूर आवाज येई. एकीकडे रोग्याचं घुट्र, तिकडे बोक्याचं घुर्र; आणि पिलांचं केविलवाणं ओरडणं. जणू सर्वत्र मृत्यू येऊन बसला होता. आणि आई, त्या दिवशी माझ्याही मनात

मरणाचे विचार येत होते. आपल्या जीवनाचा काही उपयोग होईल का, कशाला भूभार होऊन जगावं, असं माझ्या मनात येत होतं, मनात मरण, सभोवती मरण. भीषण रात्र! सकाळी मांजरीची मेलेली पिलं तिथं पडलेली होती; आणि क्रिमिनलनंही राम म्हटला होता.

''परंतु सर्वांत दु:खाची गोष्ट मरणानंतर आहे. त्याच्या घरी त्याच्या आजाराचं पत्र गेलेलं होतं. आणि ज्या दिवशी तो मेला, त्याच दिवशी सकाळी त्याची घरची मंडळी त्याला भेटायला आली. परंतु त्याला भेटायला आली तो मरून पडला होता! त्याच्या तोंडावर राजकीय क्रैद्यांनी तुळशीपत्र ठेवलं होतं. मृतदेह तिथं होता. घरच्या मंडळींना ती वार्ता सांगण्यात आली. बिचारे आशेनं आले होते.

''त्या प्रेताजवळ ती मंडळी बसली. बायको टाहो फोडून रडू लागली. मुलं रडू लागली. पत्नी पतीच्या तोंडावरून हात फिरवीत होती. ती रडत होती. ते तोंड कायमचं मुकं झालं होतं. घरघर कायमची थांबली होती. मुलं बापाचा हात हातात घेत. तो हात थंडगार होता. ती किती वेळ रडणार व शोक करणार?

''जा आता तुम्ही.'' शिपाई म्हणाला.

''कुठ जाऊ? यांना घेतल्याशिवाय कुठं जाऊ?'' मोठा मुलगा म्हणाला.

''प्रेत मिळणार नाही.''

''द्या हो, द्या. जिवंतपणी माझा धनी नाही दिलात, मेल्यावर तरी द्या. बाहेर या गावचे चार जातवाले आहेत. ते येतील. मूठमाती नीट देऊ. नाही म्हणू नका.''

''शिपाई जेलरसाहेबांकडे गेला. जेलरसाहेब म्हणाले, ''त्याचा दंड म्हणावं भरा, मग प्रेत मिळेल.''

शिपाई आला.



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय, सातारा.

''देतात का रे दादा?'' तिने विचारले.

''याचा दंड होता शंभर रुपये तो भरा. मग प्रेत मिळेल.''

''आता दंड कुठून भरू, भाऊ? आम्हाला विका.''

''जा इथून. प्रेत मिळणार नाही.''

''आम्ही गरीब माणसं. कोण देणार शंभर रुपये आम्हाला? माणसापरी माणूस गेलं. आणि वर पैसे मागता?''

''मृताची पत्नी रडत रडत उठली व जेलरसाहेबांकडे गेली. तिनं पदर पसरला. ती पाया पडली. परंतु काय उपयोग?

''आई, शेवटी आमच्यातील एका प्रमुख राजकीय कैद्याची शहरात ओळख होती. त्यानं गावात चिठ्ठी पाठवून शंभर रुपये त्या दंडाचे भरले. त्या गरिबांना तो मृतदेह मिळाला.

''अशा हो आई जेलमधल्या कथा. अशी निर्दयता. आणखी एक गोष्ट सांगू? एक म्हातारा क्रिमिनल होता. तो मुसलमान होता. त्याच्यात त्राण नव्हतं. त्याच्याजवळ एक जपमाळ होती. मुसलमान तिला तसबीह म्हणतात. आम्हा राजकीय कैद्यांत एक तरुण मुलगा होता. एके दिवशी तो म्हातारा आपले कपडे धूत होता. तो आमच्यांतील मुलगा त्या म्हाताऱ्याजवळ गेला व म्हणाला,

''बुद्धेबाबा, मी देतो तुमचे कपडे धुवून; आणा.''

''तू देतोस धुऊन? तुम्ही स्वराज्यवाले. आम्ही क्रिमिनल. नको बाळ, तुझे हात नको लावू. तुम्ही पुण्यात्मी माणसं.''

''गरिबांची सेवा करु , तरच स्वराज्यवाले होऊ. बुद्धेबाबा, नाही म्हणू नका; आणा ते कपडे.''

त्या मुलानं ते कपडे धुतले. म्हाताऱ्याला आनंद झाला. पुढं त्या मुलाला

म्हातारा जिथं काम करी, तिथंच काम मिळालं. सूत गुंडाळण्याचं काम. तो म्हातारा त्या मुलावर प्रेम करु लागला. त्याला स्वतःची घरची मुलं आठवली. तो म्हातारा पूर्वी मटण घेत असे. परंतु एके रविवारी त्यानं गूळच मागितला. रविवारी मटण किंवा गूळ मिळतो.

''म्हाताऱ्या, मटणाचा कंटाळा आला वाटतं?'' कोणी म्हणाला.

''मरेपर्यंत का मटण खाऊ? पैगंबर साधी रोटी खात.''

''आता पैगंबर आठवले वाटतं.''

''म्हातारा बोलला नाही. परंतु भाकरीचा भुगा करून, त्यात गूळ मिसळून म्हाताऱ्यानं लाडू केले. एक लाडू दुसऱ्या दिवशी त्या मुलाला त्यानं नेऊन दिला.

''बुद्धेबाबा, मला कशाला?''

''अरे, घे हो. मी तुला काय देऊ? तुला पाहिलं की माझा मुलगा मला आठवतो. परंतु मी तुरुंगात आलो. वीस वर्षांची सजा. बाहेर सारी मेली. बाहेर आता माझं कोणी नाही. घे हा लाडू.''

''पुढच्या सोमवारी त्या मुलांनही त्या म्हाताऱ्याला लाडू नेऊन दिला. ते दोघे जणू पिता–पुत्र बनले. त्या म्हाताऱ्याच्या जीवनात आनंद आला, ओलावा आला. एके दिवशी जेलर त्या बुद्ध्याला बोलला व त्याच्या त्यानं थोबाडीत मारली. तो बुड्ढा त्या अधिकाऱ्याच्या वडिलाप्रमाणं होता. त्या म्हाताऱ्याच्यानं भरभर काम नव्हतं होत. काय करील तो? शिवाय जीवनात ना आशा, ना उत्साह. कामाची स्फूर्ती येईल तरी कुठून? त्या मुलाला ते पाहावलं नाही. तो ताडकन् उठला व म्हणाला, 'साहेब, जरा माणुसकी दाखवा. या म्हाताऱ्याच्या का तुम्ही थोबाडीत मारावी?' साहेब संतापले. सर्व कैद्यांच्या देखत स्वराज्यवाल्यानं त्यांचा अपमान केला, त्या मुलाला

अंधारकोठडी मिळाली. तो म्हातारा रडे. माझ्यासाठी त्या मुलाला त्रास, असं म्हणे.

''आणि त्या तुरुंगातून दुसऱ्या तुरुंगांत स्वराज्यवाल्यांची तुकडी पाठवायची होती. त्यात त्या मुलाचाही नंबर होता. त्याची अंधारी संपली. त्या तुरुंगातील तो त्याचा शेवटचा शब्द होता. तो मुलगा त्या म्हाताऱ्याला भेटला. म्हाताऱ्यानं त्याला कुरवाळलं. इतर कैदी गहिंवरले.

''बेटा, ही तसबीह घे तुला.''

''नको बुड्ढेबा. तुमच्याजवळच ती असू दे. अल्लाचं नाव घ्या. तुमचा वेळ जाईल. ती माळ तुमची दोस्त.''

''तुला मी काय देऊ दुसरं?''

''तुम्ही मला पित्याचं प्रेम दिलं. आणखी काय द्यायचं राहिलं? मी सुटलो म्हणजे तुम्हाला भेटायला येईन. तुम्हाला साबण आणीन, दंतमंजन आणीन.''

''किती, तरी वर्षांत माझी कोणाशी भेट नाही.''

''मी येईन हो.''

''तो मुलगा गेला. त्या दिवसापासून म्हातारा खिन्न झाला. तो आजारी पडला. त्याला दवाखान्यात ठेवण्यात आलं. तिथं तो म्हातारा त्या मुलाची आठवण करीत करीत एके दिवशी देवाघरी गेला. सरकारी बगीच्यात त्याला पुरण्यात आलं. किती तरी अनाथांची माती त्या बगीच्यात पडली असेल. तेथील फुलाफळांना त्यातून तजेला मिळत असेल, कोमलता व सरसता मिळत असेल.

''आणि तो मुलगा सुटल्यावर पुन्हा पकडला गेला. त्यामुळं तो लौकर भेटायला आला नाही. आणि मग एके दिवशी आला. साबण, दंतमंजन घेऊन

आला. परंतु तो म्हातारा मेल्याचं त्याला कळलं. तो मुलगा स्तब्ध उभा राहिला.

''दवाखान्यात जिथं बुद्धेबाबा मेला, तिथं क्षणभर मला जाऊ देता का?'' त्या मुलानं विचारलं.

''जा. परवानगी मिळाली.

''एका शिपायाबरोबर तो मुलगा दवाखान्यात गेला. त्या म्हाताऱ्याची खाट होती, तिथं तो उभा राहिला. त्यानं प्रणाम केला. त्याच्या डोळ्यांतून तिथं अश्रू गळले.

''आई, अशा हो कथा. आता एक गंमत सांगू. आम्ही स्वराज्यवाले व क्रिमिनल त्या त्या कामांच्या जागी एके ठिकाणीच जेवायला बसत असू. जेवताना जरा मोकळेपणा असे.

''एक कैदी एकदम उठे व म्हणे, 'हा पाहा प्रेमवीर. प्रेमाच्या सङ्घ्यांत तीन वर्षांची सजा खाणारा हा प्रेमवीर. प्रेम प्रेम! प्रेमके लिये भी सजा! अफसोस की बात है.''

''दुसरा एक कैदी स्वत:जवळच मोठ्यानं म्हणे, 'कोणत्या रे मॅजिस्ट्रेटनं तुला सजा दिली? होता तरी कोण तो?''

''तिसरा हे ऐकून म्हणे, 'मॅजिस्ट्रेटना अधिकार देण्यापूर्वी तुरुंगांतील शिक्षांची पूर्ण माहिती असायला हवी. तुरुंगांतील कांजी, दंडाबेडी, हातबेडी, खडीबेडी, आडाबेडी, गोणपाटी कपडे, फटके, सर्व शिक्षाही त्यांना पाहायला मिळाल्या पाहिजेत.''

''आई, त्या कैद्यांच्या म्हणण्यात का अर्थ नसे? किती अर्थपूर्ण त्यांचे ते उद्गार असत! तुरुंगांत मी खूप पाहिलं, खूप ऐकलं. अनुभव मिळाला; जीवन संतुष्ट झालं.''

अशा गोष्टी चालल्या होत्या. शेजारच्या कुठल्या तरी घड्याळात दोनाचे ठोके पडले.

''दादा, दोन वाजले!'' रंगा म्हणाला.

''निजा आता.'' आई म्हणाली.

मित्र गेले. कल्याण व रंगा निघाले.

आणि दुसऱ्या दिवशी कल्याण संध्येकडे जायला निघाला. पुण्याला शिकावयास जाण्यापूर्वी तो संध्येला भेटला होता. त्या गोष्टीला चार वर्षे होऊन गेली होती. कल्याण आता वीस-एकवीस वर्षांचा होता. संध्या अठरा वर्षांचे. थोडी अधिकच. दोघे एकमेकांना भेटायला उत्सुक होती. कल्याणच्या मुखावर आज एक प्रकारची मधुरता व कोमलता फुलली होती. तो गाणी गुणगुणत येत होता.

संध्येचे घर त्याला माहीत नव्हते. विचारीत, विचारीत तो आला. सकाळची नवाची वेळ. शरद व अनु शाळेत गेली होती. संध्या काहीतरी वाचीत होती. आई विहिरीवर होती. दार लोटलेले होते. कल्याणने दारावर टक्टक् केले.

''कोण आहे? आले हा'' असे म्हणून संध्या आली. तो दारात कोण? कल्याण तेथे उभा होता. दोघे एकमेकांकडे पाहात राहिली. कोणी बोलेना. कोणाला बोलवेना.

''या ना आत. केव्हा आलेत?''

''आताच आलो.''

''पुण्याहून?''

''नाही, घरून आलो.''

कल्याण आत आला. संध्येने चटई घातली. दोघे बसली. मंदमधुर हसत होती. एकमेकांकडे पाहात होती.

''काय करीत होतीस?''

''वाचीत होते.''

''मला बरं नसलं वाटत, म्हणजे वाचीत बसते.''

''कोण आहे पुस्तक?''

''कल्याणची पत्रं.''

''नवीन आहे वाटतं पुस्तक? बघू दे.''

''ते अद्याप हस्तलिखित आहे.''

''पाहू दे.''

संध्येने कल्याणची पत्रे आणून दिली. सुंदर रुमालात ती ठेवलेली होती. त्यावर फुले वाहिलेली होती.

''ही तर माझीच पत्रं!''

''हेच माझं विसाव्याचं पुस्तक.''

''तू पहिल्यापासूनची माझी सारी पत्रं ठेवली आहेस?''

''हो.''

''आई कुठं आहे?''

''विहिरीवर. मी आणते बोलावून.'' संध्या आईला बोलवायला गेली. आई आली.

''बरे आहात ना?''

''तुमच्या आशीर्वादानं बरा आहे.''

''चहा घेता का?''

'' हो, घेतो.''

''आई, कल्याण जेवायलाच राहील.''

''परंतु आधी चहा व काही तरी त्यांना घेऊ दे.''

''मी घरीच जेवायला जाईन.''

''कल्याण, आम्ही का परकी?''

''परकेपणा असता तर मी आलो असतो का?''

''मग राहाच. जेव व मग सावकाशपणं जा.''

कल्याणला नाही म्हणवेना. आणि आता शाळा सुटली.

शरद व अनु घरी आली. ती कल्याणकडे पाहात राहिली.

''ताई, कोण गं?''

''ते तुरुंगातले कल्याण हो.''

''हो का?'' अनु व शरद एकदम म्हणाली.

''आंघोळ करतोस ना कल्याण? चल विहिरीवर. मी पाणी काढून देते.''

''माझी आंघोळ झालेली आहे.''

''मग कामच आटोपलं. पण कल्याण, तो शर्ट दे काढून. तो धुवून आणते. मळला आहे. दे.''

कल्याणने आढेवेढे घेतले नाहीत. त्याने शर्ट काढून दिला. संध्येने तो स्वच्छ धुवून आणला व ती कल्याणला म्हणाली,

''दे घट्ट पिळून.''

''पण वाळेल का लौकर?''

''हो. ऊन पाहा कसं पडलं आहे. माणसंही वाळतील.''

''तू उन्हात बसूनच वाळलीस वाटतं?''

''कल्याण, ताप का फक्त सूर्याचाच असतो?''

''आणखी कसला असतो?''

''सर्वांत असह्य म्हणजे मनस्ताप हो.''

पाने वाढण्यात आली. सारी जेवायला बसली. आई वाढीत होती.

''कल्याण, पोटभर जेव.'' संध्या म्हणाली.

''हे लाजतात वाटतं?''

''ते मुलगी आहेत वाटतं लाजायला?'' अनु म्हणाली.

''आणि मुली का लाजतात? त्या माझ्यासारख्या पाहुण्यालाही चिडवतात.'' कल्याण हसून म्हणाला.

''आणि तुम्ही का पाहुणे?'' अनुने विचारले.

''पाहुणा नाही का मी?'' कल्याण म्हणाला.

''तुम्ही पाहुणे नाही. तुम्ही आमचेच. संध्याताई तुमच्या आम्हाला गोष्टी सांगते. नाही का रे शरद?''

''काय सांगते गोष्टी?''

''एक आहे कल्याण, तो कुस्ती खेळतो. नदीत पोहतो. इंग्रजी शिकतो. पुण्याला राहतो. त्याला त्याचे काका छळतात. तो शाळेवर झेंडा लावतो. तुरुंगांत जातो. कधी हसतो, कधी रडतो.''

''मी नाही बा रडत.''

''तुम्ही आता मोठे झालात. संध्याताईसुद्धा रडते.''

''जेवा रे. फार हवं तुम्हांला बोलायला.'' आई म्हणाली.

''संध्याताई तुमची पत्रं वाचते व रडते. अशी कशी तुमची रडवणारी पत्रं? मी चुलीत टाकणार होतो मी.'' शरद म्हणाला.

''ताई तुमच्याशी लग्न लावणार आहे. आम्हाला आहे माहीत.'' अनु म्हणाली.

''अनु?'' संध्या रागाने बोलली.



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय, सातारा.

''भारी वाहावत चाललीत हो! मार हवा वाटतं?'' आई म्हणाली.

''तुमची पत्रं ताईला रडवतात, मग तुम्ही किती रडवाल? ताई, नको गं त्यांच्याशी लग्न करू!''

''मार हवा आहे तुम्हाला?'' संध्या म्हणाली.

''चिडली, ताई चिडली.''

''मोठी माणसंसुद्धा चिडतात?''

असे म्हणत शरद व अनु उठून गेली. कल्याण जरा गंभीर झाला होता. संध्या पानावर स्वस्थ बसली होती. वातावरण बरे आहे असे पाहून संध्येची आई म्हणाली, ''कल्याण, तुम्ही दोघं पानावर आहात. समोर अन्न आहे. अन्न म्हणजे परब्रह्मच. मी तुम्हाला सांगते की, संध्या तुमच्यासाठी राहिली आहे. तिनं तसं स्पष्ट सांगितलं. भावजी तिच्या लग्नाची खटपट करीत होते. एक चांगलं श्रीमंताचं स्थळ आलं होतं. परंतु संध्येनं स्पष्ट सांगितलं की, मी मनानं कल्याणला वरलं आहे. कल्याण, संध्या तुमची आहे. तुम्ही काय ते ठरवा, संध्येचं जीवन सुखी करणं तुमच्या स्वाधीन आहे. मी काय सांगू?''

''आई, मी गरीब आहे.''

''मनानं श्रीमंत आहात ना? संध्येला आवडता ना?''

''नुसत्या प्रेमानं का पोट भरता येतं, आई?''

''गरीब का लग्नं करीत नाहीत? संध्या दु:खी आहे. मी काय सांगू?''

''बरं, बघू?''

''केव्हा बघणार! संध्या का आता लहान आहे? तुमचं ते मध्यंतरी पत्र आलं की लग्न करावंसं वाटत नाही. त्या दिवसापासून संध्या हसली नाही.''

''आई, लग्न करून मी राहू कुठं?''

''इथं राहा.''

''तसं माझं घर नाही का? परंतु मला मुंबईला राहायचं आहे. कामगारांत काम करायचं आहे. मुंबईला खर्च कसा झेपणार?''

''कल्याण, लहानशी खोलीही पुरे. आपण तिथं स्वर्ग निर्मू.'' संध्या भावनोत्कटतेने म्हणाली. इतक्यात शरद व अनु आंत आली. ती हसली.

''जेवता तरी किती? अजून पानावरच.'' शरद म्हणाला.

''हातसुद्धा तुमचे वाळून गेले.'' अनु म्हणाली.

''जा रे जरा खेळायला.'' आई म्हणाली.

पाखरे पुन्हा निघून गेली. कल्याण उठला. संध्येने व आईने उष्टे खरकटे सारे आटोपले. संध्येने कल्याणला चिकणी सुपारी दिली.

''जरा पडायचं आहे का कल्याण?'' तिने विचारले.

''माझा शर्ट आण. जरा पडतो.'' तो म्हणाला.

तिने शर्ट आणला. स्वच्छ चुरचुरीत शर्ट. संध्येने आपली उशी त्याला दिली. तो घेऊन कल्याण झोपला. संध्येची आईही काम आटोपून जरा पडली. संध्या बाहेर मागील दारी पडवीत काही तरी शिवत होती, भरीत होती.

कल्याणला झोप येईना. या उशीवर संध्येच्या डोळ्यांतील पाणी पडले असेल असे त्याच्या मनात आले. त्यालाही वाईट वाटले. काय करावे त्याला समजेना. अगतिकत्वाचे अश्रू त्याच्या डोळ्यांतूनही घळघळले. शेवटी तो उठला व बाहेर आला.

''झाली का झोप?'' संध्येने विचारले.

''झाली.''

''चल, आपण खाली विहिरीवर जाऊ.''

दोघे विहिरीवर आली. कल्याणने विहिरीवर डोकावून पाहिले.

''खोल आहे विहीर.'' तो म्हणाला.

''तुझ्या मनाप्रमाणं.'' ती म्हणाली.

''म्हणजे काय?''

''तुझ्या मनाचा थांग लागत नाही.''

''संध्ये, तू खरंच काय करणार?''

''तुझ्या पाठोपाठ छायेप्रमाणं येणार.''

''माझ्या पाठोपाठ उपासमार करायला? मरायला?''

''तुझ्या पाठोपाठ येऊन तुझ्या प्रेमावर जगायला.''

''संध्ये, बोलणं सोपं असतं. प्रत्यक्ष परिस्थितीत प्रेम अपुरं पडतं.''

''कल्याण, माझ्या आजीची मी नात आहे. मला वायफळ बोलणं आवडत नाही. तुझ्याबरोबर राहून उपासमारीला, दुःखाला जर कंटाळले तर मी माहेरी निघून जाईन. नाही तर मुंबईचा समुद्र माझं माहेर होईल.''

''संध्ये, आज मी घरी जाईन. थोड्या दिवसांनी मी पुण्याला परत जाईन. मग काय ते कळवीन.''

''केव्हाही कळवा. माझा निश्चय अभंग आहे. माझी आशा अमर आहे. मी उतावीळ नाही. स्त्रिया आशातंतूवर जगू शकतात. आशातंतूवर जगणारी स्त्रियांचीच एक जात. प्रेमाचा एक शब्द ऐकायला मिळावा म्हणून त्या वर्षानुवर्ष कष्ट सहन करतात. प्रेमाचं फूल कधी तरी क्षणभर तरी फुलावं म्हणून त्या वर्षानुवर्ष रडतात.''

''संध्ये, तू रडत जाऊ नकोस. हस, खेळ, आनंदी राहा.''

''जशी तुझी इच्छा. तुझी इच्छा म्हणजे माझा धर्म.''

''मला नाही ही गुलामगिरी आवडत.''

''मला तर अशी गुलामगिरी आवडते. प्रेमाची गुलामगिरी म्हणजे परमोच्च

मोक्ष. ती सर्वांत थोर स्वतंत्रता.''

''चल, वर जाऊ. आई उठली असेल.''

दोघे वर आली. आईने चहा केला. संध्या. कल्याण दोघांनी घेतला. आईनेही घेतला. मुले चहा घेत नसत. ती खाऊ घेऊन शाळेत गेली.

तिसऱ्या प्रहरी कल्याण जायला निघाला. त्याने संध्येच्या आईला प्रणाम केला.

''तुम्हाला सारं सांगितलंच आहे. मातेचं हृदय ओळखा.'' ती माता म्हणाली.

कल्याण काही बोलला नाही. संध्या पोचवायला बरोबर निघाली. जवळच्या रस्त्याने पटकन् ती गावाबाहेर पडली. दोघे जात होती. कोणी बोलत नव्हते. आकाशात संध्याकाळ होऊ लागली. रंग भरू लागले.

''ती वरची संध्या रोज रंगते. परंतु ही खालची संध्या कधी रंगणार रे कल्याण? तू तिला कधी रंगवणार? सूर्याला अगदी जवळ घेतल्यावर, आपल्या घरात घेतल्यावरच संध्या अधिक रंगते. तुला जवळ घेईन तेव्हाच मी रंगेन. खरं ना?''

कल्याण काही बोलला नाही.

''सांग ना कल्याण मी कधी रंगेन?''

''वेळ येईल तेव्हा.''

''तू का आता परस्परच पुण्याला जाशील?''

''हो.''

''पत्र पाठव. प्रकृतीला जप. काही लागलं सवरलं, तर कळव. कल्याण, संध्येला तू जिंकलं आहेस. ती कधीच तुझी झाली आहे. तिनं तुला कधीच माळ घातली आहे. तुझं सुखदुःख मला कळव. माझा त्यावर हक्क आहे हो.''

''जा आता मागं!''

''तुझ्या पाठोपाठ यावंसं वाटतं. विलक्षण ओढ, वेडी ओढ.''

''आज मनानंच पाठोपाठ ये.''

''तशी तर किती वर्षे येत आहे. शरीरानंही कधी येऊ?''

''वेळ येईल तेव्हा.''

''कल्याण, आज माझा फोटो नाही का काढीत?''

''तू डोळे मीट म्हणजे काढतो.''

संध्या खरेच डोळे मिटून उभी राहिली. कल्याणच्या डोळ्यात पाणी आले. तिने डोळे उघडले तो कल्याण रडत होता.

''फोटो पाण्यानं धुवून गेला ना?''

''डोळ्यांतील या रसायनानं अमर झाला. जातो आता.''

''थांब. तुला काही तरी देते.''

''काय देतेस?''

कल्याणने तो हातरुमाल घेतला. किती सुंदर होता तो!

''माझ्या त्या लहानपणच्या फोटोवरून हा भरलास वाटतं?''

''हो.''

''किती छान आहे! परंतु मी तुला काय देऊ?''

''तू डोळ्यांतील पाणी दिलंस. ते पुरे. त्याहून थोर देणगी कोणती आणायची?''

''जातो आता.''

''पत्र पाठव.''

कल्याण गेला. संध्या थांबली. कल्याण पुन:पुन्हा मागे वळून पाहात

होता. शेवटी एक वांकण आले व तो दिसेनासा झाला. आकाशांत शतरंग उसळले होते. परंतु हे भव्य वैभव क्षणभर, फक्त क्षणभर. मागून अंधार. अनंत अंधार!

कल्याण घरी आला. त्या दिवशी रात्री त्याला काही सुचेना. संध्येची निराशा त्याला समोर दिसे. परंतु त्याचा निरुपाय होता. इतरही विचार त्याच्या मनात येत होते. मॅट्रिकच्या मुलांची परीक्षा लौकरच होणार होती. पुण्या–मुंबईला शेकडो–हजारो विद्यार्थी परिक्षेसाठी येतील. त्यांना उद्देशून एक पत्रक काढावे असे त्याच्या मनात आलें. ते पत्रक तो मनात लिहू लागला. त्याला तो विचार आवडला. त्याला आनंद झाला व त्या आनंदात तो झोपला.

त्याने विश्वासला पत्र लिहिले. पत्रक तयार कर म्हणून लिहिले. विश्वास लिही चांगले. विश्वासचे उत्तर आले नाही. कल्याणला पुण्याला जावे असे वाटू लागले. तो अधीर झाला. शेवटी एके दिवशी तो पुण्याला जायला निघाला. पुण्याला जाऊन कोठे उतरणार, कोठे राहणार? त्याने काही ठरविले नव्हते.

''कल्याण, तू जात आहेस. जा. परंतु आगीत उगीच उडी घेऊ नकोस.'' आई म्हणाली.

''आई, तू काळजी नको करू माझी. आणि बाबाही आता चांगले वागतील असं वाटतं. ते वेडंवाकडं काही करणार नाहीत. अलीकडे तर ते मौनीदेव झाले आहेत.''

''कल्याण, पण तुझं कसं होईल तिकडे?''

''आई, मित्र आहेत. ते कमी पडू देणार नाहीत.''

''दादा, मी येते पुण्याला? मी शिवणकाम शिकेन.''

''माझं पुण्याला राहायचं नक्की झालं म्हणजे ये.''

''दादा, तुझ्याजवळ मला ठेव.''

''आधी माझा पाय कुठं तरी टेकू दे.''

कल्याण निघाला. वडिलांच्या पाया पडून निघाला. रंगा रडू लागला व आईला तर अश्रू आवरतना.

पुण्याला जाणाऱ्या गाडीत कल्याण बसला. एक प्रकारे तुरुंग बरा असे त्याला वाटले. तुरुंगांत चिंता नाही. उद्या काय करायचे हा प्रश्न नाही. ध्येयासाठी तुरुंगात आहोत हे खरे की खोटे समाधानही थोडेफार असते. परंतु तो दुबळा विचार त्याला आवडला नाही. त्याने तो विचार मनातून काढून टाकला. झडझडून फेकून दिला. झगडणे हेच माझे भाग्य. झगडा असला म्हणजे प्रत्येक दिवस आपण जगत आहोत असे वाटते. प्रत्येक दिवसाची जणू आठवण राहते. मी पुण्याल जाईन. खोली घेईन. कल्हईचे वगैरे काम करीन. मित्र मिळतील. विद्यार्थ्यांतही आम्ही हालचाल करू. काही तरी काम करू. हातपाय हलवू. जिवाला जीव देणारा भ्रातृसंघ निर्मू. वर्तमानपत्रं काढू. किती तरी विचार कल्याणच्या मनात भराभर येत होते. एका स्टेशनवर बरीचशी गर्दी कमी झाली. जागा झाली. ध्येयाच्या विचारात कल्याण झोपला. इकडे घरी कल्याणच्या विचारात संध्या झोपली. ती स्वप्नात कल्याणला बघत होती. आणि कल्याणला स्वप्नात लाल झेंडा दिसत होता.

✦✦✦

८...

# मॅट्रिकच्या मुलांसाठी पत्रक

कल्याण पुण्याला आला. त्याने एक लहानशी खोली घेतली. त्याची खोली म्हणजे चैतन्याचे केंद्र बनली. तेथे तरुण जमू लागले. चर्चा होऊ लागल्या. विश्वासची परीक्षा जवळ आली होती. तरीही तो तेथे येई. त्याची पूर्वीची वृत्ती पुन्हा वर आली. मध्यंतरी आलेली सुखासीनता गेली. जणू क्षणभर आलेले ते पटल होते!

विश्वास व कल्याण दोघांनी मिळून मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांत वाटण्यासाठी म्हणून एक पत्रक तयार केलं. दोघांना ते आवडले.

''विद्यार्थी–बंधुभगिनींना:

तुमची परीक्षा होऊन तुम्ही पुन्हा आपापल्या घरी जाल आणि काय कराल? निकाल लागेपर्यंत वाट पाहाल. खेळाल. निकाल लागल्यावर तुमच्यांतील थोडे उच्च शिक्षण घेण्यास येतील. बाकीचे नोकरी शोधू लागतील. परंतु नोकरी आहे कोठे? या देशात बेकारी आहे. त्या बेकारीत तुमची भर पडेल. परंतु तुम्ही सुशिक्षित बेकार. ही बेकारी का ते तुम्ही समजून घेतले

पाहिजे. त्यासाठी शेतकरी व कामगार यांची संघटना केली पाहिजे. ही संघटना करणारे सैनिक बना. त्यासाठी ज्ञान मिळवा. स्वच्छ विचार मिळवा. ठिकठिकाणी अभ्यासमंडळे सुरू करून त्यातून नवे विचार मिळवा.

शहरातील कामगार व खेड्यांतील शेतकरी यांना जोडणारे तुम्ही जिवंत दुवे व्हा. खेड्यापाड्यांतील शेतकऱ्यांत त्यांचे प्रश्न घेऊन संघटना केली पाहिजे. कसणाऱ्याची जमीन, पडित जमिनी लागवडीला आणू, कर माफक करू, अशा स्वरुपाचा प्रचार हवा. त्याभोवती शेतकरी–गरीब शेतकरी उभा केला पाहिजे. लहान शेतकरी व शेतीवर कामे करणारे मजूर यांची संघटना केली पाहिजे.

तसेच मोठमोठ्या जमिनी असणारे व खेड्यांतून सावकाऱ्या करणारेही आपण शेतकरी म्हणून सांगतात व शेतकऱ्यांना झुलवतात. जातगोत दाखवतात. शेतकरी काय व कामकरी काय, सर्व श्रमणाऱ्यांची जात एक. मग इतरही जे असतील, ते कोठल्याही जातीचे असोत, ब्राह्मण वा ब्राह्मणेतर, हिंदू वा मुसलमान, त्यांची जात एक. जगात ह्या मुख्य दोन जाती आहेत. त्यांचा झगडा आहे. आजपर्यंत श्रमणारे नाडले गेले. त्यांनी आता संघटित झाले पाहिजे. ही संघटना आपण विद्यार्थ्यांनी केली पाहिजे. मेळे, पत्रके यांनी प्रचार करूं या. चीनभर विद्यार्थ्यांनी हे नवसमाजरचनेचे विचार फैलाविले. चीनमध्ये विद्यार्थ्यांच्या ६०० टोळ्या नाटके, मेळे करीत सर्वत्र प्रचार करत्या झाल्या. आपल्याकडेही असे प्रचाराचे वातचक्र सुरू झाले पाहिजे.

विद्यार्थ्यांनो, नवसमाजनिर्मिती करण्याचे आपले भाग्य आहे. हिंदू–मुसलमान असल्या त्रेतायुगी विचारात गुरफटू नका. श्रमणाऱ्यांचा छळ कमी झाला पाहिजे, सर्वांचे संसार सुखाचे झाले पाहिजेत, या खऱ्या मानवी धर्माचे अनुयायी बनून आपण क्रान्तीचे अग्रदूत बनू या. विचारांची ज्योत सर्वत्र पेटवू

या आणि सारी गुलामगिरी भस्म करू या.

समाजवादी समाजरचना झाली पाहिजे तरच खरी संस्कृती जन्माला येईल. जोपर्यंत हिंदुस्थानात दहा कोटी लोक अर्धपोटी राहात आहेत, तोपर्यंत संस्कृती शद्ब उच्चारणाऱ्यांना पशू म्हटले पाहिजे. कोठे आहे संस्कृती? संस्कृती यावयाची आहे. ती आणण्याची पूर्ण तयारी आपण करू. या शेतकऱ्यांत, कामगारांत जा. त्यांना साक्षर करा. साक्षर करता करता नवीन विचार द्या. नवीन क्रांतीची गाणी द्या. सर्वत्र क्रांतीची गाणी घुमू देत.

'भविष्य राज्य तुम्हारा मानो

ए मजदूरों और किसानों''

हे चरण सात लाख खेड्यांतील तमाम श्रमणाऱ्या जतनेच्या तोंडी झाले पाहिजे. हा नवमंत्र देणारे तुम्ही क्रान्तिकारक बना. हे आजचे कर्तव्य आहे. दुसरे नाही. आम्ही आशा राखतो की, तुम्हा सर्वांत ही ज्योत पेटेल, ही भावना उचंबळेल. तुम्ही डबक्यांतून बाहेर याल व इन्किलाबाची कर्जना कराल.''

अशा आशयाचे पत्रक होते. एका प्रसिद्ध कामगार पुढाऱ्याच्या मदतीने त्यांनी ते पत्रक छापून घेतले. पुण्या-मुंबईला मॅट्रिकसाठी आलेल्या मुलांत हजारो प्रती वाटल्या गेल्या. त्या पत्रकाखाली विश्वास व कल्याण यांच्या सह्या होत्या. विद्यार्थ्यांनी अधाशाप्रमाणे ती वाचली. परंतु सरकारनेही ती पत्रके वाचली. त्या पत्रकाचा सारांश काही वर्तमानपत्रांनी दिला.

एके दिवशी विश्वासचे वडील त्याला म्हणाले,

''विश्वास, तुझी त्या पत्रकावर सही आहे.''

''हो.''

''तुला मी सांगितलं होतं की या फंदात पडू नको म्हणून.''



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

''हे वेडे फंद नाहीत. हे आम्हा तरुणांचं कर्तव्य आहे.''

''परंतु कर्तव्य गळ्याला फास लावील.''

''तुम्ही उगीच भिता. काही होणार नाही.''

त्या दिवशी प्रश्न तेवढाच राहिला. जिकडे तिकडे आतां परीक्षा संपल्या होत्या. उन्हाळ्याचे दिवस होते. कल्याण, विश्वास व त्यांचे आणखी काही मित्र यांनी पुणे जिल्ह्यातील एका तालुक्याची शेतकरी परिषद घेण्याचे ठरविले. तुफानी प्रचार करावयास ते निघाले. उन्हातान्हातून ते हिंडत होते. परिषदेची आमंत्रणे देत होते. त्यांना निरनिराळे बरेवाईट अनुभव येत होते. त्यांची ही पहिलीच वेळ. शेतकऱ्यांत हिंडण्याफिरण्याची पहिलीच वेळ. शेतकरी उदासीन झालेला त्यांना दिसला. आपले कोणी नाही या निराशेने शेतकरी पडून राहिला होता.

एकदा एका गावी कल्याण व विश्वास गेले होते. सायंकाळी ते पोचले. गावात सभा कोठे होते ते त्यांनी मुलांना विचारले. गाणी गात त्यांनी पत्रके सर्वांना दिली. पुन्हा घरोघर जाऊनही त्यांनी सांगितलं.

''बाप्पा, सभेला या हां.''

''हां, येऊ.''

येणार नाही असे कोणी म्हणाले नाही. त्या दोघांना वाटले की खूप लोक येणार. कल्याण व विश्वास दोघे भुकेले होते. परंतु कोठे जेवणार? उपाशीच सभेच्या ठिकाणी ते गेले. दिवा कोठून आणायचा? सभेची जागा घाण होती. दोघांनी ती झाडली. नंतर तें दिवा मागू लागले. दिवा मिळेना. शेवटी एका घरी एक कंदील मिळाला. पाच–दहा मुले होती. मोठी मंडळी कोणी दिसेना. विश्वास पुन्हा घरोघर बोलवायला गेला. ''चला येतो'' लोक म्हणत; परंतु कोणी येईल तर शपथ! शेवटी निराशेच्या त्वेषाने विश्वासने

सभा सुरू केली. पहाडी आवाजात त्याने गाणे सुरू केले. मुले म्हणू लागली कल्याणने पोवाडा म्हटला. पुन्हा विश्वासने गाणे म्हटले. विश्वासच्या आवाजावरून वाटे की, सभेत दहा हजार लोक असतील. गावातील लोकांना वाटले की, मोठी सभा जमली आहे बहुधा. या विचाराने जो तो हळूहळू येऊ लागला. आणि शेवटी चांगलीच सभा जमली. विश्वास आनंदला. कल्याण रोमांचित झाला. त्यांची भाषणे सुंदर झाली. माहितीपूर्ण अशी ती भाषणे होती. त्यांच्या भाषणात आढ्यता नव्हती. कळकळ व तीव्रता होती. लोकांची मने त्यांनी जिकून घेतली. शेतकरी माना डोलवू लागले, त्या तरुणांचे कौतुक करू लागले.

"उठाव झेंडा क्रांतीचा" हे गाणं होऊन सभा संपली. आम्हाला गाणी टिपून द्या, असे मुले म्हणू लागली. छापलेले कागद आम्ही आणून देऊ हां, असे त्यांनी त्या मुलांना आश्वासनं दिलं. कल्याण व विश्वास निघाले; परंतु कुठे जाणार? कुठे झोपणार?

"तुम्ही कुठं जाणार झोपायला?" एका म्हाताऱ्याने विचारले.

"मारुतीचं देऊळ असेल तिथे जाऊ." कल्याण म्हणाला.

"तुमचं जेवण झालं का?"

"आताचं झालं?" विश्वास म्हणाला.

"कोणाकडे?"

"ही सभा हेच आमचं जेवण. शेवटी का होईना, शेतकरी आले. आमचं पोट भरलं. या आजच्या आनंदावर. आणखी दोन दिवस अन्नाशिवाय हिंडता येईल," कल्याण म्हणाला.

"माझ्या घराकडं चला." म्हातारा म्हणाला.

"इतक्या रात्री?" कल्याणने विचारले.

''मग का उपाशी राहणार?''

''शेतकरी उपाशी असतो. आम्हाला एक दिवस राहू दे. उपाशी राहायचं दु:ख अनुभवू दे. बाप्पाजी, तुम्ही विचारलंत, यानंच समाधान झालं. आम्ही नवीन तरुण सहानुभूती मिळाली तरी आनंद होतो.''

''शेतकरी त्रस्त झाला आहे. सभा होतात. मतं घेतात. पुढं काही नाही. कर्ज आहे, शेतसारे वाढले आहेत. कांही परवडत नाही, राजांनो, सारी शेती सावकाराची होऊ लागली.म्हणून शेतकरी उदासीन राहतो. इथं तुम्हाला आधी नाही मिळाली सहानुभूती. परंतु आता चला. पुन्हा या गावी आलेत तर माझ्याकडे उतरा. चला.''

''कल्याण व विश्वास त्या म्हाताऱ्याच्या घरी गेले. घरात भाकर शिल्लक होती,. चटणी, तेल, कांदा व भाकर देण्यात आली. दोघांनी ती पोटभर खाल्ली. जेवणानंतर त्यांना अंथरुण–पांघरुण मिळाले. दोघे मित्र झोपले, सकाळी जाताना म्हाताऱ्याने त्यांना दूध दिले. म्हाताऱ्याचा निरोप घेऊन कल्याण व विश्वास गेले. तो वृद्ध मनुष्य म्हणजे भारतीय संस्कृती होती. हिंदुस्थानातील शेतकरी गरीब झाले तरीही त्यांची माणुसकी मेली नाही. ते बसायला फाटकी होईना, घोंगडी देतील. सुपारीचे खांड देतील. स्वत: उपाशी राहून आलेल्याला जेवण देतील.

एके दिवशी सायंकाळी कल्याण व विश्वास असेच एका गावी आले. त्यांना खूप भूक लागली होती. त्यांना एक मनुष्य भेटला . कल्याणने विचारले, ''कुठं जेवायला मिळेल का?''

''माझ्याकडेच चला.'' तो शेतकरी म्हणाला.

ते दोघे त्याच्याकडे गेले. सभेची दवंडी त्यांनी दिली होती. ते ओटीवर बसले होते. दमून आले होते. ते जरा पडले. त्यांना झोप लागली.

''उठा कपडे काढा.'' शेतकऱ्याने त्यांना जागे करून सांगितले. हात–पाय धुवून दोघे मित्र जेवायला बसले. ताजा ताजा भात होता.

''तुम्हीही बसा ना आमच्याबरोबर .'' विश्वास म्हणाला.

''मी मागून बसेन. तुम्ही पोटभर जेवा.''तो म्हणाला.

''किती गोड लागतं आहे जेवण!'' कल्याण म्हणाला.

''गोड करून घ्या.'' शेतकरी म्हणाला.

जेवणे करून मित्र ओटीवर बसले. गावातील एकाने बत्तीची व्यवस्था केली होती. काही मुले कुतूहलाने तेथे जमली होती. आत तो शेतकरी जेवायला बसला होता. इतक्यात कल्याण सहज आत आला.

''बसलेत जेवायला?'' त्याने विचारले.

''होय.''तो म्हणाला.

''तुमच्या पानात भात नाही तो? हे काय आहे?''

''आंबाडीच्या भाजीत पीठ घालून हा प्रकार करतात.''

''तुम्हाला भात नाही आवडत?''

इतक्यात कोणी तरी येऊन म्हणाला,

''तो कुठून आणील भात? तुमच्यासाठी उसने तांदूळ आणून तुमच्यापुरता त्यानं भात केला. म्हणून तर तुम्हाला त्यानं आधी बसवलं. शेतकऱ्याची स्थिती काय सांगावी, दादा! शेतकरी मेला हो मेला. आम्ही अब्रूनं कसे दिवस काढतो आम्हालाच माहीत.''

कल्याण गंभीर होऊन बाहेर आला. दारिद्र्यातही अतिथ्य दाखविणारे दिलदार शेतकरी. तो मनात म्हणाला, ''अशा या उपाशी अन्नदात्याची स्थिती सुधारावी म्हणून लाखो पांढरपेशे तरुण मेले तरी उपकार फिटणार नाहीत.

कधी हा शेतकरी पोटभर खाईल, घोटभर दूध पिईल? स्वत: पाला खाऊन जगतो. अरेरे!''

असे अनुभव घेत ते दोघे मित्र हिंडले. त्यांनी दैन्यदारिद्र्याच्या कथा पुस्तकातून वाचल्या होत्या. परंतु प्रत्यक्ष पाहणे व वाचणे यात अंतर आहे. खेड्यात रोख दीडकी मिळणे कठीण. रात्री दिवा लावायला तेल नाही. आजारीपणात दवा नाही. दुसरे बदलायला स्त्रियांना वस्त्र नाही. हताश स्थिती!

शेतकरी परिषद झाली. खरोखरच हजारो शेतकरी जमले. हजारो मुंडाशी दिसत होती. महाराष्ट्रचे हृदय, महाराष्ट्राच्या पाठीचा कणा, महाराष्ट्राचे राकट मनगट तेथे होते. अध्यक्षांचे हृदय उचंबळले. अशी घनदाट शेतकरी परिषद त्यांनी पाहिली नव्हती. उन्हातान्हात हिंडून ज्यांनी प्रचार केला, त्यांचे अध्यक्षांनी कौतुक केले. अध्यक्ष स्फूर्तीने शेतकऱ्यांना म्हणाले, ''पाताळात दडपलेला हा असा शेतकरी बळीराजा वर मान केल्याशिवाय राहणार नाही. भविष्यकाळ तुमचा आहे. गादीवर लोळणाऱ्यांचा नाही. निराश व उदास नका होऊ. ती पाहा तुमच्या भाग्याची प्रभात.''

आणि शेतकरी उचंबळून स्फूर्तीने टाळ्यांचा गजर करी.

तालुक्यात हिंडताना ठिकठिकाणच्या तरुणांशी कल्याण व विश्वास यांनी ओळखी केल्या होत्या. त्यांची नावे त्यांनी घेतली होती. त्यांच्याशी पुढे परिचय वाढवू असे ते मनात म्हणत होते. परिषद संपवून ते दोघे पुण्याला परत आले. परंतु पुण्याला निराळीच परिस्थिती उभी होती. मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांना उद्देशून काढलेल्या पत्रकावर विश्वासची सही होती, त्याला कॉलेजातून काढून टाकण्यात आले होते. कोणत्याच कॉलेजात त्याला प्रवेश मिळणार नव्हता. आता घरी वडील राहू देतील की नाही हा प्रश्नच होता. शेवटी जून महिना आला. निम्मा संपलाही.

''विश्वास, तुला कॉलेजात घेणार नाही हे खरं का?'' एके दिवशी वडिलांनी विचारले.

''हो.''

''कोणत्याच नाही?''

''तुला मी सांगितलं होतं. तूं ऐकलं नाहीस.''

''तसं होईल असं मला वाटलं नव्हतं.''

''तू माफी लिहून दे.''

''माफी कशाची? मी का गुन्हा केला?''

''विश्वास, तुझी लक्षणं ठीक नाहीत. या घरात राहायचं असेल तर मी सांगेन त्याप्रमाणं वागलं पाहिजे. नाही तर निघून जा. एकामुळं सर्वांवर संकट नको. तुझी होईल देशभक्ती, परंतु आमच्या मानेला लागतील फा समजलास? जा. तुझं तोंड पुन्हा दाखवू नकोस. या घरात राहायचं असे तर माझं ऐकलंच पाहिजे. परंतु तुला आता शिंगं फुटली. मोठे देशभक्त झालेत. महिनाभर भिकाऱ्यासारखा तिकडे हिंडत होतास. वाटेल तिथं खाल्ल असशील. धर्म तुला नकोसा झाला. जानवंही अलीकडे दिसत नाही. अरे, काही मर्यादा?''

''हा निघालो. तुमच्या पाया पडू दे.''

''हे सोंग कशाला?''

''आजपर्यंत जे केलंत त्याविषयींची ही कृतज्ञता.''

विश्वास घरात गेला. आईला भेटला. ती सावत्र आई, परंतु सख्ख्या आईहूनही तिचे विश्वासवर अधिक प्रेम. ती या घरात प्रथम आली तेव्हा विश्वास लहान होता. तिने त्याला आपल्या पायावर दूध पाजले. त्याला वाढवले; तिचे त्याच्यावर अलोट प्रेम होते. तिला हुंदका आवरेना.

''विश्वास, मधून मधून येत जा. भेटत जा.'' ती रडत म्हणाली.

विश्वास बाहेर पडला. कल्याणच्या खोलीत तो राहायला गेला. दोघांचा वनवास सुरू झाला. ते दोघे मित्र कधी जेवत, कधी उपाशी राहात. भूक लागली तर एखादे पुस्तक वाचीत बसत. इतर तरुण येत. त्यांच्याजवळ ते चर्चा करीत. विद्यार्थ्यांची अभ्यासमंडळे घेत, पुण्यातील छापखान्यातील कामगारांत जात. त्यांचे साक्षरतेचे वर्ग चालवीत. कोणाला इंग्रजी शिकवीत. परंतु कधी कधी पोटात मात्र पाण्याशिवाय काही नसे.

एके दिवशी ते दोघे मित्र मुकाट्याने बसले होते. कंदील तेवत होता. दोघे भुकेले होते. जवळ दीडकी नव्हती. इतक्यांत कोणी तरी आले.

''तुम्ही का कल्याण?'' येणाऱ्याने प्रश्न केला.

''हो, का बरं?'' कल्याणने विचारले.

''तुमच्यासाठी हा डबा संध्येनं दिला आहे.

''तुम्ही कोण?''

''संध्येच्याच गावचा मी.''

''नको, मी जातो; डबा पोचल्याचं त्यांना कळवा.''

तो मनुष्य निघून गेला. कल्याणने डबा सोडला व उघडला. त्यात लाडू होते आणि लाडूहूनही गोड अशी एक वस्तू म्हणजे पत्र होते.

''कल्याण, पत्र मग वाच. आधी लाडवांचा समाचार घेऊ. ऐनवेळी लाडू आले.'' विश्वास म्हणाला .

''बरं आधी लाडू खाऊ'' कल्याणने त्या गोड कार्यक्रमाला संमती दिली. दोघांनी निम्म्या लाडवांचा चट्टामट्टा केला.

''आता चार दिवस जेवण नाही मिळाले तरी चालेल.'' विश्वास म्हणाला.

''रेड इंडियन लोक तंबाखूची गोळी तोंडात ठेवून आठ–आठ दिवस अन्नाशिवाय लढत असत.''

''तू लाडवाचा तुकडा ठेवणार आहेस की काय तोंडात?''

''ठेवला असता; परंतु तो टिकणार नाही.''

''कल्याण, मी आता निजतो. तू ते पत्र वाच. कारण ते संपायला हवं. कंदिलात तेल आहे थोडं. तुझं पत्र वाचून संपेल की नाही याची शंकाच आहे.''

''विश्वास, अरे हे पत्र काळोखातसुद्धा वाचता येईल. हे पत्र वाचायचं नसतं. हातात धरायचं असतं. हृदयाशी धरायचं असतं.''

''कल्याण, तू लग्न करणार ना नव्हतास?''

''नक्की काही नाही. परंतु संध्येची मला आठवण येते. आम्ही दोघं उपाशीही आनंदानं राहू. आज आपण उपाशी होतो. संध्या आलीच काही तरी गोड घेऊन. संध्या म्हणजे आनंद, समाधान. संध्या म्हणजे धीर व आशा.''

''कल्याण, उद्यापासून आपण कल्हई लावायचं काम करू. काही तरी खायला हवं बुवा. तुला कल्हई लावायला येते. मलाही येईल. मी 'कल्हई लावायच्ये का कल्होई' असं ओरडून भांडी गोळा करून आणीन. तू भाता वगैरे जमीन खणून लावून ठेव. करायचा का प्रयोग? मॅटिकच्या विद्यार्थ्यांना पत्रकं वाटली. आता कल्हईवाले होऊ या. विद्यार्थ्यांची मनं उजळ करू पाहात होतो. आता भांड्यांची तोंडं व अंतरंग उजळ करू या. तुझ्या संध्येला काय वाटेल? कल्हईवाल्याशी लावील का ती विवाह?''

''अरे, ती आपणाबरोबर ओरडायलासुद्धा येईल. मी कुठंही गेलो व काहीही केलं, तरी संध्याराणी बरोबर येईल.''

''बरं, बघू.''

✦✦✦



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

९...

# कल्हईचे प्रयोग

दुसऱ्या दिवशी खरोखरच त्या दोघांनी कल्हईचे काम करण्याचे ठरविले. त्यांनी सामान आणले. एका पोत्यात कोळसा, भाता, चिमटा, नवसागर, कथिल, सारे सामान त्यांनी आणले. आणि आश्चर्य म्हणजे बरोबर वाचायला पुस्तकेही होती. नाही काम मिळाले तर झाडाखाली वाचीत बसले.

''कल्याण, कोणत्या बाजूला जायच?''

''जाऊ डेक्कन जिमखान्याकडे.''

''मी ओरडेन. माझा आवाज मोठा आहे.''

''विश्वास, तू सभेत ओरडशील. पण रस्त्यात ओरडताना लाजशील.''

''नाही लाजणार. बघ, छान ओरडेन. ओरडायचं माझंच काम. तू त्या झाडाखाली सामान घेऊन बैस. मी भांडी गोळा करून आणतो.''

कल्याण एका झाडाखाली बसला. पुस्तक काढून वाचीत बसला. विश्वास ओरडायला गेला. कानावर हात ठेवून ''कल्हई लावाच्ये कल्होई'' असे तो ओरडत निघाला. कल्याणच्या कानावर ते शब्द येत होते. त्याने आजूबाजूला

जागा साफ केली व भाता रोवला. तयारी करून "कम्युनिस्ट जाहीरनामा" तो वाचीत बसला.

"काय रे विश्वास!" एका मुलीने हाक मारली.

"विश्वास ओशाळला, लाजला. परंतु क्रान्तिकारकाने लाजता कामा नये. तो बेफिकीर, बेगुमान हवा. विश्वासने लाजलज्जा सोडली व तो म्हणाला,

"कल्हईला भांडी मिळतात का पाहतो आहे." आणि तो पुन्हा एकदा "कल्हई लावाच्ये का कल्होय" असे छान ओरडला. ती मुलगी हसली व म्हणाली, "विश्वास, छान नक्कल करतोस. तू का कल्हई लावणार? हात मात्र भाजतील."

"प्रथम भाकरी भाजताना बायकांचेही भाजतात."

"हरिणीला का नाही बरोबर घेतलीस?"

"घेईन वेळ येईल तेंव्हा."

"विश्वास, तुला कॉलेजातून काढलं ना?"

"घरातूनही काढलं."

"मग?"

"आता कल्हई–" असे म्हणून विश्वासने पुन्हा ललकारी दिली.

"मी देऊ का तुला भांडी आणून?"

"दे. तुझ्या कोणी ओळखीचं आहे का इथं?"

"हो. ही घरं माझ्या परिचयाची आहेत."

ती मुलगी एका घरात गेली. विश्वास बाहेर उभा होता. मधून मधून धंद्याची ललकारी देत होता. ती मुलगी पंचवीस भांडी घेऊन आली.

"ए कल्हईवाल्या, काय शेकडा लावणार रे?" ती मुलगी हसून म्हणाली.

''तुम्ही द्याल ते पैसे, ताईसाहेब?'' विश्वास हसून म्हणाला.

''विश्वास, अशानं तुमचं दिवाळं निघेल. कल्हई, कोळसे, नवसागर यांचा खर्च निघून पोटाला उरलं पाहिजे ना?''

''तो हिशोब कल्याणला माहीत असेल.''

''हा कोण कल्याण?''

''तो तिकडे झाडाखाली भाता लावून बसला आहे.''

''ही घे भांडी. मी आणखी आणते गोळा करून.''

''मी तिथा देऊन येतो हं.''

विश्वास भांडी घेऊन आला. कल्याण आनंदला. परंतु पाणी हवे ना? भांडे चुर्र करायला. विश्वास पुन्हा त्या मुलीकडे आला. तिच्या ओळखीने एक बादलीभर पाणी घेऊन तो आला. आणखी भांडीही मिळाली. संच जमला. कोळसे शिलगले. विश्वास भाता फुंकू लागला. कोळसे रसरशीत झाले. पहिले भांडे तापले. नवसागर पेरून कल्याणने भराभरा कल्हईची कांडी फिरविली. छान लागली कल्हई. कल्याण सपासप भांडी तयार करीत होता. फडक्याने जोराने घाशी. कल्हई नीट सर्वत्र लागे. एकदा मध्येच बोट भाजले. पटकन् तोंडात घातले त्याने. परंतु फिकिर नव्हती. ध्येयाचा उन्माद होता.

भाता फुंकता फुंकता विश्वास लाल झाला. जवळ धग होती. त्याचा गोरा चेहरा तापला. गोरा लाल झाला. लाल बावट्याला शोभणारा तो दिसू लागला. त्याने गाणे सुरू केले.

''इन्किलाब जिन्दाबाद.''

गार्ण सर्वत्र घुमले. तेथे मुलामुलींची गर्दी जमू लागली आणि ती मघाची मुलगी आणखी भांडी घेऊन आली.

''विश्वास, गाप, जरा थांबव. ही भांडी त्या भांड्यांत मिसळतील हो. अलग अलग ठेवा.''

''बघ कल्हई कशी आहे ती!''

''छान आहे. संगीत कल्हईवाले पुण्याला प्रथमच आले!''

''कल्याण!'' कोणी तरी येऊन हाक मारली.

कल्याणने वर पाहिले व पुन्हा त्याने भांडे निखाऱ्यावर टाकले. सांडसाने नीट धरलें.

''कल्याण, हे काम करतोस?''

''पोटाचा उद्योग.''

''आणि जवळ ही पुस्तकं कशाला?''

''ती आग पेटवणारी पुस्तकं आहेत.''

''म्हणजे?''

''ती क्रांतीची पुस्तकं आहेत. समाजवादाची पुस्तकं आहेत.''

''ती बरोबर कशाला?''

''भांडी नाही मिळाली तर झाडाखाली बसून वाचायला.''

''वा! असे कल्हईवाले नव्हते पाहिले. आमच्याही आळीत या. देऊ भांडी.''

''बरं येऊ. विश्वास, चालू दे तुझं गाणं. त्याच्या नादावर भट्टी पेटते चांगली. मला कल्हई लावायला जोर येतो.''

विश्वास घामाघूम झाला होता. जणू ते भारताची भट्टी पेटवीत होते. भारताचे तोंड उजळ करीत होते. विश्वास गाणे म्हणू लागला.

''इन्किलाब जिन्दाबाद''

घन–शोषणकी क्रूर कहाणी

हमे हमेशा रहेगी याद ।।इन्किलाब०।।

कोळशांची भट्टी पेटली होती व स्फूर्तीचीही भट्टी पेटली होती. सभोवतालची मुलेही गाणे म्हणू लागली. जणू तेथे सभाच सुरू झाली अद्भूत देखावा.

''कल्याण, आता तू भाता फुंक. मी कल्हई लावतो.''

''माझा हात बसला आहे. तू हात भाजून घेशील.''

''भाजू दे हात. रशियातील तरुणांनी हात भाजून घेतले होते. माझाही भाजू दे हात. पांढरपेशी हात भाजून काळासावळा होऊ दे. पाप जळून जाऊ दे. ऊठ.''

कल्याण उठला. त्याने घाम पुसला. विश्वासचाही घाम त्याने पुसला. ते मित्रप्रेम पाहून आसपासची मुले सद्गदित झाली. आता विश्वास कल्हई करू लागला. परंतु कल्याणमध्ये अधिक चपळाई होती.

''विश्वास, जरा कमी लाव कल्हई. इतकी नको लावायला.'' ती मुलगी म्हणाली.

''चांगली लावू दे. म्हणजे पुन्हा भांडी द्याल.''

''अरे, बेताची लावावी; म्हणजे लौकर भांडी पुन्हा द्यावी लागतील. हे अर्थशास्त्र अद्याप तुला समजून घ्याव लागेल.''

''हे अर्थशास्त्र तू शिकव.''

संपली भांडी. कल्याण व विश्वास यांनी ती नीट पुसून त्या त्या घरी नेऊन दिली. त्यांनी झाडाखालची घाण दूर केली. त्या मुलीचे आभार मानून दोघे मित्र निघाले. दोघांच्या खांद्यावर पोती होती. कपड्यांना डाग पडले होते. चेहरे दमलेले दिसत होते. परंतु एक प्रकारचा दिव्य आनंद त्यांना झाला होता.

पहिला दिवस तर बरा गेला. दोघे मित्र खोलीत गेले. आंघोळ करून

हॉटेलात जाऊन दोन आण्यांची राईस प्लेट खाऊन आले. कल्याणचे बोट जरा भाजले होते. परंतु काळजी करण्यासारखे नव्हते. सकाळी ते रोज कोठे तरी कल्हईच्या कामाला जात. रात्री अभ्यासमंडळ घेत. इतर काम करीत. दुपारी वाचीत.

एके दिवशी त्यांना जरा चमत्कारिक अनुभव आला. रोजच्याप्रमाणे दोघे मित्र 'कल्हई लावायच्ये का कल्होय्' असे आळीपाळीने ओरडत जात होते. वाटेत एक मोठा वाडा होता. विश्वास त्या वाड्यात शिरला. इकडे तिकडे पाहात होता. इतक्यात मालक तेथे आला.

''कोण रे तू ? काय पाहिजे?''

''काही नाही. कल्हईला भांडी आहेत का?''

''कल्हईला भांडी का घरात शिरून मागतात? तू कोणी तरी भामट्या दिसतोस. पोषाख दिसतो आहे स्वच्छ. कल्हई लावणाऱ्यांचा पोषाख असा असतो का रे? मला शिकवतोस होय? चल, तुला फरासखान्यात नेतो. हल्ली फार सुळसुळाट झालाय या चोरांचा. चल, नाव काय तुझं? खरं सांग.''

''अहो, खरंच आम्ही कल्हई लावणारे आहोत.''

''ही लफंगेगिरी आहे.''

इतक्यात कल्याण खांद्यावर पोते वगैरे घेऊन तेथे आला व दारातच 'कल्हई लावायच्ये काय कल्होय्' ओरडला.

''तो पाहा माझा मित्र. आम्ही दोघे हा धंदा करतो. कपडे जरा स्वच्छ आहेत. कारण आम्ही विद्यार्थी आहोत. पोटासाठी हा धंदा करतो. घरात शिरलो, चूक झाली. आम्ही अजून अननुभवी आहोत.''

''जा, पुन्हा अशी चूक करू नका.''

कल्याण व विश्वास बाहेर पडले. त्यांना आता हसू आवरेना. गंमतच

झाली. आज एकंदरीत दुर्दिनच होता. भांडी मिळाली नाहीत. हिंडून हिंडून दोघे घरी आले. खोलीत सचिंत बसले. त्यांना भूक लागली होती. परंतु जवळ काही नव्हते. ते तसेच झोपले. तिसऱ्या प्रहरी जागे झाले. कोणी बोलेना. खोलीचे भाडेही दोन महिन्यांचे थकले होते. ते हातात पुस्तक घेत, परंतु खाली ठेवीत. विश्वास खोलीत फेऱ्या घालीत होता. मध्येच खिडकीतून बाहेर पाही. काय चालले होते त्याच्या मनात?

''कल्याण, माझ्या मनात एक विचार आला आहे.''

''कशाविषयी?''

''पोट भरण्याविषयी.''

''आता कोणता धंदा करायचा?''

''गंमतीचा.''

''म्हणजे.''

''माझ्या पूर्वीच्या घराजवळ ओंकारेश्वराचं देऊळ आहे.''

''मग?''

''देवळाचा गुरव माझ्या चांगल्या परिचयाचा आहे. त्याचा माझ्यावर लोभ आहे. लहानपणी वडिलांनी मारलं तर धावत येई व मला सोडवी. त्याच्याकडे नैवेद्य पुष्कळ येतात. आपण त्याच्याकडून भाकरी आणीत जाऊ. प्रश्न मिटेल.''

''माझ्याही तो ओळखीचा आहे. तालमीत येत असे. बरी आहे योजना, देवाचा नैवेद्य खायचा आपणाला अधिकार आहेच.''

''आपणच देव. दुसरा देव आहे कुठं?''

''मग जायचं का सायंकाळी प्रभूकडे?''

''जाऊ.''

सायंकाळ झाली. दोघे मित्र ओंकारेश्वराकडे जायला निघाले. विश्वासच्यां घरावरून ते जात होते. आईने विश्वासला पाहिले. विश्वासचेही डोळे तिकडे गेले. विश्वासची सावत्र बहीण–भावंडे धावत आली.

''विश्वास, चल ना रे घरात.'' ती म्हणाली.

''बाबा कुठं आहेत?''

''ते बाहेर गेले आहेत. लवकर येणार नाहीत. चल.''

विश्वासच्याने नाही म्हणवेना. कल्याण व तो दोघे घरात गेले. विश्वासचा चेहरा गोरामोरा झाला होता. तो आईकडे बघे. बोलवत नव्हते त्याला.

''विश्वास, किती रे वाळलास?'' आई म्हणाली.

''शरीरानं वाळलो, पण मनानं बळकट झालो आहे.'' तो म्हणाला.

''तू का कल्हईचं काम करतोस? हरिणी म्हणत होती.''

''हो, आई. मी व कल्याण दोघे मिळून करतो. मजा येते.''

''किती रे कष्ट तुम्हाला!''

''आई, बायकांच्या कष्टापेक्षा कमीच. शेतकऱ्यांच्या कष्टांपेक्षा कमीच. 'कमाव और खाव' हे सूत्र म्हणजे खरं धर्मसूत्र.''

''विश्वास, तुम्ही दोघे इथं जेवता का? दुपारची भाकरी आहे.''

''बाबा येतील. आम्ही बांधून नेतो, आई.''

आईने भाकरी, चटणी, लोणचे बांधून दिले. दोघांना प्यायला दूध दिले.

''जातो, आई.''

कल्याण व विश्वास निघून गेले. ते ओंकारेश्वराच्या घाटावर बसले. याच घाटावर कल्याणची व विश्वासची प्रथम ओळख झाली होती. तेथे

बराच वेळ दोघे बोलत बसले.

''विश्वास, प्रभूला मी बोलावून आणतो. तू इथं बस.''

''कल्याण गेला. प्रभू तेथेच एका खोलीत राहात असे.''

''प्रभू आहे का?'' कल्याणने विचारले.

''कोण आहे?''

''मी कल्याण.''

''का रे कल्याण? अलीकडे तालमीत येत नाहीस तो? आणि आता रात्रीचा कुठं आलास? काही काम का आहे?''

''काम आहे म्हणून तर आलो आहे.''

''आधी जेवायला ये.''

''आज लौकरसं जेवण?''

''आज सोमवार नाही का?''

''खरंच.''

''मग येतोस का जेवायला?''

''मी एकटाच येऊ?''

''दुसरं कोण आहे?''

''एक मित्र तिकडे घाटावर बसला आहे. तो तुम्हाला बोलावीत आहे. तुम्हाला भेटायला तो आला आहे.''

''कोण मित्र?''

''विश्वास.''

''विश्वास, तो आमच्या शेजारचा? वडिलांनी घालवून दिलेला? फार हट्टी व करारी बुवा. कुठं आहे तो?''

''चला दाखवतो.'' प्रभूने पटकन् जेवण आटोपले व कल्याणच्याबरोबर तो घाटावर आला.

''काय रे विश्वास?''

''प्रभू, तुला भेटायला आलों आहे!''

''का रे विश्वास, असा कापरा का आवाज?''

''प्रभू, तू माझा शेजारी. तू माझ्यावर प्रेम करीत असस. तूच मला पोहायला शिकवलंस. तूच वडिलांच्या रागापासून वाचवीत असस. प्रभू तुझा विश्वास हल्ली उपाशी असतो. काम तरी काय करायचं? कल्हई लावायला आम्ही जातो. परंतु त्यातच वेळ जातो. विद्यार्थ्यांत जायचं. त्यांच अभ्यासमंडळ चालवायचं. वाचायचं. कामगारांत जायचं. सभा असतातच कल्हई लावणंही नीट जमत नाही. कल्याणची तर बोटं भाजली. एक दिवस माझा पाय भाजला. भांडीही कधी मिळतात, कधी नाही. म्हणून म्हणतो की, आम्ही ज्या दिवशी उपाशी असू त्या दिवशी तुझ्याकडे जेवायला येत जाऊ. आमच्यासाठी तू भाकरी राखून ठेवीत जा. रात्री दहापर्यंत भाकरी ठेवीत जा. तोवर नाही आलो तर मग गाईला घाल. प्रभू, तुला सांगायला संकोच नाही वाटत. आईबापांजवळ स्वाभिमान दाखवणारा हा विश्वास तुझ्याजवळ भीक मागत आहे. का? तर तू मजवर प्रेम करीत होतास म्हणून. ते प्रेम अद्याप असेल अशी आशा आहे म्हणून.''

''विश्वास, तू उपाशी असतोस, मग इतके दिवस का आला नाहीस? आजपर्यंत तुम्ही का उपाशी राहिलेत? आजपर्यंत का संकोच केलास?''

''परंतु आज आलो ना संकोच सोडून?''

''विश्वास येत जा हो. तुमच्यासाठी ठेवीत जाईन आणि आता हल्ली काय रे करता काम?''

''विचार–प्रसाराचं.''

''तुम्ही का सारे भाई होणार?''

''हो.''

''चांगलं आहे. पण भाई लोकांचं एक मला आवडत नाही.''

''ते काय?''

''ते धर्म नको म्हणतात; बरं, ते जाऊ दे; तुम्ही येत जा माझ्याकडे. सुखाचे जीव तुम्ही दु:खात घातले आहेत. तुम्ही कष्ट करीत आहात. मला तुमच्याविषयी आदर आहे, आपलेपणाही आहे.''

कल्याण व विश्वास आपल्या खोलीवर गेले. परंतु खोलीतील कंदिलात तेल नव्हते. त्या खोलीत विद्युद्दीप नव्हता. ती साधी खोली होती. खोलीत अंधार. अंधारात दोघे बसले.

''विश्वास, तेल आणतोस?''

''मी नाही जात. तो दुकानदार मागचे पैसे मागेल.''

''बरं, मी जातो.''

कल्याण बाटली घेऊन वाण्याच्या दुकानात गेला. त्याच्याच नावावर खाते होते. त्याने तेल सांगितले.

''तेल मिळत नाही. पहिली बाकी चुकती करा!''

''अरे, आम्ही का कुठं जातो? आता घरून मनिऑर्डर आली की देऊन टाकू पैसे. पैसे का बुडतील तुझे? दे लवकर तेल. तिकडे खोलीत नाही दिवा. मित्र आले आहेत.''

''मनिऑर्डर एक महिन्यापासून येत आहे तुमची. का विलायतेतून यायची आहे?''

''दे रे बाबा. घे ही बाटली.''

कल्याणचा आवाज जरा मिळते घेणारा होता. त्याच्या आवाजात आर्जव होते. मन वळवण्याचा गुण होता. विश्वास रागीट, तल्लख. त्याच्याने हे जमले नसते. कल्याण तेल घेऊन आला व दिवा लागला.

''ये कल्याण, आईच्या हातची भाकरी खाऊ.''

''विश्वास, इथं राहायचा मला कंटाळा आला. मी मुंबईला जातो. तिथं काही तरी धडपड करीन. थोडं समाधान तरी मिळेल.''

''तू गेल्यावर इथं मी एकटा काय करू?''

''आपण दोघे मुंबईला जाऊ.''

''परंतु मुंबईला तरी राहायचं कुठं? खायचं काय?''

''आपण काही दिवस थांबू. मुंबईत जर संप करायचं ठरलं, तर त्यावेळी आपण जाऊ. संपातील कामाचा अनुभव येईल.''

''पण इथून जाण्यापूर्वी खोलीचं भाडं द्यावं लागेल. दुकानदाराचे पैसे चुकते केले पाहिजेत. जायलाही भाड्यासाठी पैसे हवेत. पैशाशिवाय काय करायचं?''

''मला वाटतं की, बिनतिकिटानं जावं. धाडस करावं. जरा अडवतील, मग सोडतील.''

''काही हरकत नाही. करू प्रयोग?''

असे बोलत दोघे मित्र अंथरुणावर पडले. वाचीत वाचीत झोपी गेले. परंतु पहाटे कल्याण उठला. त्याने संध्येला एक सुंदर पत्र लिहिले. काय काय लिहिले होते? ते त्यालाच माहीत.

आणि वर्तमानपत्रांत एके दिवशी वार्ता आली. मुंबईला प्रचंड संप होणार होता. त्याची तयारी सुरू झाली. प्रचार सुरू झाला. कल्याण व विश्वास


श्री. छ. प्रतापसिंह म... नगर वाचनालय, सातारा.

यांची मने मुंबईला जाण्यासाठी तडफडू लागली आणि मुंबईच्या कार्यकर्त्यांकडून त्यांना बोलावणेच आले. दोघांचा उत्साह वाढला. परंतु पैसे नव्हते जायला. खोलीचे भाडे, दुकानदाराचे पैसे?

परंतु संध्येकडून दहा रुपये आले आणि कुपनात काय लिहिले होतं? ''आणखी दहा लौकरच धाडते. चिंता नको करू.'' कल्याणचे मन उचंबळून आले.

''कल्याण, तू संध्येला पत्र लिहिलं होतंस?''

''हो.''

''लग्न न करताच संध्येला लुटत आहेस!''

''आमचं मनोमय लग्न लागलं आहे. मी तिच्या मनात सदैव आहे.''

''आणि ती तुझ्या आहे का?''

''आहे, आहे.''

''कल्याण, मग तुम्ही लग्न का नाही करीत?''

''वेळ आली म्हणजे होईल.''

संध्येकडून आणखी दहा रुपये आले. खोलीचे भाडे व दुकानदाराचे पैसे देण्यात आले. खोलीतील पुस्तकं व सामान एका मित्राच्या घरी ठेवून कल्याण व विश्वास मुंबईला जायला निघाले. ते आगगाडीत बसले. मुंबईच्या कामगारांची ते चळवळ पाहाणार, त्या लढ्यात लढणार! मुंबईचा संप म्हणजे लाठीमार, अश्रूवायू, गोळीबार! रोमहर्ष प्रसंग आणि स्वत:च्याच डोक्यात लाठी बसली तर? अंगात गोळी घुसली तर? तर काय? त्या वेळी इन्किलाबची गर्जना करू. दोघे मित्र कल्पनात रंगून गेले होते.

✦✦✦

# १०...
# मुंबईस

मुंबईला संपाची वावटळ कधी उठेल याचा नेम नव्हता. मिलचे मालक वाटेल तेव्हा चावटपणा करीत. किती तरी वर्षांपूर्वी मंदी म्हणून त्यांनी पगारकाट केली होती. ती तशीच चालू होती. मंदी संपली होती. तेजी होती; परंतु पगार कमीच. आम्हाला परवडत नाही हे मालकांचे तुणतुणे नेहमीचे ठरलेले. कारखानदाराचे हिशेब मोठे और असतात. सतराशे फंडातून रकमा दाखवतील. पुन्हा एजंट तेच. एजन्सीचे कमिशन तेच खाणार. ते कमिशन कमी होता कामा नये. सतरा तोंडांनी मालक खात असतो व जगाला कारखाना नुकसानीत आहे, असे दाखवतो. हातचलाखी हे तर बुद्धीचे लक्षण.

गिरण्यांतील माल उठत नाही असे एकीकडे हे मालक म्हणत होते, तर दुसरीकडे रात्रपाळ्या सुरू होत होत्या! मालाचा उठाव नसता तर रात्रपाळ्या सुरू झाल्या असत्या का? परंतु मालक समोपचाराने थोडेच ऐकणार?

कामगार–युनियनचे रात्रपाळीच्या बाबतीत असे म्हणणे होते की, रात्रपाळीवाल्याला अधिक मजुरी दिली पाहिजे. परंतु मालक ते मान्य करीत नव्हते. कामगार पुढाऱ्यांनी अर्थशास्त्रावरील पुस्तकांतील उतारे सादर केले.

परंतु मालक म्हणाले, ''ते उतारे काय करायचे? रात्री काम करणारे का अधिक काम करतात?''

''रात्री काम केल्यानं आयुष्य कमी होतं, असं त्या पुस्तकांत स्वच्छ आहे. रात्री काम करणारा दिवसात झोप घेतो. परंतु ती झोप तितकी गाढ व नीट येत नाही. रात्रीची झोपच खरी आरोग्यदायी असते. दिवसाचं आठ तास काम व रात्रीचं आठ तास काम यांत फरक आहे. दिवसा काम करण्यात जो ताण पडतो, यात त्याच्या दीडपट ताण रात्री पडतो.'' असे कामगार पुढाऱ्यांनी पुराव्यानिशी सिद्ध केले.''

परंतु मालकांचा नकार ठेवलेलाच. दुसरेही अनेक प्रश्न होते आणि अशा रीतीने हळूहळू प्रकरण चिघळत चालले. शेवटी युनियन संपाचा विचार करू लागले. आणि मुख्य संपाची तयारी म्हणून आधी एकच दिवस सर्वत्र संप करण्याचे निश्चित करण्यात आले. त्या एका दिवसाचा संप यशस्वी व्हावा म्हणून सर्वत्र जोरात प्रचार सुरू झाला. कामगारांचे वर्तमानपत्र 'ठिणगी' सर्वत्र तेजाचे झोत सोडू लागले. 'ठिणगी'चे हजारो अंक खपू लागले. कोपऱ्या–कोपऱ्यांवर सायंकाळी प्रचारसभा होऊ लागल्या. मोटरलॉरीवरून कर्ण्यातून घोषणा घुमवण्यात येऊ लागल्या.

अशा परिस्थितीत कल्याण व विश्वास आले. एका मोठ्या कामगार पुढाऱ्याकडे ते उतरले. तो एक थोर पुढारी होता. दिसायला साधा, परंतु त्याची शक्ती महान होती. त्याचे संघटनाचातुर्य अप्रतिम होते. कामगार त्याला आपला प्राण मानीत. पूर्वी एका संपात त्याच्यावर येणारी गोळी एका कामगाराने स्वतःवर घेतली. इतके कामगारांचे त्या पुढाऱ्यावर प्रेम होते. अपार कष्ट त्याने सोसले होते. तुरुंगात कित्येक वर्षे काढली होती. तुरुंगांत खडी फोडून हात रक्तबंबाळ झाले होते. अर्थशास्त्राचा त्याचा गाढा अभ्यास होता. कल्याण व विश्वास यांना आनंद झाला. त्या घरी ते एकरूप झाले. ते

गेले तेव्हा तो पुढारी आपल्या लहान मुलीला खेळवीत होता. ते दृश्य मोठे विलोभनीय होते. गिरणीमालकांना ज्याच्या नांवाने कापरे भरे, सरकार ज्याला वचके, कामगार ज्याच्या शब्दाने मरायला तयार होत, असा तो उग्र नेता लहान मुलीला खेळवीत होता, तिच्याकडून आपले केस ओढवून घेत होता. नेपोलियनचे असेच एक चित्र आहे. युरोपची सिंहासने मोडणारा व उभाणारा नेपालियन मांडीवर मुलाला घेऊन बसला आहे असे ते चित्र आहे. वात्सल्य म्हणजे एक अपूर्व चीज आहे. औरंगजेब कोठेही नमत नसे. परंतु स्वतःच्या मुलीसमोर नमे. त्याच्या हृदयातील गोठलेली माणुसकी, गोठलेली कोमलता तेथे प्रकट होई व माणुसकीचा अनुभव त्याला येई.

कल्याण व विश्वास यांना 'ठिणगी' पत्राच्या कचेरीत काम देण्यात आले. विश्वासला निरनिराळ्या वर्तमानपत्रांतील बातम्या थोडक्यात काढण्याचे काम देण्यात आले. तसेच इतर काही लेखांचे भाषांतर करण्याचेही काम त्याला असे. विश्वास सुंदर लिही. त्याचे लिहिणे तेथील मंडळींना आवडू लागले. कल्याण मुद्रिते तपाशी. दोघे मित्र कामात दंग असत. जणू ते वर्तमानपत्र त्यांचेच होते. त्या दोघांची निष्ठा व कार्यतत्परता पाहून सर्वांना कौतुक वाटे. दिवसभर काम करून सायंकाळी प्रचारसभांना ते दोघे पुन्हा जात. अशा रीतीने वेळ केव्हाच जाई.

रात्री दोघे गॅलरीत झोपत. एके दिवशी थंडी होती. परंतु त्याच्या अंगावर कोणी तरी पांघरुण घातले. सकाळी पाहतात तो अंगावर पांघरुण! किती प्रेमळ तो कामगारांचा पुढारी! कसे बारीकसारीक सारे पाहणारा! एके दिवशी ट्रॅममधून येताना कल्याण व विश्वास चुकले. घरी यायला उशीर झाला.

''उशीरसा झाला?'' त्या पुढाऱ्याने विचारले.

''ट्रॅम चुकली!'' विश्वास म्हणाला.

''अशी कशी चुकली? क्रांतिकारक व्यवस्थित हवा. एकदा पाहिलेली

जागा त्याच्या ध्यानात हवी. एकदा पाहिला माणूस ध्यानात हवा. क्रांतिकारक बावळट नये असता कामा.''

''आम्ही बोलत होतो. भानच राहिलं नाही. कोणत्या गाडीत बसतो ते पाहिलं नाही.''

''बरं, चला. मला लागली आहे भूक.'' तो पुढारी म्हणाला.

सारे जेवायला बसले. परंतु त्या पुढाऱ्याचे जेवण पटकन् संपले.

''हे काय, झालं जेवण?'' विश्वासने विचारले.

''तुम्हाला भूक ना लागली होती?'' कल्याण म्हणाला.

''अरे, त्यांना खरी भूक आहे ती म्हणजे आपल्या देशाच्या स्वातंत्र्याची! आपली ही भारतमाता पारतंत्र्याच्या पंकांतून वर आली आहे, तिची लेकरं तिच्या अंगावर सुखासमाधानानं खेळत आहेत. आणि तिच्या नैसर्गिक वैभवाचा उपभोग घेत आहेत, कला, विद्या आणि शास्त्र यांचा अभ्यास करून जगातील सर्व राष्ट्रांच्या आणि संस्कृतीच्या मेळाव्यात भारतीय संस्कृतीला अग्रपूजेचा मान मिळत आहे, अशा तऱ्हेचं भारताचं वैभवशाली दृश्य पाहण्याची आतुरता त्यांना लागली आहे. रात्रंदिवस हेच विचार त्यांच्या डोळ्यात घोळत असतात. किंबहुना याच विचारांवर ते जगतात. हे विचार म्हणजे त्यांचं मुख्य खाणंपिणं. ते वरून शांत दिसतात, परंतु आत नुसती खाई पेटलेली आहे, आग भडकलेली आहे.'' त्या पुढाऱ्याची पत्नी म्हणाली.

''आणि तू काय कमी पेटलेली आहेस? अंगावरची लहान मुलगी मोलकरणीच्या स्वाधीन करून कामगार बायांबरोबर मिलच्या फाटकात तू उपाशी बसतेस. विश्वास, हीसुद्धा आग आहे हो. मी थंड झालो तर हीच मला पेटवते. मला पेटवणारी ही फुंकणी.''

''शेवटी आम्हाला चुलीजवळच बसंवलंत.''

''चुलीसाठी तर सारा झगडा. गरिबाची चूल नीट पेटावी, ती थंड राहू

नये, त्याला पोटभर भाकर मिळावी म्हणून तर क्रांती.'' अशी बोलणी होत जेवणे झाली. विश्वास व कल्याण गॅलरीत पडले.

''हे आणखी घ्या पांघरुण. पहाटे थंडी पडते.''

''काय तुम्ही अंगावर टाकलंत आमच्या?''

''आणि तुम्हाला उशाला हवं का काही?''

''नको; लागलं तर पुस्तकं घेऊ.''

''ठीक. तुरुंगात आम्ही थाळी घेत असू.''

असे दिवस चालले. 'ठिणगी'चा अंक कल्याण व विश्वास खूप खपवीत. त्यांना कामाचा जणू कैफ चढला होता आणि त्या एक दिवसाच्या संपाची तारीख जवळ आली. प्रचार जोरात सुरू झाला. कल्याण व विश्वास दोघांचे घसे बसले. तरी ते कण्र्यांतून ओरडतच असत.

ती तारीख आली. साऱ्या गिरण्या बंद पडल्या. यंत्राप्रमाणे सारे झाले. अत्यंत शांततेचा असा तो एक दिवसाचा निषेध–संप होता. इतका व्यवस्थित संप पूर्वी कधीही झाला नव्हता आणि सायंकाळी विराट सभा भरली. लाख–दीड लाख कामगारांची भव्य सभा. कामगार मैदान फुलून गेले होते. उंच लाल झेंडा तेजाने फडकत होता. 'पगारवाढ ताबडतोब' अशी गर्जना होई व ती गगनाला भिडे. इन्किलाबच्या घोषणांनी दशदिशा भरल्या. विश्वास व कल्याण यांच्या डोळ्याचे पारणे फिटले. ही सभा भरविण्यासाठी त्यांचेही प्रयत्न होते. अनेकांच्या प्रयत्नांत त्यांचीही भर होती.

सभेत ध्वनिक्षेपक यंत्रे होती. अनेक पुढारी बोलले. आणि शेवटी तो महान नेता उभा राहिला. सर्वत्र निस्सीम शांतता होती. त्या भाषणांत जबरदस्त आत्मविश्वास होता. मालकांच्या डावपेचांची त्या भाषणात छाननी होती. कामगार मान डोलवीत व 'बरोबर' असें म्हणत. असे ते अपूर्व भाषण चालले होते आणि शेवटी तो थोर पुढारी म्हणाला, ''पगारवाढीचा उग्र लढा जर पुढे

करावाच लागला तर तो शेवटपर्यंत चालवावा लागेल त्यासाठी आधीपासून आपली तयारी हवी. फंड हवा. परवा दहा तारखेला पगार होईल. प्रत्येकाने एकेक रूपया संप फंडाला दिला पाहिजे. एक लाख कामगार आहेत. एक लाख फंड जमा झाला पाहिजे. तुम्हाला खरोखरच लढा लढवायचा आहे याची ती निशाणी आहे. मालक मगरूर असला तरी मग विचार करील. दुसरी गोष्ट म्हणजे लाल बावटा युनियनचे सारे सभासद होऊन जा. लढा युनियनमार्फत चालवला जाणार. त्या युनियनची प्रतिष्ठा वाढवा. कामगारांची मान उंच व्हावी म्हणून हे युनियन आहे. येत्या पगाराच्या दिवशी कमीत कमी २५ हजार फंड व २५ हजार युनियनचे सभासद झाले पाहिजेत.''

सभा बेफाम झाली होती. इन्किलाबचे गाणे होऊन लाल बावट्याच्या जयजयकारात सभा संपली. ती सभा पाहून कल्याण व विश्वास चकित झाले. कामगारांची शक्ती त्यांच्या निदर्शनाला आली. कामगारांची एकजूट म्हणजे काय प्रभावी चीज आहे ते त्यांनी आज प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिले.

आणि पगाराचा दिवस आला. त्या दिवशी कामगार स्वंयंसेवकांनी शर्थ केली. सर्वत्र चैतन्य नाचत होते हजारो पावत्या फाटत होत्या. चाळीचाळीतून स्वयंसेवक हिंडत होते. कल्याण व विश्वास यांनी क्षणाची विश्रांती घेतली नाही. त्यांची तहान–भूक जणू हरवली होती.

सारे पैसे एकत्र आले. पावतीबुके आली. २५ हजांरावर फंड जमा झाला. २२ हजारांवर सभासद झाले. सभासद आणखी होत होते. एका दिवसात हे काम झाले. मुंबई चकित झाली.

दुसऱ्या दिवशी पुन्हा प्रचंड सभा भरली. उत्साह वाढत होता. तो महान नेता म्हणाला, ''तुमचा निश्चय २५ हजार रुपयांनी व हजारो युनियनच्या सभासदांनी मालकांना कळवला आहे. ज्यांनी अद्याप फंड दिला नसेल, त्यांनी येथे जवळ असेल ते द्यावे. सभा संपल्यावर या लाल बावट्यासमोर असेल

ते आणून द्या. आपणास मारुती, शनि वगैरे देव माहीत नाहीत. समता हीच आमची देवता. हिची उपासना करून प्रस्थापना करणे हेच आमचे कर्तव्य! भूतलावर हिचा अवतार झाला, म्हणजे, ऐदी व श्रीमंत लोकांच्या साऱ्या स्वार्थी संघटनांचा सत्यानाश होऊन श्रमणाऱ्यांचे संसार सुखाचे व सोन्याचे होतील. जे कोणी सभासद झाले नसतील, त्यांनी होऊन जावे.''

सभेनंतर खरोखरच खिशात असेल नसेल ते कामगारांनी तेथे अर्पण केले. किती रक्कम जमली? किती तरी वेळ मोजणे चालले होते. हजारांवर रक्कम झाली. त्यात नोटाही होत्या. खरोखरंच खिशात होते ते फेकले की काय त्यांनी? प्राण फेकायला तयार असणारा कामगार दीडक्या का फेकणार नाही?

प्रचाराचा असा धूमधडाका सुरू होता. मालकांवर या गोष्टीचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही. सरकार व मालक यांच्यात वाटाघाटी सुरू झाल्या. सरकारवर जबाबदारी होती. लाख-दीड लाख कामगार संपावर जाणे साधी गोष्ट नव्हती. सारा व्यवहार त्याने बंद होतो. इतर धंद्यातील कामगारही मग संपावर जाऊ लागतात. सारे जीवनच जणू थांबते. साऱ्या नाड्या आखडतात. लाख-दीड लाख कामगार संपावर गेले व बिथरले तर? गोळीबार करावा लागतो. सरकारचीही नाचक्की असते. ती काही तरी पगारवाढ द्यावी असे आत शिजू लागले होते.

परंतु एकाएकी कामगार पुढाऱ्यांना गिरफदार करण्यात येऊ लागले. तो महान नेता सर्वांच्या आधी उचलला गेला. त्यांना जामिनावरही मोकळे सोडले नाही. अत्याचाराला प्रवृत्त करणारी भाषणे केल्याचा त्यांच्यावर आरोप होता. त्याच्या अटकेच्या निषेधार्थ सभा झाली. त्या सभेत कल्याण व विश्वासही बोलले. मुंबईच्या सभेत बोलण्याची त्यांची ती पहिलीच वेळ. परंतु त्यांची भाषणे कामगारांना आवडली. कारण ती भाषणे ठरीव साच्याची नव्हती.

 मुंबईस

ठरलेल्या पध्दतीची नव्हती. त्यांत राणा भीमदेव आदळआपट नव्हती. त्यांच्या भाषणांत कळकळ होती. एक प्रकारचा अकृत्रिम जिव्हाळा होता. विश्वासने सांगितले, ''आपले प्रिय व पूज्य पुढारी गिरफदार होत आहेत;याचा अर्थ आपला विजय आहे. आपल्या संघटनेचा हा विजय आहे. निश्चयाचा विजय आहे. पुढारी पकडले गेले तरी जोपर्यंत त्यांची स्फूर्ती प्रत्येक अनुयायाच्या अंत:करणातील सिंहासनावर विराजमान होऊन आदेश देत असते. तोपर्यत भिण्याचं मुळीच कारण नाही. पुढारी पकडले जाणं हे स्वाभाविक आहे. कारण संपत्ती आपल्या विलोभन–सामर्थ्याचा प्रयोग करून हरली म्हणजे सत्तेची कास धरते. संपत्तीला सत्तेचा आश्रय घ्यावा लागला, यातच आपला विजय आहे. म्हणून भिण्याचं मुळीच कारण नाही, आपल्या प्राणाहून प्रिय आणि पूज्य पुढाऱ्यांची प्रेरणा आपणाजवळ आहे. आपण पोलादी एकजूट करून उभे राहू या.'' विश्वासचा आवाज अद्याप बसलेलाच होता. फार वेळ त्याच्याने बोलवले नाही. कल्याणचे भाषण सुंदरच झाले. तो म्हणाला, ''आपल्यातील पुढारी जसजसे उचलले जातील, तसतसे कामगारांमधून पुढारी निर्माण झाले पाहिजेत. तुमच्या चाळीचाळीतून नेते निघाले पाहिजेत. निश्चयी, एकमुखी, एकजुटीचे नेते. आपले पुढारी उचलण्यात आले. कारण ते प्रचंड निश्चय निर्माण करीत होते. एका दिवसात २५ हजार फंड जमला. २५ हजार सभासद झाले. ही गोष्ट साधी नव्हती. अभंग निश्चयाची व निर्धाराची ती लाल खूण होती. आपल्या पुढाऱ्यांच्या अटकेचा निषेध करायचा आहे ना? तो सभेने केवळ न दाखवता कृतीनं दाखवा. युनियनचे सभासद २५ हजारांचे ५० हजार व्हा. तुरुंगात तुमच्या पुढाऱ्यांना ही गोष्ट कळली तर ते नाचतील. हातापायांतील बेड्यांच्या तालावर ते नाचतील.

**''बेडी के झनझन में वीणा की लय हो**

**जय हो विजय हो**

भारत जननी तेरी,जय हो विजय हो''

लो. टिळक म्हणाले होते की, ''माझ्या तुरुंगवासातील कष्टानंच माझं कार्य वाढेल. आपल्या पुढाऱ्यांच्या तुरूंगवासानं आपलंही कार्य वाढो. घार उंच असली, दूर असली, तरी तिथून ती पिलांकडे पाहते. तिच्या दृष्टीतूनच पिलांना चारा मिळतो. पोषण मिळतं. त्याप्रमाणं आपले पुढारी जरी कुठं अंदमानात नेऊन ठेवले, तरी त्यांची दृष्टी आपल्याकडे, आपल्या युनियनकडे असेल. त्यानं आपलं युनियन वाढेल, पुष्ट होईल. खरं ना? ज्ञान मिळवा; वर्गयुद्धाचं ज्ञान मिळवा. आजपर्यंत पिळवणूक होत आली. परंतु मोक्षाची वेळ जवळ येत आहे. ग्रहण सुट्रू लागलं आहे. १८७१ मध्ये पॅरिस शहरातील कामगारांनी तीन महिने राज्य केलं. त्या तीन महिन्यांतूनच त्यांनी केवढी नवीन दृष्टी दाखवली होती! समाजरचनेच्या नवनिर्मितीचं दर्शन त्यांनी घडवलं होतं. परंतु ती सत्ता नष्ट करण्यात आली. कामगारांच्या पुढाऱ्यांना भिंतीसमोर उभे करून गोळ्या घालण्यात आल्या. त्या क्रांतीत नाना धंद्यांतील कामगार होते. एक कामगार सेनापती विटा भाजणारा होता. एक न्हावी होता. त्यांचा उपहास करून गोळ्या घातल्या गेल्या. ''विटा भाजणारा, राज्य करू पाहतो बेटा; घाला गोळी'' असं म्हणून गोळी घातली. त्यांना काय माहीत की, ५० वर्षाच्या आतच रशियातील कामगार एक महान श्रमजीवी सरकार स्थापन करतील? परंतु आज कामगारांसमोर तो लाल आदर्श आहे. त्या ध्येयाकडे जगातील सारे कामगार जातील. आपणास कष्ट पडतील. आगीतून जावं लागेल. परंतु आगीतून गेल्यावरच वीट पक्की होते व मग तिच्यामुळं टोलेजंग इमारत उठते. कामगार भाईहो, संघटना, ज्ञान, एकजूट ही आपली ब्रीदवाक्यं. एक लाल झेंडा हे आपलं दैवत. हा लाल झेंडा फडफडत असला म्हणजे आजपर्यंत कामगार चळवळीत जे जे जगभर मेले, त्यांची हृदयं तडफडत आहेत, असं वाटतं. त्यांचे आत्मे तुम्हाला पेटवण्यासाठी वारा घालीत आहेत,



मुंबईस

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

असं वाटत. लाल झेंड्यात सारे पुढारी आहेत. सारं बलिदान आहे. त्याच्याखाली या व इन्किलाबची, कामगारांची घोषणा करा.'' कल्याण किती तरी बोलत राहिला,त्याला बोलूही देण्यात आले. त्याच्या भाषणाचे सर्वांना आश्चर्य वाटले. सर्वांनी त्या भाषणाची प्रशंसा केली. सभा प्रचंड जयघोषांत पुढाऱ्यांच्या जयघोषांत संपली.

''कल्याण, तू आज किती सुंदर बोललास!'' विश्वास म्हणाला.

''ते आज बाहेर असते, तर तुमची पाठ थोपटते.'' त्या थोर पुढाऱ्याची पत्नी म्हणाली.

''परंतु ते बाहेर असते, तर मी बोललोच नसतो.'' कल्याण म्हणाला.

मंडळी घरी आली. कल्याण व विश्वास नित्याप्रमाणे गॅलरीत पथाऱ्या पसरून पडले. विश्वास लवकरच घोरू लागला. परंतु कल्याणला झोप येईना. तो कठड्याशी उभा होता. ट्रॅमची घरघर थांबली होती. म्युनिसिपालिटीचे दिवे आकाशातील ताऱ्याप्रमाणे शांतपणे पहारा करीत होते. सारी मुंबई शांत होती. रस्त्यांवरील झाडे मूर्तीप्रमाणे शांतपणे उभी होती. परंतु कल्याण अशात होता. आकाश शांत होते. पृथ्वी शांत होती. वारे शांत होते; परंतु कल्याण अशांत होता. तो सुस्कारे सोडीत होता. कसला करीत होता तो विचार?

आणि विश्वासला एकदम जाग आली. त्याने कल्याण उभा आहे असे पाहिले.

''काय रे कल्याण, झोप नाही का येत?''

''नाही.''

''का बरं?''

''आज मला एकदम आठवणी आल्या. आईच्या, रंगाच्या, संध्येच्या, सर्वांच्या आठवणी. हृदयसागर उसळला आहे. विश्वास, इकडे आपण कामात दंग आहोत. दिवस कसा जातो ते कळतही नाही. परंतु तिकडे आईची काय

दशा असेल? बाबा पुन्हा तिला छळीत असतील का? आई रडत असेल का? रंगा अगतिक होऊन निराशेनं बसला असेल का? आणि प्रेमळ,आशामयी, स्नेहमयी संध्या. विश्वास, काय करावं समजत नाही. कशाला या अशा ओळखी होतात.? हृदयाला पिळवटणाऱ्या ओळखी. आज माझं भाषण चांगलं झालं असं तुम्ही सारे म्हणालेत. मग संध्येला किती आवडलं असतं ते! तिला किती आनंद झाला असता! तिनं माझी पेमपूजा केली असती. संध्या दूर आहे.म्हटलं तर ती जवळही आहे. परंतु हें समाधान काय कामाचं?

''कल्याण, तू लग्न कर.''

''विश्वास, लग्न करून कुठं राहू? इथं पाहिलंस ना लोक कसे राहतात? एकजण कुठं तरी नोकरी करतो व ठिणगीत काम करणाऱ्या दोघा मित्रांना पोसतो. भाई लोक म्हणजे कमालीचा त्याग. कोणी चहाचे चार पेले घेऊनच दिवस मारून नेतात. कोणी विडीच्या धुरावरच मस्त राहतात. तर कोणी एक पानपट्टी चघळून उपासमार विसरतात. आपण कोणावर भार घालायचा, विश्वास?''

''कल्याण, हजारोंचं होतं तसं तुझं होईल.''

''पाहू, आताच काय त्याचं?''

''मग झोप आता.''

पुन्हा दोघे मित्र झोपी गेले. परंतु दुसऱ्या दिवशी आणखी धरपकड झाली. आणि तीत कल्याणही पकडला गेला. ते भाषण त्याला भोवले. कामगारांत असंतोष पसरला. प्रचंड सभा होऊन 'पगारवाढ न मिळाली तर अमक्या तारखेला संप पुकारू' असा निर्णय घोषविण्यात आला. संपसमिती स्थापली गेली. परंतु कामगारांना १२॥ टक्के पगारवाढ देण्याचे जाहीर झाले. संपूर्ण नाही, तर निदान निम्मी मागणी मिळाली. कामगारांचा जय झाला.

ऐक्याची शक्ती त्यांच्या अनुभवाला आली. परंतु पुढारी अद्याप तुरुंगातच होते. त्याच्यावर खटले भरण्यात आले. अनेकांना शिक्षा झाल्या. कल्याणलाही एक वर्षाची सक्तमजुरी मिळाली.

विश्वास मुंबई सोडून गेला. तो नगर जिल्ह्यात एका कार्यकर्त्याबरोबर शेतकऱ्यात हिंडूफिरू लागला. मधूनमधून तो पुण्यालाही येई. विद्यार्थ्यांच्या संघटनेतही काम करी. परंतु कल्याणची त्याला आठवण येई. अभ्यास, प्रचार, संघटना तो करीत होता. परंतु त्या सर्व कार्यात कल्याण नसल्यामुळे त्याला राम वाटेना.

आणि संध्या? ती का रडत बसली असेल? किती दिवस ती आशेवर अशी राहणार? कल्याणने तुरुंगातून तिला पत्र लिहिले असेल का? विश्वासच्या मनात संध्येला जाऊन भेटावे असे आले. परंतु पैसे कोठून आणावयाचे? त्याने वाऱ्यांबरोबर तिला सहानुभूती पाठविली.

कल्याणने तुरुंगातून घरी पहिले पत्र लिहिले. त्याने ते रंगाला लिहिले.

''प्रिय रंगास सप्रेम आशीर्वाद.

मी तुरुंगात आहे. वर्ष लौकरच जाईल. आला दिवस जातो. हा हा म्हणता दिवस जातील. रंगा, मी स्वतःला लहान समजत होतो. परंतु २२/२३ वर्षांचा झालो. किती पटकन मोठा झालो. रंगा, तुम्ही सारी धीराने राहा. बाबा नीट वागत असतील अशी आशा आहे. आईला म्हणावे काळजी नको करू. मी येथे आनंदात आहे आणि संध्येकडे जा. तिला हे पत्र दाखव. पुढील पत्र तिला पाठवीन. तिला सांग की आशा सोडू नको

मला तुमची सर्वांची आठवण येते. तू पुण्याला येऊ म्हणत होतास. आता सुटल्यावर पुढील बेत करू. परंतु पुढे काय काय वाढलेले आहे ते कोणाला ठाऊक? येथे फारसा त्रास नाही, पूर्वीचे दिवस नाहीत. कामाचा तितकासा ससेमिरा नसतो. पुस्तके वाचायला व वही लिहायला मिळाली

आहे. मी कविता करीत बसतो. क्रांतीची गीते, तुरुंगात शरीर अडकते, परंतु मन अधिकच मुक्त होते. तुरुंगात प्रतिमेला नवपल्लव फुटतात. एका इंग्रज कवीने म्हटले आहे की, ''अत्यंत गोड गाणी अत्यंत करूण व दुःखमय असतात.'' मी म्हणतो की, ''अत्यंत दुःखद असा जो तुरुंगवास तो थोर विचारांना व भावनांना जन्म देतो.'' इंग्रजी भाषेतील अमर पुस्तक 'यात्रेकरूची यात्रा' तुरुंगातचं लिहिले गेले. थॉमस पेनचे 'मानवी हक्क' तुरुंगातच लिहिले गेले आणि लोकमान्यांचे कर्तव्यस्फूर्ती देणारे 'गीतारहस्य' तुरुंगातच जन्मले. मी असा महापुरुष नाही. परंतु माझीही प्रतिभा चिमणी भुरभूर उडत असते. संध्येला म्हणावे कल्याण पुन्हा कवी झाला आहे. अश्रू व हास्ये काव्यात गुंफीत आहे. कामगारांचे अश्रूबिंदू व रक्तबिंदू शब्दांत गुंफीत आहे. आशानिराशांना पंख देत आहे. किसान–कामगारांचा तो कवी होत आहे. हे ऐकून संध्या हसेल व आनंदेल. सर्वांना सप्रेम प्रणाम. गावातील मित्रांसही.

तुझा,

**कल्याण**

✦✦✦

## ११...
# संध्येची चलबिचल

संध्या दु:खी झाली होती. तिच्या डोळ्यांत नाचणारी आशा कोठे उडून गेली  ती परत येईचना. तिचे हास्य कुठे पळून गेले ते तिला पुन्हा भेटायला यईना. ती खिन्न, अति खिन्न असे. सायंकाळी संध्येचे सुरम्य रंग दिसतात. परंतु ते रंग जातात व भीषण रात्र पसरते. अंधार पृथ्वीला घेरतो. चंद्रमा असला तर बरे. नाही तर ताऱ्यांची ती नुसती चकमक अंधाराला तेजस्वी करू शकत नाही. उलट ते थरथरणारे तारे पाहून अंधारात जीव अधिकच थरथरू लागतो. संध्येची मन:स्थिती अशीच झाली होती. क्षणभर तिला आशा वाटे,परंतु ती आशाच अधिक उदास करी. भयाण अंधारात मिणमिण दिवा भीतीदायक वाटतो. संध्येला ध्यानीमनी कल्याण दिसे. स्त्रिया देतात तेव्हा सर्वस्व देतात. स्त्रिया म्हणजे धो धो वाहत येणाऱ्या सरिता. एकदा एखाद्या गोष्टीकडे त्या निघाल्या, म्हणजे त्यांना अन्य दिसत नाही, अन्य सुचत नाही. स्त्रियांना सर्वस्व समर्पणात पूर्णता वाटते. प्रिय वस्तूशी सायुज्य मोक्ष त्यांना पाहिजे असतो. लहानसे ध्येयही त्यांना परिपूर्णतेच्या परमेश्वराचे दर्शन घडवू शकते. संध्या प्रेम देत होती. रात्रंदिवस दोन्ही डोळ्यांतून प्रेमाचे

अर्घ्य सोडीत होती. परंतु तिचा प्रेम–देव कोठे होता? सूर्य दूर असला, दिसत नसला तरी भक्त त्याला अर्घ्य अर्पितोच की नाही? संध्येचा सूर्यनारायण तुरुंगांतील भिंतीआड होता. ती त्याला दुरून पूजा पाठवीत होती.

''संध्ये, तू हा मृगजळाचा नाद सोडून दे.'' एके दिवशी आई म्हणाली.

''आई, मला जगवणाऱ्या जीवनाला तू का मृगजळ म्हणतेस? हे मृगजळ नाही, हे अमृतवर्षण आहे. हा अमृतसिंधू आहे.''

''अग, तो कल्याण सदोदित तुरुंगात राहणार. एखाद्या दिवशी बाहेर येईल. परंतु पुन्हा तुरुंग. तुरुंग हेच त्याचं घर. तुला कुठला आनंद, कुठलं सुख? माझं ऐक.''

''आई, यातच माझा आनंद आहे, सर्व सुख आहे. ज्याला मी मनानं वरलं, तो असा त्यागी तरुण आहे हेच माझं भाग्य. तो केवळ भोगासक्त जीव नाही हेच माझं भाग्य. आई, सावित्रीनं अल्पायुष होणारा परंतु सद्‌गुणसागर असा सत्यवान वरला. खरं ना? ज्याला मी मन दिलं, त्याला दिलं. आई, संध्या रडताना दिसती तरी ती त्यातही आनंद मानते हो. मी का मला सुख नाही म्हणून रडते? कल्याणचे हाल डोळ्यांसमोर येऊन मी रडते.''

''बरं बाई. मी तरी काय सांगू?'' असे म्हणून आई कामाला गेली.

संध्येने कल्याणचा फोटो आपल्या उशाशी ठेवला होता. त्याची ती पूजा करी. रात्री सारी झोपत. संध्या हळूच उठे. तो फोटो घेऊन ती अंगणात जाई. त्याच्याजवळ बोले, हंसे, रडे. वर आकाशाकडे तोंड करून ती देवाची प्रार्थना करी. माझ्या जीवनाचा राणा सुखरूप परत आण, असे ती देवाला विनवी.

कल्याण तुरुंगात होता. तुरुंग आता जरा सुधारले होते. निर्जीव यंत्रांत थोडी माणुसकी आली होती. शिवीगाळ, मारहाण जरा प्रमाणात झाली होती. कैदी जरा आनंदले होते. जुन्या शिस्तीत वाढलेले व सतरा जेलांचे पाणी

पिऊन आलेले कैदी म्हणत, ''अब तो जेल नही। सब ताबूत थंडे हो गये।''

''काय हो, पुन्हा काँग्रेसची चळवळ कधी सुरू होईल? गांधीबाप्पा चळवळ कधी करील?'' कैदी कल्याणला उत्सुकतेने विचारीत. मागे ३०-३२ साली चळवळ झाली तेव्हा सत्याग्रहींना जागा व्हावी म्हणून सरकारने इतर कैदी सोडून दिले होते. पुन्हा अशी चळवळ झाली तर आपण सुटू' अशी त्यांना आशा वाटे. म्हणून ते कल्याणला आशेने विचारीत.

''काँग्रेसची चळवळ सध्या तर नाही. पुढं कदाचित होईल.'' कल्याण सांगे.

''तुम्ही काँग्रेसचेच ना?''

''मी काँग्रेसचाच. परंतु थोडा पुढे गेलेला. आमचं म्हणणे असं की, सत्ता श्रमणाऱ्यांच्या हाती असावी. शेतकऱ्या-कामगारांचं राज्य व्हावं. श्रमावं यांनी व सत्ता गादीवाल्यांच्या हाती, हे आम्हांला पसंत नाही.''

''खरं आहे दादा तुमचं म्हणणं.'' कैदी म्हणत.

त्या तरुंगात कल्याण एकटाच राजकीय कैदी होता.

त्याची प्रकृती खालावली. त्याला रक्ती आमांश सुरू झाला. तो दवाखान्यात आला होता, बरेच दिवस विश्वास खानदेशातील शेतकऱ्यांत हिंडत होता. तिकडे त्याला नवीन मित्र भेटले. त्यांच्याशी त्याने नवीन स्नेहाचे नाते जोडले. विश्वासला आनंद झाला होता. खानदेशी मित्रांतील एकाचे त्याच्यावर प्रेम जडले. या खानदेशी मित्राचे नाव भाईजी. भाईजी खानदेशातील शेतकऱ्यांत नवचैतन्य निर्मू पाहात होते. दुष्काळ पडला होता. भाईजी सर्वत्र हिंडत होते. त्यांच्या प्रयत्नांची माहिती कळूनच विश्वास तिकडे गेला होता. भाईजींबरोबर तो सर्वत्र हिंडला. जणू भाईजींचा तो लहान भाऊ झाला. भाईजींचा निरोप घेऊन विश्वास परत निघाला, तेव्हा त्यांना किती तरी वाईट वाटले.

कल्याणची व विश्वासची भेट झाली. कल्याणची दुबळी प्रकृती पाहून विश्वासला वाईट वाटले. विश्वासची प्रकृती छान होती. तो राजबिंडा दिसत होता. तो जरा उंच झाला होता. अंगानेही जरा जाड झाला होता. एकदम त्यांच्यात वाढ झाली. हालअपेष्टा होत्या. खाण्याची भ्रांत असे. तरीही त्याला न जुमानता वाढण्याचे वय होते म्हणून त्याचे शरीर वाढलेच.

''कल्याण, तू आजारी आहेस?''

''होय, या आजारीपणाचा कंटाळा आला.''

''औषध?''

''स्वस्थ पडून राहणं हेच मुख्य औषध. होईन आता बरा. गुण पडत आहे. तू अकस्मात कसा आलास? कुठं असतोस?''

''प्रथम नगर जिल्ह्यात हिंडत होतो. परंतु इकडे खानदेशात अतिवृष्टीमुळं सारी पिकं बुडाली. भाईजी म्हणून एक इकडे कार्यकर्ते होते. ते शेतकऱ्यांना सारासूट मिळावी म्हणून प्रचार करीत होते. तालुक्यातून गटागटांच्या सभा होत होते. त्यांना दुसऱ्या कोणाचा पाठिंबा नव्हता. त्यांच्या कामात मदत करण्यासाठी म्हणून मी आलो. त्यांना आनंद झाला. त्यांच्याबरोबर मी खानदेशभर हिंडलो. नवीन तरुण मित्र जोडले. खूप प्रचार करून सर्व जिल्ह्यांतील शेतकऱ्यांची आम्ही प्रचंड सभा घेतली. ४०/५० हजार शेतकरी जमले असतील. शेतकऱ्यांच्या शेकडो बाया कित्येक मैल पायी चालत आल्या होत्या. शेतकऱ्यांची मुलं गाणी गात पायी आली होती. अपूर्व सभा. परंतु सरकार काही देणार नाही हे खरं. पण संघटनेचा श्रीगणेशा या दृष्टीनं आपण पाहायचं. खरं ना?''

''त्या भाईजींची मतं काय आहेत?''

''भाईजी सक्रमणावस्थेत आहेत. ते म्हणतात, ''अमुक एका पक्षाचा

शिक्का असा माझ्या कपाळावर नाही. सहानुभूती हा माझा धर्म. जिथं दुःख आहे, अन्याय आहे, जुलूम आहे, जिथं जाव, झगडावं, हे माझं ब्रीद.' ते धर्मशील आहेत. परंतु त्याचा धर्म गंधभस्मांचा नाही. परमेश्वरावर त्यांची फार श्रद्धा आहे. ईश्वराचं नाव घेतील व सद्‌गदित होतील. परंतु त्यांचा धर्म दुबळा नाही. त्यांचा धर्म समाजवादी कार्यक्रमांच्या आड येत नाही. महर्षि सेनापती बापटांप्रमाणं ते म्हणतात, 'तुमच्या समाजसत्तावादाच्या पाठीमागं, तुमच्या मार्क्सच्या तत्वज्ञानाच्या पाठीमागं माझा एक श्रीहरी ठेवा म्हणजे झालं.' परंतु मला ते आवडते.''

''शंकराचार्यांनी बुद्धांच्या शून्यापीठमागं परब्रह्म ठेवलं. त्याप्रमाणंच हे भाईजी एक श्रीहरी ठेवू इच्छितात. होय ना? शून्यवादी नागार्जुन व ब्रह्मवादी शंकराचार्य जवळ जवळ सारखेच असं कोणी म्हणतात. परंतु विश्वास, खरं सांगू का, हे देव मानणारे लोक केव्हा दगा देतील याचा नेम नाही. ते मुद्दाम दगा देतील असं नाही. परंतु त्याच्या एकांगी वृत्ती, त्यांच्या उत्कट भावना, आंतरिक प्रेरणा इत्यादी गोष्टी पुष्कळ वेळा अडचणी उत्पन्न करतात.''

''विश्वास, मला आपलं वाटतं की शक्य तितकं सर्वांशी सख्य जोडून आपलं घोडं पुढं दामटावं. आपलं तत्त्व सोडू नये म्हणजे झालं. इतर पक्षांचे लोक प्रचारार्थ नाना युक्ती करतात. राष्ट्रातील प्राचीन अर्वाचीन विभूती ते स्वतःच्या प्रक्षाच्या समर्थनार्थ उपयोगितात. आपणही त्या विभूतींचा उपयोग करून घेतला पाहिजे. त्या व्यक्तीतील क्रांतिकारकत्व आपण दाखवलं पाहिजे. श्रीकृष्ण क्रांतिकारक होता, शेतकऱ्यांची, गोपाळांची बाजू घेणारा होता; रामचंद्र वानरांची म्हणजे दडपलेल्यांची बाजू घेणारा होता; भगवान बुद्ध बहुजन समाजासाठी उभे राहिले; श्रीशिवाजी महाराजांनी बहुजन समाजाचं काम अंगावर घेतलं, म्हणून ते क्रांती करू शकले. अशा रीतीनं आपण सारा

इतिहास आपल्या बाजूला उभा केला पाहिजे. जवाहरलाल यानी म्हटलं होतं एकदा की परंपरेशी अजिबात संबंध तोडून भागणार नाही. परंपरेतून नवीन विचार पाजा. कल्याण, भाईजींचं असंच म्हणणं. ते म्हणतात, 'मी वेदांतून साम्यवाद, समाजवाद शिकवीन; गीतेंतून शिकवीन. तुकारामांच्या अभंगांतून शिकवीन.' मी म्हणतो ठीक. त्यांच्यासारख्यांचाही आपण उपयोग करून घेऊ या. जनतेची मनोरचना आपणांसारख्या केवळ बुद्धिवाद्यांना, केवळ पुस्तकी पंडितांना कळत नसते, हे खरं. अभ्यासमंडळांत सिद्धांत चर्चावे, समजून घ्यावे; परंतु खेड्यांतील जनतेसमोर निराळ्याच रीतीनं सारं मांडलं पाहिजे. जुन्या आजीबाईला चहाच पाजायचा, परंतु तो रामपात्रांतून पाजायचा. तिला कपबशी नाही चालत. काय पाजायचं हा मुख्य प्रश्न. कशातून पाजायचं हा मुख्य प्रश्न नाही. कल्याण, एकदा आम्ही भाई लोक एका प्रचंड सभेत बोलत होतो. शेतकरी झोपू लागले; परंतु भाईजी उठले व त्यांच्यात उत्साह संचारला. भाईजी साध्या साध्या गोष्टी सांगू लागले. ''या रे गाऊ सारे गान। या रे उठवू सारे रान।। खान्देशचा जागा झाला आज किसान' हे गाणं त्यांनी एकदम म्हटलं व ते चरण गुणगुणत लोक घरी गेले. आम्हांला आश्चर्य वाटलं. किसानांतील प्रचाराचं तंत्र आपण नीट समजून घेतलं पाहिजे.''

''विश्वास, लेनिनचं असंच म्हणणं होतं, नाही? शत्रूशी लढताना सर्व साधनं हाती घ्यावी. केवळ तत्त्व तत्त्व म्हणत बसू नये. जर्मनीजवळ १९१७ मध्ये तह घडवून आणताना वाटाघाटी करायला जाणाऱ्या मित्रानं लेनिनला विचारले, 'कोणता पोषाख करून जाऊ?'' तर महात्मा लेनिन म्हणाला, ''ज्या पोषाखानं कार्य सिद्धीला जाईल असं वाटत असेल, तो घाला. पोषाखासाठी तह अडायला नको.' खरं ना?''

भेट चालली होती. अधिकारी जरा कामासाठी गेले होते. ते परत आले. दोघे मित्र जरा थांबले.

''चालू द्या बोलणं'' अधिकारी सस्मित बोलला.

''कल्याण, ते भाईजी मला इकडेच राहा असं सांगत होते. किती त्यांचा आग्रह. मी तुझीही सारी हकीकत त्यांना सांगितली. आपले कल्हईचे प्रयोग सांगितले. त्यांना वाईट वाटलं. ते म्हणाले, ''असे उपाशी नका राहात जाऊ. मला कळवीत जा. माझी मतं तुमच्याशी एकरूप नसली, तरी आपण मित्र होऊ या. मी जणू तुमचा वडील भाऊ.' कल्याण, ते प्रेम आहेत. परंतु दुःखी आहेत. त्यांना एकटं एकटं वाटतं. ते श्रमजीवींची अधिक उत्कटतेनं बाजू घेतात व आपणांसारख्यांना बहिष्कृत मानीत नाहीत, म्हणून संकुचित गांधीवादी जे आहेत व जे ठिकठिकाणी आज सूत्रधार आहेत त्यांचा त्यांच्यावर रोष. आणि ते अहिंसा मानतात, देवाला हाक मारून रडतात, म्हणून भाईलोकही त्यांना हसतात. ते मला म्हणाले, 'मी एकटा आहे. माझा दिवा घेऊन मी जात आहे. थोडाफार जीवनाचा उपयोग झाला तर पुष्कळ झालं.'' कल्याण, तू सुटलास. म्हणजे आपण त्यांना बोलावू.''

''विश्वास, मी आजारी आहे हे संध्येला कळवू नकोस. उगीच ती चिंता करीत बसेल. मी बरा आहे असंच तिला कळव. समजलं ना?''

''कल्याण, मी का खोटं लिहू?''

''मोठा सत्याचा पुजारी की नाही तू!''

''बरं, ते पाहीन मी. कल्याण, आपण सत्याचे पुजारी नसलो तरी असत्याचेही नाही. सत्याची मर्यादा आपणही पाळतो. सत्य पाळणं हाच आपलाही कायदा; असत्य हा अपवाद.''

इतक्यात वेळ संपत आल्याची सूचना मिळाली.

''विश्वास, मला काय आणलं आहेस!''

''प्रेम. दुसरं काय आणू, कल्याण? भाईजींसारख्या नवीन मित्रांच्या

प्रेमाची जोड. तू बरा हो. क्रांतीसाठी, संध्येसाठी, आम्हा सर्वांसाठी प्रकृती सांभाळ.''

''माझी काळजी करू नको.''

दोघे मित्र हातात हात घेऊन क्षणभर उभे राहिले. विश्वास गेला. कल्याण पुन्हा दवाखान्यातील खाटेवर पडला. डोळे मिटून पडला. त्याच्या डोळ्यांसमोर शतचित्रे येत होती. ''हे भाईजी कोण? आपण बाहेर असतो तर त्यांना पाहिलं असतं. आणि विश्वास संध्येला माझ्या आजारीपणाविषयी कळवील की काय? तिला कळलं तर ती येईल. ती आली तर तिला माझी प्रकृती पाहून वाईट वाटेल. मला लौकर बरं झालं पाहिजे. परंतु ते का माझ्या हाती आहे?'' अशा विचारात तो होता.

आणि विश्वासने खरेच संध्येला पत्र लिहिले. काय लिहिले?

''प्रिय संध्याताई,

तुम्ही आता मला ओळखीत असाल. मी कल्याणला भेटायला गेलो होतो. तो जरा आजारी होता. आता त्याची प्रकृती सुधारत आहे. काळजी करू नये. तुम्ही आनंदात राहा. कल्याणनं तुम्हाला आनंदी राहावयास, हसा-खेळावयास सांगितले आहे.

**विश्वास**

संध्येला ते पत्र मिळाले. कल्याण आजारी होता. कितपत आजारी होता? विश्वास खरे कशाला लिहील? मी काळजी करू नये म्हणून मोघम त्याने लिहिले असेल. विश्वास भेटून आला; आणि मी? मी जाऊ का भेटायला? आई देईल का पैसे, देईल का परवानगी? मी भेटायला गेले तर कल्याणला बरे वाटले की वाईट? तो मला विसरू पाहात असेल का? की माझे स्मरण करीत असेल? काय करावे?

तिन्हीसांजा झाल्या. आई बाहेर गेली होती. संध्येने केरवारा केला व घागरकळशी घेऊन ती विहिरीवर गेली. परंतु घागर विहिरीत सोडून तेथे एका दगडावर ती बसली. समोर एक पक्षी नाचत होता. टुणटुण उड्या मारीत होता. तिला त्या पक्ष्याचा आनंद पाहवला नाही. तिनं त्याला दगड मारला. तो उडून गेला. तिला त्या वेळेस कोणी जवळ नको होते. मनुष्य नको. पशुपक्षी नको. कोणी नको. आणि समोर आकाशात संध्या फुलली. तिने डोळे मिटून घेतले. कशाला ही संध्या रोज मला लाजवते? तिला रोज पतिदर्शन आहे. दिवसभर कर्तव्यसेवा करून दुनियेसाठी जळून सायंकाळी थकला भागलेला सूर्यनारायण पश्चिम संध्येजवळ येतो; परंतु या संध्येला तिचा सूर्यनारायण भेटत नाही. फुकट माझा जन्म. संध्या डोळे मिटून बसली. ती एक गाणे म्हणू लागली. कानडी गाणे का होते त्या गाण्यांत? संध्येने डोळे उघडले. पुन्हा मिटले.

''संध्ये, इथं काय अशी बसलीस?'' आई येऊन म्हणाली.

''काय बिघडलं बसले म्हणून?''

''लोक तुला वेडी म्हणतील.''

''तू नाही ना म्हणणार? लागू दे, मला वेड लागू दे. अजून पुरं वेड लागत नाही म्हणून मला वाईट वाटतं. पुरं वेड लागलं तर इथं अशी बसले नसते.''

''ऊठ, तिन्हीसांजा रडू नये.''

''मग केव्हा रडायचं?''

''कधीच रडू नये.''

''आई, तू कधी नाही का गं रडलीस? सांग, सांग.''

''घरी चल. ऊठ. वेडी आहेस तू. ऊठ.''

आईने घागर कमरेवर घेतली. संध्येने कळशी घेतली. संध्या येऊन

अंगणातच बसली.

''ताई, घरात चल ना गं!'' अनु म्हणाली.

''आम्हाला गाणं शिकव. कल्याणचं गाणं.'' शरद म्हणाला.

''मल इथंच बसू दे. तुम्ही जा घरात.'' संध्या म्हणाली.

''तुला घेऊ तेव्हाच घरात जाऊ. चल ना गं!'' दोघे म्हणाली.

संध्येला कल्याणचे वचन आठवले. आपण दुसऱ्याला तकलीफ देऊ नये. ती उठली. हसली. तिने भावंडे जवळ घेतली. ती त्यांना गाणे शिकवू लागली. शरद नाचू लागला; अनु टाळ्या वाजवू लागली. चुलीजवळून आईही बाहेर आली. तिन्ही मुलांचा आनंद पाहून तीही आनंदली. तीसुद्धा टाळ्या वाजवू लागली. वातावरण प्रसन्न झाले जरा. जेवणे झाली. संध्येने लहान भावंडांना एक गोष्ट सांगितली. शरद व अनु झोपी गेली. संध्येने आईला काही वाचून दाखविले.

''संध्ये, नीज आता. नको त्रास करून घेऊ.'' आई म्हणाली.

''आई, कल्याण आजारी आहे. त्याला भेटावसं मला वाटतं. तुझ्याजवळ पुन्हा पैसे मागायचे. जिवावर येतं माझ्या. परंतु आई, यंदा मला नवीन लुगडी घेऊ नकोस. हीच मी पुरवीन. कुणाला दाखवायचं आहे नवीन लुगडं? फाटकं असलं म्हणून काय झालं? कुठं जायचं आहे मला? कामगारांत काम करणाऱ्याची राणी फाटक्या लुगड्यातच शोभते. आई, देशील का पैसे? माझ्या लग्नात तुम्ही नसतेस का पैसे खर्च केलेत? हुंडे दिले असतेत. मग मला कल्याणला भेटून येण्यासाठी नाही देणार?''

''तू का एकटी जाणार?''

''दुसरं कोण कशाला हवं? प्रेम आहे ना बरोबर? प्रेम सारं शिकवील. पुण्याला विश्वास बसेल; कल्याणचा मित्र. त्याला बरोबर घेईन. आणि मी

काही आता लहान नाही. वाटेत तिथं एकटी जाईन. आई, दे पैसे, दे परवानगी. कल्याणला पाहून येईन, गड्डे''

असे म्हणून संध्येने आईच्या खांद्यावर मान ठेवली. आईने तिचे अश्रू पुसले. केस सारखे केले. मांडीवर तिचे डोके घेतले. संध्या पडून राहिली. पुन्हा दीनवाणे तोंड करून आईकडे वर बघत ती म्हणाली,

''देशील ना आई पैसे?''

''देईन हो.''

''किती माझी ममताळू आई!'' असे म्हणून संध्येने आईच्या मांडीत तोंड खुपसले.

आणि एके दिवशी संध्या कल्याणला भेटायला निघाली. नदी सागराला भेटायला निघाली. त्या दिवशी अकस्मात पाऊस आला. संध्या भिजली. ती स्टेशनमध्ये कुडकुडत बसली. ती मनात प्रेमस्नेहाने आर्द्र झाली होती. बाहेरून आकाशाने तिला ओले केले. मनातील प्रेमाचा ओलावा ऊब देत होता. परंतु बाहेरचा ओलावा गारठवीत होता. मनावर आनंदाचे रोमांच उभारले होते. शरीरावर थंडीचा काटा उठला होता. गाडी आली. संध्या बायकांच्या डब्यात जाऊन बसली. बाहेर पाणी पडत होते. इंजिनातून ठिणग्या पटकन विझून जात. हृदयांतून आशेचे स्फुलिग असेच नाचत बाहेर येत असतात; परंतु परिस्थितीने विझून जात असतात.

संध्येला वाटले की कल्याण असाच रडत असेल. हे आकाश नाही वर्षत. हे माझ्या कल्याणचे हृदयच जणू पाझरून राहिले आहे. माझ्या कल्याणचे विशाल हृदय, गरिबांसाठी तळमळणारे ते थोर हृदय! असा विचार मनात आला व संध्येने डोके बाहेर काढले. तिच्या केसांवर पाणी पडत होते. तोंडावर उडत होते. ती हात पुढे करी. ते पाणी ओंजळीत घेऊन ती पिई. कल्याणच्या

प्रेमामृतासाठी तहानलेली संध्या! ती ते पाणी पीत होती. कल्याणच्या हृदयातील प्रेमवर्षाव ती प्राशीत होती.

परंतु एकदम दुसराच एक विचार तिच्या मनात आला. ती भेटायला आली आहे असे पाहून कल्याणला वाईट वाटेल. म्हणून तर नाही हे आकाशाचे अश्रू? हा विचार मनात येऊन संध्येला वाईट वाटले. तिने खिडकीत खिन्नपणे डोके ठेवले. परंतु ती पुन्हा हसली. माझा कल्याण कठोर नाही. मला पाहून तो आनंदेल. तो आजारी पडला तर बरा होईल. मी भेटायला गेले नाही म्हणूनच तो आजारी पडला असेल. हो, खरेच: आता बरा होईल तो. तिने आपले डोके पुसले. तोंड, डोळे पुसले. तिने अंथरुण घातले. पांघरुण घेऊन ती झोपली. मनात कल्याणशी बोलत बोलत ती झोपली.

आता उजाडले होते. वाटेत एका स्टेशनवर तिने वर्तमानपत्र विकत घेतले. आयुष्यातील पहिलाच हा प्रसंग. स्वत: वर्तमानपत्र विकत घेऊन वाचण्याची पहिलीच वेळ. जणू नवीन जगात संध्या येत होती. वर्तमानपत्र वाचीत ती बसली. आणि पुणे स्टेशन आले. तिला नेण्यासाठी विश्वास आला होता. दोघांनी एकमेकांना कधी पाहिले नव्हते. संध्या वळकटी घेऊन उभी राहिली. ती इकडे तिकडे पाहात होती. तो विश्वास धावत आला.

''तुम्हीच ना संध्याताई?'' त्याने विचारले.

''आणि तुम्ही विश्वास?'' तिने हसून प्रश्न केला.

''हो, द्या ती वळकटी.''

''ती जड नाही. असू दे माझ्याजवळ.''

''परंतु आम्ही बरोबर असता तुमच्या हातात सामान असणं बरं दिसत नाही.''

''विश्वासने वळकटी घेतली. दोघे बाहेर आली. टांग्यात बसली

विश्वासच्या बरोबर दुसरा एक मित्र होता. तो सायकलवर बसून पुढे गेला आणि घरी एक मित्र संध्येसाठी स्वयंपाक करीत होता. संध्या व विश्वास खोलीवर आली. संध्येचे अंगघुणे झाले. विश्वासने पाट मांडला. ताट मांडले. संध्या जेवायला बसली. विश्वासचा घरी असलेला मित्र वाढीत होता. सायकलवरचा मित्र आपल्या घरी निघून गेला होता.

''यांचं नांव काय?'' संध्येने विचारले.

''बाळ.'' विश्वास म्हणाला.

''आणि तो सायकलवरून पुढं गेला तो?''

''त्याचं नाव लक्ष्मण.''

''बाळच्या हातचं मी आज जेवत आहे. तुम्ही रोज हातानंच करता?''

''कधी कधी करतो.''

''आणि कधी कधी कुठं जाता?''

''कधी कंटाळा येतो.''

''स्वयंपाक का हे बाळच करतात?''

''मीही करत असे; परंतु हल्ली बाळच करतो. कारण मलाही बरं वाटत नाही. रोज ताप येतो; तसा फार नसतो. परंतु येतो; अशक्त वाटतं. पडून राहतो. बाळच सारं करतो.''

''माझ्याबरोबर कल्याणच्या भेटीला तुम्ही येणार?''

''परंतु कल्याण मध्यंतरी अन्नसत्याग्रह करीत होता, असं काल कळलं. त्याची भेट घेऊन देतात की नाही ते विचारलं पाहिजे. आपण जेलच्या सुपरिटेंडंटला पत्र लिहू. अन्नसत्याग्रह सुरू आहे की काय तेही विचारू आणि मग काय ते करू.''

''तोपर्यंत?''

''तोपर्यंत इथं राहा. मलाही तोवर बरं वाटेल. तुमच्याबरोबर येईन.''

''बरं तर इथं राहीन. तुमचा स्वयंपाक करीन. कल्याणचे तुम्ही मित्र. मला परकेपणा नाही.''

''आम्हांलाही नाही.''

संध्येचे जेवण वगैरे झाले. ती तेथील पुस्तके चाळीत बसली. इतक्यात सायकलवरून एक मुलगी आली. ती आत आली.

''ये हरिणे; या संध्याताई हो.'' विश्वासने सांगितले.

''तुम्ही का हरिणाताई! किती दिवस तुम्हांला पाहायची इच्छा होती.'' संध्या आनंदाने म्हणाली.

दोघी जणी बसल्या. परंतु बोलणार काय?

''विश्वास, तुझं कसं आहे आज?'' हरिणीनें विचारले.

''आज अद्याप ताप नाही. तुला शिकवतो.''

''आज नकोच नाही तर. या आल्या आहेत.''

''त्या इथं काही दिवस राहणार आहेत. त्या काही परक्या नाहीत. शिकायला लाजतेस वाटतं?''

''इश्श, लाजायला काय झालं? तू मात्र लाजू नकोस म्हणजे झालं.''

विश्वास हरिणीला शिकवू लागला. संध्या आतल्या खोलीत अंथरुणावर पडली. तिला झोप लागली.

शिकवता शिकवता विश्वास रागावला. त्याने पुस्तक आपटले व तो म्हणाला, ''तू घरी काहीच वाचीत नाहीस, तर कशाला येतेस?''

''मला नाही रे सारखं हे वाचायला आवडत.'' ती म्हणाली.

''पास झालं पाहिजे बघ.''

''नाही पास झाले तर?''

''हरणे, मग कसं व्हायचं? तू पास झालीस तर ते तुला नोकरी देणार आहेत. मग तुझा विश्वास उपाशी नाही राहणार. प्रेमावर नुसतं जगता नाही येत.''

''विश्वास, घरी सारं काम मला करावं लागतं. वडील वारल्यापासून हे असं चाललं आहे. वडील कौतुक करीत. हरिणीला काम नका सांगू, असं ते म्हणत. परंतु आता काय? आईलाही बरं नसतं. दादा नुसता खाबू. मला मात्र वाटेल तसं बोलतो. विश्वासकडे गेलीस तर बघ असं म्हणतो. तरीही मी अभ्यास करते. पुन्हा तुमच्या अभ्यास मंडळांना येते. काय काय रे मी करू?''

''ते काही असो. परंतु पास झालं पाहिजे.''

संध्या आता उठली होती. हरिणी जायला निघाली.

''जाते हं मी.'' हरिणी संध्येला म्हणाली.

''उद्या याल ना.'' तिने विचारले.

''येईन.''

हरिणी गेली. संध्या घरात सारे पाहू लागली. तो घरात काय होते थोडेसे तांदूळ, थोडी डाळ, तेलही संपले होते.

''विश्वास, संध्याकाळी काय करू?''

''संध्याताई, काय करायचं संध्याकाळी?''

''विश्वास, मघा हरिणीजवळ तुम्ही म्हणालात की मग विश्वास उपाशी नाही राहणार? तुम्ही का कधी कधी उपाशी राहता?''

''होय; कुठून आणायचे पैसे? कोणी मित्र कधी देतो. कधी आम्ही कुठं काम करतो. ढकलतो गाडं. संध्याताई, आज घरात काही नाही. तुम्हाला इथं राहा म्हटलं, पण खायचं काय? भाईजी पाठवणार होते पैसे. पण अद्याप

आले नाहीत.''

''हे भाईजी कोण?''

''असेच एक लाभलेले नवीन मित्र. आमच्याहून वयानं मोठे आहेत. परंतु भावनांनी व विचारांनी थोडे आमच्यासारखे.''

''ते का श्रीमंत आहेत?''

''नाहीत.''

''मग ते तरी कुठून पाठवणार?''

''ते भिक्षा मागतात व ती मदत आम्हाला पाठवतात. कधी काही लिहितात. मिळाले पैसे तर आम्हाला देतात.''

''विश्वास, हे माझ्याजवळचे पैसे घ्या. सामान आणा. मी आले आहे. तर दोन दिवस तरी पोटभर जेवा. मी जेवण करून वाढीन.''

''संध्याताई, आमचा खळगा नेहमीच आहे. तुमचे पैसे खर्च झाले. तर उद्या कल्याणला भेटायला कशा जाल?''

''मी जास्त पैसे घेऊन आले आहे. आईला लिहून आणखीही पैसे मागवून घेईन. विश्वास, माझे पैसे घ्यायला तुम्ही संकोच नका करू. तुम्ही मित्र जिवाला जीव देता. मी तुमच्या मित्राचीच पत्नी ना?''

संध्येने पत्नी शब्द एकदम उच्चारला, ती लाजली व बावरली.

विश्वास सामान आणायला गेला. संध्येनं भांडी नीट घासून स्वच्छ ठेवली. तिने केर काढला. अंथरुणे नीट झाडली. तिने विस्तव पेटवला. तो विश्वास आला. साधा खिचडीचा बेत ठरला. म्हणजे सुटसुटीत काम. चुलीवर खिचडी ठेवून विश्वास व संध्या बोलत बसली.

''विश्वास, हरिणीला मघा तुम्ही रागं भरलेत. असं रागानं बोलू नये. मुलीचं मन तुम्हांला कळत नाही. लहानसा शब्दही आम्हाला दुःख देतो. तो

आम्ही मनात धरून बसतो. मनात उगाळीत बसतो.''

''संध्याताई, माझा स्वभावच तापट. आणि या आजारीपणामुळं ती चिरचिरा झालो आहे. आमच्या निराशा. तेही एक कारण आहे. मागं भाईजी एकदा मला असंच म्हणाले होते. परंतु माझ्या मित्रांना माझी सवय झाली आहे. ते तेवढं मनावर घेत नाहीत.''

''हरिणी चांगली आहे मुलगी. चपळ व उत्साही. विश्वास, मला नाही सायकलवर बसता येत.''

''मग शिकायचं आहे?''

''कल्याण मला शिकवील. संध्या नको आणि तुम्ही का नेहमी आजारी असता?''

''मधूनमधून ताप येऊ लागला आहे; त्यामुळं अशक्तपणा फार वाटतो.''

''असा ताप येणं बरं नाही. जपा हो प्रकृतीला.''

रात्री जेवणे झाली. विश्वास व बाळ बाहेर गॅलरीत झोपले. संध्या आत झोपली. परंतु तिला झोप येईना. ती विचार करीत होती. ती कल्याणला भेटायला आली होती. परंतु त्याचे मित्र तर येथे उपाशी होते. आजारी होते. जे पैसे कल्याणला पाहायला जाण्यात मी खर्च करणार, ते येथे यांनाच खर्चाला दिले तर? कल्याणला त्याने अधिकच आनंद होईल. संध्या त्यामुळे कल्याणची अधिकच आवडती होईल. देवाला भेटायला जाणाऱ्यापेक्षा, दुष्काळातील लोकांना आधार देणारा देवाजवळ अधिक लौकर जातो. तीच खरी देवपूजा. त्याप्रमाणे कल्याणच्या आजारी मित्रांची सेवासुश्रूषा हीच कल्याणची भेट. मला त्यागी ना जीवन कंठायचे आहे? तर मग करू दे त्याग. प्रेम म्हणजे शेवटी त्याग. परंतु प्रेम म्हणजे का प्रेमाचाही त्याग? परंतु मी कल्याणवरील प्रेमाचा का त्याग करीत आहे? त्याची मूर्ती पाहणे म्हणजे प्रेम, का त्याला

आवडणारे कर्म करणे म्हणजे त्याच्यावरचे प्रेम? मी प्रेमाचा नाही त्याग करीत, तर आसक्तीचा त्याग करीत आहे, मोहाचा त्याग करीत आहे. का आईजवळ आणखी पैसे मागू? माझे सारे पैसे चोरीला गेले असे लिहू? परंतु आईला का फसवू? माझे डोके मांडीवर घेऊन थोपटणारी, माझे अश्रू पुसणारी आई, तिला का खोटें लिहू? परंतु मोघमच लिहिले तर? अधिक पैसे पाहिजे आहेत. पाठव. एवढेच लिहावे. कुणाजवळून येऊन आई पाठविल्याशिवाय राहणार नाही. मुलीला परदेशी दीनवाणी ती पडू देणार नाही. असे विचार ती करीत होती.

दुसऱ्या दिवशी संध्येने विश्वासजवळून एक पाकीट घेतले व आईला लिहिले. विश्वास भाईजींच्या पैशांची वाट पाहात होता. परंतु संध्येच्याच घरून ताबडतोब पैसे आले. संध्येला आनंद झाला. आईची अडचण तिच्या ध्यानात आली. तिला कृतज्ञता वाटली. आईची धन्य आहे, असे ती म्हणाली. तिने विश्वासजवळ पैसे दिले. ते घेऊन विश्वास म्हणाला,

''संध्याताई, कशाला मागितलेस पैसे?''

''तुम्हाला का मी उपाशी ठेवू?''

''किती दिवस तुम्ही आम्हाला पुराल?''

''शक्य तोवर.''

त्यादिवशी होता रविवार. हरिणी दुपारी जरा लौकर आली होती. मोकळेपणे बोलणी झाली. संध्येने सायंकाळची भाजी चिरायला घेतली.

''मी चिरते, संध्याताई!''

''हरिणे, तू बस. नाही तर सरबत कर. तुला आवडतं ना?''

''आवडतं म्हणून का रोज करायचं?''

''रोज नको करू. पण आज कर. विश्वासही घेतील.''

''घेशील का रे विश्वास?''

''तू करशील तर घेईन.''

''आणि बाळ रे कुठं गेला?''

''तो गेला अभ्यास मंडळ चालवायला.''

हरिणीने सरबत केले. सारी प्याली. तिघे बोलत होती.

''संध्याताई, हा विश्वास अगदी रागीट आहे.'' हरिणी म्हणाली.

''तू त्यांना सोशीक बनव, जरा शांत बनव.'' संध्या हसून बोलली.

''संध्याताई, ही हरिणीही तशीच आहे–'' विश्वासने सांगितले.

''तर मग जोडा अगदी अनुरूप आहे तुमचा.'' संध्या म्हणाली.

''संध्या व कल्याण यांच्यासारखा, होय ना?'' हरिणी हसून म्हणाली. सारी हसली.

दुसर दिवशी जेलचे उत्तर आले. ''भेट देऊ. अन्नसत्याग्रह नाही.'' असे पत्र होते. संध्येचा जीव खाली पडला. तिच्या तोंडावर आशा नाचू लागली. उत्साह खेळू लागला. डोळे एकदम हसरे झाले, खेळकर झाले.

''संध्याताई, तुम्ही एकट्या जाणार, का विश्वास बरोबर येणार?''

''मी एकटीच जाईन. उगीच खर्च कशाला वाढवा? तेवढेच पैसे इथं कामाला येतील. वास्तविक मीसुद्धा जाणं योग्य नाही. ते पैसेही इथं या मित्रांसाठी देणे अधिक उचित झालं असतं. परंतु नाही मोह आवरत. जावंसं वाटतं. संध्या वेडी आहे हो.''

''आणि संध्याताई, मीही वेडीच आहे. हा विश्वास मला बोलतो, तरी मी येतेच की नाही?''

''हरणे, कधी गं मी तुला बोललो?''

''कधी रे बोलत नाहीस? आणि चुकलं तर थापट्या मारतोस.'' असे

म्हणून हरिणीनेच विश्वासच्या पाठीत थापट दिली!

''तू चुकतेस म्हणून मी देतो, परंतु तू मला उगीचच्यया उगीचही देतेस. संध्याताई, पाहिलंत ना?''

''खरंच का रे विश्वास थापट मारली? माझ्या नव्हतं लक्षात.''

''मी मारलेली बरी तुझ्या लक्षात राहते.''

''ती गोड असते म्हणून लक्षात राहते, होय ना हरणे?'' संध्या म्हणाली.

''तुम्हाला अनुभव आहे वाटतं? कल्याण मारकुटा आहे वाटतं?'' हरिणीने हसत टोमणा मारला.

''हरणे, तो तालीमबाज होता.'' विश्वास म्हणाला.

''परंतु आता तुरुंगात जाऊन तो अशक्त झाला असेल. नाही रे विश्वास? नाही तर पूर्वी माझा कल्याण कसा दिसे, जसं घवघवीत फुले.'' संध्या म्हणाली.

हरिणी व संध्या दोघी फिरायला गेल्या. विश्वास एकटाच घरी होता. दोघी मैत्रिणी खूप बोलल्या. मनातील सुखदु:खे, आशानिराशा, भावी संसाराचे मनोरे सारे एकमेकींनी एकमेकींना निवेदन केले. हरिणी घरी गेली. संध्या इकडे आली. परंतु ती आली तो विश्वास अंथरुणात पांघरुण घेऊन झोपला होता.

''काय हो विश्वास?''

''ताप आला. चिरमित्र!''

संध्या विश्वासजवळ बसली. तिने त्याचे कपाळ चेपले. त्याच्या अंगावर तिने नीट पांघरुण घातले.

''विश्वास, बराच आला हो ताप.''

''होईल कमी सकाळला.''

''तुम्ही काय खाल?''

''काही नको.''

''साबूदाणा आणू? थोडी खीर करीन.''

''संध्याताई, किती तुम्ही कराल? तुमची आमची ओळखसुद्धा फारशी नव्हती. किती एकदम तुम्ही एकरूप होता! तुमच्या जीवनात परकेपणा नाही. कृत्रिमता नाही. सरळ स्वभाव. आम्ही सध्या राजाप्रमाणं आयतं खात आहोत व तुम्हांला राबवीत आहोत. कुठल्या तुम्ही, कुठले आम्ही!''

''विश्वास, असं नका तुम्ही म्हणू. कल्याणचे मित्र ते सारे माझे. ते मला जवळचेच आहेत. हो. असं तुम्ही मनाला लावून नका घेऊ. दुजाभाव नका मनात आणू. नाही तर मला वाईट वाटेल.''

''आज नकोच काही खायला?''

''मी मंडईत जाते व फळं घेऊन येते. कल्याणसाठीही न्यायचीच आहेत. मी जाऊन येते हं पटकन्.''

संध्या मंडईत गेली व फळांची करंडी घेऊन आली. तिने दिवा लावला. मोसंबे सोलून त्याच्या फोडी तिने विश्वासला दिल्या. रात्री त्याला प्यायला कढत पाणी तिने दिले. बाळ व संध्या दोघेच जेवायची होती.

बाळ एके ठिकाणी सभा होती, ती आटोपून आला. जेवणे झाली.

''विश्वास, तुम्ही बाहेर नका झोपू. मी तुमच्या बहिणीसारखी. वाऱ्यावर नका निजू. आतच झोपा. बाळही आत झोपू देत. आज थंडीही आहे. तुम्ही बाहेर झोपलेत म्हणून तर नाही ना ताप आला? मी रोज सांगन म्हणत असे. परंतु तुमचा संकोच पाहून मलाही संकोच वाटे. संकोच शेवटी संकट आणतो. नकोत हे संकोच, हे कुत्रिम संशय.''

''उद्या तुम्ही जाणार का?'' बाळने विचारले.

''राहू का?''

'' नको. जा भेटीचं पत्र टाकलं आहे. कल्याण वाट पाहील. का आली नाही संध्या असं म्हणेल. आमचं आजारीपण रोजचंच आहे. ते थांबणार आहे थोडंच!''

दुसऱ्या दिवशी संध्या एकटीच जायला निघाली. तिच्याबरोबर स्टेशनवर हरिणी जाणार होती. विश्वास पडून होता. त्याचे तोंड कोमेजून गेले होते. संध्या आपल्याच विचारात गर्क होती. परंतु ती एकदम भानावर आली.

''विश्वास, जाते हां. तुमच्या मित्राला भेटून येते. प्रकृतीला जपा.''

''कल्याणला सांगा की प्रकृतीची काळजी घे. माझ्या तापाचं त्याला सांगू नका.''

टांग्यात बसून हरिणी व संध्या स्टेशनवर आली. बायकांच्या डब्यात सामान ठेवून दोघी मैत्रिणी एका बाकावर बसल्या.

''संध्याताई, तुमचा किती प्रेमळ स्वभाव.''

''आणि हरणे, तू किती चपळ, उत्साही.''

''आपण पुढं एकत्र राहू.''

''राहू हो. परंतु काही ठरवू नये. जे जे होईल ते पाहू.''

''विश्वासला ताप येतो. मला वाईट वाटतं. वाटतं त्याच्याजवळ राहावं. त्याच्या डोक्यावर हात ठेवून बसावं. परंतु हल्ली येते तेसुद्धा दादाला आवडत नाही. मामा म्हणतात की, हरिणीचं लग्न करून दिलं पाहिजे. आई थोडंफार माझं मन ओळखते. परंतु तिलाही हा भिकारी विश्वास पसंत नाही. पूर्वी कॉलेजमध्ये असताना विश्वास तिला पसंत होता. तेव्हा वडील म्हणायचे, हा जोडा छान दिसतो, नाही? परंतु आता वडीलही नाहीत. मामा सारा कारभार पाहतात. दादा जरा द्वेषी व मत्सरी. काय करावं? कसं अभ्यासात मन रमेल? माझा विश्वास किती ध्येयवादी! त्याच्यासाठी काय करू असं होतं. संध्याताई, या तरुणांना पैशाचा पाठिंबा नाही. नाही तर सारा महाराष्ट्र त्यांनी

चेतवला असता. काय करतील बिचारे! मनात जळतात व असे आजारी पडतात. उपासमार, निराशा, कष्ट यांनी हो विश्वासची अशी दशा झाली. कसा दिसे पूर्वी? त्याच्या चेहऱ्यावर दृष्टी ठरत नसे. लाखात उमटून पडे माझा विश्वास. परंतु आज किती मलूल दिसतो! संध्याताई, आपण समदुःखी आहोत. तुमचे वडील नाहीत, माझेही नाहीत. तुमची आईही तुमच्या लग्नाच्या प्रथम थोडी विरुद्धच, तशीच माझीही आई. माझा विश्वास आजारी; तर तिकडे तुमचा कल्याण आजारी. कल्याणला माझा प्रणाम सांगा हो तुम्हाला पाहून तो आनंदेल, तुमच्यावर फार आहे तो त्याचं प्रेम. तुमची पत्रं अंधारात हृदयाशी धरून कल्याण बसायचा.''

अशी बोलणे चालली होती. तो घंटा घणघणली. दोघी मैत्रिणी डब्याजवळ गेल्या. संध्या डब्यात बसली. हरिणी खाली होती. शिट्टी झाली. गाडी सुटली. दोघी मैत्रिणींनी हातरुमालाच्या खुणा केल्या. शेवटी संध्या आत बाकावर बसली व इकडे हरिणी घरी गेली.

संध्या आता कल्याणमय राज्यात रमली. मध्येच एखादे स्टेशन येई व तिची समाधी भंगे. परंतु पुन्हा समाधी लागे. कल्याणजवळ काय काय बोलायचे ते ती ठरवीत होती. मध्येच तिचे तिला हसू येई. असे करता करता मुक्कामाला तर ती आली. परंतु उतरणार कोठे? ती टांगा करून जेलच्या दरवाजाजवळ आली. टांगा निघून गेला. तिने आत अर्ज दिला. सायंकाळी चार वाजता या, असे सांगण्यात आले. संध्या तेथेच एका झाडाखाली बसली. कल्याणचा पत्रसंग्रह ती वाचीत बसली. तोच तिचा आवडता ग्रंथ होता. ती तिची गीता, ती उपनिषदे. सारे काही त्या पत्रात होते. संध्या जेवली नाही. कल्याणला फळे देईन. मग मी जेवीन, असे जणू तिने ठरविले होते.

आणि तो क्षण आला. संध्येच्या नावाचा पुकारा झाला. जेलची ती दिंडी

उघडली गेली. संध्या आत गेली. भेटीच्या जागी आली. तेथे खुर्चीवर कल्याण बसला होता. तो उठला. संध्येने हात पुढे केले. त्याने ते हाती घेतले. संध्या खुर्चीवर बसली. दोघांचे हात काही वेळ हातांत होते. पुढे दूर झाले. कोणी बोलतना. एकमेकांकडे दोघे बघत होती. डोळ्यांनी बोलत होती. तोंडावरील आविर्भावांनी बोलत होती. पुन्हा संध्येचा हात कल्याणने हातात घेतला. कल्याणचा हात कृश झाला होता. कल्याण वाळला होता.

''कल्याण!'' शेवटी वाचा फुटली. संध्येने हाक मारली.

''बरा आहे आता मी. आता झपाट्यानं सुधारेन. काळजी नको करुस. इथले अधिकारी माझ्या परिचयाचे आहेत. या जेलमध्ये मी पूर्वी होतो. त्यामुळं बर आहे. त्रास नाही. तू काळजी नको करू.''

''तू बाहेर कधी येशील?''

''अद्याप चार महिने आहेत.''

''म्हणजे १२० दिवस.''

''सेकंद केलेस तर किती होतील?''

''कल्याण, तुझ्याशिवाय एकेक क्षण म्हणजे युगासारखा वाटतो. किती रे दिवस दूर राहू?''

''परंतु मी तुझ्याजवळ आहे.''

''हे रे कसलं समाधान? अन्नाच्या दुरून दर्शनानं का पुष्टी मिळते?''

''परंतु फोनोचं गाणं जरा दुरूनच मधुर लागतं.''

''फार दूर असू तर ऐकायलाही येणार नाही.''

''संध्ये, आमचं सतीचं वाण आहे.''

''कल्याण, ही फळं तुला देऊ?''

''परवानगी विचारली पाहिजे.''

संध्येने जेलरसाहेबांना विचारले. आजाऱ्यासाठी ठेवा असे तिने विनविले. संमती मिळाली.

''कल्याण, एक मोसंबं माझ्या हातांनी सोलून देऊ?''

''दे.''

संध्या मोसंबे सोलीत होती. बोलणे चालू होते. विश्वास, हरिणी, बाळ, लक्ष्मण सर्वांची माहिती तिने दिली. बाहेरची इतरही हकीकत तिने सांगितली. मोसंबाच्या फोडी कल्याणने मटकावल्या. विश्वासच्या आजारीपणाची हकीकत ऐकून कल्याण सचिंत झाला.

''कल्याण, तू सुटलास म्हणजे लग्न कर. म्हणजे तुमची सर्वांची जेवणाची ददात जाईल. तुझ्या मित्रमंडळाची मी स्वयंपाकीण बनेन.''

''संध्ये, स्वयंपाकाला तरी काही पाहिजे ना? स्वयंपाक शब्दांचा थोडाच होत असतो?''

''कल्याण, हरिणी पास झाली तर नोकरी करणार आहे. मी अशी एखादी परीक्षा दिली असती तर? परंतु मी कोणतीच परीक्षा दिली नाही. संध्या निरुपयोगी आहे.''

''तू प्रेमाची परीक्षा दिली आहेस. ती तर सर्वात कठीण परीक्षा.''

''कल्याण, मी पुण्याला येऊन तिथूनच परत जाणार होते. तुझ्याकडे येण्यात खर्च होणारे पैसे विश्वासला झाले असते; परंतु आईजवळ आणखी मागितले पैसे.''

''आईला सारखी सतावू नकोस.''

''आपल्या प्रेमाच्या माणसांनाच आपण सतावतो. वासराच्या ढुशींनी गाईला का त्रास होतो?''

''तू भलतंच बोलू लागलीस!''

''तुझा गुण का माझ्यात येऊ लागला?''

दोघांनी एकमेकांकडे पाहिले. बोलणे थांबले. संध्येची बोटे कल्याण पाहात होता.

''संध्ये!''

''काय?''

''काही नाही.''

''काही तरी सांगणार होतास तू. सांग. माझ्यापासून लपवून ठेवू नकोस.''

''सुटलो म्हणजे आपण करू हो लग्न. होऊ पती-पत्नी.''

''खरंच?''

''हो, खरंच. परंतु वाटेल त्या स्थितीत राहावं लागेल.''

''मी रे कधी नाही म्हटलं? तुझ्या संगतीत उपवासही मला अमृतपान आहे हो, कल्याण. तुझ्या संगतीत मला सारं गोड आहे, प्रिय आहे. कल्याण जवळ बसला पाहिजे. सारं रमणीयच असेल; नाही का?''

''विश्वासला ही गोष्ट सांग.''

''सांगेन आणि तू प्रकृतीला जप.''

''तू फळं आणली आहेस. तुझ्या भेटीचं टॉनिकही मिळालं आहे. आता मी लौकर बरा होईन. संध्ये, आज तू जेवलीस का?''

''मला तुझी भूक होती. तुला पोटभर खाता यावं म्हणून दुसरं काही मी खाल्लं नाही. आता बाहेर गेल्यावर खाईन.''

''माझ्या हातचं तू घे हे फळ. खा.''

संध्येने ते खाल्ले. दोघे आनंदली. हातात हात घेऊन बसली. वेळ संपली. कल्याण व संध्या उठली. दोघांचे हात एकमेकांच्या हातात होते. ते त्यांनी घट्ट धरले. दोघांचे डोळे भरून आले.

''जाते हं कल्याण. जप; बरा हो. संध्येसाठी तरी जप.''

''होय हो.''

संध्या मागे पाहत पाहत गेली. दरवाजा उघडला. पुन्हा बंद झाला. मनोमन कल्याणला बरोबर घेऊन संध्या बाहेर पडली. संध्या रडली, परंतु हसली. का हसली? कारण ती आनंदवार्ता घेऊन जात होती. कल्याणने अभिवचन दिले होते. तिला नवजीवन मिळाले. तिचा हृद्रोग गेला. आणि इकडे कल्याणचे उदयही हलके झाले. त्याच्या जीवनातही नवीन आशा, नवीन कर्तव्य यांचा हृदय झाला. संध्या गेली. परंतु तिच्यासमोर भविष्य नाचू लागले. भविष्याची भीतीही तिला वाटली. मी अशी बावळट, कसे होईल? मी हरिणीसारखी शिकलेली असते तर? परंतु काय करणार? असो. मी सर्वांची सेवा करीन, सर्वांना प्रेम देईन, त्रासलेल्यांना रिझवीन. संध्येचे हेच काम. दिवसभर कष्ट करून, धावपळ करून दमल्या–भागलेल्या जगावर, त्रस्त संतप्त झालेल्या जगावर शांतीचे मंगल असे अमृतकुंभ भरभरून आणून सिंचणे हेच संध्येचे पवित्र व गंभीर कर्तव्य!

✦✦✦

## १२...
# संध्या नि कल्याण यांचा विवाह

कल्याण तुरुंगातून सुटला. त्याला मुंबईचे तिकीट मिळाले होते. तो सरळ मुंबईला आला. तेथील कार्यकर्त्यांना भेटला. आपण लौकरच विवाह करणार आहोत असे त्याने त्यांना सांगितले. त्या सर्वांनी त्याचे अभिनंदन केले. मुंबईहून तो पुण्याला आला. त्याचा जीवलग मित्र विश्वास तेथे होता. विश्वास आजारी होता. तो अशक्त झाला होता. अंथरुणात पडून होता. त्याच्या डोळ्यातील तेज मात्र अद्याप तसेच होते. कोणी कोणी म्हणत की विश्वासला क्षय होणार; परंतु डॉक्टर धीर देऊन सांगत की, पूर्ण विश्रांती नि पौष्टिक आहार मिळाला, तर प्रकृतीला धोका नाही.

परंतु पौष्टिक आहार कुठून आणायचा? जेथे साधी मीठभाकर मिळण्याची पंचाईत, तेथे कोठला पौष्टिक आहार? कल्याण येऊन विश्वासजवळ बसला. दोघंही मित्र स्तब्ध होते. बोलणार तरी काय?

''विश्वास, तू किती वाळलास?'' शेवटी कल्याण बोलला.

''तू काळजी करू नकोस. तू आता लग्न कर. संध्ये घेऊन ये. मग तिच्या हातचं सुग्रास जेवण मला मिळत जाईल. मी बरा होईन.''



श्री. छ. प्रतापसिंह महाराज ...नरले)
नगर वाचनालय, सातारा.

''आणि बाळ कुठं आहे?''

''त्याचीही प्रकृती बरी नाही. तो हवापालट व्हावा म्हणून एका दूरच्या आप्ताकडे गेला आहे. बाळ म्हणजे रत्न आहे, नाही? परंतु आपल्यांतीलच कांहींना त्याचा मत्सर वाटतो. काय करायचं? जगातून हेवेदावे, हे मत्सर कधीच नाही का दूर करणार?''

''दुसऱ्याच्या गुणांचा गौरव करणं ही गोष्टही तितकीशी सोपी नाही. ज्याप्रमाणं दुसऱ्याजवळच्या संपत्तीचा आपणाला हेवा वाटतो, त्याप्रमाणंच दुसऱ्याजवळच्या थोर दैवी संपत्तीचाही आपणास मत्सर वाटतो.''

''परंतु संपत्ती दुसऱ्याच्या श्रमानं निर्माण झालेली असते. श्रमणाऱ्याला त्यानं स्वतःच निर्मिलेली संपत्ती जर मिळाली नाही, तर त्यानं मनात द्वेष-मत्सर बाळगावा हे साहजिक आहे. आपणच निर्माण केलेल्या संपत्तीतून आपणावरच पिळवणूक व्हावी, जुलूम व्हावा, ही गोष्ट संतापजनक आहे; परंतु सद्गुणसंपत्तीचा मत्सर काय म्हणून वाटावा?''

''तू शांत पडून राहा. हरिणीचा अभ्यास कसा काय आहे? पुन्हा बसणार ना परीक्षेला?''

''बसणार आहे. बाळ इथं असला म्हणजे तिला तो शिकवतो. हरिणी पास झाली म्हणजे बरं होईल.''

विश्वास डोळे मिटून पडून राहिला. कल्याण विचारमग्न होऊन त्या खोलीत फेऱ्या घालीत होता. त्याच्या मनात कोणते विचार खेळत होते? क्षणात तो आपल्या हाताच्या मुठी वळी; क्षणात कोठे तरी बघत उभा राही; खिडकीतून दूरवर पाही; शेवटी तोही अंथरुणावर पडला. दोघे मित्र निद्रामाऊलीच्या कुशीत विश्रांती घेत होते.

सकाळ झाली. वर्तमानपत्रे विकणारी मुले ओरडत होती. बाहेर थंडी

होती. परंतु त्या मुलांना थंडीचा विचार करून कसे चालेल? वर्तमानपत्रे खपतील तेव्हा दोन दिडक्या मिळणार? कल्याण अंथरुणात जागाच होता. त्याने खाली जाऊन ताजा अंक घेतला. तो वर आला नि वाचीत बसला. त्याला एक विशेष बातमी सापडली. त्याने एकदम विश्वासला हाक मारली.

''विश्वास, अरे उद्या पुण्यात एक जंगी मिरवणूक निघायची आहे. शस्त्रास्त्रबंदी उठवावी म्हणून मिरवणूक. आणि सर्व पक्षांचे लोक तीत सामील होणार आहेत.''

''काँग्रेसचेही? त्यांचं तर अहिंसा-व्रत आहे ना?''

''विश्वास, महात्माजींनी १९३० साली सरकारकडे अकरा मागण्या केल्या होत्या. त्यातील एक शस्त्रास्त्रं वापरण्यास परवानगी असणं ही होती. तू विसरलास वाटतं? अहिंसा-तत्त्व महात्मांजींचा जीवन-सिद्धान्त आहे. परंतु त्यांची अहिंसा दुबळेपणा शिकवीत नाही. हाती शस्त्र असूनही आम्ही अहिंसक राहू असं हिंदी राष्ट्रानं जगाला शिकवावं असं त्याना वाटतं आणि त्यांनीही एकदा नव्हतं का लिहिलं, की मी जरी अहिंसा शिकवीत असलो, तरी उद्या स्वतंत्र हिंदुस्थानात सैन्य राहाणारच. हिंदुस्थाननं आपण होऊन स्वेच्छेनं शस्त्रसंन्यास केला आहे असं दृश्य चार-पाच हजार वर्षांपर्यंत तरी दिसेल की नाही कुणाला ठाऊक? काँग्रेस जनतेच्या आत्म्याला खच्ची करू इच्छित नाही. म्हणून काही काँग्रेसचे लोकही निदान अनधिकृतरित्या उद्याच्या मिरवणुकीत सामील झाले, तर त्यात शिस्तीविरुद्ध असं काही नाही. स्वत: महर्षि सेनापती बापट हाती तिरंगी झेंडा घेऊन मिरवणुकीत भाग घेणार आहेत. संघवाले भगवा झेंडा घेऊन येणार आहेत. विश्वास, आपण लाल बावटा घेऊन जावं.''

''कल्याण, ही मिरवणूक शांतपणे पार पडेल असं मला वाटत नाही.''

''का बरं? मिरवणुकीत आपापल्या झेंड्याचे कोणी जयजयकार करायचे नाहीत असं ठरल्याचं इथं लिहिलेलं आहे. निश्चित अशा घोषणांचाच घोष करण्यात येणार आणि सेनापतींसारखी थोर विभूती तिथे असल्यावर वेडंवाकडं वर्तन कोण करील?''

''तू काही म्हण, मला तर दंग्याची भीती वाटते.''

''विश्वास, या मिरवणुकीत भाग घेण्यासाठी मीही उद्या इथं राहीन म्हणतो. लाल झेंड्याखाली मी उभा राहीन.''

''नको. तू इथं राहू नको. तू घरी जा. संध्याराणी वाट बघत असेल. उद्या मारामारी होईल. तुझ्यानं स्वस्थ राहावणार नाही. तूही घुसशील. बरं-वाईट झालं तर?''

''मारामारी होणार असेल तर मी राहिलंच पाहिजे. कातडी वाचवून काय होणार? जखमी नवरदेव संध्येला अधिकच आवडेल.''

विश्वासने कितीही सांगितले तरी कल्याण गेला नाही. तो राहिला आणि दुसऱ्या दिवशी त्या मिरवणुकीत तो सामील झाला. ते पाहा, तीन प्रकारचे झेंडे! तो पाहा भगवा झेंडा, तो पाहा लाल झेंडा आणि तो सर्वांचे ऐक्य करू पाहणारा थोर तिरंगी झेंडा! तपस्वी सेनापतीच्या हातात नवभारताची ती दिव्य पताका होती. चरख्याचे चिन्ह असलेली नव-राष्ट्रध्वजा! त्या तिरंगी झेंड्याने दरिद्री जनतेला हृदयाशी धरले आहे, असा नाही का त्या खुणेचा अर्थ?

शांतपणे मिरवणूक चालली. परंतु लकडी पुलाजवळ काही तरी भानगड झाली. भगव्या झेंड्याचा म्हणे कोणी तरी जयजयकार केला! मग इतर झेंड्यांचेही सुरू झाले. ''फाडा तो तिरंगी झेंडा'' कोणी गर्जले. मारामारी सुरू झाली. सेनापतींच्या हातातील तिरंगी झेंडा एका शूर मुलीच्या हातात होता. तिच्या

हातातून तो झेंडा हिसकवून घेऊ लागले. परंतु ती कोमल मुलगी वज्राच्या निश्चयाची होती. तिची सुकुमार मूठ जणू पोलादी होती. त्या निर्भय मुलीवर हल्ला झाला. ती भारतकन्या मूर्च्छित पडली. तेथे सेनापती धावून आले आणि त्यांच्यावरही घाव पडले! महाराष्ट्राच्या शौर्यधैर्याची, त्यागतपस्येची ती पवित्र मूर्ती! राष्ट्रात ऐक्य व्हावे म्हणून तळमळणारी ती वंदनीय विभूती! त्या पवित्र शरीरावर का प्रहार व्हावा?

मिरवणूक मोडली. सेनापतींना उचलून नेण्यात आले. त्या शूर मुलीला उचलून नेण्यात आले आणि कल्याण कोठे आहे? तो पाहा रक्तबंबाळ कल्याण! आपले रक्त पुशीत तो जात आहे. त्याच्या कपाळावर जोराचा तडाखा बसला होता. महाराष्ट्राच्या पुण्य मूर्तीला वाचविण्यासाठी तोही धावून गेला होता. अभिमन्यूप्रमाणे त्या गर्दीत घुसून तो घाव झेलीत होता.

कल्याणची जखम बांधण्यात आली. तो शांतपणे पडून होता. परंतु त्याचे डोके अशांत होते. विचारांचे वादळ डोक्यात उठले होते. तो अस्वस्थ झाला होता. महर्षींच्या पुण्यपावन देहावरही घाव घातले जावेत, याची त्याला चीड आली होती. परंतु हल्ला करणाऱ्यांची शेवटी. तो कींव करू लागला. त्यांच्या अज्ञानाचे, संकुचितपणाचे त्याला वाईट वाटले. तो शेवटी विश्वासला म्हणाला,

''विश्वास, सेनापतीसारख्यांवर हल्ला करणाऱ्या तरुणांची वृत्तीच मी समजू शकत नाही. अशा पुण्यात्म्यावर हल्ला करणारे त्यांना माणसं म्हणू की माकडं? आपल्या देशातील तरुणांत ही फॅसिस्टी वृत्तीच बळकावणार का? उगीच मारामारी मरणं, कारण नसता कुरापत काढून दंगल माजवणं, मध्येच का काही तरुणांना पुरुषार्थ वाटणार? उदार भावनांचे तरुण अशा संकुचित संघटनांत शिरून माणुसकीला का पारखे होणार? की यांच्यातही पुढं विवेक

येईल, मोठी नवयुग–दृष्टी येईल?''

''कल्याण, तू शांत पडून राहा.''

''कसा शांत पडून राहू? माझं डोकं भणाणलं आहे. या फॅसिस्ट संघटनांना कसा आळा घालता येईल याचा मी विचार करीत आहे. आपण शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या नि त्यांच्याविषयी सहानुभूती असणाऱ्या पांढरपेशी तरुणांच्या प्रचंड संघटना ठायी ठायी उभ्या केल्या पाहिजेत. सारं श्रमजीवी जग उठवलं पाहिजे. कोट्यवधी किसान कामगार कवायती करू लागले की जुनाट संस्कृतीच्या क्षुद्र गप्पा मारणाऱ्या या भांडवलशाही स्वरुपाच्या संघटना निस्तेज होतील.''

''अरे कल्याण, हे संघवालेही समाजवादाच्या गप्पा मारू लागले आहेत. म्हणतात, आम्ही हिंदूसमाजवाद स्थापू. यांना समाजवाद कशाशी खातात ते तरी कळतं का? हिंदू जमीनदार, सावकार, इनामदार यांची पदोपदी तरफदारी करणाऱ्यांनी समाजवादाच्या गप्पा मारणं हास्यास्पद आहे. सारे भांडवलदार शेवटी एक होत असतात. सारे श्रमणारे शेवटी एक होतात. परंतु ही गोष्ट यांना केव्हा कळणार? कोकणातील हिंदू व मुसलमान खोत एक होतात नि कुळांना नाडतात आणि पुन्हा तेच हिंदू खोत हिंदुमहासभेतही असणार! सारा चावटपणा आहे.''

''परंतु बहुजन समाजाला समजेल तेव्हा. धर्माच्या नावानं अडाणी जनतेच्या भावना भडकवता येतात. परंतु एक दिवस असा येईल की, ज्या दिवशी त्यांना हा सारा ढोंगीपणा कळेल. विश्वास, आपलं काम आहे त्यांना सारं समजावून द्यायचं. आपण सर्वत्र गेलं पाहिजे. नव–विचारांची संघटना बांधली पाहिजे. किसान कामगार यांची पथकं ठायी ठायी उभारली पाहिजेत.''

''तू म्हणतोस ते खरं. परंतु हे सारं व्हायचं कसं? आपल्या मनात

किती तरी कल्पना येतात, योजना येतात. परंतु जवळ दीडकी नाही. कसा करायचा प्रचार? भाईजी नि मी सर्व महाराष्ट्रभर हिंडणार होतो. परंतु मनातील विचार मनातच राहिले. संघटनेसाठी पैसा हवा.''

''विश्वास, जेवढं होईल तेवढं आपण करू. मनातील सारं कोणाला साधलं आहे? पैसा–पैसा असं म्हणत का रडत बसायचं? निराश होऊन का कोपऱ्यात पडून राहायचं?''

''कल्याण, असली बेगडी भ्रामक समाधानवृत्ती माझ्याजवळ नाही. होईल तेवढं म्हणे करा. मला नाही ही मिळमिळीत वृत्ती आवडत. आपण त्यागी नि ध्येयवादी म्हणून मिरवितो. परंतु हातून तर काहीही होत नाही. हा कर्मशून्य ध्येयवाद काय कामाचा? ध्येयाची पूजा करीत असं इथं माशा मारीत पडून राहायचं. कोपऱ्यात उपाशी पडून ध्येयवादाच्या चर्चा चालवायच्या. यापेक्षा कुठं नोकरी मिळाली तर करावी. पोटभर खावं–प्यावं. काहीही न करता आपण काही तरी करीत आहोत असं भ्रमजाल तरी स्वत:भोवती निर्मू नये. आत्मवंचना तरी नको. लोक आपणांपासून प्रत्यक्ष कार्याची अपेक्षा करतात. ती अपेक्षा आपण कधी कशी पुरी करणार? कित्येक दिवस झाले, मी घरातून बाहेर पडलो नाही. एक तर आजारी आहे; परंतु बाहेर पडावं असं वाटतच नाही; कारण कोणी ओळखीचे भेटले तर लगेच विचारतात, 'काय चाललं आहे संध्या काम?' त्यांना काय द्यायचं उत्तर? मागं आपण हवेली तालुक्यात हिंडलो. अनेक तरुणांच्या ओळखी करून घेतल्या; परंतु त्या ओळखी टिकवण्यासाठी तिकडे जाता येत नाही, पत्रही पाठवता येत नाही. आपल्याजवळ दीडकीही नाही. ना काढता येत पत्रक, ना लिहिता येत कोणाला पत्र. फुकट सारं जीवन. हा निरर्थक त्याग आहे. नाही धड ध्येयपूजा, नाही सांसारिक सुखोपभोग.''

''विश्वास, ध्येयाला मिठी मारून कोपऱ्यात उपाशी मरणं हेही महान

कार्य आहे. पुढल्या पिढीला हे तुमचं मरण स्फूर्ती देईल. तू असा निराश नको होऊ. क्रांतिकारकांच्या चरित्रातून किती निराशा, किती विपत्ती आपण पाहतो. मनस्ताप करून नको घेऊ. आपली जीवनं फुकट नाही जाणार. मनात खेळवलेले विचारही सभोवतालच्या वातावरणात जात असतात. या जगात काहीही फुकट जात नसतं.''

दोघे मित्र शांत होते. सायंकाळ होत आली. कल्याण बाहेर गेला. त्यानं बाजारातून ब्रेड आणला. दोघां मित्रांनी तो खाल्ला. विश्वासला थोडा ताप आला होता. त्याचे डोके थोपटीत कल्याण बसला होता. त्याला संध्येची का आठवण येत होती? थोड्या वेळाने तो जाणार होता.

''विश्वास, तुला ताप आला आहे. परंतु मला जायला हवं. संध्या वाट बघत असेल.''

''तू जा. ताप उद्या उतरेल. संध्येला घेऊन ये. तुम्हाला लग्नभेट म्हणून तरी काय देऊ? कल्याण, विश्वासजवळ काय आहे?''

''आणि संध्येला द्यायला माझ्याजवळ तरी काय आहे? मनातील प्रेम हीच आपली तिला भेट.''

''आणि आपण आपली ध्येयं तिला देऊ. गरिबांबद्दलची आपली तळमळ तिला देऊ. खरं ना?''

कल्याण जायला निघाला. समोरच्या माडीत गाणे चालले होते. आनंद होता आणि येथे अपार दु:ख होते. विश्वासजवळ कल्याण उभा होता.

''येतो!'' तो बोलला.

''संध्येला घेऊन ये.'' विश्वास म्हणाला.

मित्राच्या अंगावर चादर घालून कल्याण निघून गेला. स्टेशनवर येऊन तो आगगाडीत बसला. गाडी सुरू झाली. केव्हा सुरू झाली ते त्याला कळलेही

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय सातारा
दाखल नं. 19011 ग्रंथानुक्रमांक 95604
किंमत 240/- पाने 354

नाही. तो आपल्याच विचारांत दंग होता.

कल्याण घरी आला. त्याची आई वाटेकडे डोळे लावूनच होती. तिला आनंद झाला. परंतु पूर्वी गोटीसारखा गुटगुटीत असणारा कल्याण कृश झाला होता. मातेच्या डोळ्यांतून पाणी आल्यावाचून राहिले नाही. तिने त्याला जवळ घेतले. त्याच्या डोक्यावरून तिने हात फिरविला. वात्सल्यपूर्ण हात!

''डोक्याला रे काय लागलं? तुरुंगात का मारलं?''

''नाही, आई. पाय घसरून पडलो. जरा लागलं होतं, आता बरं आहे.''

''आणि किती वाळलास?''

''आई, कोट्यवधी भावंडं माझ्याहूनही वाळलेली आहेत. तिकडे कोकणातील गरीब शेतकरी पावसात उगवणाऱ्या तेऱ्याची भाजी खाऊन जगतात. तुझ्या कल्याणची तितकी वाईट दशा नाही म्हणून सुख मान.''

कल्याण घरी आला, परंतु त्याच्या चेहऱ्यावर कधी आनंद दिसला नाही. तो संध्येकडेही गेला नाही. तो वर खिडकीत बसून राही. शून्य दृष्टीने समोरच्या भीमा नदीच्या प्रवाहाकडे पाहात बसे.

''कल्याण, सारखा विचार तरी कसला करतोस? वरती एकटा बसतोस, काय आहे तुझ्या मनात?कोणतं आहे दुःख?'' एके दिवशी आईने विचारले.

''माझ्या मनात लग्न करायचे विचार येत असतात. मी संध्येशी लग्न लावणार. तुला नि बाबांना आहे का पसंत? का तिकडे पुण्याला जाऊन लग्न लावू?''

''अरे, आम्ही कधी नाही का म्हटलं?''

''बाबांना तू सांगशील?''

''तूच त्यांना सारं सांग. त्या दिवशीच्या त्या प्रसंगापासून ते घरात एकही शब्द बोलत नाहीत. जणू जन्माचे मुके, मला वाईट वाटतं.''



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

''मी काढू बाबांजवळ गोष्ट?''

''काढ. तुझं सारं काही ते एकतील.''

कल्याणने पित्याजवळ गोष्ट काढली. मुका बनलेला पिता त्या दिवशी बोलला.

''चांगलं आहे बाळ. तुझी आज्ञा होईल त्याप्रमाणं मी वागेन. आपल्या कुळाचाराप्रमाणं विरुपाक्षाच्या देवळात लग्न लावायला हवं. विरुपाक्षाचं मंदिर काही फार लांब नाही. गाड्या करून आपण जाऊ.''

वडिलांचा रुकार घेऊन कल्याण एके दिवशी संध्येकडे आला. सर्वांनाच आनंद झाला. अनु आणि शरद ''ताईचे ते आले, ताईचे ते आले''करीत नाचू लागली.

''संध्ये, बसायला घाल!'' आई प्रसन्नपणाने म्हणाली. संध्येने सुंदर चटई पसरली. संध्या उभी होती. आई तेथे बसली.

''संध्ये, तूही बस ना.'' कल्याण म्हणाला.

''मी बाहेर जाऊन येते. जरा काम आहे.''

''लवकर ये.'' आई म्हणाली.

संध्या गेली. कल्याण नि आई तेथें होती. शेवटी आई म्हणाली,

''तुम्हाला तुरुंगात भेटल्यावर संध्या घरी आली. तुम्ही लग्न करणार म्हणून तिनं सांगितलं. तुमची संमती ऐकून माझा जीव खाली पडला. आईच्या हृदयाची तुम्ही कल्पना करू शकाल.''

''तिला संमत्ती दिल्यावर माझही हृदय हलकं झालं. आई आता विधी केव्हा उरकायचा? विरुपाक्षाच्या मंदिरात जाऊन लग्न लावायचं असा आमचा कुळाचार आहे. बाबांसाठी तसं करायचं मी ठरवलं आहे.''

''तुम्ही ठरवाल ते सारं मला मान्य आहे. संध्येचा सुखाचा संसार

एकदा सुरू होवो, म्हणजे झालं.''

''आपण गाड्या करून जाऊ. तुमच्या नि आमच्या गाड्या त्या आमराईजवळ भेटतील. तिथून एकत्र पुढं जाऊ.''

''आई, लग्नाच्या आधीच यांची मिरवणूक!''

''लग्नाच्या आधीच वरात!''

''पण नळे–चंद्रज्योती कुठल्या?''

''आकाशातील चंद्र नि झाडांवरचे काजवे.''

''अनु, शरद तुम्ही बाहेर जा खेळायला. असं काही तरी बोलू नये. पाहुण्यासमोर बडबड का करावी?''

''आई, हे का पाहुणे? हे तर ताईचे--''

''नवरे!''

''जाता की नाही बाहेर!''

शरद नि अनु बाहेर गेली. टाळ्या वाजवीत, हसत हसत गेली. आई जरा गंभीर होऊन बसली होती. परंतु पुन्हा म्हणाली,

''होय, लौकरच उरकून घेऊ.'' कल्याण म्हणाला. इतक्यात संध्या आली. ती फुले घेऊन आली होती.

''फुलं कशाला?'' कल्याणने विचारले.

''तुला आवडतात ना?

''मला वाटलं. आजच माळ घालते की काय?''

''माळ तर कधीच घातली होती. विसरलास वाटतं?''

''परंतु त्या वेळी तुला का काही कल्पना होती?''

''देवाला माहीत; परंतु भविष्यकाळच्या छाया आधी पडतात ना?''

''संध्ये, मला भूक लागली आहे.''

''काय करू. सांग!''

''थालीपीठ लाव.''

संध्या घरात गेली. थालीपीठ तयार झाले. कल्याणने कढत कढत खाल्ले.

''इतकं थालीपीठ खाऊन जेवाल काय?'' आई हसून म्हणाली.

''आई, कल्याणची भूक न शमणारी आहे.''

''मी जेवायला राहात नाही, मी आताच जाणार आहे.''

''कल्याण राहिला, दुपारची जेवणे झाली. संध्या नि कल्याण विहिरीवर गेली होती. सभोवती केळी होत्या. जवळच विशाल आम्रवृक्ष होता. त्यावर कोकिळा कुहू करीत होती.

''संध्ये, ठरलं ना एकदाचं?''

''हो.''

''तुझा कल्याण गरीब आहे. साधं लग्न.''

''तुझं श्रीमंत जीवन मला मिळणार. आणखी काय हवं? तुझं प्रेम पृथ्वीमोलाचं आहे. कल्याण, संध्या संपत्तीची पुजारीण नाही आणि लग्न लागल्यावर बरोबर लगेच मला ने. मी आता तुझ्याशिवाय राहणार नाही. तुझ्याशिवाय मी जगू शकणार नाही. सुखात वा दुःखात आता एकत्र राहू.''

''होय हो, संध्ये.''

''तू मला लग्नात काय देणार?''

''काय देऊ तुला सुंदर? लुगडी घ्यायलाही माझ्याजवळ पैसे नाहीत. कुठून आणू कुडी, कुठून आणू अंगठी, कुठून आणू गळ्यात घालायला साज, हातात घालायला सोन्याच्या बांगड्या?''

''कल्याण, मी सहज विचारलं. तुझं प्रेम दे. तुझ्या प्रेम समुद्रात मी

डुबत राहीन, कधी बुडी मारीन, कधी लाटांशी खेळेन.''

''संध्ये, तुला द्यायला एक पुस्तक मी आणलं आहे.''

''कोणतं रे!''

''जगातील क्रांतिकारक स्त्रिया.''

''मी ते वाचीन. कल्याण, मी होईन का रे क्रांतिकारक? तुला शोभेशी मी होईन का? मी तुला धीर देईन, प्रेम देईन. मी स्वत: क्रातिकारक झाले, तरी तुझ्या क्रांतीच्या आड तरी येणार नाही.''

संध्या जरा खिन्न झाली. परंतु पुन्हा प्रेमळपणा तोंडावर फुलला. कल्याणच्या केसावरून तिने हात फिरवला. दोघांनी एकमेकांकडे पाहिले. संपूर्णपणे पाहिले.

''डोक्याला रे काय लागलं, राजा?''

''तो एक दु:खद इतिहास आहे.''

''सांग मला.''

कल्याणने पुण्याची ती हकिकत सांगितली. थोडा वेळ थांबून तो म्हणाला, ''संध्ये, ती मुलगी मूर्च्छित पडली तरी तिनं झेंडा सोडला नाही. तू असं दाखवशील शौर्य–धैर्य?''

''तिच्या हातात कोणता झेंडा होता?''

''तिरंगी. परंतु आपला आहे लाल.''

''तुम्ही का तिरंगी झेंडा मानीत नाही?''

''आधी लाल मानतो. मग तिरंगी.''

''परंतु आधी स्वदेशाचा नको का मानायला?''

''संध्ये, श्रमणाऱ्याला स्वदेश नसतो. पुढं तुला सारं समजेल.''

''कल्याण, झेंडा हाती घेऊन निर्भयपणं लाठीमारांत वा गोळीबारांत संध्या उभी राहील की नाही ते काय सांगू? परंतु अशा धुमश्चक्रीत घुसणारा झुंझार वीर मला जीवनाचा सोबती मिळणार आहे, यातच मला कृतार्थता वाटत आहे.

संध्येने हळूवारपणाने त्या जखमेवरून हात फिरवला. थोड्या वेळाने दोघे वर गेली. कल्याण निरोप घेऊन आपल्या सुपाणी गावी निघून गेला.

एके दिवशी लग्नाच्या गाड्या निघाल्या. आमराईजवळ एकत्र होऊन निघाल्या. परंतु वाटेत मुसळधार पाऊस सुरू झाला. काही गाड्या पुढे गेल्या. काही मागे राहिल्या. नवरीची नि नवरदेवाची गाडी पुढे गेली. त्या गाड्यांचे बैल चांगले होते.

विरुपाक्षाच्या मंदिराजवळ गाड्या आल्या; तो त्या देवळात दुसरे एक लग्न उतरले होते. आता काय करायचे?

''इथं उतरायचा आमचा पूर्वापार हक्क आहे.'' कल्याणचे वडील म्हणाले.

''तुम्ही येणार हे आम्हाला काय माहीत? आणि या पावसातून आम्ही जाणार तरी कुठं?'' ते उतरलेलें वऱ्हाड म्हणाले.

भांडण होणार की काय? परंतु गावचा पाटील आला.

''-- आम्ही उद्या दुपारी इथून परतही जाऊ.'' कल्याणचे वडील म्हणाले.

''ठीक; तुम्ही गावात चला, मी रात्रीपुरती जागा देतो. उद्या तिसऱ्या प्रहरी तुम्ही इथं या. लग्नात विघ्न नको.'' पाटील देवळातील मंडळीला म्हणाला.

शेवटी ती मंडळी गावांत गेली. कल्याण, संध्या, रंगा सारी देवळात बसली. त्यांना भुका लागल्या होत्या. परंतु फराळाचे ज्या गाडीत होते, ती अद्याप आलीच नव्हती. राहून राहून पाऊस येतच होता. लग्नाला का हे

विघ्न? हे लग्न पुढे का सुखावह होणार नव्हते? हे लग्न वधू-वरांना पुढे का रडवणार होते? का असा अकस्मात पाऊस आला? परंतु हे पावसाचे दिवसच आता नाहीत का? आणि या विराट विश्वातील नाना शक्ती तुमच्या लहान संसाराची का पदोपदी क्षिती करीत बसणार? आपण सदैव आशा राखून जावे. चांगली दृष्टी घ्यावी. हा पाऊस आला म्हणून का विघ्न मानायचे? उलट हे शुभचिन्ह का समजू नये? तो पाऊस अपशकुनी नव्हता. तप्त पृथ्वीला शांतवायला तो भरभरून येत होता. पृथ्वी आज शांत होत होती. प्रसन्न होत होती. तिच्या अंगावर रोमांच थरारत होते. पृथ्वीचा संसार हिरवा हिरवा होणार होता. सुकलेले झरे वाहू लागणार होते. सर्वत्र चैतन्यकळा फुलणार होती. नद्या नाचू लागणार होत्या. पर्वत हिरवे पोषाख चढवणार होते. मौज, आनंद. तो पाऊस घाण वाहून नेणारा होता. नवसौंदर्य निर्मिणारा होता, पाऊस! पाऊस म्हणजे सृष्टीचे महाकाव्य आहे. तो पाऊस संध्येला सांगत होता. ''संध्ये, तुझा संसार कधी रुक्ष होणार नाही. सदैव टवटवीत राहील. सुख फुलेल, प्रसन्नता पिकेल. इतके दिवस तुझे जीवन रुक्ष होते; ओसाड होते. आता नंदनवन फुलेल. तुझ्या हृदयातील भावनांचे झरे खळखळ वाहू लागतील; आनंदमय करतील.''

कल्याण नि संध्या तेथे देवळाबाहेर उभी होती. पाऊस जरा थांबला होता. परंतु पुन्हा जोराने येणार अशी चिन्हे दिसत होती.

''संध्ये, आकाश बघ मेघांनी भरलेलंच आहे.''

''आणि माझं हृदयही भरून आलं आहे. प्रेमाच्या शत मेघांनी ओथंबून आलं आहे. कल्याण, आजचा दिवस किती आनंदाचा, किती धन्यतेचा! किती वर्षांनी प्रेमाचा अपरंपार पावसाळा आज लाभत आहे. कल्याण, पुन्हा जोरानं येणार का रे पाऊस? आपल्या लग्नाला मेघांची वाद्यं, आकाशातील विद्युतदीप, पर्जन्यवृष्टीची फुलं, वाऱ्यांची मंगलाष्टकं! सारी सृष्टी आपल्या लग्नाला साथ देत आहे.''

''संध्ये, किती सुंदर तू बोलतेस?''

''तुझं प्रेम मला बोलवीत आहे. स्त्रियांना त्यांच्या भावना बोलायला शिकवतात. ध्रुवाच्या गालाला भगवान विष्णूंनी स्पर्श करताच तो लहान बाळ वेद बोलू लागला. कल्याण, तुझ्या प्रेमाचा असर स्पर्श संध्येच्या हृदयाला होताच त्यातून का बरं काव्य बाहेर पडणार नाही?''

''तू काव्य बोल,परंतु माझ्या पोटात तर कावळे ओरडत आहेत.''

''तुला भूक लागली आहे, परंतु माझी भूक तर हरपली आहे.''

''मला काही तरी खायला दे.''

''हा हात घे, ही बोटं खा. चुंफ.''

''दे तुझा हात. प्रेमानं भरभरेला. पिऊ दे पोटभर प्रेम.'' असे म्हणून कल्याणने तिचे हात आपल्या तोंडाशी नेले.

त्याने त्या हातांचे चुंबन घेतले. ती बोटे त्याने हळूच चुंफिली, हळूच चावली.

''पुरे, अजीर्ण होईल.'' संध्या म्हणाली.

इतक्यात ''गाड्या आल्या, गाड्या आल्या'' अशा आनंदाच्या हाका कानी पडल्या. रंगा हातात कंदिल घेऊन पुढे झाला. गाड्या वाटेत एके ठिकाणी चिखलात रुतल्या होत्या, म्हणून उशीर लागला. सर्वांचे आता फराळ सुरू झाले.

''आई, कल्याणला आणखी वाढ. त्याला फार भूक लागली आहे.'' संध्या म्हणाली.

''एव्हापासून काळजी घ्यायला लागलीस वाटतं?'' कोणी हसून म्हणाले.

''काळजी किती वर्षापासून घेत आहे. देवाला माहीत.''संध्या म्हणाली.

''मलाही माहीत आहे.'' कल्याण म्हणाला.

''तूच माझा देव. दुसरा देव कुठून आणू?'' ती म्हणाली. फराळ झाले. शरद, अनु झोपली. गाडीवानही फराळ करून झोपले. हळूहळू सारीच मंडळी घोरू लागली. पाऊस झिमझिम पडत होता. परंतु नंतर जोरानेच सुरू झाला. बैल बाहेर पावसातच थरथरत उभे होते. कोठे बांधणार त्यांना? कल्याण मंदिराच्या पायरीवर बाहेर उभा होता. एकटाच उभा होता. मध्येच कडाड कडाड होई आणि ती पाहा हळूच उठून संध्या आली. तिने कल्याणचे डोळे धरले.

''संध्ये, डोळे झाकतेस कशाला? डोळे उघडे ठेवूनच आता संसार करायचा आहे.''

''पुष्कळ वेळा डोळे मिटूनच अधिक चांगलं पाहता येतं. योगी लोक डोळे मिटून पाहतात.''

''खरं आहे, संध्ये, मनुष्य बाहेरचे डोळे मिटतो, परंतु विचाराचे आतले डोळे उघडतो. हा कल्याण बहिर्दृष्टी न होता अंतर्दृष्टी व्हावा अशी का संध्येची इच्छा आहे? ती इच्छा पुरी होईल. समाजरचनेतील विषमतेच्या मुळाशी हा कल्याण आपली दृष्टी पोचवील. केवळ वरवर पाहणारा थातुरमातूर करणारा मी होणार नाही. तात्पुरती मलमपट्टी करीत मी बसणार नाही. संध्ये, समजलीस ना? परंतु तू आता आत जा; झोप. इथं बाहेर सारं कसं गारगार आहे. तुला बाधेल.''

''तुला बाधत नाही, मग मला काय म्हणून बाधेल? कल्याण,चल, आपण पावसात नाचू. लग्नाच्या आधीच रासन्हाणं. देवाघरचं भरपूर पाणी. विश्वातील संगीत. गंमत. घेतोस?''

इतक्यात कानठळ्या बसवणारा कडाड आवाज झाला आणि समोरच्या झाडावर विजेचा लखलखीत गोळा पडला. झक झाले. संध्येने कल्याणला मिठी मारली; ते झाड देवळावरच पडायचे; परंतु नशीब, नाही तर केवढा



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)

उत्पात तेथे झाला असता! सारी मंडळी जागी झाली. आता कोणालाच झोप येईना. देवाने सर्वांची झोप उडवली.

''विरुपाक्षाची कृपा म्हणून वाचलो.''संध्येची आई म्हणाली.

''वधूवरांचं प्रभू असंच सदैव संकटात रक्षण करो.''कल्याणचे वडील म्हणाले.

''पुढं का यांच्या आयुष्यात अशीच वादळं येणार आहेत? परंतु आली तरी त्यातून निभावून जातील, असं का देवाला सुचवायचं आहे?'' आणखी कोणी म्हणाला.

आता उजाडले. सुंदर प्रकाश पसरला होता. रमणीय देखावा. सारी सृष्टी न्हाऊन माखून विश्वंभराच्या पूजेला जणू उभी होती आणि प्रेमळ रंगा काय करीत आहे? त्या पडलेल्या झाडांचे पल्लव त्यांने सर्वत्र लावले. आसपासची फुले आणून मधून गुंफविली. हिरवी सुंदर वनशोभा! आणि लग्नसमारंभ सुरू झाला. संध्या नि कल्याण यांना फुलांच्या सुंदर मुंडावळ्या बांधण्यात आल्या होत्या. किती गोड दिसत होती संध्या! सारे विधी झाले. एकमेकांचे हात एकमेकांच्या हातात देण्यात आले. सर्वांनी मंगल आशीर्वाद दिले. दुपारी गोड जेवणे झाली. मंदिर स्वच्छ सारवून मंडळी परत निघाली. गाड्या जुंपण्यात आल्या. संध्या नि कल्याण आता एका गाडीत होती. तिसरा फक्त गाडीवान. संसारयात्रा सुरू झाली. संध्येचा हात कल्याणच्या हातात होता. दोघे मुकी होती. मधून मधून मंदमधुर हसत व एकमेकांना बघत आता संध्याकाळ झाली. आकाशात अनंत रंग पसरले आणि संध्येच्या मुखमंडलावरही रंगसागर उचंबळला होता. कल्याणचे नेत्रमत्स्य त्यात नाचत होते. तो मध्येच आकाशाकडे पाही. मध्येच संध्येकडे पाही. तो पुढील चरण गुणगुणू लागला:

''येताच सूर्य धार्मी। रंगे खुले प्रीतीची
किती गोड गोड रंग। प्रीती फुले मनींची।।
अनुराग अंतरींचा। प्रकटे सहस्त्र रंगी
सूर्यास न्हाण घाली। निज-भावना तिरंगी।।
किती गोड गोड दृश्य। किती गोड गोड चित्र
शतवार पाहुनीही। होती न तृप्त नेत्र।।''

कल्याण म्हणत होता. आणि तिकडे संध्येचे तोंड अधिकच सुंदर नि सुकुमार दिसत होते. प्रेमाची लावण्यमयी कोवळी प्रभा तेथे पसरली होती. कल्याणचे लक्ष आकाशातील संध्येकडून गाडीतील जवळच्या संध्येकडे एकदम आले. ती अति गोड हसली. तिचे ते स्वच्छ शुभ्र दात मोत्यांप्रमाणे झळकले आणि आईने दिलेली टपोऱ्या मोत्यांची ती सुंदर कुडी! संध्येच्या कानात ती शोभत होती. पाठीमागे काळेभोर केस रेशमाप्रमाणे मऊ शोभत होते.

''कल्याण, तू ते चरण म्हणत होतास. किती गोड आहे त्यातील भाव, नाही? थकून भागून आलेल्या सूर्यनाथाला आपल्या हृदयातील भावनांच्या लाटांनी पश्चिम दिशा स्नान घालीत आहे! सुरेख कल्पना!''

''संध्ये, मनुष्याच्या हृदयसिंधूवरील लाटा तोंडावर उठतात, नाही?''

''परंतु काही माणसं त्या लाटा आतल्या आतच दाबतात.''

''संध्ये, माझा आनंद मी का लपवला आहे? जगासमोर आपलं सुख वा दु:ख याचं सारखं प्रदर्शन करू नये, एवढंच मला वाटतं.''

''परंतु इथं तर तुझं-माझंच जग आहे. मी का परकी आहे?''

''परंतु तुझ्यापासून मी काय लपवलं? माझा हा हात तुझ्या हातात आहे. माझी नाडी तुझ्या हातात आहे. माझी बोटं तुझ्याशी का बोलत नाहीत?

ती का मुकी आहेत? माझ्या ह्या थरथरणाऱ्या बोटातून माझ्या हृदयाचं संगीत तुला नाही ऐकू येत? हृदयातील भावनांच्या लाटा तुला नाही समजून येत? संध्ये, आपण एकमेकांपासून कधीही काहीही लपवून ठेवायचं नाही असं या क्षणी ठरवू या. आपल्या प्रेमाच्या राज्यात प्रेमळ मोकळेपणा असू दे. ठरलं ना?''

''कल्याण, असे का करार करायचे असतात? ठरवायला नको. ते सहज होईल. तुला भूक लागली आहे ना? दुपारी तू जेवला नाहीस पोटभर.''

''त्या वेळी पोट भरून आलं होतं. परंतु आपल्या गाडीत काही आहे का फराळाचं?''

''मी मुद्दामच घेऊन ठेवलं आहे बरोबर. म्हटलं कल्याण आहे भुकेचा हळवा. असू दे शिधोरी बरोबर.''

संध्येने करंडी सोडली. तिने कल्याणला करंज्या, कडबोळी दिली. गाडीवानालाही दिली. संध्या कल्याणला देत होती. तो खात होता. शेवटी ती हसली.

''काय गं झालं हसायला?''

''म्हटलं, खाणार तरी तू किती? आता पुरे हो. सोसायचं नाही.''

''तू जरूर तेवढं देशील अशा भरवशावर मी होतो. आतां पुरे करू? तू काही खाल्लंस का?''

''तू देशील तेव्हा ना मी खाईन?''

''आण ती करंडी. मी तुला देतो.''

कल्याण संध्येला देत होता. ती खात होती. ती सुखावली होती. तिने मध्येच तोंड पुढे केले. कल्याणने तिच्या तोंडात घास दिला. ती उचंबळली.

''पुरे. आता पोट भरलं.''ती म्हणाली.

त्या शेवटच्या घासाने तिचे पोट भरले असेल. भावना म्हणजे एक अपूर्व वस्तू आहे. त्याच त्या साध्या वस्तू असतात. परंतु भावनेच्या योगाने तेथे आपण नवे विश्व उभारतो. नवी दुनिया रचतो. त्या साऱ्या वस्तूंच्याभोवती आपण तेजोवलय, सौंदर्यवलय निर्मितो. तीच वडी, तोच लाडू, तीच भाकर, तीच भाजी, सारे तेच. परंतु त्या वस्तू कोणी केल्या, कोणी आपल्याला दिल्या, यावर किती अवलंबून असते! मनुष्य शेवटी भावनामय नि विचारमय आहे. भावना नि विचार हेच त्याचे खरे जीवन. त्याचा आत्मा बाह्य सृष्टीवर शेवटी विजय मिळवतो. जड सृष्टीच्या वर उड्डाण करतो. आईच्या हातचा कोंडा खाऊन मांडा मिळाल्याप्रमाणे तो नाचतो. परंतु परक्याच्या हातची जिलेबी खाऊनही ते समाधान त्याला मिळत नाही. सांगा तर मग, महत्त्व कशाला? माझ्या भावनामय मनाला का बाह्य सृष्टीला?

चैतन्याला महत्त्व की जडाला? संध्येला जाऊन विचारा. कल्याणपेक्षा तीच अधिक बरोबर उत्तर कदाचित देईल.

✦✦✦

## १३...

# पुन्हा मुंबईत

लग्नानंतर कल्याण नि संध्या काही दिवस सुपाणी गावी होती. संध्या कल्याणच्या आईला कामात मदत करी. सर्व कामाची तिला सवय होतीच. मामंजीची खोली ती स्वच्छ झाडून ठेवी. त्याच्या अंथरुणावरची चादर तिने धुतली. उशीचा अभ्रा धुतला. सासरा प्रसन्न झाला. माझ्या कल्याणने केलेली निवड कल्याणमयच असणार असे तो गौरवाने म्हणाला. संध्येने आपल्या सासरी प्रसन्न व निर्मळ वातावरण निर्माण केले. संध्याकाळी कल्याण, रंगा, संध्या सारी भीमेच्या तीरावर फिरायला जात.

परंतु मुंबईला पुन्हा संप होणार अशा बातम्या वर्तमानपत्रांतून येऊ लागल्या. विश्वासचे कल्याणला निघून येण्याविषयी पत्र आले. ''आपण सारीच मुंबईला राहू. तिथं एखादी खोली घेऊ. तेथील संपाच्या तयारीत भाग घेऊ.'' वगैरे त्याने लिहिले होते. कल्याण जायला उत्सुक होता आणि संध्येलाही बरोबर नेल्याशिवाय गत्यंतर नव्हते.

रंगा नि कल्याण बोलत बसले होते. संध्या जवळच काही तरी निवडीत होती.

''रंगा, आमचं तिकडे कसं काय जमतं ते पाहू. मागून तुला नेईन.'' कल्याण म्हणाला.

''दादा, मलाही तिकडे लौकरच बोलाव. इथं मला कंटाळा येतो. मलाही तुमच्याजवळ राहू दे. तुझ्याजवळ राहण्यात मला आनंद वाटतो.'

''रंगा, तूसुद्धा ये रे आमच्याबरोबर. आपण राहू कशी तरी.'' संध्या म्हणाली.

''संध्ये, कशी तरी राहू म्हणजे काय? कल्पनेचं जेवणखाण करून पोट भरत नसतं. मुंबईत राहणं सोपं का आहे?'' कल्याण खिन्नपणे म्हणाला.

''कल्याण, आपण पुण्याला जायचं की मुंबईला?'' संध्येने विचारले.'

''पुण्याला एखादा दिवस राहून लगेच मुंबईला जायचं.''

''मुंबईला कुठं राहायचं?''

''राहू कुठं तरी. तिथं दुसरे कामगार कार्यकर्ते राहतात, तशी आपण राहू संध्ये, सेवकांना कष्टाचंच जिणं. आपण लग्न करूनही जणू संन्याशाप्रमाणं राहणार. त्यागातच आनंद मानणं हेच आपलं ध्येय.''

''दादा, तू लग्न तरी कशाला केलंस? संन्याशीच का नाही झालास?''

''रंगा, संन्यास म्हणजे केवळ लग्न न करणं असा नाही अर्थ. संन्यास म्हणजे ध्येयासाठी सर्वस्वावर पाणी ओतायची तयारी. संन्यास म्हणजे ध्येयाच्या रंगानं स्वत:चं जीवन अंतर्बाह्य रंगवणं. लग्न करूनही मी संन्याशीच राहीन. संध्येच्या मोहात पडून मी ध्येयाला विसरणार नाही. वेळ आली तर स्वत:चा, संध्येचा, तुम्हा सर्वांचा ध्येयासाठी होम करायला मी मागंपुढं बघता कामा नये. हसत हसत मी सर्वांचा त्याग करीन. स्वत:च्या प्राणांचाही करीन. कुटुंब म्हणजे ध्येयार्थी जिवांचा संघ.''

''संध्याताई, दादाजवळ राहणं म्हणजे होमकुंडाजवळ राहणं आहे.''

''रंगा, ज्योतीला दिव्याजवळ राहण्यातच आनंद. प्रभेला प्रभाकराशी एकरूप होऊन राहण्यातच धन्यता.'' ती म्हणाली.

''आणि ज्योतीशिवाय दिव्याला तरी काय अर्थ?''

''प्रभा नसेल तर प्रभाकराला कोण विचारील?'' रंगा म्हणाला. थोडा वेळ सारी स्तब्ध होती. एकदम रंगा म्हणाला, ''संध्याताई!''

''मला वैनी म्हणा. वैनी म्हणवून घ्यायचा माझा हक्क आहे.''

''मलाही मग भावजी म्हटलं पाहिजे.''

''काय रंगाभावजी?''

''काय वैनी?''

इतक्यात आईने हाक मारली. सारीजण गेली.

''काय आई?'' कल्याणने विचारले.

''मग तू नि संध्या जाणार का?''

''हो, आई. परवा जाऊ.''

''रंगाचं काय ठरलं?''

''तो पुढं येईल, आमचं कस जमतं ते पाहू.''

''कल्याण, तुम्ही मुंबईला जपा. संध्ये, तू सुखात वाढवलेली. कसं होईल तुझं?''

''आई, तुमच्या आशीर्वादानं सारं कल्याणचं होईल.''

रात्री जेवताना संध्याही सर्वांबरोबरच जेवायला बसली. जणू ती सून नसून माहेरवाशीणच होती. सासूबाई वाढीत होत्या. त्यांनी संध्येच्या भातावर दूध वाढले.

''आई, आम्हाला नाही वाढलंस ते?'' कल्याणने हसून विचारले.

''अरे, तिला सवय आहे हो भातावर थोडं दूध घ्यायची. त्या दिवशी सहज ती म्हणाली.''आई प्रेमाने म्हणाली.

''वैनी, मुंबईला भातावर दूध कोण वाढणारं?''

''तिचा कल्याण वाढील.'' आई म्हणाली.

रात्री मायलेकरे किती तरी वेळ बोलत बसली होती. संध्येने सुंदर गाणी म्हटली. त्या वेळी कल्याणचे वडीलही माडीवरून खाली येऊन ऐकत बसले नि शेवटी म्हणाले, ''आनंदी मैना आहे. गुणी आहे पोर.''

ते गौरवाचे शब्द उच्चारून ते पुन्हा वर गेले. सर्वांना आश्चर्य वाटले. संध्येने मुक्यांनाही वाचा फोडली. दुसऱ्या दिवशी कल्याण नि संध्या उडगी गावी गेली. संध्येच्या आईचा निरोप घ्यायचा होता. संध्येच्या आईने हातातील बांगड्या तिला दिल्या. पातळे दिली, पोलकी दिली. अंथरूण, पांघरुण, काही भांडी – सारे दिले. जणू ती माऊली मुलीचा संसार मांडून देत होती आणि शेवटी सद्गदित होऊन ती म्हणाली :

''तुम्ही दोघं एकमेकांना जपा. मोठ्या शहरात आता राहणार. संध्ये, नीट हुशारीनं राहा. प्रकृतीला जपा. कधी काही लागलं सवरलं तर कळवीत जा. तुझ्या आईला जोवर देता येईल, तोवर देत राहीन हो बाळ.

संध्येचे डोळे भरून आले. तिने अनु व शरद यांच्या पाठीवरून हात फिरवला. ती म्हणाली, ''आईला त्रास नका देऊ. भांडू नका. आईला पोथी वाचून दाखवीत जा. मी गोष्टींची पुस्तकं पाठवीन. गोड गोष्टींची, ती आईला वाचून दाखवा.''

''ताई, चित्र असलेली पुस्तकं पाठव.''

''हो, पाठवीन.''

''आणि आम्हाला मुंबई पाहायला केव्हा नेशील?''

''नेईन हं. पुढं नेईन.''

सर्वांचा निरोप घेऊन पुन्हा दोघं सुपाणीला आली! आणि मुंबईला जाण्यासाठी दुसऱ्या दिवशी निघाली. कल्याणची आई! ती त्यांना काय देणार? तिच्याजवळ काहीही नव्हते. तिने त्यांना आशीर्वाद दिला. तिला फार वाईट वाटले. पहिली सून. परंतु तिच्या अंगावर घालायला एकही दागिना तिच्याजवळ नव्हता. ईश्वराची इच्छा आणि प्रेमळ रंगालाही रडू आवरेना. पित्याचे डोळेही निरोप देताना ओले झाले.

संध्या नि कल्याण स्टेशनवर येऊन गाडीत बसली. आज त्यांचा एकत्र प्रवास होता. पहिलाच प्रसंग. परंतु कोणीही बोलत नव्हते. शत भावनांनी त्यांची हृदये भरून आली होती. गाडीत गर्दीही होती. संध्या सुखावली होती. तिच्या मनातील आशा आज पूर्ण झाली होती. सारे मनोरथ सफल झाले होते. हृदय समाधानाने नि कृतज्ञतेने भरून आले होते आणि कल्याण? तोही आनंदला होता. परंतु त्याच्या आनंदात दु:खाचीही छटा होती. ती जरी तितकीशी दिसून येत नव्हती, तरी होती.

''कल्याण, कल्याण, ती बघ हरणं!'' संध्या टाळी वाजवून म्हणाली.

''कुठं आहेत?''

''गेलीसुद्धा. किती वेगानं गेली!''

''संध्ये, सुखंसुद्धा अशीच असतात. दिसतात न दिसतात तो दूर जातात.

परंतु सुखाच्या स्मृतीही गोड असतात. त्या झाडाखाली तू झोपलेला होतास आणि मी येऊन तिथं उभी होते. किती तरी वेळ तुझ्याकडे बघत उभी होते. तो प्रसंग आठवला म्हणजे अजूनही उचंबळून येतं.''

''चंद्रहास झोपलेला असताना विषया अशीच येऊन उभी होती.''

''चंद्रहास केवढा ईश्वरभक्त! त्याच्याजवळ तो शाळिग्राम होता. शेल्याच्या टोकाला बांधलेला. कल्याण, तुला नाही ना देव आवडत? परंतु मी तर त्याला आळवीत बसते. माझ्या ट्रंकेत लहानशी सुंदर मूर्ती आहे.''

''तू मुंबईला त्या मूर्तीची का पूजा करीत बसणार?''

''मी एकटी असेन तेव्हा करीन.''

''माझे सारे मित्र तुला हसतील.''

''मी त्यांची कींव करीन.''

''मला म्हणतील की, ही कुठली पुराणकाळातील बायको आणलीस!''

''कल्याण, तुला त्यात कमीपणा का वाटेल? ज्यामुळं तुला कमीपणा येईल ते मी कधीही करणार नाही. माझा देव ट्रंकेतच राहील. तिथंच मी त्याचं मधून मधून दर्शन घेत जाईन. मग तर झालं?''

''संध्ये, ती शेतं बघ जरा; हिरवी हिरवी दिसत आहेत. इकडे पाऊस पडला आहे.''

''पृथ्वीच्या अंगावर जणू हिरवे रोमांच उठले आहेत.''

''पर्जन्यदेव भेटीला आला आहे म्हणून.''

दोघे बाहेरची शोभा पाहात होती. मागे कल्याणला भेटण्यासाठी म्हणून जेव्हा संध्या गेली होती, तेव्हा रात्रीच्या गाडीने ती गेली होती. आज दिवसाची आता वेळ होती. रात्री आठ–नऊच्या सुमारास ती पुण्याला पोचणार होती.

''कल्याण, हा कोणत्या नदीवरचा पूल?''

''अगं, ही कृष्णा.''

''आपली भीमा पुढं कृष्णेलाच मिळाली आहे.''

''हो.''

''कल्याण, आपल्या दोघांची जीवनं उद्या कशाला मिळणार?''

''आपली संयुक्त जीवनं क्रांतीच्या समुद्राला मिळणार.''

''मी तुझ्या क्रांतीत कोणतं रे काम करू, कोणता भाग घेऊ? मी रात्रंदिवस विचार करते. परंतु माझ्या काही ध्यानात येत नाही.''

''वेळ आली म्हणजे आपोआप समजेल, संध्ये, तू जरा नीज. काल रात्री घरी आपण किती वेळ बोलत होतो.''

थोडी जागा झाली होती. संध्या निजली. कल्याण काही तरी वाचीत होता. संध्येच्या तोंडावर खिडकीतून ऊन येत होते. त्याने खिडकी लावली. त्याचे आता वाचनात लक्ष नव्हते. त्यानेही डोळे मिटून घेतले. बसल्या बसल्या जणू तोही झोप घेत होता. थोड्या वेळाने संध्या उठली.

''कल्याण, आता तू जरा पड; मी बसते.'' ती म्हणाली. त्याने ऐकले. आता गाडीत उकडत होते. संध्येने खिडकी उघडली. आकाशात ढग जमले होते आणि थोड्या वेळाने पाऊसही आला. खिडकीतून शिंतोडे आत येऊ लागले. कल्याणच्या तोंडावर ते उडत होते. तो जागा झाला नि उठून बसला.

''संध्ये, तुझ्या तोंडावर ऊन येत होतं म्हणून मी खिडकी लावली. परंतु माझ्या तोंडावर तुषार येत होते तरी तू काही लावली नाहीस.''

''त्या तुषारांनी तुला हुशारी वाटेल, आनंद वाटेल, असं मला वाटलं.'' ती म्हणाली.

थोड्या वेळाने दोघांनी फराळ केला. आता पाऊस थांबला होता आणि पुढे तर रखरखीत प्रदेश लागला. एके ठिकाणी शेतात मोट चालली होती. संध्या एकदम आनंदली.

''मोट–मोट, कल्याण, ती बघ मोट!'' ती म्हणाली.

''तुला मोट पाहून इतका आनंद झाला?'' त्याने विचारले.

''कल्याण, मी आजीबरोबर मळ्यात जात असे. मीसुद्धा मोट हाकायची,

परंतु जमत नसे. कधी कधी रिकाम्या मोटेबरोबर मी खाली विहिरीत जात असे आणि मोटवाला मला पुन्हा वर ओढून घेई. कल्याण, मोट रिकामी होते तेव्हा कसं धो धो पाणी पडतं. तो आवाज माझ्या कानात घुमत आहे. मजा!''

''आता मुंबईला मोटा नाहीत. तिथं पाण्याचे नळ.''

''त्यांची करंगळीसारखी धार.''

''संध्ये, तुला मुंबई आवडणार नाही.''

''पण तू आहेस ना तिथं. जिथं तू आहेस तिथं मी आनंदानं राहीन. कल्याण, आपण एखाद्या खेडेगावात राहिलो असतो तर किती छान झालं असतं! आपण लहानसा मळा केला असता; गाय ठेवली असती; फुलझाडं लावली असती; वांग्याचं भरीत करून भरीतभाकरी झाडाखाली बसून खाल्ली असती. पाखरांची गोड किलबिल ऐकली असती मी. झाडावर चढून कोकिळा बनून कुहू करून तुला साद घातली असती; तू वर पाहिलं असतंस व लहानसा खडा मारला असतास. परंतु आता आपण मुंबईला राहणार. तिथं काय करता येईल?''

''मुंबईला तुला काय करता येईल? तूं खरंच तिथं कंटाळशील. तिथं गिरण्यांची धुराडी, ट्रामगाड्यांचा खडखडाट, मोटारीचं पों पों, रस्त्यांतून गर्दी, आपली लहानशी खोली; तीतून दिसणारं लहानसं आकाश. संध्ये तुझं कसं होईल?''

''सारं चांगलं होईल. मी मुंबईला कंटाळले, तरी तुला नाही कंटाळणार.''

पुणे आले. संध्या नि कल्याण विश्वासच्या खोलीवर आली. विश्वास, बाळ सारे तेथे होते. विश्वासची प्रकृती जरा बरी दिसत होती.

''लग्नाचे लाडू आणलेत का?'' विश्वासने विचारले.

''तू आजारी असशील म्हणून आणले नाहीत.''

''अरे, खायला मिळत नाही म्हणून तर आजारी पडतो.''

''आणले आहेत हो विश्वास, लाडू!'' संध्या एकदम म्हणाली.

''बायकांना धीर नसतो!'' कल्याण म्हणाला.

''कल्याण, आपण सारेच मुंबईला जाऊ. आम्हा सर्वांना बोलावणं आलं आहे. मोठा संप होणार असं दिसतं. युद्धामुळं महागाई झाली आहे. कामगारांची महागाई भत्त्याची मागणी आहे. दडपशाही व्हायचा संभव आहे. परिस्थिती गंभीर होईल. आपण गेलं पाहिजे.'' विश्वास म्हणाला.

''मुंबईला या वेळी भरपूर काम आहे. काम असलं म्हणजे मला उत्साह वाटतो. आपणाला चाळीचाळींतून प्रचार करावा लागेल. कदाचित् धरपकडही होईल. सभाबंदीचा कायदाही जारी होईल.'' बाळ बोलला.

''मुंबईला आपणा सर्वांसाठी एकच खोली घेण्यात आली आहे. आपण तिथं राहू. संध्ये, तुला सर्वांचा स्वयंपाक करावा लागेल.'' विश्वासने सांगितले.

''मी तयार आहे. त्यासाठी तर आले आहे. तुम्हाला तुमचं काम मिळालं म्हणून आनंद वाटत आहे; मलाही माझं काम मिळाल्यामुळं आनंद होत आहे.'' संध्या संतोषाने म्हणाली.

''दमून जाशील स्वयंपाक करून.'' कल्याण म्हणाला.

''मला संवय आहे काम करायची, कल्याण. आमचं पूर्वी केवढं कुटुंब होतं. नुसती एक वेळची कांद्याची भाजी चिरायची झाली, तर दहा शेर कांदे पुरत नसत. डोळ्यांतून पाण्याच्या धारा लागत.'' ती म्हणाली.

''काम फार पडे म्हणून ना धारा?'' विश्वास हसून बोलला.

''विश्वास, कांदे चिरताना डोळ्यांना पाणी येतं एवढंही नाही का माहीत तुला? काम करताना मी कधी हटायची नाही. कामाला मी वाघ आहे!''

संध्या ऐटीने नि अभिमानानें म्हणाली.

ते सारे मित्रमंडळ मुंबईला आले. परळच्या बाजूला एक खोली होती. तेथे बिऱ्हाड थाटण्यात आले. कल्याण, विश्वास, बाळ सारे दिवसभर बाहेर असत. जेवायला तेवढे घरी येत. रात्री कामगारांच्या चाळीचाळींतून प्रचारसभा सुरू झाल्या. त्या सभांतून कल्याण, विश्वास हेही बोलत. घरी यायला बारा वाजायचे. संपाची तयारी जोराने सुरू झाली.

एके दिवशी भाईजीही मुंबईला आले. संघटना पाहायला आले. प्रचारतंत्र पाहायला आले. विश्वास, कल्याण, यांच्याबरोबर तेही जात. ते फारसे बोलत नसत, बोललेले ऐकत; दृश्ये बघत.

संध्येला घरीच राहावे लागे. इतक्यात स्वयंपाक करायचा असे. सभांना ती जाऊ शकत नसे. कामगार–मैदानावर प्रचंड सभा होऊ लागल्या. एके दिवशी स्त्री–कामगारांचीही खास सभा होती. परंतु संध्या घरीच भाकऱ्या भाजीत होती. सभा संपल्यावर सारे घरी आले. पाने वाढण्यात आली.

"भाईजी, पोटभर जेवा." कल्याण म्हणाला.

"मी उद्यांपासून घरीच राहीन." ते म्हणाले.

"का?" विश्वासने विचारले.

"संध्येशी बोलत बसेन. तिला एकटीला कंटाळा येत असेल."

"तिच्याशी नुसतं बोलत बसाल, की स्वयंपाकांत मदत करू लागाल? संध्ये, भाईजी स्वयंपाक छान करतात." विश्वास म्हणाला.

"माझ्याहून चांगला?" संध्येने विचारले.

"तुझ्याहून चांगला कसा करीन?" ते म्हणाले.

जेवणे झाली. मित्र बाहेर बोलत बसले होते. संप मोठा होणार असे सर्वांचे म्हणणे होते. भाईजी मुके होते.

''तुम्ही काहीच का बोलत नाही?'' विश्वासने विचारले.

''मला काय समजतं? तुमच्या साऱ्या शास्त्रीय गोष्टी.'' ते खिन्नपणे म्हणाले.

''भाईजी, हा टोमणा ना?''

''की हा विनय?''

''हा टोमणाही नाही, विनयही नाही; हे सत्यकथन आहे.'' भाईजी गंभीरपणे म्हणाले.

''तुमच्या मनात काहीच का विचार येत नाहीत?'' विश्वासने तीव्रतेने विचारले.

''विचार येतात; परंतु तुमचे विचार निराळे, माझे विचार निराळे. मी स्वत:ला गांधीवादी म्हणवतो; गांधीवादी मला तसं समजोत वा न समजोत. वाद हा शब्दही मला आवडत नाही. आपल्या परंपरेत निरनिराळ्या विचारसरणींना योग हा शब्द लावीत. सांख्ययोग, भक्तियोग, ज्ञानयोग. मी गांधीयोगाचा उपासक आहे. त्याला सर्वोदय योग म्हणणं अधिक चांगलं. तुम्ही विग्रहावर भर देता. आम्ही समन्वयावर भर देतो. सामोपचारानं जरा घ्यावं. या देशात तरी रक्तपाताचे प्रयोग न होवोत. महात्माजी संप करूच नये असं म्हणत नाहीत. संपाचा अधिकार आहेच. अहमदाबादला कामगार संप संपवून परत तसेच कामावर जाऊ लागलेले पाहताच महात्माजींनी उपवास सुरू केला. संप लढवा. ते म्हणाले. संप म्हणजे शेवटचं हत्यार. ते हाती घेतलं म्हणजे मग खाली ठेवू नये. अहमदाबादला कामगार संघटना आहे. तिनं का कामगारांचा फायदा केला नाही? तुम्हा मुंबईच्या कामगार-पुढाऱ्यांना तसा फायदा करून दिल्याचं दाखवता येणार नाही. उठल्या बसल्या तुमच्या संपाच्या गर्जना.'' भाईजी बोलले.

''भाईजी, आमची संघटना केवळ दीड-दोन आणे पगारवाढ व्हावी म्हणून नाही. आर्थिक फायदा झाला तर हवाच आहे. परंतु आमची संघटना राजकीय आहे. शेवटी सर्व सत्ता श्रमणाऱ्यांच्या हाती यावी हे आमचं ध्येय आहे. तुमच्या डोळ्यांसमोर हे ध्येय आहे का? तुमच्या डोळ्यांसमोर कामगार आज नऊ तास काम करीत असेल, तर उद्या त्याला आठ तास काम करून पुरेशी मजुरी मिळाली म्हणजे झालं, असं असेल. वर्ग समन्वयाची भाषा बोलणाऱ्यांसमोर बहुजन समाजाचं कोणतं चित्र असतं? कामगाराला थोडी अधिक मजुरी द्या, जरा चाळी नीट बांधून द्या, थोडी पगारी रजा द्या; याहून अधिक भव्य असं भविष्यकालीन दृश्य तुमच्या दृष्टीसमोर आहे का? आमच्यासमोरचं चित्र निराळं आहे. सारं उत्पादन आम्ही यांत्रिक करू आणि सर्वांना मग भरपूर विश्रांती मिळेल. सारी संस्कृती फुरसतीच्या वेळी निर्माण होते. उद्याच्या नवसंस्कृतीत सारी मानवजात भाग घेईल. माझे कामगार इतिहास वाचतील, भूगोल वाचतील. कोणी शास्त्रज्ञ होतील, कोणी कलांची उपासना करतील. चित्रालयं, ग्रंथालयं, पदार्थसंग्रहालयं, प्रयोगालयं ठायी ठायी असतील. ज्ञानोपासना, कलोपासना मोफत असेल. सारी जनता स्वतःचा बौद्धिक विकास करून घेईल. महान ध्येय, थोर दृश्य! तुमच्यासमोर आहे का हे उदात्त भवितव्य? तुमच्या रामराज्यात कामगार केवळ राबणारा कामगार म्हणून राहील. त्याला ज्ञानाचा, कलेचा आनंद मिळणार आहे का? कामगारांना थोडी डाळरोटी अधिक द्याल, परंतु मानवी संस्कृतीत भाग घेणारा, भर घालणारा असा तो होईल का? तुमच्या वर्गसमन्वयांत गादीवर लोळणारे राहायचेच आणि केवळ श्रमणारे राहायचेच. हे क्षूद्र ध्येय आमचं नाही. दोन दिडक्या अधिक मिळवून संतुष्ट व्हा असं आम्ही कधीही सांगणार नाही. श्रमणाऱ्याला संपूर्ण विकसित मानव आम्ही करू इच्छितो. जीवनातील बुद्धीचे व कलांचे आनंद त्याच्या दारी नेऊ इच्छितो. आम्हाला अशी समाजरचना


श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

हवी आहे, जिथं सर्वांना स्वत:चा विकास करून घ्यायला पूर्ण वाव असेल, अवसर असेल.'' विश्वास भावनोत्कटतेने बोलत होता.

क्षणभर सारे स्तब्ध होते. भाईजी शेवटी म्हणाले, ''विश्वास, तुम्ही तुमच्या मार्गानं जा. मी काँग्रेसचा सेवक आहे. माझ्या काँग्रेसलाही सर्वांचा विकास हवा आहे. महात्माजींना सारे श्रमणारे सदैव राबवत असावेत असं काही वाटत नाही. त्यांनाही कलेचा आनंद असावा असं त्यांना वाटतं. आणि काय रे, जी श्रमजीवी जनता आहे, त्या जनतेजवळ का कला नाही, संस्कृती नाही? सुंदर सुंदर गाणी, सुंदर नृत्यं त्यांच्याजवळही आहेत. नागपंचमी आली तर शेतकऱ्यांच्या बायका फेर धरून का गाणी म्हणत नाहीत? कलेशिवाय कोणी जगू शकत नाही. सर्वांजवळ संस्कृती असते. माणुसकीची संस्कृती श्रमणाऱ्यांजवळ का कमी आहे? परंतु बहुरंगी संस्कृतीही त्यांना मिळू नये असं का आम्हाला वाटतं?''

''परंतु तुमच्या ग्रामोद्योगानं ती कशी मिळेल? अधिक फुरसत तर हवी?''

''उद्या ग्रामोद्योग आणायचे की यंत्रोद्योग ते स्वराज्य आल्यावर ठरवू. काँग्रेसनं राष्ट्रीय योजना–समिती नेमली आहे. ग्रामोद्योग नि यंत्रोद्योग यांचा समन्वयही कदाचित करावा लागेल. एखाद वेळेला वाटतं की लाखो खेड्यापाड्यात हिंदुस्थान पसरलेला आहे तोच बरा. ते एक प्रकारे संरक्षण आहे. या विमानाच्या काळात सात लाख खेड्यांची सातशे शहरं कराल, तर परचक्र आलं म्हणजे कठीण जाईल. सात लाख खेडी भस्म करणं कठीण आहे. सातशे शहरं ताबडतोब नष्ट करता येतील. आपण खेड्यांचीच गोकुळं करू. काही मोठे उद्योगधंदे ठेवावे लागतील. ते राष्ट्राच्या मालकीचे करू. बाकी ग्रामीण धंदे ठेवू. ते सुधारू. त्याच्यांत शोधबोध करू. महात्माजींना चरख्यात का शोध नको आहे? त्यांनी त्यासाठी बक्षीसही लावलं होतं. सर्व

मानवांच्या बुद्धीचा, हृदयाचा विकास व्हावा असं मलाही वाटतं. माझी काँग्रेस असलंच स्वराज्य आणू पाहात आहे. नदी खाली खाली जात सागराला मिळते, त्याप्रमाणं काँग्रेस बहुजन समाजाच्या सागराला येऊन मिळेल. या श्रद्धेनं मी काँग्रेसच्या झेंड्याखाली उभा राहात असतो.''

''आम्हीही काँग्रेस मानतो.'' कल्याण म्हणाला.

''ते खरं नाही. काँग्रेसला मोडण्यासाठी तुम्ही काँग्रेसमध्ये आहात. तुम्ही काँग्रेसची सदैव टिंगल करता. तुम्ही अशी परिस्थिती मुद्दाम घडवून आणाल की काँग्रेस बदनाम होईल. काँग्रेसच्या मंत्रिमंडळाच्या काळी इथं गोळीबार झाला. तुमचेच एक मोठे पुढारी त्यावेळी खासगी संभाषणात म्हणाले, ''काँग्रेसचे मंत्री होते म्हणूनच अगदी सौम्य गोळीबार झाला.'' परंतु तरीही काँग्रेसनं कामगारांचं रक्त सांडलं असंच तुम्ही सांगणार. माझ्या जिल्ह्यात गोळीबाराची वेळ येऊ नये म्हणून मी माझे प्राण पणाला लावले. तुम्हाला ते आवडलं नाही. परंतु माझ्या डोळ्यांसमोर काँग्रेस होती. तिची प्रतिष्ठा राहावी ही माझी एकच इच्छा. आपल्या काँग्रेसचं मंत्रिमंडळ आहे. जरा मिळतं घेऊ, असं तुम्हाला वाटलं नाही. मागं काँग्रेसचे लाखो सभासद व्हावेत म्हणून मी तळमळत होतो, तर हा विश्वास म्हणाला, ''निवडून येण्यापुरते करावेत. काँग्रेसची शक्ती नि प्रतिष्ठा आम्ही काय म्हणून वाढवावी?' तुम्ही खरे काँग्रेसचे नाहीत. माझ्यासारखे काँग्रेसजवळ भांडतील, परंतु तिची प्रतिष्ठा आम्ही कधी कमी होऊ देणार नाही. काँग्रेसचे या राष्ट्रावर अपार उपकार आहेत. मोठमोठे लढे करून या राष्ट्रात माणसं नांदतात असं तिनं जगाला पटवलं. नि:शस्त्र असलो, तरी आम्ही अन्याय सहन करणार नाही असं तिनं प्रत्यक्ष कृतीनं दाखवलं. काँग्रेसची शक्ती आपण वाढविली पाहिजे. परंतु तुमच्या मनात ते नसतं. राष्ट्रीय शक्तीचा बिचका व्हावा असं तुमचं ध्येय आहे. परंतु वसाहतीतील गुलाम देशांना आधी परसत्तेपासून मुक्त व्हावं

लागतं. त्यासाठी राष्ट्रीय शक्ती एकत्रित करावी लागते. असं करताना काँग्रेसला अनेकांशी मिळतं घ्यायचा प्रयत्न करावा लागतो. यश न आलं तर ती शेवटी एकटी लढायला उभी राहतेच आणि मिळतं घेत असतानाही दरिद्र जनतेला ती विसरत नाही. काही असो. मी तुमच्याकडे ओढला गेलो आहे तो तुमच्या सर्व गोष्टी मला पटतात म्हणून नव्हे. तुम्हीही ध्येयवादी आहात. तुम्ही निराश होऊ नये, एवढंच मला वाटतं आणि तुम्हालाही धीर द्यावा, आधार द्यावा, प्रेम द्यावं असं वाटतं. कदाचित वैयक्तिक प्रेमामुळंही मी ओढला जात असेन. मी प्रेमाचा पुजारी आहे. प्रेमाचा कणकण गोळा करणारा भिकारी आहे, किंवा माझं प्रेम सर्वांना देत फिरणारा मी फकीर आहे. मला अमुक तत्त्वज्ञान नाही, अमुक पंथ नाही.''

भाईजींचा आवाज सकंप झाला. बाहेर पाऊस पडू लागला.

''भाईजी, बाहेर पाऊस पडत आहे.'' संध्या म्हणाली.

''पाऊस म्हणजे देवाची परम कृपा.'' भाईजी म्हणाले.

''देवाची कसली कृपा? पाण्याची वाफ होते, वर जाते, थंड होऊन पुन्हा पावसाच्या स्वरुपानं खाली येते. हा पदोपदी देव कशाला? हा देव मेल्याशिवाय मानवाची मान उंच होणार नाही. देवाधर्मांनी मानवाला गुलाम केलं आहे.'' विश्वास म्हणाला.

''आजची थोडीफार माणुसकी देवाधर्मांनीच दिली आहे. विश्वास, तुला असं का वाटतं, की या विश्वाचा विचार करता करता त्याच्या पाठीमागे एखादी महान प्रेमरक शक्ती असावी असं ज्यांना वाटलं ते सारे मूर्ख होते? त्यांची बुद्धी का गाढी नव्हती? विवेकानंद तुमच्यापेक्षा का कमी बुद्धीचे होते? श्रीरामकृष्ण परमहंसांची जीवनसाधना का व्यर्थ पोरखेळ होता? महान तत्त्वज्ञानी स्वायनोझा या विश्वाच्या पाठीमागं ऋतसत्याची चिच्छक्ती नसे

का मानीत? मार्क्स म्हणजे का शेवटचा शब्द? त्या महापुरुषालाही तुमची जड अंधश्रद्धा आवडणार नाही. जुने पंडित 'इति श्रुतिषु' म्हणत. तुम्ही 'इति महर्षि: कार्ल मार्क्स:' असं म्हणता. तुम्ही वास्तविक असं म्हणावं की, 'विचार अनंत आहे, आम्हाला ईश्वराचा अद्याप पुरावा नाही. वास्तविक त्या क्षेत्रात आम्ही संशोधन केलं नाही. ज्यांनी ईश्वरशोधार्थ जीवनं दिली, त्यांना जे अनुभव आले, ते त्यांना सत्य असतील.' विश्वास, तुम्ही थोडं नम्र बनलं पाहिजे. श्रीरामकृष्ण परमहंस वगैरे सारे मूर्ख नि बावळट असं म्हणायचा अहंकार नका दाखवू. पंडित जवाहरलाल आत्मचरित्रात म्हणतात, ''रुढींचा, संकुचितपणाचा, अहंतेचा धर्म त्याज्यच होय. परंतु असे काही महात्मे दिसतात की, ज्यांच्या जीवनाकडे पाहिलं म्हणजे काही आहे असं वाटू लागतं. काही नाहीच असं स्पष्टपणं म्हणवत नाही.'' आणि विश्वास, माझ्या मनात तर निराळेच विचार येतात. तुम्ही सारेच म्हणता की, मानवप्राणी हा कधी उत्क्रांतीच्या मार्गानं तर कधी आकस्मिक क्रान्तीच्या मार्गानं बनत आला आहे. आपली ही पृथ्वी म्हणजे जळणाऱ्या सूर्याचा उडालेला एक कण. हा कण थंड होऊ लागला. पुढं पाणी झालं. केव्हा तरी वृक्षवनस्पती निर्माण झाल्या. पहिला जीव निर्माण झाला. जलचर, स्थलचर, आकाशचर असे पशुपक्षी झाले. शेवटी वानर आले. त्यातून मानव आला. लाखो स्थित्यंतरांचे हे ठसे आपल्या जीवनातही सुप्त रुपानं असतील. हे संस्कार का नष्ट होतील? आणि भगवान बुद्धासारखा एखादा महापुरुष त्या विश्वात उभा राहतो. विशाल सहानुभूतीची सुई लागून हृदयात विश्वप्रेमाचं संगीत सुरू होतं. या साऱ्या विश्वात मी होतो. या सर्वांतून मी वाढत आलो आहे. या ताऱ्यात मी होतो. या वाऱ्यात होतो. या अणुरेणूंत मी होतो. या गवतात मी होतो. या वृक्षवेलीत मी होतो. या फुलांतून मी हसलो होतो. या पशुपक्ष्यांत मी होतो. असा थोर विचार मनात येऊन तो नाचतो, उचंबळतो. फोनोग्राफच्या

तबकडीवरील ठसे सुई लागताच जसे जागृत होतात आणि मधुर गान सुरू होतं, त्याप्रमाणे अशा संतांच्या हृदयात महासंगीत सुरू होतं. 'हे विश्वचि माझे घर' असं त्याला वाटतं. धर्माचा हा आरंभ. ही अनुभूती जीवनात अधिकाधिक राहील असं करीत जाणं म्हणजे धर्माचरण. हा धर्म शास्त्रीय आहे. हा धर्म म्हणजे अफू नाही. अति थोर भावना नि अति थोर विचार यांचं मधुरतम मीलन इथं आहे. कधी कधी भावना म्हणजे पुंजीभूत विचार असतो; कधी कधी विचार म्हणजे पुंजीभूत भावना असते. विश्वास, अशा धर्माला तुम्हीही प्रणाम कराल.''

भाईजी थांबले. सारीजण आता पथाऱ्यांवर पडली. दमले ते तरुण झोपी गेले. संध्याही झोपली. भाईजींना झोप नव्हती. ते अस्वस्थ होते. बाहेर पाऊस पडत होता. ते गॅलरीत येऊन उभे राहिले. अंगावर पाणी येत होते. गार वाराही सुटला. ते आत आले. विश्वास जुडी करून झोपला होता. भाईजींनी आपली शाल त्याच्या अंगावर घातली. थोड्या वेळाने त्यांनाही झोप आली.

एक ऑगस्टपासून संप सुरू करायचा असे ठरत होते. तुफानी प्रचार सुरू होता. सभा, मिरवणुकी, पत्रके यांचा पाऊस पडत होता. कामावर जाताना व कामावरून येताना 'एक ऑगस्ट ध्यानात धरा. कामगार क्रांतीचा जय असो. पोलादी संघटना उभारा; अशा घोषणा कामगार करीत आणि एके दिवशी बिहारमधील किसानांचे पुढारी स्वामी सहजानंद मुंबईला आले होते. कामगारांच्या सभेत ते बोलणार होते.

''संध्ये, आजची सभा अपूर्व होईल. तू जा.'' भाईजी म्हणाले.

''तुम्ही नाही का जात?''

''मला आज जरा बरं वाटत नाही. मी घरीच पडून राहीन.''

एका स्वयंसेवकाबरोबर संध्या सभेला गेली. विराट सभा जमली होती. ध्वनिक्षेपक होते. परंतु आकाश मेघांनी भरून आले होते. पाऊस येणार की काय? आलाच पाऊस. जणू सत्वपरीक्षा घेण्यासाठी आला. हजारो छत्र्या उघडल्या गेल्या. परंतु एक कामगार पुढारी उभा राहिला. तो म्हणाला,

''साऱ्या छत्र्या मिटा. आज अपूर्व शिस्त दाखवा. पावसाच्या माऱ्याला का भिणार? कामगारांना आगीच्या वर्षावांतूनही जावं लागतं. मिटा सर्व छत्र्या.''

आणि खरोखरच छत्र्या मिटल्या गेल्या. ऐक्याची महान् विद्युत जणू सर्वांमध्ये संचारली होती. इन्किलाबची गगनभेदी गर्जना झाली. आकाशातील मेघांनीही धीरगंभीर उत्तर दिले.

स्वामीजींनी भाषण सुरू केले. पावसात बसून लोक ऐकत होते. परंतु स्वामींना करुणा आली. ते म्हणाले, ''छत्र्या उघडा.'' आणि हजारो छत्र्या उघडण्यात आल्या. भांडवलशाहीचा निषेध करणारी जणू हजारो काळी निशाणे!

रात्री विश्वास, कल्याण, संध्या, बाळ सारी घरी आली. त्यांचे कपडे भिजले होते आणि घरी भाईजी काय करीत होते? ते चुलीजवळ बसून स्वयंपाक करीत होते.

''हे काय भाईजी?'' संध्येने विचारले.

''माझा वेळ जाईना, म्हणून करमणूक सुरू केली. तुम्ही इतक्या लौकर याल असं वाटलं नाही.''

''पावसात किती वेळ सभा चालणार? परंतु आजचं दृश्य पाहून तुमचं कविहृदय नाचलं असतं.''

''माझं कविहृदय देवाजवळ रडण्यासाठी.''

''ते शेतकऱ्यांना नि कामगारांनाही पेटवील. त्यांच्यात वणवा पेटवील.'' रागाने नि प्रेमाने विश्वास म्हणाला.

''विश्वास, ते ओले कपडे आधी काढ. तो माझा शर्ट घाल. तुला होईल.''

''देवासाठी रडणाऱ्याचा शर्ट मला नको.''

भाईजींना वाईट वाटले. त्यांची चर्या गोरीमोरी झाली.

''बरं, घालतो तुमचा शर्ट. कुठं आहे?'' विश्वास विरमून म्हणाला.

''तो तिथं आहे.''

सारी मंडळी वर्तुळाकार बसून जेवण करू लागली.

''छान झाली आहे भाजी.'' संध्या म्हणाली.

''म्हणजे रोज भाईजींनीच स्वयंपाक करावा अशी तुझी सूचना की काय?'' कल्याणने हसून विचारले.

''इथं आहे तो खरंच करीत जाईन. तेवढा तरी उपयोग. माझं जीवन थोडं कारणी लागेल. संध्ये, तू सभा–मिरवणुकांना जात जा. तू क्रान्तिकारकाची पत्नी आहेस.''

''आणि तुम्ही क्रान्तिकारकाचे मित्र होत आहात.''

''विश्वास, माझा पिंड आता बनला. माझी मनोबुद्धी ठरीव साच्याची जणू झाली. माझ्या जीवनावरचे संस्कार आता बदलणं कठीण आहे. माण मडकं पक्कं झालं.''

''नाही भाईजी; तुम्ही लहान मुलांसारखे आहात. क्षणात रडता, क्षणात हसता; क्षणात रागावता, क्षणात लोभावता. तुम्हीच वाढाल. क्षणाक्षणाला वाढाल. झपाट्यानं वाढाल. तुम्ही जून नाही झालात. तुम्ही कोवळे आहात. आमच्याहूनही तुम्ही पुढं जाल. खरंच!'' विश्वास भक्तिप्रेमाने म्हणाला.

पाऊस पडत असताही ती जी विराट सभा झाली, तिचा मालकांवर फार परिणाम झाला. कामगारांत अभेद्य एकजूट आहे असे त्यांना वाटले,

तडजोड करावी असे त्यांना वाटत होते. युनियनशी बोलणी सुरू झाली. एका मोठ्या पुढाऱ्याला मध्यस्थी करण्यास सांगण्यात आले. परंतु कामगार–पुढाऱ्यांत द्वेष–मत्सर होते. त्या पुढाऱ्यांची रात्री एक गुप्त सभा झाली. त्यांच्यांत दोन गट होते. आयत्या वेळी काही झाले तरी तडजोड करायची नाही असा बहुमताने निर्णय घेण्यात आला. कारण ज्या कार्यकर्त्याने तडजोड सुचविली होती, त्याचे महत्त्व वाढू नये असे दुसऱ्यांना वाटत होते. आपसांतील स्पर्धा नि कामगारांचे वाटोळे!

मालकांनी युनियनला मान्यता द्यावी, पगारवाढ म्हणजे महागाई भत्ता बारा टक्के द्यावा, अशा स्वरुपाच्या अटींवर तडजोड होणार होती. परंतु २५ टक्के महागाई भत्ता हवा असा आता हट्ट धरण्यात आला. मालक ऐकेनात. संप जाहीर करण्यात आला. कामगार–पुढाऱ्यांची धरपकड सुरू झाली. सभांतून ध्वनिक्षेपक लावायचे नाही असा वटहुकूम निघाला. चाळीचाळींतून सभा घेणारेही पकडले जाऊ लागले. संपाचा विचका उडाला आणि एक दिवस संप मागे घेण्यात आला. मालक प्रथम देत होते तेवढ्यावरच संतोष मानून कामगारांना कामावर जावे लागले.

''कल्याण, मी नि बाळ आता पुण्याला जातो.'' विश्वास म्हणाला.

''आणि मीही माझ्या जिल्ह्यात जातो.'' भाईजी म्हणाले.

''भाईजी, थोडे दिवस राहा ना.'' संध्या म्हणाली.

''संध्ये, मी पुढं येईन. तुझा वाढता संसार बघायला येईन. आज आग्रह नको करूस.''

''येथील कामगार पुढाऱ्यांच्या वर्तनानं भाईजी दुःखी झाले आहेत. होय ना भाईजी?'' कल्याणने विचारले.

''तुमचे होतात खेळ, त्यांचा जातो जीव. सन्मानपूर्वक तडजोड होत

असताही आपसांतील मत्सरानं काही कामगार–पुढाऱ्यांनी ती होऊ दिली नाही. बिचारे लाखो कामगार इतके दिवस हाल भोगीत राहिले. श्रमणाऱ्या जनतेचं कल्याण आपल्या डोळ्यांसमोर आधी हवं. आपल्या डोळ्यांसमोर दुसरी राजकारणं असतात. सत्ता कोणाच्या हाती, सुत्रं कोणाच्या हाती, याचा विचार आपण करीत असतो. जाऊ दे. मी कशाला कोणाला नावं ठेवू? संध्ये, सध्या मला जाऊ दे. मी पुढं येईन.'' ते म्हणाले.

आणि सारी गेली. कल्याण नि संध्या मुंबईत होती. त्यांनी दुसरीकडे एक लहानशी खोली घेतली. तीत त्यांचा छोटा संसार सुरू झाला. परंतु त्या छोट्या खोलीतील संसारात संध्या महान आनंद अनुभवीत होती.

✦✦✦

१४...

# मुंबईचा त्याग

संध्या व कल्याण परळच्या बाजूस एका लहानशा खोलीत राहात होती. ती खोली लहान होती. परंतु त्या खोलीत आनंद–सिंधू होता. किती स्वच्छ होती खोली! त्या खोलीत चारच भांडी होती, परंतु ती आरशासारखी होती. त्या खोलीतील संध्याराणी म्हणजे प्रेमदेवता होती. प्रेमाचा नंदादीप तिने तेथे पाजळला होता. कल्याण सकाळी बाहेर पडे. तो युनियनच्या कचेरीत काम करी. दुपारी बारा–एकच्या सुमारला तो घरी येई. दोघे बरोबर हसत–बोलत जेवण करीत. कल्याण मग पुन्हा बाहेर जाई. सायंकाळी सभा, कोठे वर्ग वगैरे असत. ते सारं आटोपून तो आठाच्या सुमारास घरी परते. सायंकाळ झाली म्हणजे संध्या स्वयंपाकाला लागे. स्वयंपाक करून खोलीला कुलूप लावून ती खाली रस्त्यावर येऊन उभी राही. हजारो लोक जात–येत असत. मोटारी, घोड्याच्या गाड्या, सायकली, गर्दी असे. नाना वस्तू विकणाऱ्यांच्या चालत्या ढकलगाड्या दिसत असत. संध्येचे लक्ष कोठे असे? तिचे लक्ष एका गोष्टीकडे असे. त्या सर्व संभारांत कोठे कल्याण येताना दिसतो का तेवढेच तिचे डोळे पाहात असत. त्यासाठी तिची नजर चौफेर असे.

आणि कल्याणही संध्येला बघत येई. संध्या कोठे तरी उभी असेल असे मनात येऊन त्याचे डोळे शोधतच येत. उभयतांची शोधक दृष्टी एकदम दुरून भेट व सुकलेली हृदये फुलत. जणू अमृतसिंचन होई. प्रिय व्यक्तीच्या स्मरणानेही आनंद होतो. मग दर्शनाने किती होईल! हस्तस्पर्श होताच किती होईल! संध्या कल्याणचा हात हाती घेई व दोघे खोलीत येत. जेवत. झुणका-भाकरीचे बहुधा जेवण असे. सुटसुटीत काम.

एके दिवशी रात्री घरी आल्यावर कल्याण म्हणाला,

''संध्ये, तुला त्रास होतो ना?''

''मला रे कसला त्रास? तूच दमतोस. दिवसभर तुला कष्ट. माझा घरी बसून वेळही जात नाही. चटईवर पडून तुझं ध्यान करते. दुसरं काय करू?'' ती म्हणाली.

''म्हणून कंटाळा येतो ना?''

''तुझी आठवण करून का कंटाळा येईल?''

''संध्ये, आज आपण बोलपट पाहायला जाऊ.''

''कशाला उगीच?''

''जाऊ. महिन्यातून एकदासुद्धा नये का जाऊ? चल, लौकर जेवू व जाऊ.''

संध्या नाही म्हणाली नाही. कल्याणचा आनंद तो तिचा होता. जेवण उरकून दोघे निघाली. ट्रॅममध्ये बसली आणि एका बोलपटगृहाजवळ आली. तेथे तुफान गर्दी होती. खालची तिकिटे बंद झाली होती. रुपयावरची तिकिटे मिळत होती.

''संध्ये, रुपया रुपयाची काढू तिकिटं?''

''नको हो कल्याण. दोन रुपये आठवडाभर जेवायला पुरतील. बाहेरूनच आपण ही चित्रं पाहू, म्हणजे पुरे.''

''दोन दिवस उपाशी राहू. इतकी आलो नि आता का तसंच परत

जायचं? मी काढतो तिकिटं.''

''मी येणार नाही. तू एकटा जा. मी बाहेर उभी राहीन.''

''मला एकट्याला का पाहायची हौस आहे? मी तुला आनंद व्हावा म्हणून आलो. तुझ्या मनाची करमणूक व्हावी म्हणून मी तुला घेऊन आलो.''

''मी तुझ्यासाठी आले. तुला वाईट वाटू नये म्हणून आले. नाही तर मला थोडाच आवडतो बोलपट?''

''संध्ये, काढू का तिकिट?''

''नको.''

''चल तर परत जाऊ.''

दोघे निघाली. कोणी बोलेना. कल्याण का हिरमुसला होता, रागावला होता?

''कल्याण, ट्रॅममध्ये नाही का बसायचं?''

''दोन आणे फुकट का दवडा? एक वेळ खायला पुरतील.''

''कल्याण, का रे मला हिणवतोस? चल हो, बोलपट पाहू. काढ रुपया–रुपयांची तिकिटं. चल, खरंच चल.''

''आता नको. ती बघ आपली ट्रॅम आली. गर्दी आहे. पटकन चढ!''

''मी पूढून चढते.''

आणि दोघे पुन्हा ट्रॅममध्ये बसली. कल्याणकडे पाहून संध्या हसली. परंतु तो हसला नाही. आज तिचे हसणे का परिणामहीन होते? तिच्या हसण्यातील जादू का आज नाहीशी झाली होती? काही वेळ गेला नि कल्याणही हसला.

''संध्ये, तू वेडी आहेस.''

''पुढं तू मला शहाणी म्हणशील.''

''शहाणी होशील तेव्हा शहाणी म्हणेन.''

''कल्याण, एखादं शिवायचं हातयंत्र नाही का घेता येणार? नवंच हवं

असं नाही. जुनं कमी किमतीत नाही एखादं मिळणार? मी शेजारच्या बायकांना वगैरे विचारलं मला त्यांचे कपडे शिवायला मिळतील. वेळ जाईल थोडा. नाही का?''

''परंतु हल्ली किमती फार वाढल्या आहेत.''

''मागं माझ्या एका दूरच्या मामांचं पत्र आलं होतं. त्यात त्यांनी विचारलं होतं की,, तुला काय पाहिजे, कळव. तुला लग्नाची काही भेट द्यावी असं मनात आहे. कल्याण, त्यांना एक शिवणकामाचं हातमशीन द्या, असं कळवू? ते पत्र मी विसरूनच गेले होते. लिहू का त्यांना?''

''त्यांना लिही की तुम्हाला जेवढे पैसे द्यायची इच्छा असेल, तेवढे पैसे मला पाठवा. मी इथं त्यातून जे घेता येईल ते घेईन.''

''असं कसं लिहायचं?''

''त्यात काय बिघडलं.''

''कल्याण, अरे आपण पुढं आलो. मागंच उतरायला पाहिजे होतं.''

''चल, आता इथं उतरू.''

दोघे उतरली व पुन्हा मागे चालत गेली.

दिवसेंदिवस कल्याणला मुंबईत संसार चालविणे कठीण जाऊ लागले. ठिणगी वर्तमानपत्र बंद पडले. कोणताही छापखाना ते छापायला तयारच होईना. अर्थात कल्याणला तेथे थोडेसे पैसे मिळत तेही आता बंद झाले. कामगार कचेरीत थोडा पगार मिळे. तेवढ्याने कसे भागणार? दुकानातून डाळ, तांदूळ, तेल, सारे तो उधार आणी. पैसे थकत. एका दुकानात बरीच उधारी झाली की, कल्याण दुसऱ्या दुकानात खाते सुरू करी. अनेक दुकानांची अशी उधारी तुंबत चालली. कल्याण सचिंत झाला. तो दुपारी घरी जेवायला येईनासा झाला.

''कल्याण, दुपारी कुठं जेवतोस?''

''संध्ये, तिकडे काम असतं. मग तिथंच हॉटेलात घेतो राईसप्लेट.''

''तेवढ्यानं पोट भरतं?''

''हो. एका राईसप्लेटीत तुझं–माझं दोघांचं पोट भरेल.''

संध्या विश्वास ठेवी. परंतु कल्याण उपाशीच असे. रात्री संध्येबरोबर तो थोडेसे खाई. कल्याण अशक्त होऊ लागला. जिने चढताना तो दमून जाई. एके दिवशी जिना चढून येताना घेरी येऊन तो पडला. संध्या थांबली. इतरही शेजारी आले. कल्याणला सावध करून खोलीत नेण्यात आले. संध्या त्याच्याजवळ बसली.

''आता बरं वाटतं का, कल्याण?''

''हो, बरं वाटतं.''

''कशानं रे घेरी आली?''

''पित्त वाढलं आहे. अपचन, दुसरं काय? काल जरा भजी जास्त खाल्ली होती, मित्राच्या आग्रहामुळं खाल्ली.''

''कल्याण, घरीच जेवायला येत जा.''

''थोड्या दिवसांनी पाहू.''

काही दिवस रेल्वे कामगारांच्या युनियनमध्ये कल्याणला थोडे काम मिळाले. परंतु तेथे पक्ष होते. त्यामुळे ते काम पुन्हा गेले. उपासमार डोळ्यासमोर दिसू लागले. संध्येच्या लक्षात या गोष्टी येऊ लागल्या होत्या. परंतु ती अद्याप बोलली नव्हती. एके दिवशी तिने रात्री फक्त कल्याणचेच पान वाढले.

''माझंच एकट्याचं पान? तुला नाही जेवायचं?''

''दुपारी आज जास्त झालं जेवण. भूक नाही.''

''संध्ये, खोटं बोलत आहेस.''

''तू माझ्याशी खरंच बोलतोस ना? कल्याण, लग्न लागून आपण परत येत होतो. बैलगाडीत होतो. सूर्य मावळत होता. त्या वेळेस तू काय म्हटलंस ते आठवतं?''

''माझ्या आठवणी मरत चालल्या. काय बरं मी म्हटलं होतं?''

''आपण एकमेकांपासून कधीही काही लपवायचं नाही असं नव्हतं ठरलं?''

''हो.''

''मग तुझं दुःख तू माझ्यापासून का बरं लपवतोस? ते मला का कळत नाही? माझे डोळे तुझा चेहरा का वाचीत नाहीत? तुझ्या चेहऱ्यावरून, बोलण्याचालण्यावरून, वागण्यावरून सारं माझ्या ध्यानात येतं. स्त्रियांपासून तुम्ही काही लपवू शकणार नाही. त्या क्षणात सारं जाणतात. कल्याण, तू दुःखी आहेस. तू दुपारी जेवत नाहीस. मला खोटं सांगतोस: अपचनानं घेरी आली, की उपाशी राहिल्यानं आली?''

''संध्ये, उपाशी नको राहू तर काय करू? हल्ली काम कमी झालं, पैसे कुठून आणायचे?''

''परंतु ते मला का नाही सांगितलंस? तू उपाशी राहात होतास व मी दोन्ही वेळा जेवत होते.''

''तू जेवलीस म्हणजे मलाच मिळे.''

''तसं मिळतं तर पडतास ना, घेरी येती ना. कल्याण, जे असेल ते दोघं खाऊं. दोघांत अंतर नको. तुझ्या–माझ्यात अंतर पडणार असेल, तर हे जीवन मला असह्य होईल. मी इतर सारं सहन करीन, परंतु तू कधी अंतर देऊ नकोस हो, कल्याण.''

''बरं. ये आता जेवायला माझ्याबरोबर. जे केलं आहेस, ते दोघं मिळून खाऊ''

एके दिवशी संध्येच्या मामांकडून पन्नास रुपये आले. भेट म्हणून

आले. संध्येने शिवणकामाचे एक हातमशीन असेच. आडगिऱ्हाईकी घेतले. तिने थोडे थोडे काम सुरू केले. एके दिवशी संध्या एका खादी भांडारात गेली. तिने तिथे शिवायला काही काम देत जाल का म्हणून विचारले.

''तुमची कोणाची ओळख आहे का?''

''ओळख कोणाची? मी काही फसवणार नाही. अनुभव घेऊन पाहा. काही काम द्या. उद्या घेऊन येईन.''

तिला काही काम देण्यात आले. संध्येने ते कल्याणला दाखविले नाही. तिने ते पुरे करून खादी भांडारात नेऊन दिले. सुंदर काम. तिला मजुरी मिळाली. संध्येला परमानंद झाला. चाळीतील बायकांचेही काही काम ती करी.

''संध्ये, तू फार नको हो श्रमत जाऊ!''

''नाही हो कल्याण. अरे, हे बसल्या बसल्या काम.''

परंतु एके दिवशी निराळाच प्रसंग उभा राहिला. नेहमीप्रमाणे संध्या खादी भांडारात काम मागायला गेली. परंतु आज तेथे काही वांधा निघाला.

''तुम्ही खादीधारी आहात का?''

''नाही; मिलची पातळं मी नेसते.''

''तर मग तुम्हाला काम मिळणार नाही.''

''असं नका हो करू.''

''परंतु नियम झाला आहे, त्याला मी काय करू?''

''मी खादीचं पातळ नेसू, तर खाऊ काय?''

''ते तुम्ही पाहा.''

''बरं, मी विचार करीन.''

संध्या त्या दिवशी काम घेऊन गेली. तिने गुजराती पद्धतीचे खादीचे पातळ नेसण्याचे ठरविले. म्हणजे फार जड झाले नसते. खादी भांडारात

जाण्यापुरते नेसावे म्हणजे बरेच दिवस पुरेल असे तिने ठरविले. एके दिवशी तिने एक तसे लहान पातळ खरेदी केले. भांडारात जाताना ते ती नेसे. एके दिवशी भांडाराचे मालक म्हणाले,

''तुम्ही पातळ तर एकच नेसलं. इथं येण्यापुरतं नेसता वाटतं?''

''थोडे पैसे शिल्लक उरू देत. मग दुसरं घेईन हो.''

त्या दिवशी तेवढ्यावरच निभावले. परंतु शेवटी एके दिवशी हाही आशेचा धागा तुटला. संध्येचा हाही आधार नाहीसा झाला.

''तुमचे यजमान का लाल बावट्यात काम करतात?''

''हो.''

''ते काँग्रेसचे नाहीत?''

''काँग्रेस गरिबांसाठी मरेल, तर ते काँग्रेसचे होतील.''

''खादी गरिबांसाठीच नाही का काँग्रेसनं निर्माण केली?''

''गरिबांचं राज्य व्हावं असं तुम्हाला वाटतं का? गरिबांची नुसती किव नका करू? श्रमणारे शेतकरी व कामकरी यांची सत्ता स्थापन व्हावी असं काँग्रेसचं म्हणणं आहे का?''

''मला वाद घालायला वेळ नाही. तुम्हाला आजपासून काम मिळणार नाही. ज्यांची मतं आम्हाला मारक, त्यांना काय म्हणून आम्ही आधार द्यावा?''

''एक दिवस ते तुमच्या मताचे होतील या आशेनं द्या.''

''तशी आशा आम्हाला नाही.''

''ब्रिटिशांचा हृदयपालट होईल ही आशा तुम्हाला आहे वाटतं? एका गरीब भगिनीला तिचा नवरा केवळ लाल बावट्याचा आहे म्हणून तुम्ही काम द्यायचं नाकारता? तुम्हाला हे न्याय्य वाटतं?''

''आम्हाला बोलायला वेळ नाही. उद्यापासून कामासाठी कृपा करून येऊ नका.'' असे म्हणून तो व्यवस्थापक दुसरे काम करू लागला.

संध्या निघून गेली. ती निराश झाली. किती हे संकुचित जग असे तिला वाटले. ती खोलीत गेली. तिने ते खादीचे पातळ सोडले. त्याला ती काडी लावणार होती. परंतु तिला धैर्य झाले नाहीम गरिबांनी विणलेली ही खादी आहे. खेड्यातील दु:खीकष्टी बायकांच्या हातचे तीत सूत असेल. त्यांचे अश्रू त्यात मिसळलेले असतील. तिने ती खादी पुन्हा हृदयाशी धरिली. तिला भाईजी आठवले. भाईजीचं खादीवरील प्रेम तिला आठवले. तिने त्या खादीची घडी केली. आपल्या ट्रंकेत खाली खोल तिने ती घडी ठेवून दिली.

सायंकाळी कल्याणची वाट पाहात ती रस्त्यावर घुटमळत होती. तो पाहा कल्याण आला, परंतु त्याच्याबरोबर दोन दुकानदारांची दोन माणसे होती. ती त्याला शिव्या देत होती. कल्याण ऐकत होता.

''किती दिवस झाले! पैशांचा पत्ता नाही. आमचं दुकान सोडून दुसरीकडे माल घेतो.''

''आणि आमच्याकडे त्याने तोच प्रकार केला.''

''मोठे आले लाल बावटेवाले!''

''मला वाटेल ते बोला. लाल बावट्याला बोलाल, तर एकेकाचं थोबाड रंगवीन!'' कल्याण त्यांना संतापून म्हणाला.

''अरे, जा रे थोबाड रंगवणाऱ्या!'' दोघे ओरडले.

कल्याण संतापाने त्यांच्या अंगावर धावला. संध्येने त्याला आवरले.

''उद्या तुमचे देऊ हो पैसे. या बांगड्या विकू व पैसे देऊ.''

''बायकोला सोन्याच्या बांगड्या करतो आणि आमचे पैसे द्यायला मात्र टाळाटाळी!''

''आता जास्त बोलू नका. जा!'' संध्या कल्याणला धरून म्हणाली. ते दोघे नोकर गेले. संध्या व कल्याण घरी आली.

''कल्याण, या बांगड्या उद्या विकून टाक.''

''तुझी आई मला काय म्हणेल? तुला एखादा दागिना करून द्यायचा पराक्रम माझ्याजवळ तर नाहीच; उलट तुझ्या आईनं दिलेले दागिने का विकू? त्यापेक्षा मरण बरं.''

''हे रे काय कल्याण, असं नको बोलू. विक हो या बांगड्या. कामगारात काम करणाऱ्याच्या पत्नीला बांगड्या शोभत नाहीत. कुडी शोभत नाहीत. या दागिन्यांची मला लाज वाटते. मी त्या दिवशी तुझ्याबरोबर त्या कामगार–बायांच्या सभेत आले होते. मला तिथे लाज वाटत होती. मी माझे हात माझ्या ओच्यात लपवून ठेवले होते. ज्यानं मनाला मोकळेपणा नाही, ते कशाला जवळ ठेवा? कल्याण, आणि दुकानदाराचं देणं आहे. देऊन नको का टाकायला?''

शेवटी बांगड्या विकण्यात आल्या. काही उधारी देण्यात आली. पुन्हा उधार माल मिळू लागला. परंतु पुन्हा बाकी थकत चालली. चाळीत फारसे शिवणकाम मिळत नसे. संध्या व कल्याण दोघे खिन्न, संचित व उदास असत.

''संध्ये, आज विश्वास येणार आहे. काही तरी चांगली भाजी कर; मी स्टेशनवर जातो.''

''कसली करू भाजी?''

''आज कोबीची भाजी कर. तुला आवडते ना?''

''आमचा मळा होता तेव्हा आवडत असे. आता मला काही आवडत नाही. फक्त एक आवडत आहे, ती मात्र कधी जाणार नाही. मी मरेन, परंतु ती आवड मरणार नाही.''

''कोणती अशी धन्य वस्तू?''

''तुझं प्रेम.''

''प्रेम पुरं पडत नाही, संध्ये, शेवटी ज्याला तुम्ही जड वस्तू म्हणता,

त्या भातभाजीशिवाय सारं फुकट आहे!''

''परंतु केवळ भातभाजीही पुरेशी नाही हो!''

''दोन्ही हवीत. जड व चैतन्य दोहोंचा खेळ हवा. दोहो मिळून जीवन पूर्ण आहे. दोहों मिळून विकास आहे.''

''बरं, तू जा. कोबीचीच आज भाजी करीन.''

कल्याण गेला. संध्येने किती तरी दिवसात आज छानसा स्वयंपाक केला. थोडी टमाटोची कोशिंबीरही तिने केली होती. तिने चार बोंडे तळली. विश्वासला दैन्य दिसू नये, म्हणून का तिची खटपट होती?

संध्या स्वयंपाक करून खाली रस्त्यावर गेली. बराच वेळ झाला तरी कल्याण व विश्वास यांचा पत्ता नाही. इतक्यात तिच्या पाठीवर कोणी तरी थाप मारली. ती चमकून मागे पाहते तो कल्याण व विश्वास तेथे उभे!

''मी इकडे पाहात होते.'' संध्या म्हणाली.

''संध्ये, स्टेशन या बाजूला आहे. तिकडून आम्ही कसे येऊ?''

''माझ्या नाही हो लक्षात आलं '' ती म्हणाली.

सारी वर आली. विश्वास जरा थकल्यासारखा दिसत होता.

''विश्वास, बरं नाही का वाटत तुला?''

''न वाटायला काय झालं.?''

''मग असा का दिसतोस?''

''प्रवासाचा शीण, बरेच दिवस भटकत होतो.''

''आतां इथं राहा महिनाभर.''

''आणि खाऊ काय?''

''संध्येकडे दुष्काळ नाही हो, विश्वास, तुला भरपूर वाढीन. जरा अंगानं नीट होऊन मगच पुण्याला जा. म्हणजे हरिणीला आनंद होईल. तुला मधूनमधून

ताप येतो. तिला किती वाईट वाटतं. ती मला म्हणे, संध्ये, काय करू म्हणजे विश्वासची प्रकृती नीट सुधारेल? परंतु काही करायचं झालं तरी मी स्वतंत्र कुठं आहे.?' विश्वास, तू हरिणीसाठी तरी प्रकृतीला जप.''

''कल्याण तुझ्यासाठी जपतो ना?''

''तें त्याला विचार, आता जेवायला चला बरं. मला भूक लागली आहे. तुम्ही उपाशी राहता. परंतु संध्येला नाही हो राहवत.''

जेवणे झाली, आणि कल्याण व विश्वास फिरायला निघाले.

''मी येऊ का, कल्याण?''

''तुला न्यायचं असतं, तर मी आधीच नसतं का चल म्हटलं?''

''कुठं जाता तुम्ही?''

''काही महत्त्वाच्या कामाला.''

''जा हो; महत्त्वाची कामं आम्हा बायकांना काय करायची?''

''संध्ये, लगेच असं गं काय म्हणतेस?''

''नाही हो, पुन्हा असं बोलणार,कल्याण. प्रेमानं जरा भांडूी नये वाटतं?''

''प्रेमानं रागावून म्हणत असशील तर काहीच म्हणणं नाही.''

''तुझ्यावर खरं रागावता मला येईल का तरी? या जन्मी तरी नाही हो ते शक्य.''

ते दोघे मित्र गेले. आणि संध्या खोलीत एकटीच होती. परंतु ती आज अस्वस्थ होती, अशांत होती. आज तिला घरच्या सर्वांची आठवण आली. आई आठवली, बाबा आठवले आणि प्रेमळ आजी आठवली. आजीची आठवण येताच संध्या इकडे तिकडे पाहू लागली. एकदम आजी जवळ आहे, असा तिला भास झाला. ती घाबरली. परंतु लगेच शांत झाली. तिन; आपली टंक उघडली. टंकेतील देवाची ती सुंदर मूर्ती तिने काढली. तिने ती मूर्ती मस्तकी

धरली. समोर एका सुंदर पुस्तकावर तिने ती मूर्ती ठेवली. त्या मूर्तीसमोर ती डोळे मिटून बसली. ईश्वराच्या ध्यानात ती रंगून गेली आणि कल्याण व विश्वास आले. हळूच दार उघडून ते आत आले. दाराला कडी नव्हती. संध्या प्रभुचिंतनात बुडून गेली होती.

''संध्ये!'' विश्वासने हाक मारली.

तिने डोळे उघडले. कोणी बोललें नाही. संध्या बावरली, ओशाळली.

''आत रे कसे आलेत?'' तिने विचारले.

''तुझ्या देवानं कडी काढली.''कल्याण म्हणाला.

''संध्ये, तू कडी लावलीसच नव्हतीस. कोणी चोर येता तर?''

''येता तर निराश होता. आहे काय घरात न्यायला?''

''संध्ये, तुझं माझ्यावर प्रेम नाही.''कल्याण म्हणाला.

''कशावरून?''

''तुझं दुसऱ्या कोणावर तरी प्रेम आहे.''

''काय हे कल्याण बोलतोस?''

''खरं ते मी बोलतो.''

''कोणता रे पुरावा?''

''प्रत्यक्ष डोळ्यांचा.''

''कल्याण?''

''मी आजपर्यंत बोललो नाही. आज पाहिलं म्हणून बोलतो.''

''काय रे पाहिलंस?''

''की दुसऱ्यांचं तूं चिंतन करतेस.''

''म्हणजे त्या माझ्या मूर्तीचं? होय ना?''

''होय. माझ्यापेक्षा ती मूर्ती तुला प्रिय आहे. या सजीव कल्याणपेक्षा ती

निर्जीव मूर्ती तुला अधिक आवडते. आपणास आपल्या दुःखात ज्याची आठवण होते, तोच खरा आपला. त्यालाच आपण जीवन दिलं असं म्हणता येईल. तुला हा कल्याण प्रिय नसून तो देव प्रिय आहे.''

''कल्याण, देव मला प्रिय आहे तोसुद्धा तुझ्यासाठी. तुझ्यासाठीच ना मी त्याला आळवते? तुझ्याशिवाय जर मला देव मिळत असेल,तर नो मला नको. माझ्या कल्याणसाठी मला देव पाहिजे आहे. मुख्य तू, तुझ्यासाठी इतर सारं.''

''संध्ये, आम्ही समुद्रावर गेलो होतो. भरती होती. वर चंद्र होता. समोर लाटांचा नाच चालला होता. सागरसंगीत चाललं होतं. वारा येई व लाटा अधिकच जोरान येत.'' विश्वास म्हणाला.

''समुद्रावर तुम्ही काय रे करीत होतेत?''

''आम्ही दोघे खूप खूप बोललो. सारी सृष्टी आम्ही विसरून गेलो होतो. आमची ध्येयं, आमचं तत्त्वज्ञान, पुढील कामाचं धोरण, सर्व गोष्टींची आम्ही चर्चा केली. त्या आमच्या साध्या गप्पा नव्हत्या. जीवनातील सर्वोत्कृष्ट असं ते संगीत होतं. हृदयापासून आम्ही बोलत होतो. आशा–निराशा बोलत होतो. भावी मनोरथ रचीत होतो. वाळूत लाल झंडे की जय लिहीत होतो–'' विश्वास कवीप्रमाणे जणू बोलत होता.

''किती तरी दिवसांत संध्ये,असा अनुभव मला आला नाही. माझ्याशी समरस न होणाऱ्या ध्येयशून्य लोकांत माझा जीव गुदमरतो. तिथं मला चुकल्या–चुकल्यासारखं वाटतं. विश्वास, तू व मी ओंकारेश्वरावर असेच बोलत बसत असू चितेजवळ बसून बोलत असू. आज सागराजवळ आपण बोलत होतो. ओंकारेश्वराजवळच्या चिता पाहून आपणास गरिबांच्या संसाराच्या चिता दिसत व आपल्या मनात आगडोंब उसळे. आज अनंत सागर पाहून अशाच अनंत भावना हृदयात उसळल्या. संध्ये, आजचा आमचा आनंद स्वर्गीय होता–'' कल्याण म्हणाला.

''परंतु त्या आनंदात वाटेकरीण होण्यासाठी मला नेलं नाहीत ना? कदाचित त्या आनंदाची गोडी मला चाखता आली नसती. कल्याण,तुझ्याशी समरस न होणाऱ्या लोकांच्या संगतीत तुझा जीव गुदमरतो, म्हणजे माझ्या संगतीत ना? मी ध्येयशून्य ना? माझ्यामुळं शेवटी तुझी निराशा, होय ना? असंच ना तुला सागायचं होत?'' संध्या दुःखाने विचारती झाली.

''संध्ये, प्रत्येक शब्द तू स्वतःला काय लावून घेतेस? रोज सारखा का मी तुझ्याजवळ असतो? तूच का सारं जग? अगं दिवसभर मी बाहेर असतो. निरनिराळ्या ठिकाणी जातो. तिथं बोलणी होतात.चर्चा निघतात. मतभेद होतात. त्रास होतो. गुदमरल्यासारखं होतं. तुझ्यामुळं नाही. तुझ्यामुळं माझा जीव जगला आहे. तू मला जीवन देत आहेस, तू माझ्या जीवनाचा ओलावा आहेस. आणखी काय सांगू, संध्ये?''

''संध्ये, आम्ही भाईजीना बोलावणार आहोत.'' विश्वास म्हणाला.

''तू बोलाव. तुझ्या बोलावण्यानं ते येतील. तुझ्यावर त्यांचं प्रेम आहे.'' संध्या म्हणाली.

''माझ्यापेक्षाही तुझ्याविषयी त्यांना फार वाटतं. संध्येची समाधानी वृत्ती स्वर्गीय आहे. अलौकिक आहे, असं भाईजी म्हणत.'' विश्वास म्हणाला.

''ते आमचा संसार पाहायला येणार होते.'' कल्याण म्हणाला.

''भाईजी आले म्हणजे तुम्ही दोघं जरा भांडा.''विश्वास हसून म्हणाला.

''भांडणाचे नकोत डोहाळे.'' संध्या म्हणाली.

''मग कसले होताहेत, संध्ये?'' विश्वासने हसून विचारले.

''विश्वास!'' संध्या रागावल्यासारखे करून जरा लाजून म्हणाली.

''बरं, नाही मी बोलत.'' विश्वास म्हणाला.

भाईजी कशासाठी येणार होते? त्यांना का बरे बोलावण्यात आले? काय होते काम? परंतु त्यांना विश्वासचे पत्र पोचताच ते निघाले, ते मुंबईला

आले. संध्येला खूप आनंद झाला. तिला भाईजी म्हणजे एक आधार वाटे. का वाटे ते सांगता येत नाही. तिला त्याच्याजवळ तीळमात्र संकोच वाटत नसे. ती त्याच्याजवळ बसे, हसे, थट्टाही करी.

''भाईजी, फिरायला येता?'' विश्वासने विचारले.

''चल, कल्याण नाही का येत?''

''त्याला दुसरीकडे जायचं आहे. आपणच जाऊ. मला तुमच्याशी जरा बोलायचं आहे.''

दोघे फिरायला गेले. वरळीच्या चौपाटीवर ते बसले होते. प्रथम कोणीच बोलेना.

''विश्वास, काय बोलायचं आहे?''

''नेहमीचीच रडकथा.''

''पैसे का हवे आहेत?''

''तुमच्याजवळ मागायचे तरी कितीदा? आणि तुम्ही तरी नेहमी कुठून आणणार? देता आले नाहीत तर तुमच्या मनालाही त्रास होतो. तुम्ही वाईट वाटून घेता.''

''विश्वास, मी लक्षाधीश असतो तर!''

''लक्षाधीश असतेत तर आम्हाला कदाचित तुम्ही जवळही केलं नसतंत. भाईजी, आम्ही सदैव पैशांच्या अडचणीत असतो. ही रोजचीच रडकथा संपवण्यासाठी आम्ही एक धाडसी प्रयत्न करणार आहोत. त्या प्रयोगासाठी आम्ही एक जुनी मोटर विकत घेणार आहोत. आमच्याजवळ थोडे पैसे आहेत. तुम्ही चारशे द्या.''

''विश्वास, तुम्ही काय करणार त्याची मला एका क्षणात कल्पना आली. परंतु माझं तुम्हाला सांगणं आहे की, असं काही रोमांचकारी करू नका. काही तरी आदळआपट करणं बरं नव्हे. काही तरी दिव्य भव्य करावं, साहस करावं,

जीवनाचं महाकाव्य करावं, करुण, वीररस निर्मावे, असं तरुणांना वाटतं. मी त्यालाही नाव नाही ठेवीत. महान क्रान्तिकारक क्षण येतो, त्यावेळी सर्वांनी उठून दिव्य भव्य करावं. परंतु आज का ती वेळ आहे? आज तयारीचे, संघटनेचे दिवस. होईल तेवढं करा. त्यासाठी प्राण नका आजच पणाला लावू. मी तुम्हाला दरमहा दोनशे रुपये देत जाईन. चालेल?''

''तुमचे दोनशे रुपये कितीसे पुरणार? आम्हाला मोठा छापखाना काढायचा आहे. वर्तमानपत्र काढायचं आहे. किती तरी योजना, कल्पना आहेत. त्याला लाख रुपये हवेत. ते काही नाही. आम्ही करणारच आमचा प्रयोग! यश आलं तर खूप काम करू. त्या साहसात मरण आलं तरीही कृतार्थ होऊ. माशा मारीत बसण्यापेक्षां असं मेलेलं काय वाईट?''

''विश्वास, निराशेमुळं तुम्ही हे करू पाहात आहात. जीवनाला तुम्ही कंटाळला आहात. आपल्या हातून एकदम काही तरी व्हावं असं तुम्हाला वाटतं. हा अहंकार आहे. तुम्ही खरे क्रान्तिकारक नाही. क्रान्तिकारक असा अधीर होत नाही.''

''तुमच्याशी मला चर्चा करायची नाही. वाटेल ते म्हणा. परंतु पैसे द्या. द्याल का? सांगा.''

''देईन पैसे. परंतु मी देवाची प्रार्थना करीन की तुमचा निश्चय बदलो. मी दुबळा आहे. तुला नाही म्हणायचं मला धैर्य नाही. तुमची निराशा मला बघवत नाही. माझं प्रेम तुमच्यावर आहे. परंतु हे प्रेम का मोह? तुमच्या मोहात पडून का मी तुम्हाला मदत करणार? मला काही सांगता येत नाही. माझं जीवन म्हणजे ओढाताण, झगडा, स्वच्छ प्रकाशच नाही. ठीक देईन पैसे. कुठून तरी देतो रक्कम. परंतु विश्वास, माझं तुला सांगणं आहे की नको काही असं करू? माझ्याबद्दल तुला काहीच का वाटत नाही? शेवटी मीच वाटतं तुमच्या इच्छेला सदैव शरण यावं? एकदाही तुमच्या मनात असं का

येत नाही, की भाईजींची इच्छा प्रमाण.''

''भाईजी, तुम्ही म्हणजे आमचं अंतिम प्राप्तव्य असं आम्हाला वाटत नाही. आमच्या ध्येयाकडे जात असताना तुमचा होईल तो उपयोग आम्ही करून घेऊ . तुम्ही आमच्यावर, माझ्यावर प्रेम करता त्याचा फायदा आम्ही अवश्य करून घेऊ. आम्ही प्रेमबीम जाणत नाही. शेवटी त्याचा बळी देतो. माझ्या एका मित्राच्या बहिणीवर एका श्रीमंताचं प्रेम बसलं होतं. परंतु त्या बहिणीचं दुसऱ्या एका दरिद्री तरुणावर प्रेम होतं, माझा मित्र आपल्या बहिणीला म्हणे, 'कसलं प्रेम घेऊन बसलीस?' कर या श्रीमंताशी विवाह. तो दहा हजार रुपये देतो आहे. आम्हाला प्रचाराला होतील. कर त्याच्याशीच विवाह. त्याला प्रेमानं वश करून घे व आम्हाला आमच्या कार्यासाठी तुझी सारी इस्टेट हळूहळू देऊन टाक,' त्याच्या बहिणीला ते पसंत पडलं नाही. तो बहिणीवर रागावला. बहीण ऐकेना. तिनं आपल्या दरिद्री प्रियकराशीच विवाह केला. तेव्हापासून माझा मित्र बहिणीच्या घरीही जात नाही. तिच्याशी तो बोलत नाही.'जी बहीण माझ्या ध्येयार्थ उपयोगी पडली नाही, संधी आली असतानाही जिनं ती संधी लाथाडली, ती बहीण काय कामाची?'असं तो म्हणतो. असे आम्ही लोक आहोत.''

''विश्वास, काय सांगतो आहेस तू? अरे, ही दृष्टी एकदा घेतली की, जगात सारं शून्य होईल. आपल्या पत्नीलाही मग वेश्याव्यवसाय करायला सांगावा व मिळवावे कामाला पैसे.''

''भाईजी, तो निस्संग व अनासक्त वेश्याव्यवसायही मी पवित्र मानीन. कबिराची पत्नी लोथी आपण होऊन नाही का श्रीमंताकडे जायला निघाली? स्वत: कबीरानं तिला खांद्यावरून पोचविली.''

''संतांच्या गोष्टी तुम्ही नका बोलू.''

''आम्ही काही जात नाही; ध्येयाशिवाय ज्यांना दुसरं काही दिसत नाही, असं सतीचं वाण हाती घेतलेले आम्हीही आहोत. तुम्ही काही तरी बोललेत म्हणून मला बोलावं लागलं. ध्येयासाठी आम्ही प्रेमाचाही बळी देतो. एवढंच माझं सांगणं भाईजी, आम्हाला या कामी मदत करताना तुमची सदसद्‌विवेकबुद्धी जर मोठं बंड पुकारीत असेल व तुम्ही अस्वस्थ होणार असाल, तर मदत देऊ नका. मागणं हे आमचं काम. तुम्ही माझ्यावर प्रेम करता, म्हणून तुमच्याजवळ मागितले.''

''परंतु तुझं नाही ना माझ्यावर प्रेम?''

''माझं प्रथम ध्येयावर प्रेम. मग तुमच्यावर, इतरावंर.''

''विश्वास, माझं ध्येय अद्याप मला मिळालं नाही. परंतु कुठं तरी खूप प्रेम करावं व तदर्थ सर्वस्व द्यावं असं मला वाटत असतं. मी प्रेमाची पाणपोई घालून बसलो आहे. कोणी माझ्याजवळ येतात, क्षणभर राहतात, पाणी पितात, निघून जातात माझ्याजवळ कायमचं राहावं असं कोणालाही वाटलं नाही.असा कोणी मिळेल का मला? माझ्या प्रेमाची तहान ज्याला सदैव लागेल,असा भेटेल का कोणी मला? हा जणू माझा प्रयोग आहे. जाऊ दे. विश्वास, फार विचार केला तर सारं शून्यच वाटू लागतं, मी देईन पैसे; परंतु विश्वास, असा कठोर भावनांचा कसा रे तू? हृदयातून का साऱ्या भावना, कोमल भावना फाडून फाडून तू फेकून दिल्या आहेस?''

''भाईजी, हा विश्वास जीवनातील सौंदर्याचा उपासक आहे. परंतु आज सभोवतालचं सारं जीवन विफल झालं आहे. कलाहीन झालं आहे. भावनांच्या जीवनांतील सुंदरता प्रकट व्हायला आज अवसरच नाही. कुठं पाहायला वेळ नाही. पाखरांची किलबिल ऐकायला मन धजत नाही. घरात पोरं थंडीत उघडी असता पाखराची किलबिल कोणाला मोहील? जीवनातील सारी कुरूपता, सारा हिडीसपणा, सारी क्रूरता आज समोर सर्वत्र उसळून राहिली

आहे. सौदर्याला प्रकट व्हायला वेळच नाही. कोमल भावनांच्या विकासाला आज अवसरच नाही. मी सौदर्योपासक आहे. कोमल भावनांचा उपासक आहे, म्हणूनच आज मी कठोर झालो आहे. काय सांगू भाईजी, मला नीट सांगताही येत नाही.''

''विश्वास, चल जाऊ. माझ्या प्रेमाचा दिवा आज जो रस्ता मला दाखवील त्यानं मला जाऊ दे. हे प्रेम का आसक्ती ? मला समजत नाही. तुम्हांला निराश व हताश करणं म्हणजे मरण वाटतं. माझं प्रेम म्हणत आहे, 'दे पैसे.' मी देईन.''

''भाईजी, तुमच्यां या प्रेमाला अनंत प्रणाम.''

भाईजी व विश्वास घरी आले. कल्याण नि संध्या स्वयंपाक करीत होती. कल्याण पोळ्या भाजत होता; संध्या लाटून देत होती. ते दृश्य पाहून भाईजीना परम आनंद झाला.

''पतीपत्नीचा प्रेमळ सहकार ही एक अति मधुर व पवित्र गोष्ट आहे.''

ते म्हणाले.

''भाईजी, तुम्ही हो का नाही लग्न केलंत? तुमचा संसार फार सुखाचा झाला असत्ता.'' कल्याण हसून म्हणाला.

''परंतु मला मग सर्वस्व देता आलं नसतं. तोंडातून नकार काढावा लागला असता. म्हणून मी लग्न नाही केलं. बरं, ते जाऊ दे. संध्ये, मला फार भूक लागली आहे.'' भाईजी म्हणाले

''भाईजी, तुम्हाला भूक?'' विश्वासने विस्मयाने विचारले.

''अरे, मला का खायला लागत नाही?'' ते आश्चर्याने म्हणाले.

''तुम्हीच म्हणता की एका गोष्टीचा मला कंटाळा आहे व तो म्हणजे जेवणाचा.'' विश्वासने आठवण दिली.

''कंटाळा आला तरी जेवावं लागतं. अजून तुमच्या प्रेमामुळं जगायचा कंटाळा आला नाही.'' भाईजी म्हणाले.

जेवणं झाली. रात्री जरा पत्ते खेळून सारी शांत झोपली.

दुसऱ्या दिवशी सकाळी कल्याण व विश्वास बाहेर गेले होते. संध्या भाजी चिरीत होती. भाईजी वर्तमानपत्रे वाचीत होते.

''भाईजी, तुम्हाला एक गोष्ट सांगू?'' संध्येने विचारले.

''सांग.''

''तुमची खादी जाळावी असं मला वाटतं.''ती म्हणाली.

''खादीवर राग नको करू. लाखो गरिबांना ती स्वाभिमानाचा घास देत आहे.''

संध्येने त्या खादी भांडारांतील तो कटू अनुभव सांगितला. भाईजी खिन्न झाले व म्हणाले,

''संध्ये, महात्माजींची सहानुभूती अनंत आहे. संकुचितपणा त्यांच्याजवळ नाही; परंतु महापुरुषांचे काही अनुयायी जड वृत्तीचे होतात. सूर्य भाजीत नाही, परंतु ती क्षुद्र वाळू अधिक भाजते. तसंच हे. या अशा संकुचित बुद्धीच्या माणसांकडे पाहून महापुरुषांवर आपण रागावू नये. खादीवर रागावू नये. या भाईलोकांतही असे प्रकार नाहीत का? मार्क्सच्या तत्वज्ञानाला काही मार्क्सवादीच ठोकळ्यात घालू पाहतात. त्यांतील प्रगतीपरत्व मारू पाहतात. सर्वत्र हाच अनुभव. महापुरुषांची विशाल व व्यापक दृष्टी सामान्य अनुयायांजवळ नसते आणि हे अनुयायीं हटवादी, निर्दय, सहानुभूतीशून्य असे ठोकळे बनतात. काही गांधीवादी असे सर्वत्र दिसतात. परंतु त्याचा राग बिचाऱ्या खादीवर नये काढू. भले-बुरे लोक, असे संकुचित लोक सर्वत्रच आहेत. समजलीस ना?''

दुपारची जेवणे झाली. विश्वास पुन्हा पुण्याला गेला. भाईजीही निघून

गेले. ते कोणीही जास्त राहिले नाहीत. पुन्हा संध्या नि कल्याण दोघेच राहिली. परंतु त्यानाही मुंबई मानवेना. संध्येला ताप येऊ लागला. घरात सारी अडचण.

''संध्ये, आपण पुण्यालाच जाऊ.''

''कल्याण, पुण्याला तरी हाच ना प्रकार?''

''तिथं भाडं कमी पडेल. रंगालाही बोलावू. पुणंच बरं. नको ही महाग मुंबई.''

''इथं दुकानदारांचं देणं आहे.''

''संध्ये, हे हातमशीन टाकावं विकून. पुण्याला जाण्यापुरते थोडे तरी पैसे होतील.''

''जे योग्य दिसेल ते कर.'' पडल्या पडल्या संध्या म्हणाली.

शेवटी कल्याणने सारी व्यवस्था केली. एके दिवशी रात्री दोघे गुपचूप निघाली. पुण्याच्या गाडीत बसली. दोघे हळूच बोलत होती.

''कल्याण, खोलीचं भाडं दिलंस का?''

''पुढचा जन्म असला तर देऊ!''

''आणि दुकानदारांचे पैसे?''

''कामगारांची सत्ता स्थापन होईल तेव्हा देऊ.''

''कल्याण, असं रे काय बोलतोस?''

''संध्ये, दिले हो सर्वांचे पैसे.''

''खरंच?''

''हो, खरंच. लाल झेंडेवाले फसवे आहेत असं नये होता कामा आणि नसते पैसे देता आले, तर आपण मोठं पाप केलं असं थोडंच झालं असतं? आपणाजवळ नसलंच काही, तर द्यायचं तरी कुठून? खरं ना संध्ये?''

✦✦✦

१५...

# भाईजी, मी त्यांना परवानगी दिली

संध्या, कल्याण, विश्वास, बाळ, रंगा सारीच आता एकत्र राहात होती. तिसऱ्या मजल्यावर ती खोली होती. विजेचे दिवे होते. खोली चांगली लांबरुंद होती. एका खिडकीतून पर्वती दिसे, एका खिडकीतून नदीचे सुंदर पात्र दिसे. सायंकाळचे देखावेही सुंदर दिसत. परंतु सारे वातावरण शांत असे. तेथे गडबडगुंडा काही नव्हता. रंगा शिवणकाम शिकत होता;. तो सकाळी ७॥ वाजता जाई. तो १२ ला घरी येई; पुन्हा एक वाजता जाई. तो रात्री आठ वाजता येई. त्याला तेथे फार शिकवत नसत. बटणांचे काच शिवायला देत. रंगाची बोटे दुखू लागत. मध्ये थोडासा वेळ मशीनवर बसू देत. या गतीने किती वर्षे शिवणे शिकायला लागतील, देव जाणे. परंतु जेथे तेथे पिळवणूक आहे. रंगाला सबंध सहा रुपये तेथे मिळत! आणि दहा तास काम पडे. परंतु करतो काय?

रंगाचा स्वभाव मोठा आनंदी होता. त्याच्या चेहऱ्यावर खिन्नता कधी नसे. घरी येईल व खोलीत हास्य पिकवील. सूक्ष्म विनोद करण्यात त्याची बुद्धी मोठी हुशार. संध्येप्रमाणेच तोही स्वच्छतेचा भोक्ता. व्यवस्थितपणाचा

भोक्ता. घरी आल्यावर तो चपला वगैरे फडक्याला पुसून ठेवी.

बाळची आई त्याला काही पैसे देत असे. लक्ष्मण हा विश्वासचा एक मित्र होता. तो शिकत होता. तो या मित्रमंडळाला काही मदत देई. रंगाचे सहा रुपये. अशा रीतीने गाडे कसे तरी ढकललें जात होते.

परंतु विश्वासची प्रकृती पुन्हा बिघडली. त्याला ताप येऊ लागला. कोठून तरी त्या मित्रमंडळाने एक खाट मिळवली. विश्वासचे अंथरुण त्या खाटेवर असे. संध्या त्याची नीट शुश्रूषा करी. पिण्याला कढत पाणी त्याच्यासाठी ती करून ठेवी. त्याचे कपडे बदली. त्याला सकाळी थोडा ताजा भात करून जेवायला वाढी. कपाळ फार दुखू लागले तर सुंठ उगाळून त्याच्या ती कपाळाला लावी.''

''संध्ये, सदा मरे त्याला कोण रडे? किती तू करणार माझं? मला लाज वाटते. नको हे जगणं असं वाटतं.''

''विश्वास, बरा होशील हो. भाईजी पैसे पाठवणार आहेत. मग टॉनिक घे. तुम्हाला क्रान्ती ना करायची आहे? मग असं काय बोलतोस? क्रान्ती करू पाहणाऱ्यानं मरणाची वार्ता काढू नये. जाईल हे आजारीपण.''

आणि अशी बोलणी त्या दिवशी चालली होती, तो हरिणी आली.

''ये हरणे!'' संध्या म्हणाली.

''का गं आज असा का चेहरा?''विश्वासने तिला विचारले.

''विश्वास, घरी सर्वांची बोलणी खाऊन कंटाळले मी. दादा बालतो, मामा बोलतात. करू तरी काय? अभ्यासात लक्ष लागत नाही. मामा सारखं लग्नाविषयी बोलतात. मी आज त्यांना सांगून टाकलं की, पुनश्च माझ्याजवळ लग्नाचं बोलाल तर शपथ, तेव्हा ते मज्ञा वाटेल ते बोलले.''

''हरणे, बोलू देत त्यांना. तू मॅट्रिकची परीक्षा यंदा पास हो. म्हणजे मग

आपण विवाहबद्ध होऊ. तुला नोकरी मिळेल. तोपर्यंत कड काढ. मी असा आजारी. तुला शिकवताही येत नाही.''

''मी करीन नीट अभ्यास. तू काळजी नको करू यंदा मी पास होईन. मग आपण स्वतंत्र होऊ'.

विश्वास व हरिणी बोलत होती. संध्या खाली नळावर धुवायला गेली. विश्वास व हरिणी यांना संकोच वाटू नये म्हणून का ती गेली? संध्या खाली गेली आहे असे पाहून हरिणीने खोलीचा केर काढला. तेथे भाजी होती. ती तिने चिरायला घेतली.

''हरणे,'' विश्वासने हाक मारली.

''काय रे?'' तिने विचारले.

''मला थोडं पाणी दे.''

हरिणीने त्याच्या तोंडात पाणी ओतले.

''बस जरा माझ्याजवळ.''

हरिणी विश्वासजवळ बसली. त्याच्या केसावरून ती हात फिरवीत होती. तिच्या डोळ्यांतील पाणी त्याच्या तोंडावर पडले.

''हे काय हरणे?''

''विश्वास, तू कसा होतास, कसा झालास?''

''होईन पुन्हा पूर्वीसारखा.''

''विश्वास, मी तुझ्या घरी जाऊन तुझ्या आईला दूध पाठवायला सांगू का? त्या आनंदानं पाठवतील.''

''सांग. तिलाही बरं वाटेल.''

संध्या धुणी घेऊन आली. तो केर काढलेला, भाजी चिरलेली.

''हरणे, भाजी कशाला चिरलीस?''

''संध्याताई, आपण पुढं दोघी एकत्र राहणार ना? मी का परकी आहे? आपलं सर्वांचं एकच घर. खरं म्हटलं म्हणजे तुलाच आता विश्रांती हवी. तीन मजल्यांची चढउतार करणं बरं नाही.''

''मला अजून तसं काही वाटत नाही.''

''विश्वास, जाते आता मी.''

असे म्हणून त्याच्या अंगावर नीट पांघरुण घालून हरिणी गेली. कल्याण, बाळ वगैरे हल्ली घरी फक्त जेवायला येत. दिवसा–रात्री बाहेरच असत. रात्री कधी बाराला, कधी दोनला ते घरी येत. परंतु संध्या कधी काही बोलली नाही. एके दिवशी विश्वासला घेऊन बाळ दवाखान्यात गेला. विश्वासची प्रकृती तपासावयाची होती. घरी कल्याण व संध्या दोघेच होती.

''कल्याण, अलीकडे तू कोणत्या कामात गुंतला आहेस? तुला बोलायलाही वेळ नसतो. संध्येची जणू तुला आठवणही नाही.''

''संध्ये, तू माझ्याबरोबर नेहमीच आहेस.''

''काही तरी महत्त्वाच्या कामात हल्ली तुम्ही सारे आहात.''

''संध्ये, तुला सांगू सारं?''

''असं विचारतोस का? मी का विश्वासघात करीन? बायकांजवळ खरं सांगू नये, गुप्त गोष्ट सांगू नये असं म्हणतात. त्याच सनातनी मताचे तुम्हीही का?''

''संध्ये, तू भिशील, घाबरशील, म्हणून सांगायला मन कचरतं.''

''ऐक तर. संध्ये, आम्ही काही मित्र कुठं तरी दूर लौकरच जाणार आहोत.''

''मला सोडून?''

''क्रान्तिकारकाला सर्वांना सोडून जावं लागतं. संध्ये, एका मोठ्या साहसासाठी मी जाणार आहे. वाचलो तर तुझा. तू निरोप दे.''

''कल्याण, त्या साहसासाठी तूच का जायला हवं? ज्यांची लग्नं झाली

नसतील, त्यांनी आधी जावं; तू नको जाऊस.''

''संध्ये, तू दुसऱ्यांच्या प्राणांवर निखारा ठेवायला तयार आहेस. अगं, ज्यांची लग्नं झाली नसतील, ते कोणाचे नवरे नसले तरी कोणाचे भाऊ असतील, कोणा आईबापांचे प्रिय पुत्र असतील, कोणाचे जीवलग स्नेही असतील. जो कोणाचाच नाही, तो मेला तर कोणी रडणार नाही, असा अभागी या जगात कोणी असेल का? स्नेहबंध सर्वांना असतात.''

''कल्याण, रागावू नकोस.''

''संध्ये, तुला लौकरच बाळ होईल. मी समजा, जगातून गेलो, तरी तुझ्याजवळ ती करमणूक असेल. त्या बाळाला वाढव. त्याला माझ्या गोष्टी सांग. त्याला क्रान्तीवीर बनव.''

''कल्याण, ते बाळ कोणाला दाखवू?''

''सुखरूप मी परत आलो, तर आहेच बाळाला बघायला; परंतु वेळ आहे, वखत आहे. सर्व गोष्टींसाठी मनाची तयारी असावी. जाऊ ना मी?''

''जा, कल्याण. तुझ्या ध्येयापासून मी तुला परावृत्त करणार नाही. रजपूत स्त्रिया आपल्या पतींना हसतमुखानं मरायसाठी पाठवीत : 'जा, लढता लढता मरा' असं सांगत; परंतु त्या स्वतःही मग जोहार करीत. मी काय करू ते सांग. कल्याण, तुझ्या विरहाची कल्पनाही मला असह्य होते आणि तू सापडलास तर? तुझ्या हातून जर काही बरंवाईट झालं असेल, तर तुलाही ते भयंकर मरण पत्करावं लागेल. कल्याण, कल्याण, मी काय करू? मीही तुझ्या पाठोपाठ आले असते. परंतु पोटात बाळ वाढत आहे. त्या बाळाला कुठं ठेवू? कशाला पोटी येत आहे ते बाळ? जन्मदात्याची नित्याची भेट व्हायची नसेल, तर कशाला ते येत आहे? कल्याण, मी अभागिनी आहे. परंतु असं कशाला म्हणू? तुझ्याशी माझं जीवन एकजीव झालं आहे.

मी भाग्यवान आहे. कल्याण, जा; तू क्रान्तीच्या गळ्यातील ताईत आहेस. भेटशील का पुन्हा? तुझं बाळ जन्माला आलं तर काय सांगू त्याला?''

''पित्याचं अपुरं राहिलेलं कार्य पुरं करायला सांग. संध्ये, रडू नकोस. ते कार्य करताना तुझे अश्रू जर मला आठवले, तर माझ्याकडून नीट काम होणार नाही. आमचं कार्य सफल होणार नाही. तू आनंदानं मला निरोप देऊन ठेव. आजच मी जात आहे, मरत आहे, असं नाही. संध्ये, मनाला लावून घेऊ नकोस. बाळासाठी तरी आनंदी राहा. आपल्या दोघांची आशा म्हणजे आता ते बाळ. खरं ना? संध्ये,.तुला हल्ली काय वाटतं? तुझी कशावर इच्छा जाते? सांग मला. तुझा दरिद्री पती शक्य तो तुझी इच्छा पुरवील. सांग, एखादी तरी इच्छा मला सांग. तू कधीही कांही मागत नाहीस, कधी काही सांगत नाहीस. आज माझ्याजवळ काही तरी माग; माग.''

''कल्याण, तुझ्या मांडीवर डोकं ठेवून पडून राहावं असं वाटतं. परंतु हल्ली तुमची सर्वांची धावपळ आहे. तू क्षणभरही माझ्या वाट्याला येत नाहीस. तू क्रान्तीच्या नादी. मग तुझा एखादा सदरा घेऊन, पायजमा घेऊन त्याची मी उशी करते. त्यावर डोकं ठेवते हो, कल्याण.''

''ये, ठेव माझ्या मांडीवर डोकं. संध्ये, तू थकतेस. इतक्या सर्वांचा स्वयंपाक तुला करावा लागतो. खालून वर पाणी आणावं लागतं, मी तरी काय करू?''

''कल्याण, रंगा देतो हो पाणी आणून. मी एक जिना चढते व जरा बसते. मग वर येते. मी जपते प्रकृतीला. स्वयंपाक बसल्या बसल्या करते. त्याचा काही तितका त्रास नाही हो होत. तू दोन–चार वेळा दिवसातून दिसलास, थोडा वेळ माझ्याजवळ बोललास, हसलास, म्हणजे मग काही वाटणार नाही. सारं नीट होईल.''

दोघे आता स्वस्थ होती. संध्या डोळे मिटून कल्याणच्या मांडीवर डोके ठेवून पडून राहिली होती. मध्येच तिने वर पाहिले. तो कल्याणच्या

डोळ्यातील अश्रू त्याच्या गालावर आले होते.

''रडू नको तू; आपण एकमेकांच्या हृदयात कायमची आहोत; रडू नको. हस.''

कल्याण हसला. अश्रूंची फुले झाली. कल्याण संध्येला थोपटीत होता. आणि जिन्यात विश्वास, बाळ वगैरेंचे शब्द ऐकू आले.

''विश्वास आला. त्याचं अंथरुण साफ करायचं राहिलं.'' संध्या एकदम उठून म्हणाली.

''मी करतो साफ.'' कल्याण म्हणाला.

कल्याणने ते अंथरुण झटकले. उशी वगैरे नीट ठेवली आणि विश्वास व बाळ आले. विश्वास अंथरुणावर पडला.

''काय म्हणाले रे डॉक्टर?'' कल्याणने विचारले.

''पूर्ण विश्रांती हवी असं म्हणाले.'' बाळने सांगितले.

''कल्याण, तुमच्या प्रयत्नात हा दुर्दैवी विश्वास भाग घेऊ शकत नाही. मला वाईट वाटत आहे.'' तो म्हणाला.

''तू शांत पडून राहा.'' बाळ म्हणाला.

''शांत पडणं म्हणजे मरणं. संपूर्ण शांतता म्हणजे मरण?'' विश्वास म्हणाला.

बाळ व कल्याण बाहेर गेले. संध्या स्वयंपाकाला लागली. भाईजींकडून मनिऑर्डर आली. वेळेवर औषधाला पैसे आले.

''संध्ये, भाईजी म्हणजे एक देवाची देणगीच आपणाला मिळाली, नाही?'' विश्वास पडता पडता म्हणाला.

''विश्वास, देवाची देणगी? देव कुठला आणलास हा?''

''संस्काररुपानं अद्याप शिल्लक असलेला. संध्ये, आपल्या तोंडून देव शब्द येतो एखादे वेळेला. लहानपणापासून झालेले संस्कार, ऐकलेले

शब्द, ते येतात सहज तोंडून. त्यासाठी चिडवायला नको काही एवढं!''

''विश्वास, आज पडवळाची भाजी आहे.''

''तुम्हा कानडी लोकांना पडवळं फार आवडतात.''

''अरे, पडवळ हा शब्दसुद्धां कानडीच आहे.''

''हो कानडी! काही तरीच.''

''विश्वास, अरे खरोखरच तो कानडी शब्द आहे. तुमच्या मराठीत किती तरी भाज्यांची नावं कानडी आहेत. आम्ही कानडी लोकांनी तुम्हाला खाण्याची संस्कृती दिली. आम्ही भाज्यापाले दिले. तुमची भाषा समृद्ध केली.''

''आणखी काय दिलंत?''

''आम्ही तुम्हाला खेळ दिले. लहान मुलांची गाणी दिली. एडिक बेडिक दामाडू व आटक माटक चन्ने चाटक ही गाणी व हे खेळ आमचेच. दिवा लावून मुलाला तीट लावताना अडगुळं मडगुळं गाणं महाराष्ट्रीय माता म्हणतात तें कानडीच.''

''संध्ये, याचा अर्थ काय, माहीत आहे? कानडी बायकांनी महाराष्ट्रीय वीर पसंत केले. महाराष्ट्रीयांशी लग्नं करून त्या महाराष्ट्रात आल्या. येताना त्यांनी आपली गाणी बरोबर आणली. मुलांना खेळवताना ती गाणी म्हणू लागल्या. 'कानडीनं केला मराठी भ्रतार' हा तुकारामाचा चरण उगीच नाही. आम्ही महाराष्ट्रीय तुम्हा कर्नाटकी स्त्रियांना आवडत असू, हीच गोष्ट खरी.''

विश्वास, भाईजी एकदा म्हणाले की, मागं महाराष्ट्रांत चौदाव्या शतकात दुर्गादेवीचा दुष्काळ पडला. बारा वर्षे तो दुष्काळ सतत होता. त्यावेळी महाराष्ट्रातले हजारो लोक घरंदारं सोडून खाली कर्नाटकात आले व कर्नाटकातच राहिले. तिथं मग त्यांनी लग्नं केली. संसार मांडले. परंतु पुढं पुन्हा महारष्ट्रात ते गेले. अर्थात कानडी बायको बरोबर घेऊन ते गेले आणि

त्यामुळं ही कानडी संस्कृती महाराष्ट्रात आली. भाज्यापाले, मुलांचे खेळ, गाणी सारं आलं. तुम्ही दुष्काळी लोक कर्नाटकात आलेत. कर्नाटकी स्त्रियांनी तुमची कीव केली. तुमचे संसार त्यांनी मांडले. आणि विश्वास, महाराष्ट्राची उगीच ऐट नको सांगूस. तुमचे अटकेपार झेंडे गेले. परंतु घोडे कुठले होते?''

''कुठले म्हणजे?''

''अरे, ती भीमथडी घोडी होती. माझ्या गावची. अजूनही आमच्याकडची घोडी कणखर म्हणून प्रसिद्ध आहेत.''

''संध्ये, तू वेडी आहेस. अगं, भीमथडी घोडी म्हणजे पुणे जिल्ह्यातल्या भीमथडी तालुक्यातील. तुझ्या गावच्या भीमनदीकाठची नाहीत काही.''

''नाही कशी? आमच्याकडचीच घोडी भीमथडी–भीमेच्या तीराची म्हणून प्रसिद्ध आहेत.''

''संध्ये, जाऊ दे. घोडी तुमच्याकडची कबूल; परंतु वर कोण बसले? मराठी वीरच ना?''

''विश्वास, काल रात्री जेवताना तुला भाजी आणखी हवी होती. होय ना?'' एकदम आठवण होऊन संध्या म्हणाली.

''परंतु रंगा म्हणाला, मी पातेलं उष्टं केलं. मग काय करणार? काल माझ्या तोंडाला थोडी चव होती.''

''विश्वास, रंगानं युक्ती केली. उष्टी केली असं म्हटलं म्हणजे तू घेणार नाहीस. उष्टी असली तरी चालेल असं तू म्हणतास, म्हणजे रंगाची जिरली असती. आमची आजी होती. तिची एक गंमत सांगू का? एकदा कसली तरी पंगत होती आमच्याकडे. एक भाजी फारच छान झाली होती. लोक सारखी तीच मागायचे. भाजी संपत आली. इतक्यात आजी मागील दाराहून ओरडली, 'हड् हड्! अरे, कुत्रं शिवलं पातेल्याला. भाजीत तोंड

घातलं. कुठून आलं मेलं? तुमचं लक्ष कसं नाही कुणाचं? हड् मेल्या.' मंडळींनी ते शब्द ऐकले. ते काय काय म्हणून विचारू लागले. शेवटी आजीनं येऊन सांगितलं की, 'काय करणार? कुत्रं शिवलं भाजीला.'' लोक म्हणाले, ''त्यालाही ती आवडली वाटतं. त्यालाही तिचा मोह सुटला. फार छान होती आजची भाजी.' अशी हो आजी मोठी शहाणी, समयसूचक.''

''संध्ये, तू आजीची फार लाडकी होतीस, होय ना?''

''हो. मला तिची किती आठवण येते म्हणून सांगू. कधी कधीं आपलं मला वाटतं की, आजी माझ्या अगदी जवळ आहे. विश्वास, मेल्यावर माणसाचं काय रे होत असेल? केवळ चिमूटभर का राख? सारा खटाटोप, त्याचं सारं म्हणजे का मूठभर भुरी? काय आहे हे जन्ममरणाचं कोडं?''

''अद्याप शास्त्राला याचा नीट उलगडा करता आला नाही. एक दिवस या सर्व गोष्टींवर नीट प्रकाश पडेल.''

असे दिवस जात होते. आणि एके दिवशी कल्याण, बाळ वगैरे निघून गेले. कल्याणने संध्येचा निरोप घेतला. जिन्याच्या तोंडाशी दोघे उभी होती. संध्या थरथरत होती.

''कल्याण!''

''रडू नको. मला आनंदानं जा म्हण. मी तुझ्याजवळ आहे.''

''जा हो, कल्याण, संध्येचा तू आहेस, त्यापेक्षा तू क्रान्तीचा अधिक आहेस. दोन नद्या एकत्र मिळतात, परंतु त्या एकमेकींतच घोटाळता कामा नयेत. सागराकडे त्यांना जायचं असतं. आपल्या दोघांचे जीवनप्रवाह शेवटी क्रान्तीसाठी आहेत.''

''कसं ओळखलंस? जप हो, संध्ये; आनंदी राहा.''

''जा हं, कल्याण; संध्येच्या विचारानं खिन्न होऊ नकोस.''

ते सारे मित्र गेले.

''संध्ये!'' विश्वासने हाक मारली.

संध्या बोलेना. ती खिडकीत उभी होती. तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत होत्या. तिला हुंदका आला. जोराचा हुंदका. इतक्यात रंगाही आला.

''वैनी, हे काय?'' रंगा म्हणाला.

''संध्ये, उगी!'' विश्वास म्हणाला.

संध्या गंभीर झाली. रंगाचे जेवण राहिले होते. तो जेवला. सारी निजली. परंतु संध्या जागी होती. तिने हळूच आपली ट्रंक उघडली. ट्रंकेतील मूर्ती तिने काढली. तिने ती जवळ घेतली. स्वतःच्या अश्रूंचे तिने तिला स्नान घातले.

''देवा, माझी दया तुला!'' एवढेच ती म्हणाली. पुन्हा ती मूर्ती तिने ट्रंकेत ठेवली. ती अंथरुणावर पडून राहिली.

एके दिवशी उजाडता संध्या आपली केस विंचरीत होती, तो दारात कोण उभे? कोण बरे आले होते? कल्याण का?

''भाईजी, या ना? आता कुठून तुम्ही आलेत?''

''संध्ये, मी एकदम खानदेशातून आलो.''

''का बरं अकस्मात? तुम्हालाही तिकडे जायचं आहे की काय?''

''तिकडे म्हणजे कुठं?''

''बाळ व कल्याण गेले आहेत तिकडे.''

''ते मला काही माहीत नाही. संध्ये, मी आलो, कारण माझ्या स्वप्नात सारखी तू दिसत असतेस आणि तुझे डोळे एकदम भरून येत. मला काही समजेना. तीन दिवस असं झालं. म्हणून मी आलो. वाटलं की तू संकटांत आहेस. परंतु तू बरी आहेस हे पाहून माझा जीव खाली पडला. विश्वास, तुझं रे कसं आहे?''

''बरं आहे. वजन वाटंलं आहे. टी. बी. खास नाही.''

''भाईजी, कपडे काढा ना.'' संध्या म्हणाली.

भाईजींनी कपडे वगैरे काढले. शौचमुखमार्जन त्यांनी केले. संध्येने कपभर दूध दिले.

''दूध कशाला मला?'' ते म्हणाले.

''घ्या हो. हल्ली विश्वासला दूध येतं.''

''कोण पाठवतं?''

''त्याच्या घरी डेअरी आहे.''

''परंतु दूध कोण पाठवणार?''

''भाईजी, माझी आई सावत्र असली, तरी सख्ख्या आईहून माझ्यावर तिची माया आहे. ती पाठवते दूध. त्या दिवशी वडिलांच्या नकळत मला आंबेही तिनं पाठवले. गोड गोड आंबे. मी एक आंबा एक तासभर खात होतो. आईचं प्रेम पाहून मी उचंबळलो होतो.''

''तुझ्या कोमल भावना तू मारून ना टाकल्या आहेस?''

''आजारीपणात त्यांना पुन्हा पल्लव फुटले आहेत.''

विश्वासला खाली शौचाला जायचे होते. तो उठला तो एकदम झोक गेला.

''विश्वास, थांब; मी तुला धरून नेतो.'' भाईजी म्हणाले.

''मी जाईन हळूहळू. मला नाही धरलेलं आवडत.'' तो म्हणाला.

''इथं आवडनावड कसली आहे, विश्वास? तू अगदी हट्टी आहेस; थांब.'' भाईजी म्हणाले.

परंतु विश्वास निश्चयी स्वरात नको म्हणाला. तो एकटाच गेला. भाईजी खिन्न होऊन तेथे बसले. थोड्या वेळाने ते संध्येला म्हणाले :

''संध्ये, कल्याण, बाळ वगैरे सारे कुठं गेले आहेत?''

''ते त्या कामासाठी गेले आहेत. तुम्हीही त्यांना पैसे दिलेत. होय ना? भाईजी, पुढं काय काय होईल?''

''संध्ये, तू कल्याणला जाऊ कसं दिलंस? त्याला धरून का ठेवलं नाहीस? तुझ्या अश्रूंनी त्याला खेचून ठेवलं असतं. तुझे अश्रूही का दुबळे ठरले?''

''भाईजी, मी शांतपणे निरोप दिला. माझ्या मोहात का मी त्यांना अडकवू? त्यांच्या ध्येयाकडे त्यांना जाऊ दे. घरी त्यांचा रोज कोंडमारा होतो. जवळ पैसे नाहीत. क्रान्तीचं काम वाढत नाही. कुठून आणायचे पैसे? माझ्या अश्रूंची माणिकमोती झाली असती, तर कल्याण जाता ना. परंतु अश्रू ते अश्रू. गरीब बिचारे अश्रू. ते कल्याणला कसे रोखू शकणार? जाऊ दे कल्याणला. भाईजी, तुम्ही वाईट नका वाटून घेऊ. जे जे होईल ते ते मी सारं समाधानानं सहन केलं पाहिजे. मी वाईट वाटून घ्यायचं सोडून दिलं आहे. मग तुम्ही का वाईट वाटून घेता? तुम्ही आता इथंच राहा. पोटात बाळ वाढत आहे. मला कधी भीती वाटते. कसं हाईल असं वाटतं. आशानिराशांचा खेळ सुरू आहे. तुम्ही इथं राहा. तुम्ही जाऊ नका. माझं बाळ पाहून मगच तुम्ही जा. तुमच्या हातांनी त्याला पाळण्यात घाला. तुम्हीच त्याचं नाव ठेवा. हे काय भाईजी, तुम्ही काहीच का बरं बोलत नाही? तुम्हीही संध्येवर रागावलेत?''

''संध्ये, तू आपण होऊन कल्याणला जायला परवानगी दिलीस?''

''होय भाईजी; मी खरंच परवानगी दिली. संध्येशी लग्न लागण्यापूर्वीच कल्याणचं क्रान्तीशी लग्न लागलेलं आहे. मी कल्याणची आवडती असले, तरी पट्टराणीचा मान माझा नसून क्रान्तिदेवीचा आहे.''

◆◆◆

## १६...
# आशेचे खेळ

''संध्ये, मी तुझ्याकडे राहीन, परंतु एका अटीवर.''

''भाईजी, तुम्हीसुद्धा अटी घालू लागलेत? तुमचं देणंसुद्धा सशर्त होऊ लांगलं?''

''संध्ये, साधी अट आहे. साधी शर्त आहे.''

''सांगा, कोणती?''

''मला दोन्ही वेळा स्वयंपाक करू देणार असशील, तर मी इथं राहीन. तुला आता विश्रांती पाहिजे. संध्ये, तू अशक्त झाली आहेस. तुला काही इंजेक्शन्सही द्यायला हवीत.''

''इंजेक्शन्स कशाला?''

''जरा शरीरात रक्त वाढायला. तू फिक्कट दिसतेस हो, बाळ.''

''परंतु इंजेक्शन्स द्यायला पैसे हवेत.''

''बघू. आपण. परंतु मला स्वयंपाक करू द्यायला तरी पैसे नकोत ना?''

'' कुणाला माहीत? तुमच्यासारखा आचारी का मोफत स्वयंपाक करील?''

इतक्यात विश्वास बाहेरून आला. तो आता जरा हिंडूफिरू लागला होता. त्याच्या चेहऱ्यावरही जरा तजेला आला होता. विद्यार्थ्यांमध्ये पुन्हा त्याची जा–ये सुरू झाली होती. लवकरच सर्व विद्यार्थ्यांचा हरताळ पडायचा होता. त्यासाठी तो हालचाली करायला गेला होता. पत्रके छापून घेण्यासाठी गेला होता.

''विश्वास, हे भाईजी काय म्हणतात, ऐकलंस का?''

''ते जाऊ म्हणत असतील, होय ना? भाईजी, आमच्यावर प्रेम आहे म्हणता, परंतु चार दिवसही तुम्ही आमच्याकडे राहात नाही. आलेत नाहीत तो तुमची जायची तयारी!''

''या वेळी नाही का राहिलो?''

''मी आजारी होतो म्हणून राहिलेत. परंतु आता मी बरा झालो आहे. राहा चार दिवस. विद्यार्थ्यांचा हरताळ आठवड्यानं आहे. तुम्ही त्या दिवशीच्या सभेला अध्यक्ष व्हा.''

''मी होणार नाही.''

''तुम्हाला झालं पाहिजे. आम्ही तसं ठरवूनही टाकलं आहे. तुम्ही का आमची फजिती करणार? असं काय भाईजी?''

''विश्वास, या नसत्या भानगडी माझ्या पाठीमागं तुम्ही काय म्हणून लावता? का ही लादालादी?''

''पुन्हा नाही तुम्हाला विचारल्याशिवाय आम्ही काही करणार. परंतु या वेळी तरी तुम्ही आमची अब्रू सांभाळा.''

''विश्वास, तुमचा मी गुलाम आहे.''

''प्रेमानं गुलाम होण्यात तुम्हाला मोक्ष मिळतो ना? संध्ये, हे काय म्हणत होते? यांना जाऊ देऊ नकोस. नाही तर निमूटपणं निघून जातील व मागून पत्र पाठवतील की मला राहणं अशक्य झालं म्हणून निघून गेलो. तुझं ते ऐकतील.''

''परंतु ते एका अटीवर इथं राहणार.''

''कोणत्या?''

''म्हणतात, की मला स्वयंपाक करू दिला पाहिजे.''

''भाईजी, तुम्ही पुरुष कशाला झालेत?''

''स्वयंपाक पुरुषांनी करू नये असं तुझ्या मार्क्सवादात आहे वाटतं? शास्त्रीय विरोधविकासवादात आहे वाटतं?''

''भाईजी, तुम्ही मार्क्सवादाबद्दल असं उपहासानं नेहमी का बोलता? होय, आमचा शास्त्रीय समाजसत्तावाद शास्त्रीय विरोधविकासवाद आहे, शास्त्रीय ऐतिहासिक भौतिकवाद आहे; आमचा सदैव शास्त्रीयच दृष्टिकोन असतो. भोळसटपणा हे आमचं ब्रीद नव्हे. समाजाच्या गतीचे आम्ही नियम शोधून काढतो. त्यावरून पुढील अनुमानं काढतो. शास्त्रावर आमची श्रद्धा आहे.''

''आणि शस्त्रावर, हिंसेवरसुद्धा?''

''होय; क्रान्ती करण्यासाठी शस्त्रही आम्ही हाती धरू, समजलंत? तुम्ही भरा बांगड्या.''

''बांगड्या भरणारे हात विश्वास, दुबळे नसतात. स्त्रियांविषयी नकळत तुमच्या तोंडून पाहा कसे अनुदार उद्‌गार बाहेर पडतात ते आणि शस्त्र हाती न घेणारा तो भ्याडच असतो असं नाही. दुष्टाच्या शस्त्रासमोर निर्भयपणं उभा राहणारा तो का भ्याड? 'चलाव तेरी गोली' असं म्हणून गुरख्यासमोर स्वत:ची विशाल छाती उघडी करणारे स्वामी श्रद्धानंद, ते का भीरू?''

''वाद नकोत. भाईजी, तुम्ही राहणार की नाही ते सांगा. मला पुन्हा बाहेर जायचं आहे.''

''विश्वास, पुन्हा तुझी धावपळ सुरू झाली. आजारी का पुन्हा पडायचं आहे? जरा जपून वाग.''

''तुम्ही यासाठीच तर इथं राहा आमची जरा काळजी घ्यायला. 'जपून वागा' असं सांगायला.''

''मग स्वयंपाक मी करीत जाऊ ना?''

''संध्ये, दे त्यांच्या हातात चूल. होऊ दे त्यांचं समाधान. भाईजींच्या मनाचा कोंडमारा नको. करा हं स्वयंपाक, नीट करा. तुमचा आत्मा त्यात ओता.''

''माझ्या आत्म्याची टिंगल तुम्हाला चालते ना?''

''ही टिंगल का? म्हटलं आत्मा ओता व मोक्ष मिळवा.''

''होय, मिळवीन. तीच माझी धडपड आहे.''

विश्वास पुन्हा बाहेर गेला. आणि त्या दिवशी सायंकाळपासून भाईजी स्वयंपाक करू लागले. संध्या अंथरुणावर पडून राही. काही वाची. भाईजींना थोडी मदत करी. गप्पागोष्टी करी. दिवस आनंदांत जात होते. भाईजी दुपारी वाचीत. समाजवादावरची पुस्तकं वाचीत. विश्वास निरनिराळी पुस्तकं त्यांना आणून देई.

''तुम्हाला मी दोन पुस्तकं देईन. त्यांचा मराठी अनुवाद करा, भाईजी. तुम्ही छान कराल. तुमचं भाषांतर भाषांतर असं वाटत नाही. आमचं भाषांतर बोजड होतं. क्लिष्ट होतं. कराल का?''

''तुझी इच्छा असेल तर ती पुरी नको का करायला? माझा जो उपयोग करून घेता येईल, तो करा.''



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

''परंतु तुम्ही तर चूल हातात घेता.''

''विश्वास, संध्येला सध्या विश्रांती नको का? तिचं हे पहिलं बाळंतपण. वास्तविक माहेरी जाऊन आईजवळ लडिवाळपणानं व भरवशानं राहण्याचे हे दिवस. म्हणून मी बसतो चुलीजवळ. तुम्हाला इतर कामं आहेत. मला काय आहे काम? मी चुलीजवळ बसण्यातच धन्यता मानतो. माझ्या आयुष्यात हे हल्लीचे दिवस मी भाग्याचे मानीन. सार्थकी लागले हे दिवस असं समजेन. तू दिलेल्या पुस्तकांचंही भाषांतर करीन. इतर वेळ थोडा का असतो?''

भाईजी त्या पुस्तकांचा अनुवाद करू लागले. पहाटे तोंड वगैरे धुऊन लिहायला बसत. आठ वाजेपर्यंत लिहीत. मग मंडईत जाऊन भाजी वगैरे घेऊन येत. नवानंतर ते शेगडी पेटवीत. स्वयंपाक करीत. दुपारीही ते लिहीत. त्यांना खूप आनंद वाटत होता. चेहऱ्यावर तो दिसत होता. भाईजींच्या वृत्ती पटकन प्रकट होत असत. लपवालपवी त्यांच्याजवळ नसे. त्यांना ती साधतही नसे.

''भाईजी, हल्ली तुमचं तोंड फुललेलं दिसतं.'' संध्या म्हणाली.

''होय. हल्ली माझा प्रत्येक क्षण कामात जात आहे. ज्या दिवशी मला वेळेचा हिशेब देता येतो, त्या दिवशी संध्ये, मी अत्यंत आनंदी असतो. त्या दिवशी मी अधिक जेवतो. जेवण्यात त्या दिवशी रस वाटतो, चव वाटते.''

त्यांचे असे बोलणे चालले होते, इतक्यांत पोस्टमनने काही तरी लठ्ठ टाकले व तो गेला.

''काय आहे गं, संध्ये?''

''ही ती एजन्सी आली. हे फॉर्म वगैरे आहेत.''

''कसली एजन्सी?''

''लुधियाना येथील कापडाची. हे कापडाचे नमुने आहेत. त्यांना ऑर्डरी

मिळवून द्यायच्या. आपणाला कमिशन मिळतं. कल्याणनं त्यांच्याशी पत्रव्यवहार चालवला होता. आता तो आला की एजंट होईल. बरं होईल.''

''हे कापड खपतं वाटतं?''

''हो. मागं कल्याणच्या एका मित्राला बऱ्याच ऑर्डरी मिळत. तो मित्र दुसरीकडे गेला, म्हणून कल्याणनं अर्ज केला होता. चांगलं झालं. परंतु कल्याण कधी येईल, भाईजी? त्याचं पत्रही नाही.''

''येईल हो संध्ये, चिंता नको करू.''

''तुम्हाला खरंच का वाटतं, की ते येतील सारे?''

''हो, वाटतं.''

आणि एके दिवशी रात्री खरेच ते सारे आले. संध्या, रंगा, विश्वास, भाईजी सारी झोपलेली होती आणि दरवाजावर विश्वास, विश्वास अशा हाका ऐकू आल्या. संध्या एकदम जागी झाली.

''विश्वास, रंगा, जा रे दार उघडा; कल्याण आला, जा.''

विश्वास व रंगा उठले. रंगा धावतच गेला. त्याने दरवाजा उघडला. कल्याण, बाळ वगैरे सारे आले. खोलीत आले. संध्या एकदम कल्याणजवळ गेली. त्याने तिच्या पाठीवर थोपटले. संध्येने त्याच्या खांद्यावर मान ठेवली. तिला बोलवत नव्हते. तिचे हृदय भरून आले होते.

''संध्ये, चल, तुझ्या अंथरुणावर बसू.''

थोडा वेळ सारे मित्र बसले. सारे थकलेले होते. लौकरच सारे अंथरुणे पसरून झोपली गेले. संध्येला झोप लागेपर्यंत कल्याण तिच्याजवळ बसला होता. तिला झोप लागल्यावर तोही एका सतरंजीवर एक चादर पांघरून झोपी गेला.

भाईजी मात्र जागे होते. त्यांना फार आनंद झाला होता. देवाने आपली

व संध्येची प्रार्थना का ऐकली, असे त्यांच्या मनात आले. परंतु तो अहंकार क्षणात दूर गेला. आपण प्रार्थना न केल्या तरीही देवाला जे होऊ नये असे वाटत असेल, ते तो होऊ देणार नाही. त्याच्या विश्वाच्या विकासमार्गात जे मोडणे, तोडणे, जे जोडणे, सांधणे, त्याला योग्य दिसेल ते तो करवून घेईल. मानवाला ते क्रूर दिसो व हिडीस वाटो. बरे वाटो वा बुरे वाटो. भाईजी पुन्हा शांत व गंभीर झाले. परंतु त्यांनी हात जोडले व आपले डोके लवविले. देवा, सांभाळ तुझी ही मुले. त्यांना उत्साह दे. त्यांच्या हातून मला आवडणारेच काम होऊ दे. त्यांना निराश नको करू. अशी त्यांनी प्रार्थना केली व

'नेदी दिसों केविलवाणे। पांडुरंगा तुझें तान्हे'

हा आपला आवडता अभंगचरण त्यांनी मनात कितीदा तरी म्हटला व तो गुणगुणतच तेही शांतपणे झोपले.

''दादा, डेक्कन जिमखान्यावर तुला एके ठिकाणी ते कापडाचे नमुने घेऊन एकाने बोलावलं आहे. काय त्याचं नाव-'' रंगा सांगू लागला व आठवू लागला.

''मला माहीत आहेत ते गृहस्थ. जाणार आहे त्यांच्याकडे; विश्वास, तूही येतोस ना? आज दोघे जाऊ.'' कल्याण म्हणाला.

''जाऊ . दोन तास येऊ हिंडून!'' विश्वासने उत्तर दिले.

''जरा गोड बोलत जा विश्वास, गिऱ्हाईकाजवळ; नाही तर तू संतापायचास व उठाव झेंडा बंडाचा तिथंच म्हणू लागायचास!'' संध्या म्हणाली.

''तूच जा की गोडूबाई हिंडायला आणि आण ऑर्डरी.''

''जाईन हो. मला काही त्यात लाज नाही वाटत.''

''लाज वाटायचा प्रश्न नाही. ऑर्डरी मिळवण्याचा आहे.''

''विश्वास, परत केव्हा याल? संध्येला मग भूक लागते.'' भाईजींनी विचारले.

''उशीर झाला तर तुम्ही बसा.'' कल्याण म्हणाला.

ते दोघे हिंडायला गेले. कापडाचे नमुने घेऊन गेले. रंगा दुकानात गेला. संध्या तांदूळ निवडीत होती. भाईजी विस्तव पेटवीत होते. इतक्यात मालक वर आला.

''गेले वाटतं बाहेर?'' त्याने विचारले.

''हो, आताच गेले.'' संध्या म्हणाली.

''एक बातमी सांगायला आलो होतो.'' तो म्हणाला.

''कसली.''

''आपल्या घराभोवती अलीकडे पोलीस हिंडतात–फिरतात. मला वाटतं की तुमच्या जाण्यायेण्यावर त्यांची टेहळणी असते.''

''अहो, आम्हाला ते माहीत आहे. त्याची काही काळजी नको. आम्हाला सवयच आहे ह्या साऱ्या गोष्टींची.''

''तुम्हांला काळजी नाही, पण आम्हाला आहे. अहो, आज बाहेर बाहेर हिंडताहेत. उद्या घरात येऊन ठाणं द्यायचे. तुम्ही जरा जपूनच राहा, एवढंच मला सुचवायचं आहे.''

''बरं.'' संध्या म्हणाली.

मालक निघून गेला.

''भाईजी, झडती वगैरे घेईल की काय?''

''परंतु झडतीसारखं घरात तर काही नाही.''

''पुन्हा या सर्वांना अटक तर नाही होणार?''

''तसं सध्या तरी वाटत नाही. तू काळजी नको करू.''

संध्या पुन्हा गुणगुणू लागली. हल्ली ती गाणी गुणगुणे. मैना जरा सुखावली होती, मंदावली होती. ती खाटेवर वर्तमानपत्र वाचीत पडली होती. काय वाचीत होती? ती वाचीत होती, की त्यांत काही चित्रबित्र पाहात होती?

''संध्ये, काय एवढं आहे त्या पत्रात?''

''काही नाही.''

''पत्र डोळ्यांसमोर तर सारखं धरून बसली आहेस!''

''एक चित्र पाहात होते, भाईजी.''

''चित्र?''

''हो.''

''कसलं आहे? व्यंगचित्र?''

''व्यंगचित्र नव्हे, दुसरं एक चित्र.''

''पाहू दे, मला दाखव.''

''तुम्ही हसाल, मी नाही दाखवीत.''

''तू नको दाखवू, मीच बघतो. आण बरं तो अंक.'' संध्येने स्मित करीत तो अंक भाईजींजवळ नेऊन दिला. ते पाहू लागले, तो चित्र कोठेच दिसेना.

''संध्ये, कुठं आहे चित्र?''

''डोळे असतील, तर दिसेल!''

''अगं, डोळे आहेत.''

''जरा निराळे डोळे हवेत. कल्पनेचे डोळे हवेत, आशेचे डोळे हवेत. भविष्य राज्याकडे पाहण्याचे डोळे हवेत.''

''तू काव्यच बोलू लागलीस!''

''कधी कधी मला काव्य बोलता येतं.''

''संध्ये, तुम्हा सर्वांची जीवनं म्हणजेच महाकाव्यं.''

''चित्र बघा ना पण आधी.''

''संध्ये, या पानावर तर चित्र नाही. फक्त इकडे ही एक जाहिरात आहे बालामृताची. आणि ही एक माता आहे. तिच्याजवळ एक मूल आहे. गुटगुटीत मूल. या जाहिरातीशिवाय दुसरं काय आहे या पानात? हे चित्र का तू पाहात होतीस? हं, आलं ध्यानात; हो खरंच संध्ये?''

''इतका वेळ लागला ना? आणि म्हणजे मी कविहृदयाचा!''

''संध्ये, एके काळी माझ्या जीवनात काव्य होतं.''

''आता का नाही? भाईजी, तुमच्या जीवनात काव्य नसतं, तर इथं संध्येसाठी स्वयंपाक करीत नसतेत हो बसलेत. भाईजी, काव्य म्हणजे शेवटी सहानुभूती असं नाही का?''

''होय; कवीचं हृदय मऊ मेणासारखं असतं. आजूबाजूच्या सुखदु:खांचे ठसे, आजूबाजूच्या परिस्थितीचं प्रतिबिंब त्याच्या हृदयावर पटकन् उठत. आणि प्रतिभेची सुई लागून तबकडी फिरू लागते, गाऊ लागते. गीत तयार होतं.''

''भाईजी, हे चित्र मी दिवसांतून शंभर वेळा तरी पाहते. तुम्ही इतर बातम्या वाचता, परंतु मी हीच एक बातमी रोज वाचते. असंच का माझ्या मांडीजवळ बाळ असेल, असं गुटगुटीत व गुबगुबीत? किती तरी कल्पना माझ्या मनात येतात. मला आनंद होतो. मी सारखं हे चित्र पाहते. भविष्याचं चित्र. संध्याराणीच्या भावी राज्यातील चित्र.''

''संध्ये, किती तुझं कोवळं मन! भावनाशील मन.''

''भाईजी, तुमच्याजवळ म्हणून हे सारं बोलते. हे का हृदयाचं काव्य

बोलून दाखवायचं असतं?''

''नाही हो संध्ये. तुझ्या कोमल मधुर भावना, तुझी स्वप्नं तू माझ्याजवळ बोलतेस, हे माझं भाग्य.''

''भाईजी, डाळ जळली वाटतं, वास आला.''

''आपण बोलतच असला.''

भाईजी चुलीजवळ गेले. स्वयंपाकात रंगले, दंगले. संध्याराणी पुन्हा अंथरुणावर पडली. ते वर्तमानपत्र तोंडावर घेऊन ती झोपली. तिला शांत झोप लागली.

अकराच्या सुमाराला विश्वास व कल्याण परत आले. बाळ आज आपल्या घरी जेवायला जाणार होता. दोघे मित्र बरेच थकले होते. ते बसले.

''संध्ये?'' कल्याणने हाक मारली.

''आलास का? ये, बस माझ्याजवळ.'' ती डोळे उघडून म्हणाली. आणि कल्याण तिच्याजवळ जाऊन बसला.

''मिळाल्या का ऑर्डरी?'' तिने हसत विचारले.

''आज एक चांगलं गिऱ्हाईक भेटलं, संध्ये.''

''मोठी ऑर्डर मिळाली.'' विश्वास म्हणाला.

''कितीची रे?'' भाईजींनी विचारले.

''असेल पंचवीसाची,'' संध्या म्हणाली.

''अगं, सव्वाशेची ऑर्डर मिळाली.'' कल्याण म्हणाला.

''खरंच का?'' संध्येने उठून विचारले.

''खरंच, ही बघ!'' तो म्हणाला.

''आज दोन घास जास्त खा.'' ती म्हणाली.

मोठी ऑर्डर मिळाली म्हणून सर्वांना आनंद झाला. रंगाही जरा लौकरच

आज आला. सारी एकदम जेवायला बसली.

''रोज अशी एक ऑर्डर मिळाली तर किती छान होईल?'' विश्वास म्हणाला.

''निदान इतक्या रुपयांच्या ऑर्डरी रोज मिळायला हव्यात.'' कल्याण म्हणाला.

''परंतु दादा, ही ऑर्डर खरी असेल का?'' रंगाने संशय घेतला.

''तो चांगला होता तरुण. विद्यार्थी आहे. एलएल. बी.च्या वर्गातला. लांबचा आहे. उमरावती–अकोल्याकडचा. तिकडचे लोक श्रीमंत असतात.''

''त्यानं ॲडव्हान्स दिला का?''

''संध्याकाळी त्याच्याकडे जायचं आहे. तो असाच एके ठिकाणी भेटला. त्याच्याजवळ तेव्हा पैसे नव्हते. परंतु माल कोणता कोणता पाहिजे ते टिपून घेतलं.''

''आज मी बरोबर होतो म्हणून अशी ऑर्डर मिळाली. संध्ये, माझा पायगुण.'' विश्वास म्हणाला.

''रोज तूच जा हिंडायला. पायगुण दिसू दे रोज.'' ती म्हणाली.

''विश्वास, आमटी घे की आणखी.'' भाईजी म्हणाले.

''आज मला केवढी मोठी वाटी तुम्ही ठेवली आहे! ही वाटी का वाटेश्वर?''

''पोटभर आमटी पीत जा. ते तुझं टॉनिक.'' संध्या हसून म्हणाली.

''संध्ये, भाईजींची आमटी खरंच मला आवडते. सारं पातेलं पिऊन टाकावंसं वाटतं. परंतु तुम्ही नावं ठेवाल, हसाल, म्हणून मी भितो.'' विश्वास म्हणाला.

''पातेलंभर नको पिऊ, संध्या वाटीभरच पुरे.'' भाईजी म्हणाले.

''तुम्ही असा माझा सूड नका घेऊ. तुमची दृष्ट पडेल हो माझ्यावर!'' विश्वास हसून म्हणाला.

गप्पागोष्टी होत जेवणे झाली. रंगा थोड्या वेळाने दुकानात जायला निघाला. तो संध्येने त्याला काही तरी कानात सांगितले. रंगा हसला.

''काय रे रंगा सांगते आहे?'' कल्याणने विचारले.

''रंगा, आळीमेळी हं!'' संध्या म्हणाली.

रंगा हसून निघून गेला.

''काय गं सांगितलंस आणायला?'' विश्वासने विचारले.

''कोबीचा कांदा, दुसरं काय?'' कल्याण म्हणाला.

''नाही तर सोनचाफ्यांची फुलं असतील.'' विश्वास बोलला.

''तुम्हाला नाहीच ओळखता येणार.''

''मी ओळखू, संध्ये?'' भाईजींनी विचारले.

''ओळखा हो?'' संध्येने आव्हान केले.

''रंगा आहे शिवणकामाच्या दुकानात. दुकानात चिंध्या असतात पुष्कळ. कापडाचे तुडकेटाकडे उरतात. ते आणायला सांगितले असशील. होय ना?'' भाईजी म्हणाले.

''चिंध्या कशाला?'' कल्याणने विचारले.

''तुला गोधडीबुवा करायला?'' विश्वास म्हणाला.

''शेगडी पेटवायला पाहिजे असतील. होय ना?'' कल्याणने विचारले.

''भाईजी, बोलू नका हं? माझ्या चिंध्या असोत की काही असो. तुम्हाला काय पंचायती?'' संध्या म्हणाली.

दुपारी भाईजी भाषांतर करीत बसले. कल्याण व विश्वास बाहेर जायला निघाले.

''इतक्या उन्हातून कुठं जाता?'' संध्येने विचारले.

''एके ठिकाणी आमची बैठक आहे.''

''आणि त्या ऑर्डर देणाऱ्याकडे जायचं आहे ना? विसराल हो.'' तिने आठवण दिली.

''नाही विसरणार.''

''भाईजी, तुम्हाला भाषांतराचं काम चांगलं मिळालं की नाही?'' कल्याणने विचारले.

''मनाजोगं.'' ते म्हणाले.

''तुम्ही असे असेच कोपऱ्यात बसा व आम्हाला खूप लिहून द्या.'' कल्याण म्हणाला.

''नाही; भाईजींना प्रचारासाठी बाहेर काढलं पाहिजे. कल्याण, या दिवशीचं विद्यार्थ्यांच्या सभेतलं त्यांचं भाषण किती सुंदर झालं! सारं वातावरण त्यांनी गंभीर व उत्कट केलं. आरंभीच्या वक्त्यांच्या भाषणांनी सभेत पोरकटपणा उत्पन्न केला होता. परंतु भाईजी बोलू लागले व एकदम चमत्कार झाला. भाईजी, तुम्ही कोपऱ्यात नका बसू. तुम्ही स्वतःच्या शक्ती वाया दवडीत आहात. तुम्हाला कोणी उत्तेजन देणारं मिळालं नाही, म्हणून हे असं झालं. आम्ही तुम्हाला महाराष्ट्रभर नेऊ. तुम्ही सारं. वातावरण चेतवाल.'' विश्वास म्हणाला.

''विश्वास, पूर्वीसुद्धा तू एकदा भाईजींना बरोबर घेऊन हिडायचं ठरवलं होतंस. तो निश्चय तसाच राहिला. आजचंही म्हणणं तसंच राहील. पैशाशिवाय साऱ्या गोष्टी फोल आहेत आणि तो प्रयत्न तर आपला फसला.'' कल्याण म्हणाला.

''पुन्हा प्रयत्न करू, आता मी पुढाकार घेईन.'' विश्वास म्हणाला.

''नकोत ते प्रयत्न.'' भाईजी म्हणाले.

''बसा तर कोपऱ्यात खरडीत!'' विश्वास रागाने म्हणाला.

दोघे मित्र निघून गेले. थोड्या वेळाने सायकलवरून रंगा आला. चिंध्या घेऊन आला. छान छान चिंध्या आणि सुंदर सुंदर कापडाचे उरलेले लहान लहान तुकडेही होते. रंगा देऊन निघून गेला.

''भाईजी, ही पाहा संध्येची चिंध्यांची संपत्ती. या, आपण निवडू.'' संध्येने हाक मारली.

निरनिराळ्या रंगांचे तुकडे त्यांनी अलग अलग केले. मोठे तुकडे अलग केले. बारके बाजूला काढले. संध्या व भाईजी चिंध्यांत रंगून गेले होते.

''संध्ये, या लहान लहान तिकोनी तुकड्यांच्या आपण चिमण्या करू. मला छान येतात. चिंध्यांच्या चिमण्या करायला. पाळण्यावर लावायला होतील. नाही? छान आहेत चिंध्या, रंगारंगांच्या.''

''भाईजी, या मोठ्या तुकड्यांचं मी काय करणार आहे. माहीत आहे.'' यांची दुपटी शिवीन. चित्रविचित्र रंगीत दुपटी. छान. दिसतील, नाही?''

''आणि हे तुकडे बाजुला का काढले आहेस?''

''त्याचं काय करणार आहे, सांगा.''

''काय बरं?''

''लहान आंगडी-टोपडी नकोत का करून ठेवायला? आधीपासून तयारी हवी, भाईजी. देवाच्या पूजेची आधीपासून तयारी लागते.''

''लहान मूल म्हणजे देवच. देवाची ती आशा. देवाघरचं ते खुशालीचं, आनंदाचं, आशेचं, आशीर्वादाचे पत्र नाही का?''

''भाईजी, तुम्ही चिमण्या करा व बाळाच्या पाळण्यावर टाकून ते हस रे माझ्या मुला' गाणं म्हणा हा. त्या गाण्यात चिमण्यासुद्धा आहेत. नाही?''

''हो आहेत.''

'चिमणी येऊन
नाचून बागडून
काय म्हणे मला
चिंवचिंव करीन
चिंता हरीन
हस रे माझ्या मुला'

असे आहेत ते चरण, म्हणेन तुझ्या बाळाला, लहानपणापासून बाळाला हसण्याचा मंत्र शिकू दे. सृष्टीचं मंगल स्वरूप त्यांला दिसू दे. संध्ये, स्पेन देशात यादवी चालली होती,तेव्हां मुलांच्या दृष्टीला भीषण दृश्यं पडू नयेत म्हणून तिथं किती जपत. जामिनीखाली तळघरांतून ती मुलं आनंदात राहात. तिथं गाणं, बोलपट, खेळ सारे असे. आणि वर बॉब पडून लोक मरत होते! वरती मरण व खाली भूमातेच्या हृदयाजवळ त्या तळघरांतून मानवजातीचं भविष्यकालीन हृदय नाचत असे.त्या मुलांचं मनोरम जीवन त्या तळघरांतून चालू असे. मुलांच्या डोळ्यासमोर मांगल्य ठेवा; फुलपाखरं ठेवा. संध्ये, ही बघ झाली ना छान चिमणी? तिच्या चोचीत दिले आहेत हे दोन लाल चिमणे धागे. जणू काही तरी नेत आहे! पिलांसाठी घरटं बांधायला धागेदोरे नेत आहे. नाही?''

''भाईजी. कसलं हे काम करायला मी तुम्हाला लावलं?''

''संध्ये. हे का कमी प्रतीचं काम? लहान मुलांची खेळणी निर्माण करणारा मनुष्य मला देवाचा सहकारी वाटतो. ईश्वर ज्याप्रमाणं या सर्व मानवी लेकरांसाठी फुलं, पाखरं, झाडंमाडं, चंद्र, तारे, नाना रंग, आकाशातील शोभा अशी अनंत खेळणी निर्माण करतो, त्याप्रमाणं आपणही आपल्या

लहान मुलांसाठी ही खेळणी करतो. संध्ये, देव आपणास आशीर्वाद देत असेल. तुझ्या–माझ्या बोटांत त्याची कला येऊन बसली असेल.''

संध्येने लहानसे टोपडे शिवले.

''भाईजी, बघा; हे लहान होईल ना हो?''

''जरा वाढत्या अंगाचंच संध्ये, शिवून ठेव. मोठं झालं तरी चालेल; परंतु फार लहान होऊन घालता नाही आला तर फजिती!''

अशा आनंदात वेळ जात होता. आशेचे खेळ चालले होते.

इतक्यात जिन्यात पावले वाजली.

''भाईजी, पटकन ट्रंकेत भरा सारं.'' संध्या म्हणाली.

घाईघाईने साऱ्या चिंध्या ट्रंकेत भरण्यात आल्या आणि विश्वास व कल्याण आले.

''काय कल्याण, लौकरसे आलेत?'' भाईजींनी विचारले.

''भाईजी, आमची सारी फजिती.'' विश्वास म्हणाला.

''काय झालं, विश्वास?'' संध्येने प्रश्न केला.

''ती सव्वाशे रुपयांची ऑर्डर देणारा तो तरुण निघून गेला घरी.'' विश्वास हसून म्हणाला.

''आणि ॲडव्हान्स !'' संध्येने विचारले.

''कसला ॲडव्हान्स? अगं तो गप्पाड्या होता. त्यानं केली आमची थट्टा. तेव्हाच जरा वाटलं की, एवढं कापड याला कशाला? परंतु वाटलं, हवं असेल. आम्ही आशाळभूत होतो. परंतु चांगलीच फजिती झाली.'' कल्याण म्हणाला.

''विश्वास, तुझा पायगुण असा कसा?'' भाईजींनी विचारले.

''परंतु. कालपासून आजपर्यंत चोवीस तास त्या आनंदात तर होतो

की नाही? मोठ्या ऑर्डरीचा आनंद उपभोगला. पुष्कळ झाला. विश्वास, वाईट नको रे वाटून घेऊ.'' संध्या हसून म्हणाली.

रंगाचं म्हणणं एकंदरीत खरं ठरलं.'' कल्याण म्हणाला.

''कल्याण उद्या कुठं जायचं हिंडायला? काही तरी ऑर्डरी मिळवायला हव्यातच. थोडे पैसे हवेत. हल्ली आपण भाईजींचे पैसे संपवून राहिलो आहोत.'' विश्वास म्हणाला.

''माझे पैसे म्हणजे तुमचेच, त्याचा संकोच कशाला?'' भाईजी म्हणाले.

''कोण करतो संकोच? नीट जेवत आहोत. तुम्हाला राबवीत आहोत. तुम्ही का मागच्या जन्मीचे आमचे देणेकरी आहात?'' विश्वासने विचारले.

''मागचा जन्म तू मानतोस, विश्वास?'' संध्येने विचारले.

''संध्ये, तू अगदी मला शब्दात पकडायला तयारच असतेस.'' विश्वास चिडून म्हणाला.

''चिडला, विश्वास चिडला'' संध्या टाळ्या वाजवून म्हणाली.

''कल्याण, आपण हे घर बदलायचं ना?'' भाईजींनी विचारले.

''काय घाई आहे.?'' कल्याण म्हणाला.

''परंतु मालक घाबरला आहे.'' संध्या म्हणाली.

''कल्याण, आपण आता जागा पाहू ती चांगली पाहू. जरा मोठी. चार खोल्या तरी हव्यात. एका खोलीत संध्येची खाट, पाळणा. एका खोलीत स्वयंपाक. छान पाहू जागा.'' विश्वास म्हणाला.

आपण पुढं सारी एकत्र राहणार. हरणीही राहायला येणार. अशा साऱ्या बेतानंच जागा घेऊ. म्हणजे पुन्हा पुन्हा बदलायला नको आणि दुसरी गोष्ट म्हणजे उजेड हवा.'' कल्याण म्हणाला.

''परंतु भाडं बरंच पडेल; ते कुठून द्यायचं?'' भाईजी म्हणाले.

''भाईजींना उगीच काळजी. रंगाला सहा रुपये मिळतात. कल्याण व विश्वास यांना रोज सव्वाशे–दीडशेच्या ऑर्डरी, म्हणजे रोज दहा रुपये कमिशन पडलं. पैशाची काय चिंता? कल्याण, चांगला बंगलाच घ्या हवेशीर.'' संध्या हसून म्हणाली.

''संध्ये, थट्टा करतेस आमची, होय ना? विश्वास म्हणाला.

''अरे गंमत, आशेवर जगावं, कल्पनेत रंगाव. मी तरी हल्ली आशेवर जगायला शिकत आहे. स्वप्नसृष्टीत रमायला शिकत आहे. स्वप्नसृष्टीत ना अडचण, ना आडकाठी. खरं ना भाईजी?'' संध्या म्हणाली.

''सारं जगच आशेवर चाललं आहे. क्रान्तिकारक आज उपासमारी काढतात, हालअपेष्टा काढतात, त्या तरी आशेच्याच जोरावर. भविष्यकालीन भव्य दर्शन त्यांना शक्ती देत असतं. पुढं जी सुंदर, वर्गहीन, अविरोधी समाजरचना त्यांच्या डोळ्यासमोर दिसते, तीमुळं ते सारे कष्ट सहन करतात. आशा म्हणजेअमृत  आशा म्हणजे जीवनाचं जीवन.'' भाईजी म्हणाले.

''संध्ये, कोणत्या बाजूला जागा घ्यायची?'' कल्याणने विचारले.

''तिकडे पर्वतीच्या बाजूला.'' ती म्हणाली.

''तिकडे मलेरिया आहे. डास आहेत.'' विश्वास म्हणाला.

''परंतु ढेकूण नाहीत ना?'' भाईजीनी विचारले.

''पुणं आणि ढेकूण नसणं अशक्य गोष्टी आहेत. पुण्याला काल बांधलेलं जरी घरं घेतलतं, तरी तिथं ढेकूण असतील. पुण्यातील मुलांना जन्मतांच ज्याप्रमाणं राजकारण मिळतं, त्याप्रमाणं पुण्यातील घरंही जन्मत:च ढेकूण घेऊन येत असतात. पुणं कशासाठी प्रसिद्ध, तर ढेकणासाठी असं भूगोलात का देत  नाहीत, कुणाला ठाऊक?'' विश्वास म्हणाला.

''ढेकणांना पुण्यातील लोक फार आवडतात. ढेकणासारखाच त्यांचाही

स्वभाव आहे. सर्वांना ते चिमटे घेतील. पुन्हा गनिमी काव्यात तरबेज, ढेकूण का पटकन  सापडतो? बचावासाठी तो वाटेल तिथं घुसेल.'' कल्याण म्हणाला.

''कल्याण, पुण्याला नाव नको हो ठेवू.'' विश्वास म्हणाला.

''न्यायमूर्ती रानड्यांना पुण्याची आठवण येऊन रडू येत असे; पुण्याशिवाय  त्यांना चैन पडत नसे. पुण्याला कोण नाव ठेवील? पुण्याला पूर्वीच्या पुण्यस्मृती आहेतच. परंतु हल्लीच्याही आहेत. लोकमान्य पुण्याचे, नामदार गोखले पुण्याचे, न्यायमूर्ती पुण्याचे, कर्मवीर कर्वे पुण्याचे, पहिले रँग्लर पुण्याचे; महात्मा ज्योतिबांची पुणं हीच कर्मभूमी आणि थोर आण्णासाहेब शिंदे यांची हीच कर्मभूमी. निबधमाला इथूनच निघे. केसरी इथूनच गर्जे. इथंच इतिहास संशोधक  मंडळ; इथंच मोठमोठ्या शिक्षणसंस्था; इथंच स्त्रियांत स्वावलंबन व स्वाभिमान उत्पन्न करणारं थोरं सेवासदन; पुण्याला प्रणाम करावा.'' भाईजी म्हणाले.

''भाईजी, पुण्याचं जागतिक आवळेल तेल राहिलं ना?'' विश्वास म्हणाला.

''भाईजींची यादी संपते की नाही म्हटलं!'' संध्या म्हणाली.

''परंतु या यादीत आपलं घर घालायचं राहिलं.'' कल्याण म्हणाला.

''आपलं घर कुठं घ्यायचं ते कुठं अद्याप ठरलं आहे?'' विश्वास म्हणाला.

''ते आपण हरणीला विचारू ती सर्वत्र हिंडते. ती आता मॅट्रिक होईल. तिला नोकरी मिळेल. तिच्या शब्दाला अधिक किंमत दिली पाहिजे. सारे प्रश्न आर्थिक  असतात.'' संध्या हसून म्हणाली.

''संध्ये, खरंच मिळणार आहे हरणीला नोकरी. तिचे पेपर्स चांगले गेले आहेत. ती पास तर होणारच. निकाल लागला की दुसऱ्या दिवशी नोकरी.

चाळीत तरी देतील?'' विश्वास म्हणाला.

''आशेचे खेळ, कल्पनांचे खेळ!'' संध्या म्हणाली.

''घर बांधायच्या आधी संध्ये, प्लॅन करावा लागतो. नकाशा करावा लागतो. प्रत्यक्षाच्या आधी मानसिक क्रिया असते. आधी कल्पना, मग प्रत्यक्ष सर्जन, प्रत्यक्ष निर्मिती.'' विश्वास म्हणाला.

''मीही तेच सांगितलं. मी कानडीत सांगितलं वाटतं? सर्जन निर्मिती शब्द घातलेस म्हणजे काही नवीन सांगितलंस असं नाही होत, विश्वास. आशेचे सारे खेळ.''

''मनुष्यप्राणी सुधारेल या आशेवरच ईश्वराचाही विश्वखेळ चालला आहे. आशेनंच तो फुलं फुलवीत आहे, मुलं वाढवीत आहे.'' भाईजी म्हणाले.

◆◆◆

## १७...

# करुण प्रसंग

ताराचंद रामनाथ दवाखान्यात संध्येच्या बाळंतपणाची सोय करून ठेवण्यात आली होती, संध्येची आई तिकडे हिंवतापाने आजारी होती. माहेरी तरी कोण करणार बाळंतपण? शिवाय खेडेगावात डॉक्टर वगैरे लागलाच तर एकदम कोठून मिळणार? हे पहिले बाळंतपण; शिवाय संध्या कल्याणच्या जवळ राहू इच्छित होती. त्याला सोडून कोठेही जावयास ती तयार नव्हती. म्हणून पुण्यालाच व्यवस्था करून ठेवण्यात आली होती.

एके दिवशी कल्याण संध्येला घेऊन त्या दवाखान्यात गेला. संध्येची प्रकृती वगैरे पाहण्यात आली.

''अद्याप काही दिवस जातील.'' मुख्य सुतिका म्हणाली.

''इंजेक्शन्स वगैरे काही द्यायला हवीत का?'' कल्याणने विचारले.

''दिली तर बरं; अंगात रक्त जरा कमी आहे. काही इंजेक्शन्स द्यावी. मी नाव लिहून देते. ती इंजेक्शन्स द्या.'' ती सुतिका म्हणाली.

कल्याण व संध्या टांग्यात बसून निघाली. वाटेत कल्याणने ती इंजेक्शन्स विकत घेतली.


श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

''उगीच खर्च.'' संध्या म्हणाली.

''या वेळी नाही करायचा, तर केव्हा?'' तो म्हणाला.

''कोण देईल इंजेक्शन?'' तिने विचारले.

''हरणी देईल. तिचा हात हलका आहे.''

''तिला येतं देता?''

''हो; ती आपल्या आजीला नेहमी देत असे.''

''हरणीला भय नाही वाटतं?''

''भय कसचं? धरायचा हात व सुई हळूच टोचायची.''

''माझ्यानं नाही होणार हो असलं काम!''

''तू इन्जेक्शन देणार नाहीस, परंतु घेशील ना?''

''हवी घ्यायला म्हणतोस, तर घेईन.''

टांगा घराजवळ थांबला. संध्या हळूहळू जिना चढत होती. एके ठिकाणी ती बसली. थोड्या वेळाने पुन्हा उठून वर आली. ती अंथरुणावर पडून राहिली.

विश्वासने हरिणीची आज बरीच वाट पाहिली. शेवटी तो बोलवायला निघाला. इतक्यात दारात हरिणी उभी.

''कुठं निघालास, विश्वास?''

''तुलाच बोलवायला येत होतो. तू आलीस. एक काम झालं. परंतु दुसरं एक काम आहे. हरणे, तुझी सायकल घेऊन मी जातो हं. लौकरच येईन.''

''माझी नको सायकल नेऊ. माझ्या दादानं ती पाहिली, तर तो मला बोलेल. नको नेऊ हं, विश्वास.''

''दादा का रस्त्यातून सर्वांच्या सायकली बघत जातो?''

''परंतु तुझी बघेल.''

''बघू दे. सांग त्याला, की दिली होती विश्वासला; इतका भित्रेपणा

काय कामाचा?''

विश्वास हरिणीची सायकल घेऊन निघाला. हरिणी वरून पाहात होती व विश्वासनेही वर पाहिले.

''नाही हो नेत, हरणे.'' तो खालून म्हणाला.

''ने आता विश्वास, ने हो.'' ती वरून म्हणाली.

परंतु सायकल न घेताच विश्वास निघाला. तो दरवाजापर्यंत गेला आणि पुन्हा परत आला. शेवटी सायकल त्याने घेतली व गेला एकदाचा.

हरिणी संध्येजवळ बसली होती. संध्या थकली होती. टांग्यातून जरी ती गेली होती, तरी ती हालचाल तिला सहन झाली नाही.

''हरणे, माझं जरा अंग हळूहळू चेपतेस?'' तिने विचारले.

''चेपते हो, संध्ये.'' हरिणी म्हणाली.

''परंतु संध्ये, आधी इंजेक्शन घेतेस ना?'' कल्याणने विचारले.

''संध्याकाळी घेईन.'' ती म्हणाली.

''हरणे, सायंकाळी येशील?'' कल्याणने विचारले.

''येईन.'' तिने उत्तर दिले.

संध्येचे अंग हरिणी हलक्या हातांनी चेपीत होती. तोंडाने गाणे गुणगुणत होती. ती आनंदात होती.

''हरणे! तुझ्या परीक्षेचा निकाल कधी?'' संध्येने विचारले.

''परवा!'' ती म्हणाली.

''तुला काळजी नाही ना पास होण्याची?''

''संध्ये, मला आतून निकाल कळला आहे.''

''पास झालीस ना?''

''हो. परंतु वर्तमानपत्रात येईल तेव्हा खरं. शाळेत नाव लागेल तेव्हा

खरं. संध्ये, तू बोलू नको हो कुणाजवळ.''

''पुरे हो, हरणे. जा आता तू घरी. संध्याकाळी ये इन्जेक्शन द्यायला.''

हरिणी गेली. दुपारी बाळ आपल्या आईला घेऊन आला होता. ती अनुभवी प्रेमळ वृद्ध माता संध्येजवळ बसली. तिच्या केसांवरून तिने हात फिरविला.

''संध्ये, घाबरू नकोस, सारं नीट होईल.'' ती धीर देत म्हणाली.

''आई, हे भाईजी हो.'' बाळने ओळख करून दिली.

''तुमचं एक व्याख्यान मी ऐकलं आहे.'' बाळची आई म्हणाली.

''कधी बरं?'' भाईजींनी आश्चर्याने विचारले.

''गीतेवर होतं. मला आवडलं होतं. तुम्हाला स्वयंपाक चांगला येतो असं बाळ सांगत होता.'' ती माता म्हणाली.

''लहानपणी आईनं शिकवला होता. ती विद्या कामाला येत आहे.'' भाईजी म्हणाले.

बाळ व त्याची आई निघून गेली.

तिसऱ्या प्रहरी घराचा मालक आला व म्हणाला :

''हे पाहा कल्याण, उद्या सकाळी कदाचित तुमच्याकडे पोलीस येतील. झडती होईल असं कळतं. मी सूचना देत आहे. तुम्हाला मी कधीचा सांगतो आहे की, घर खाली करा म्हणून. या विश्वासच्या एका मित्राच्या आग्रहानं मी घर तुम्हाला दिलं. परंतु या अशा इतक्या भानगडी असतील हे नव्हतं मला माहीत. आता हा सारा तमाशा होणार.''

''परंतु त्यात तुम्हाला थोडीच तकलीफ आहे? तुम्हाला काही दंड वगैरे होणार नाही. कोणी तुम्हाला तुरुंगात नेणार नाही. येतील आमच्या घरी, पाहतील, जातील.'' कल्याण म्हणाला.

''परंतु तुम्ही लौकर दुसरीकडे पाहा बिऱ्हाड.'' असे म्हणून मालक गेला.

आणि दुसऱ्या दिवशी खरेच उजाडत सहा साडेसहाला पोलीस आले. त्या एकाच वेळी पुण्याला दहा–बारा ठिकाणी झडत्या झाल्या. कल्याणच्या खोलीत काही सापडले नाही. सेवादलाच्या घटनेचे काही कागद होते, तेच जप्त करून पंचनामा करून नेण्यात आले.

कल्याणच्या खोलीत पोलीस होते. खाली दरवाजावरही पोलीस होते. वाड्यातील मंडळींना जरा आश्चर्य वाटते. मालकाची मुले वर येऊ पाहात होती, परंतु त्यांना घरी बसविण्यात आले.

''कुठं चाललेत रे वर? ते पोलीस आले आहेत, दिसत नाही का? खबरदार खोलीच्या बाहेर पडाल तर? त्यांच्याकडे जात जाऊ नका म्हणून सतरादा सांगितलं होतं. बसा निमूटपणं!'' माल–मुलांना सांगत होता.

पोलीस गेले तरीही मालकाची मुले बाहेर आली नाहीत. आपल्याशी यांचा संबंध आहे असे पोलिसाला वाटू नये म्हणून ही एवढी काळजी! पोलीस गेल्यानंतर बऱ्याच वेळाने मालक कल्याणच्या खोलीत आला.

''काही नेलं का हो जप्त करून?'' त्याने विचारले.

''हो; पिस्तुलं नेली.'' संध्या हसत म्हणाली.

''पिस्तुलं?'' मालक घाबरून विचारता झाला.

''नाही हो; एक चिटोरं नेलं त्यांनी. काही सापडलं नाही.'' कल्याण म्हणाला.

''परंतु माझं ऐका, तुम्ही जागा खाली करा. मी तुमच्या पाया पडतो. हे लढाईचे दिवस आहेत. उगीच नको त्रास. आम्ही कुटुंबवत्सल माणसं. पिस्तुलाची आज थट्टा केलीत. खरीसुद्धा असायची तुमच्याजवळ; नाही तर एकदम तोच शब्द थट्टेनं का होईना, यांच्या तोंडातून कसा बाहेर पडला?

कृपा करा बुवा.'' मालक दीनवाणेपणाने म्हणू लागला.

''दोन दिवसात हे घर खाली करून देतो; काळजी नका करू.'' विश्वास म्हणाला.

''मी आजच बाहेर पाटी लावतो की घर भाड्यानं देणं आहे म्हणून.'' मालक म्हणाला.

''लावा.'' कल्याण म्हणाला.

मालक निघून गेला. कल्याण, संध्या, विश्वास, भाईजी सारी संचीत बसली होती.

''कल्याण, चला बाहेर पडू. घरं शोधायला जाऊ.'' विश्वास म्हणाला.

''चला.'' कल्याण म्हणाला.

''संध्ये, तुझी पिस्तुलं बाधली.'' विश्वास म्हणाला.

''ते एक निमित्त कारण झालं; किती तरी दिवस हा मालक सांगतो आहे की घर खाली करा म्हणून.'' संध्या म्हणाली.

''किती भित्री ही माणसं! दिसतात तर सुशिक्षित.'' भाईजी म्हणाले.

''सारं हिंदुस्थानच भित्रं आहे. दीडशे वर्ष गुलामगिरीत राहिल्यानं आत्मा जसा मरून गेला आहे. आपण किडे झालो आहोत, किडे! 'न आदमी रहे हम मकोडे बने' हे खरं आहे.'' विश्वास म्हणाला.

''हेही दिवस जातील. किसान–कामगारांत निर्भयपणा येत आहे. गुलामगिरी नष्ट झाल्याशिवाय राहात नाही.'' कल्याण म्हणाला.

''जा ना तुम्ही घर पाहायला; मग ऊन होईल.'' संध्या म्हणाली.

कल्याण व विश्वास गेले. भाईजी चुलीशी लागले. थोड्या वेळाने हरिणी आली. इन्जेक्शन द्यायचे होते.

''काल त्या हाताला दिलं, आज संध्ये, ह्या हाताला.'' हरिणी म्हणाली.

''तो हात अजून थोडा दुखतो आहे.'' संध्या म्हणाली.

''जरा शेकव, बरं वाटेल.'' हरिणीने सुचविले.

हरिणीने इन्जेक्शन दिले. संध्येला कळलेसुद्धा नाही.

''हरणे, किती हलका तुझा हात! तू डॉक्टरी शीक.'' संध्या म्हणाली.

''परंतु कोण शिकविणार?'' हरिणी दुःखाने म्हणाली.

''उद्या तुझा निकाल ना?''

''होय.''

''आज रात्री बारानंतर वर्तमानपत्रं जादा अंक काढतील. मुलं रस्त्यांतून हिंडू लागतील.''

''आम्ही रात्री घेऊ वर्तमानपत्र.''

''भाईजी, मी कणिक देऊ का भिजवून? ही भिजवायची आहे ना?''

''तुला उशीर होईल. तू जा आता, हरणे.'' ते म्हणाले.

परंतु हरिणीने ऐकले नाही. तिने कणिक भिजवून ठेवली व मग ती गेली.

अकरा वाजले तरी कल्याण व विश्वास आले नाहीत. संध्या वाट पाहात होती.

''संध्ये, तू जेवायला बसतेस का?''

''नको. बरोबरच बसू. बरोबर सारी बसलो म्हणजे जेवण आनंदानं होतं. येतीलच ते आता. कुठं तरी नक्की करून येणार, एरवी नाही इतका उशीर लावला त्यांनी.'' ती म्हणाली.

रंगा आला. थोड्या वेळाने घामाघूम होऊन विश्वास व कल्याणही आले. ते जरा कपडे काढून चटईवर पडले. संध्या पंख्याने कल्याणला वारा घालू लागली.

''कल्याण, खूप हिंडलेत ना?'' तिने प्रेमाने विचारले.

''हो आणि एक घर ठरवून आलो.'' तो म्हणाला.

''मला वाटलंच होतं, की ठरवल्याशिवाय तुम्ही येणार नाही म्हणून.'' संध्या म्हणाली.

सारी जेवली आणि बांधाबांध सुरू झाली.

''रात्री नेऊ सामान. घालू खेपा.'' कल्याण म्हणाला.

''दिवसा जरा संकोच वाटतो.'' विश्वास म्हणाला.

''रात्री वेळही शांत असते.'' भाईजी म्हणाले.

''किती खेपा कराव्या लागतील?'' कल्याणने विचारले.

''तीन-चार खेपांत सारं सामान जाईल. विठ्ठल, लक्ष्मण, शिवराम, राजा वगैरे मुलंही येतील. झपाट्यानं काम होईल.'' विश्वास म्हणाला.

परंतु संध्येचे एकाएकी पोट दुखू लागले.

''संध्ये, बरंच का दुखतं?'' कल्याणने विचारले.

''दवाखान्यात ताबडतोब जाणं बरं.'' भाईजी म्हणाले.

''आणू का टांगा?'' विश्वास म्हणाला.

''जरा थाबूं व पाहू.'' संध्या म्हणाली.

ती अंथरुणावर शांतपणे पडली. सामानाच्या बांधाबांधीत दगदग झाली, म्हणून का एकदम पोट दुखू लागले? थोड्या वेळाने थांबले.

''संध्ये, कसं वाटतं? खरं सांग हो.'' कल्याणने विचारले.

''बरं वाटतं हो, कल्याण. थांबलं पोट. आताच नको जायला आणि आज रात्री नका नेऊ सामान. उद्या न्या. उद्या मला तुम्ही इथूनच दवाखान्यात घेऊन जा. मी बाळाला घेऊन येईन मी मग नव्या घरीच येईन. एकदम नव्या

घरात प्रवेश.''

''संध्ये, उद्या जायचं दवाखान्यात, मग आजच गेलेलं काय वाईट?'' भाईजी म्हणाले.

''भाईजी, अगदी वेळ आली म्हणजे जावं. आधी नको. तिथं आधीपासून दवाखान्यात पडून राहायचा मला संकोच वाटतो. कल्याण, आज तू कुठंही जाऊ नकोस. तू माझ्याजवळ बस. दवाखान्यात गेलं म्हणजे मग तू थोडाच आहेस जवळ? नाही ना जाणार आज कुठं? विश्वास त्या घरी सांगून येईल की उद्या सामान आणू म्हणून.'' संध्या सांगत होती.

''बरं हो संध्ये, आज नाही नेत सामान. तसंच बांधलेलं राहील.'' कल्याण म्हणाला.

रात्रीची जेवणे झाली. गप्पागोष्टी करीत सारी बसली होती. भाईजींनी एक सुंदरशी गोष्ट सांगितली. 'हस रे माझ्या मुला' हे गाणेही त्यांनी म्हटले.

''कल्याण, बाळाचं नाव काय ठेवायचं?'' संध्येने एकदम विचारले.

''काय बरं ठेवावं?'' कल्याणने प्रश्न केला.

''परंतु नावाची गर्दी एव्हापासून कशाला ती!'' विश्वास म्हणाला.

''आणि मुलगी होणार की मुलगा?'' रंगाने शंका काढली.

''मुलगी झाली तर काय ठेवायचं, मुलगा झाला तर काय ठेवायचं, दोन्ही ठरवून ठेव.'' कल्याण म्हणाला.

''भाईजी, कोणतं नाव.'' संध्येने विचारले.

''मुलगी झाली तर विजया ठेवा, मुलगा झाला तर विजय ठेवा. परिस्थितीवर तुम्ही विजय मिळवीत असता होणारं ते बाळ. म्हणून त्यातील कोणतं तरी नाव ठेवावं.'' भाईजी म्हणाले.

''मला वसंत नाव आवडतं.'' विश्वास म्हणाला.

''ते तुझ्या मुलाला पुढं ठेवू हो!'' संध्या हसून म्हणाली.

''अजून लग्नाचा नाही पत्ता, तो आमच्या मुलांची नावं कशाला?'' विश्वास खिन्नपणे म्हणाला.

''आज रात्री हरणीच्या परीक्षेचा निकाल लागेल.'' संध्या म्हणाली.

''विश्वास, उद्या तू पेढे दिले पाहिजेस.'' कल्याण म्हणाला.

''भाईजी देतील आणून.'' विश्वास म्हणाला.

''हरणी पास झाली की विश्वास काय करायचं?'' संध्येने विचारले.

''काय म्हणजे?'' विश्वास म्हणाला.

''तुमचं दोघांचं लग्न!'' संध्या म्हणाली.

''संध्ये, ते कृष्णाच्या मुरलीचं कानडी गाणं म्हण ना. त्यातील अर्थ समजला नाही तरी ते गोड वाटतं.'' भाईजी म्हणाले. संध्येने ते अट्टकट्टु गाणे म्हटले. विश्वास हसू लागला.

''विश्वास, हसतोस काय?'' भाईजी म्हणाले.

''या द्राविडी भाषा म्हणजे तारायंत्री भाषा आहेत.'' विश्वास म्हणाला.

''तारायंत्री म्हणजे?'' रंगाने विचारले.

''कडकट्ट कडकट्ट सारखं चालत असतं. या भाषांतून टकारांतील अक्षरं जास्त. ट ड ण यांची रेलचेल; ढ नाही मात्र फारसे आढळत; ळही पुष्कळ असतात.'' विश्वास म्हणाला.

''परंतु द्राविडी भाषेतीलच आंध्र भाषा; ती भाषा जगातील सर्व भाषांहून अधिक गोड आहे असं प्रख्यात भाषापंडित मॅक्समुल्लर म्हणत असत.'' भाईजी म्हणाले.

''घंटांचं संगीत आहे या भाषातून. शंकराच्या देवळातील घंटा घण्घण्

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय सातारा
दाखल क्र. ८८७७ ग्रंथानुक्रमांक ८८१८८०४
किंमत २४० पाने ३५७

एकदम वाजाव्यात, तशा ह्या भाषा.'' विश्वासचे तुणतुणे सुरूच होते.

''मात्र, द्राविडी भाषा अधिक नादमय व संगीतमय आहेत. तामीळ भाषेतील गाणी ऐकताना अंगावर रोमांच येतात: ती गाणी स्वस्थ बसून ऐकतवच नाहीत; अर्थ कळला नाही तरी ती गाणी ऐकून नाचावं असं वाटतं. त्रिचनापल्लीच्या तुरुंगात आम्हाला हा अनुभव येत असे.'' भाईजी म्हणाले.

''भाईजी नेहमी दुसऱ्यांचं चांगलं म्हणतील.'' विश्वास म्हणाला.

''भाईजी खरं ते बोलतील.'' संध्या म्हणाली.

''तू त्यांची बाजू घेशीलच; तुझी चूल ते सांभाळतात, उद्या मुलंही म्हणशील हो त्यांना सांभाळा म्हणून.''

''तेच पाळण्यात घालतील बाळ. पाळण्याची दोरी प्रथम तेच लांबवतील. 'हस रे माझ्या मुला' गाणं म्हणतील. आमचं सारं प्लॅनिंग ठरलेलं आहे. नाही का, भाईजी?'' संध्येने हसून विचारले.

''संध्ये, आता झोपू. मला जांभया येऊ लागल्या. माझे डोळे मिटू लागले. नाही तर तुम्ही बसा बोलत.'' कल्याण म्हणाला.

''सारीच झोपू.'' संध्याही म्हणाली.

सर्व मंडळी झोपली. विश्वासला झोप नव्हती. हरिणीच्या परीक्षेच्या निकालाची त्याला चिंता होती. त्या निकालावर किती तरी गोष्टी अवलंबून होत्या. त्याचे हरिणीशी होणारे लग्न, हरिणीला मिळणारी नोकरी, साऱ्या गोष्टी त्या परीक्षेच्या निकालावर होत्या. तो बाहेरच्या गॅलरीत फेऱ्या घालीत होता.

''विश्वास, नीज आता; हरिणी होईल पास.'' भाईजी म्हणाले.

''भाईजी, आमच्या लग्नाला तुम्ही थांबा हो.'' विश्वास म्हणाला.

''थांबेन हो, विश्वास. परंतु तुम्हाला मी काय देऊ? विश्वास, तुझ्याविषयी मला किती वाटतं. परंतु काय आहे माझ्याजवळ? तुझ्या लग्नात

द्यायला मजजवळ काही नाही, काही नाही.''

''भाईजी, तुम्ही आपलं नि:स्वार्थ प्रेम आम्हाला देत आहात, आम्हा साऱ्या पोरक्या पोरांना तुम्ही थोडाफार आधार देत आहात. तुमची आमची मतं भिन्न असतील. परंतु हृदयं एकजीव झाली आहेत. त्यामुळं मला भीतीही वाटते.''

''कसली भीती?''

''आपण या अशा प्रेमामुळं मिंधे होतो. ध्येयासाठी जर हे प्रेमबंध तोडण्याची जरूर भासली, तर मोह आडवे येतात, कृतज्ञता–बुद्धी आडवी येते. कृतज्ञता श्रेष्ठ की ध्येयनिष्ठा श्रेष्ठ? मग मनुष्य तडजोडी करू लागतो. देवाणघेवाण करू लागतो.''

''विश्वास, सत्य हे तडजोडीतच असतं ना?''

''भाईजी, सत्याला तडजोड माहीत नसते. तडजोड म्हणजे निर्मळ सत्य नव्हे. तडजोडीचं सत्य म्हणजे मिसळ चांदीचा रुपया; ती संपूर्ण चांदी नव्हे.''

''परंतु संपूर्ण चांदीचा रुपया व्यवहारात चालत नाही. त्यात थोडी भेसळ लागतेच.''

''भाईजी, दुबळ्या लोकांनी हा 'व्यवहार' शब्द निर्मिला आहे. ज्यांना मोह तोडवत नाहीत, बंध काढवत नाहीत, आसक्ती फेकवत नाही, असे नेभळे जीव व्यवहाराची भाषा बोलतात. ही असली मरतुकडी तत्त्वज्ञानं निर्मितात. परंतु भाईजी, जीवनात तर व्यवहार कुठंच नाही. तुम्ही व्यवहारातीत आहात.''

''म्हणूनच मला मूर्खांत काढतात.''

''अशा मूर्खांची आम्ही पूजा करू. मलाही असा एक मूर्ख होऊ दे.''

''विश्वास, झोप आता. बारा वाजतील.''

''तर मग थोडाच वेळ राहिला. लौकरच येतील रिझल्टवाले ओरडत. थोडा वेळ बसूया इथं.''

इतक्यात पलीकडून रडण्याचा दीनवाणा आवाज ऐकू आला. करुण करुण आवाज! सर्वत्र शांतता होती. कोण रडत होते?

''विश्वास, कोण रे?''

''त्या पलिकडच्या वाड्यातून तो आवाज येत आहे.''

''कोणाचा?''

''तो मालक आपल्या पत्नीला मारीत आहे. मधून मधून तो हे प्रकार करतो. इकडे या. इथून ऐकू येईल.''

पत्नीला मारून नवऱ्याने तिला घरातून बाहेर हाकलले होते. ती अंगणात रडत उभी होती. ती दाराजवळ जाई व दीनवाणेपणे म्हणे, 'उघडा ना दार. घ्या आत; असं काय करता ते.' परंतु तो दार उघडीना. ती बाहेर पडत बसली. थोड्या वेळाने त्याने दार उघडले. 'हो आत.' असे म्हणून मारीत त्याने पुन्हा तिला आत नेले.

''काय हे प्रकार?'' भाईजी म्हणाले.

''माणसं अद्याप माकडंच आहेत. नवरे असे व बायकाही तशाच. तीच बाई उद्या सकाळी हसत खेळत असेल. पोपटाला पेरू चारीत असेल. तिला कुठं स्वाभिमान आहे? आर्थिकदृष्ट्या मान उंच झाल्याशिवाय हे प्रकार थांबणार नाहीत. ही आर्थिक गुलामगिरी आहे.'' विश्वास म्हणाला.

भाईजी काही बोलले नाहीत. ते गंभीर झाले.

''भाईजी, प्रेम प्रेम तरी काय आहे? क्षणभर त्याची गोडी नाही का? दोन प्रेमी जिवांना खांबाशी एकत्र बांधून ठेवलं, तर त्यांना का आनंद वाटेल! आपण एकत्र आहोत याचं का त्यांना सुख वाटेल! तोंडाशी सारखं तोंड आहे

म्हणून का त्यांना मोक्ष वाटेल? उलट ती दोघं विटतील. तोंड फिरवू पाहतील. आणि खांबापासून मुक्त केल्यावर त्यांच्या मनात पहिला विचार येईल तो हा की, एकमेकांचं तोंडही आता पाहून नये; नाही भाईजी? ही आसक्तीमय प्रेम, ही वासनात्मक प्रेम, अल्पमधुर आहेत, चिरमधुर नाहीत. परंतु त्याच्याशिवाय जीवनाला आधार नाही. सारं कोडं आहे. सारा गोंधळ.'' विश्वास म्हणाला.

''विवेकानं हळूहळू गोंधळ कमी होईल. जीवनात प्रसन्न शांती येईल.'' भाईजी म्हणाले.

इतक्यात ज्या आवाजासाठी विश्वास जागत बसला होता, तो आवाज कानी आला. 'मॅट्रिकच्या परीक्षेचा निकाल' अशा पत्रविक्या मुलांच्या घोषणा कानांवर पडल्या. विश्वास लगबगीने उठला व धावतच गेला. तो रस्त्यावर गेला तो तो मुलगा दूर गेला होता. विश्वास रागावला. दुसरा केव्हा येतो याची तो वाट पाहात थांबला. आला, दुसरा एक आला. विश्वासने एक प्रत घेतली. तेथेच बाहेरच म्युनिसिपालिटीच्या दिव्याच्या प्रकाशात तो पाहू लागला. परंतु नीट दिसेना. तो दिवा फोडावा असे त्याला वाटले. शेवटी तो वर आला. त्याने बटन दाबले. दिवा लावला. सारीच मंडळी उठली. हरिणीचे नाव होते. विश्वासने उडी मारली. टिचकी वाजविली. ''पास झाली, झाली पास, ठीक!'' असे तो कितीदा तरी म्हणाला.

''भाईजी, गूळ तरी वाटा.'' संध्या म्हणाली.

''उद्या आणू पेढे!'' भाईजी म्हणाले.

''हरिणीच उजाडत घेऊन येईल. उद्या हरिणीचे पेढे आणि दोन दिवशी संध्येचे पेढे.'' विश्वास म्हणाला.

''आणि मग तुझ्या लग्नाचे.'' संध्या म्हणाली.

''भाईजी, आमच्या लग्नाला आता राहिलं पाहिजे हो. ठरवू आता लौकरच.

मुख्य अडचण दूर झाली.'' विश्वास म्हणाला.

''अजून रात्र पुष्कळ आहे. निजू या सारी.'' भाईजी म्हणाले.

सकाळी तो मालक पुन्हा वर आला.

''केव्हा जाणार तुम्ही?'' त्याने विचारले.

''आज रात्री इथं झोपणार नाही, समजलेत! हा काय तुमचा त्रास? आधी नोटीस दिली होतीत वाटतं? एकदम आपले येता व केव्हा जाता विचारता. काही माणुसकी आहे की नाही?'' कल्याण रागाने म्हणाला.

''परंतु आम्हाला काय माहीत की तुम्ही राजद्रोही माणसं आहात म्हणून. आम्हाला वाटलं की असाल साधी माणसं.''

''मग काय आम्हाला शेपूट-शिंग आहेत वाटतं?'' रंगा म्हणाला.

''हे पाहा, मला तुमच्याजवळ बोलता येत नाही. मेहेरबानी करा व घर मोकळं करा.'' मालक म्हणाला.

''आज रात्रीपर्यंत खाली करतो हा. झोपायला दुसऱ्या बिऱ्हाडी जाऊ. झालं ना?'' भाईजी म्हणाले.

मालक गेला. आज आता सामान त्या नवीन जागेत न्यायचेच असे ठरले. रात्री न्यायचे ठरले. अंधार पडल्यावर न्यायचे असे ठरले. सकाळी आठाच्या सुमारास हरिणी आली. ती आज नवे सुंदर पातळ नेसून आली होती. तिला ते किती खुलून दिसत होते. तोंडावर आनंद उधळला होता. डोळे नाचत होते. आशेने नाचत होते. आणि हातात गोड पेढे होते. तिने सर्वांना पेढे दिले.

''हरणे, आता दुसरे पेढे केव्हा?'' संध्येने विचारले.

''विश्वासला विचारा. माझं काम मी केलं. पास झाले. पुढचं तुम्ही ठरवा. मी काय सांगू?''

''परंतु तुझी आई काय म्हणेल?'' विश्वासने विचारले.

''मी सारं सोडायला तयार आहे.'' हरिणी म्हणाली. हरिणी निघून गेली. दुपारची जेवणे झाली. परंतु संध्येचे पोट फिरून दुखू लागले. ते राहिना. शेवटी विश्वासने टांगा आणला. कल्याण संध्येला घेऊन गेला. थोड्या वेळाने सायकलवरून विश्वासही गेला. भाईजी एकटेच घरात होते. सारे सुखरूप पार पडो, अशी ते प्रार्थना करीत होते.

दिवे लागायची वेळ होत होती, तरी दवाखान्यातून काही निरोप येईना. कल्याणचा पत्ता नाही, विश्वासचाही पत्ता नाही. दुकानातून रंगा घरी आला.

''रंगा, सायकल घे व दवाखान्यात जा; काहीच वार्ता कळत नाही. लौकर सांगायला ये.'' भाईजी म्हणाले.

रंगा सायकलवरून दौडला तो दवाखान्यात गेला. तो तेथे काय? कल्याण व विश्वास बाहेर संचीत उभे होते.

''काय दे दादा?'' त्याने विचारले.

''काही तरी घोटाळा आहे.''

''कठीण का आहे?''

''हो, देव काय करीत ते खरं.''

''मी भाईजींना जाऊन सांगतो. ते वाट पाहात आहेत.''

''थांब, थोडा वेळ.''

''बरं तर.''

संध्येची अगतिक स्थिती झाली होती. अपार वेदना होत होत्या. तिचे ते जणू बलिदान होते आणि शेवटी एकदाचे बाळ बाहेर आले.

''झालं, आलं.'' सुतिका म्हणाली.

परंतु हे काय? बाळ सजीव नाही का? रडले नाही? पहिला श्वास

त्याने घेतला नाही. साऱ्यांची धांदल उडाली. श्वासोच्छ्वास सुरू व्हावा म्हणून उपचार सुरू झाले. ते लहान अर्भक! जन्माला आले नाही तो त्याच्यावर प्रयोग. परंतु यश आले नाही. कल्याण त्या बाळाकडे पाहात होता. संध्या बिछान्यावर मलूल होऊन पडली होती.

''आला का प्राण?''

''चालले आहेत हो यत्न.'' मुख्य सुतिका म्हणाली.

परंतु काही नाही. सारे निराश झाले. ते बाळ तेथे स्वच्छ टॉवेलवर ठेवण्यात आले. किती सुंदर होते बाळ? डोके जरा मोठे होते. कल्याण पाहात राहिला. त्याला बोलवेना, रडवेना, तो जणू दगड झाला होता!

''माझं बाळ, आणा ना ते माझ्याजवळ!'' संध्या म्हणाली.

''संध्ये, बाळ गेलं हो.'' कल्याण हळूच साश्रू स्वराने म्हणाला.

''अरेरे! असा कसा तो देव. अरेरे, अरेरे!'' संध्या अरेरे शिवाय शब्द बोलेना.

''रंगा, तू जा. भाईजींना सांग. काय करायचं? आणि परत ये.'' विश्वास म्हणाला.

''अरेरे, अरेरे. संध्येच्या किती आशा, किती मनोरथ, किती सुख-स्वप्ने! मातृत्वाच्या सुखाच्या कशा कल्पना ती रंगवी. बाळाला पाजीन, पायांवर न्हाणीन, त्याला आंगडे घालीन, त्याच्या पाळण्यावर चिमण्या टांगीन, त्याला गाणे म्हणेन! किती बेत, मनसुबे! सारे एका क्षणात मातीत गेले! जीवनांतील आनंद, उत्साह, उमेद, आशा सारे काही तेथे मरून पडले होते.

''कल्याण!'' विश्वासने हाक मारली.

''अरेरे!'' तोही तोच एक शब्द उद्गारला.

रंगा भाईजींना सांगून परत आला. भाईजींनी इतर मित्रांनाही तिकडे

पाठविले. परंतु ते स्वत: गेले नाहीत. त्यांना धीर झाला नाही. ते घरीच राहिले. ''देवा, या दु:खाहून संध्येला पार पाड, तिला हे दु:ख सहन करण्यास शक्ती दे. तिचं बाळ नेलंस, आता धैर्य तरी दे.'' अशी ते प्रार्थना करीत होते.

आणि ते मूल कल्याणने शेवटी उचचले. जे हात त्या बाळाला खेळवणार होते, नाचवणार होते, ते हात त्या बाळाला घेऊन ओंकारेश्वराकडे निघाले. संध्येने टाहो फोडला. परंतु पुन्हा ती पडून राहिली. अरेरे, अरेरे, असे ती सारखे म्हणे व रडे. कल्याण, विश्वास, रंगा व इतर मित्र शांतपणे ओंकारेश्वरी आले. वाटेत कल्याणने ते मृत बालक दुसऱ्या कोणाजवळ दिले नाही. मध्येच त्या मुलाला तो हृदयाशी धरी आणि त्याच्या डोळ्यांतील पाणी त्या फडक्यावर पडे. जणू स्वत:ची ऊब देऊन बाळाला तो सजीच करू पाही.

भूमातेच्या पोटात बाळाला ठेवण्यात आलं. विश्वासचे घर जवळच होते. तेथे विश्वास, कल्याण, सारे गेले. किती तरी दिवसांनी विश्वास घरी गेला होता. आणि आला तोही अशा प्रसंगी! करुण प्रसंगी! त्याची आई कल्याणचे सांत्वन करीत होती. क्रोधी वडील, परंतु तेही या तरुणावर आलेल्या या सर्व आपत्तींनी रडले. ते म्हणाले, ''कल्याण, विश्वास, तुम्ही अद्याप अनुभव घेतलेला नाही. अजून तुम्ही तरुण आहात; परंतु संसार हा असाच हो. या सर्व प्रसंगांना तोंड द्यावं लागतं. सहन करा सारं. शोक गिळा. तुम्हाला कुठं राहायला घर मिळत नसेल, तर इथं येऊन राहा. दोन खोल्या तुम्हाला मोकळ्या करून देईन. तिथं स्वतंत्रपणं राहा. बरं का विश्वास. बरं का कल्याण. आपल्या हातच्या थोड्याच आहेत त्या गोष्टी. उगी.''

विश्वासचे वडील सांगत होते. ज्या वडिलांनी त्याला घालविले होते, तेच त्याला व त्याच्या मित्रांना राहायला जागा द्यायला आज तयार झाले

होते. स्वतंत्र राहा येथे येऊन, असे म्हणत होते. प्रेमाने आश्वासनपर शब्द बोलून ते त्यांना धीर देत होते. मनुष्य कितीही कठोर असला, दुष्ट असला, तरी केव्हा तरी त्याच्या हृदयातील प्रेमाचे झरे वाहू लागलात. त्याच्या जीवनाच्या वृक्षाला प्रेमाचे पल्लव, सहानुभूतीची फुलेफळे एक दिवस आल्याशिवाय सहात नाहीत. कोणाच्या जीवनाच्या बागा लौकर बहरतात, कोणाच्या उशिरा; परंतु कोमल भावनांचा फुलोरा सर्वांच्या जीवनात आल्याशिवाय राहणार नाही.

आणि आईबाप! कितीही कठोर ते झाले, तरी शेवटी तेच कृपेची पाखर घालतील. सारे जग त्या वेळी आपणांस धिक्कारील, त्यावेळी आईबापच आपणास जवळ करतील. आपण जगांत पदोपदी अपमान गिळतो. अनेकांची बोलणी सहन करतो. परंतु आईबापांजवळ आपला सारा स्वाभिमान आपण जणू दाखवीत असतो. साऱ्या जगासमोर नमू, परंतु आईबापांजवळ ताठ्याने वागू. साऱ्या जगाजवळ भीक मागू, परंतु आईबापांजवळ मागायला जाणार नाही.

कां बरे असे? असे का होते? एक तरी जागा स्वाभिमान दाखवायला असू दे, असे का जिवाला वाटत असते? ज्यांचे प्रेम आहे त्यांच्याजवळच स्वाभिमान दाखवावा. दुनिया आपल्या स्वाभिमानाला थोडीच भीक घालणार आहे, असे का मनुष्याला वाटते?

वडिलांचे ते शब्द ऐकून विश्वास गहिंवरला, सद्गदित झाला.

कल्याण, विश्वास, रंगा सारे शेवटी आपल्या खोलीवर आले. भाईजी एकटेच बसले होते. सारे मुके मुके होते. कोण काय बोलाणार?

''भाईजी, खरंच चांगलं होतं मूल.'' कल्याण म्हणाला.

''श्वासोच्छ्वास सुरू व्हावा म्हणून सर्वांनी किती खटपट केली. परंतु



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय, सातारा.

उपाय नव्हता.'' विश्वासने सांगितले.

''आज विश्वासचे वडील आम्हाला म्हणाले की नसेल पुण्यात कुठं जागा मिळत तर इथं माझ्याकडे येऊन राहा.'' रंगा म्हणाला.

''काही प्रसंग असे असतात की ते सर्वांना मृदू बनवितात; सर्वांची माणुसकी त्यावेळी जागी होते.'' भाईजी म्हणाले.

''आपण सामान न्यायचं ना? चला की.'' कल्याण म्हणाला.

''चला.'' विश्वास म्हणाला.

ते सारे सामान नेऊ लागले. त्या नवीन घरी नेऊ लागले.

''इतक्या रात्री कशाला आणता सामान?'' त्या मालकाने विचारले.

''आमचं मनही अस्वस्थ आहे. झोप थोडीच येणार आहे. सामान वाहण्यानं भावना थोड्या कमी होतील. दु:ख थोडं कमी होईल.'' विश्वास म्हणाला.

इतरही मित्र आले. भराभरा सामान चालले. कल्याण सारे सामान भरीत होता. संध्येची ट्रंक त्याने उघडली. तीत इतर सारे कपडे तो भरणार होता. तो ट्रंकेत पाहू लागला. कोपऱ्यात ती देवाची मूर्ती होती आणि एक खादीचे पातळ! त्या वस्तू पाहून त्याला आश्चर्य वाटले. परंतु ती देवाची मूर्ती त्याला माहीत होती. खादीचे पातळ कोठून आले? भाईजींनी दिले होते का कधी आणून?

परंतु एक गाठोडे होते त्या ट्रंकेत. कल्याणने ते सोडले. तो त्यातून काय बाहेर पडले? चिमण्या. आशेच्या चिमण्या उडून गेल्या होत्या. चिध्यांच्या निर्जीव चिमण्या तेथे समोर होत्या. एका चांदव्याला त्या चिमण्या शिवलेल्या होत्या, टांगलेल्या होत्या आणि ती सुंदर दुपटी. आणि ती आंगडीटोपडी. अरेरे! ते गाठोडे म्हणजे संध्येचे आशास्थान होते. तिची सारी स्वप्ने त्यात

साठवून ठेवलेली होती. तिचे मंगल मातृत्व त्यात सामावलेले होते. कल्याणच्या डोळ्यांतून पाणी घळघळू लागले. उद्या संध्या घरी आली व तिने जर हे सारे पाहिले, तर तिला काय वाटेल? ही दुपटी, या चिमण्या, ही आंगडींटोपडी पाहून तिचे हृदय फाटेल. तिच्या हृदयाच्या चिंध्या होतील. त्या हृदयाच्या चिंध्या पुन्हा कोण शिवील? ते भग्न विदीर्ण हृदय कोण शांतवील? त्या हृदयात पुन्हा कोण आनंद आणील, कोण तिथे पुन्हा आशेची पाखरे खेळवील?

''कल्याण, ठेव हो बांधून ते सारं. संध्या व मी दोघांनी बसून ती स्वप्नं तयार केली. ते आशेचे मनोरे बांधले. संध्या म्हणायची, ''भाईजी, मला दुसरं कोण आहे? आपणच सारं करून ठेवायला हवं.'' किती हळूवार हृदयानं, हळूवार बोटांनी व भावनांनी ती ती आंगडीटोपडी शिवीत बसे. ती दुपटी शिवीत बसे. आणि या चिमण्या मी केल्या, मी शिवल्या. आता 'हस रे माझ्या मुला.' गाणं मी कोणाला म्हणू? कोणाला पाळण्यात घालू? कोणाला नाव ठेवू? कल्याण, मी दुर्दैवी आहे. मी जिथं जाईन तिथं का असंच व्हायचं? माझ्या निराशाच का मी सर्वत्र वाटणार, पेरणार? मी अभागी कशाला इथं आलो, कशाला राहिलो? माझ्या हाताला यश नाही हे मला माहीत होतं. त्या करंट्या हातांनी मी चिमण्या करीत असलो, संध्येचं बाळ त्या हातांनी आदळणार होतो. परंतु देवानं आधीच दोरी तोडली. बाळाच्या आयुष्याची दोरी. अरेरे! असा कसा हा देव? संध्येच्या ट्रंकेच्या कोपऱ्यात तो देव आहे. खरोखरच का ट्रंकेत एखादा बागुरडा, एखादं झुरळ असावं त्याप्रमाणं कोपऱ्यात पडणाऱ्या लायकीचा हा देव आहे? आमच्या साऱ्या आशांचा तो असा खेळखंडोबा का करतो? संध्येची स्वप्नं का पापी होती? मातृत्वाचा तो परम पवित्र आनंद, ते सात्विक समाधान, त्यात काय वाईट होतं? परंतु देवानं त्यातही विष कालवलं. अरेरे! कशी श्रद्धा राखायची, काही समजत नाही. सारं जीवन अशा वेळी अर्थहीन, सारहीन वाटतं. एक कठोर निर्माती विश्वाचा

जणू खेळ करून राहिली आहे! त्या वैश्विक प्रेरणेला ना भावना, ना काही. तो विश्वाचा कायदा केवळ यांत्रिक आहे. कुणाची पर्वा न करता तो चालला आहे. नवोढेचा पती मारून तिला तो विधवा करीत आहे; नवमातेचं मूल नेऊन तिला तो रडवीत आहे; लहान मुलांचे आईबाप मारून त्यांना तो पोरकं करीत आहे; मित्रांपासून मित्रांची ताटातूट करीत आहे. कठोर सृष्टीचं कठोर शासन. सारं एकंदरीत फोल आहे. एका क्षणात सारं नाहीसं होतं. आम्ही मनोरथ बांधावे, मनोरे रचावे; आणि एकदम कोणी हुकूमशहा येतो व विकट हास्य करीत हे सारं जमीनदोस्त करतो. कल्याण, काय बघत बसलास ते? ठेव बांधून. आटप.''

भाईजींचे शब्द ऐकून कल्याणचे अश्रू थांबले. तो अधिकच दुःख गंभीर झाला. त्याने ते गाठोडे बांधले. ट्रंकेत आणखी कपडे भरण्यात आले. भाईजींनी ट्रंक उचचली व ती घेऊन ते चालले. जणू ती आशांची, मनोरथांची, सुखस्वप्नांची तिरडीच ते घेऊन जात होते! अत्यंत दुःखाने ते जात होते. परंतु वाटेत त्यांच्या मनात शेकडो विचारांची गर्दी उसळली होती. श्रद्धा पुन्हा येऊ पाहात होती. वसिष्ठाची शंभर मुले मारली गेली तरी त्याची मांगल्यावरची श्रद्धा अचल राहिली. किती तरी लोक, स्त्री–पुरुष, अनंत आपत्ती आल्या, तरी ईश्वरावर श्रद्धा ठेवतात आणि संध्येचे एक नुकतेच जन्मलेले मूल जाताच मी का त्या ईश्वराला झुरळ बनवावे, बागुरडा बनवावे? ईश्वराचे त्यातही हेतू असतील. कल्याण, संध्या यांना त्याने मोकळे केले असेल! डोक्यावर चळवळ आहे. कल्याण वगैरे सारे कदाचित स्थानबद्ध होतील. आणि संध्या मग कुठे जाईल, कुठे राहील? त्या मुलांचे संगोपन कसे होणार? आजच खाण्याची पंचाईत आहे. उद्या आणखीच वाढेल. असे विचार भाईजींच्या मनात आले. परंतु त्यांना ते आवडले नाहीत. ते त्यांनी झडझडून दूर केले. मला तिऱ्हाईताला हे विचार ठीक आहेत. परंतु आईबाप

कितीही दरिद्री असले, तरी त्यांना मूल नकोसे वाटत नाही. माता आपल्या प्रेमाचे पांघरुण त्याला घालते, आपल्या वात्सल्याने त्याला नटविते. त्या लहान मुलामुळेच ते दारिद्र्यही त्यांना सुसह्य होत असेल. दरिद्री पिता मुलाच्या तोंडावरील हास्य पाहून दारिद्र्य विसरत असेल, क्षणभर स्वत:ची बाहेरची मानहानी विसरत असेल. संध्या व कल्याण यांच्या डोळ्यांसमोर त्या मुलाचा आनंद होता. त्यांच्या उभयतांच्या जीवनवृक्षाला लागलेले ते फूल होते, ते गोड फळ होते. त्यांच्या संयुक्त व एकजीव झालेल्या जीवनाचे ते मूर्त प्रतीक होते. मूल म्हणजे पती–पत्नीच्या अभिन्न जीवनाची मंगल खूण, त्यांच्या समरस जीवनाची ती मनमोहक मधु–मधुर अशी मूर्ती! दारिद्र्यांतही आनंद, प्रकाश, आशा यांचे किरण फेकणारे ते लहान मूल म्हणजे नवीन सुरू झालेल्या संसारातील बाल सूर्यनारायण! भाईजींच्या मनात परस्परविरोधी विचारांची गर्दी उडाली होती. त्या विचारतंद्रींत ते पुढेच गेले. ज्या घरी ते सामान न्यायचे, ते घर मागेच राहिले!

अजून भाईजी कसे आले नाहीत म्हणून कल्याण, विश्वास, रंगा त्या नव्या घरी वाट पाहात होते. शेवटी रंगा पाहायला गेला. तो भाईजी पुढे चालले आहेत ती ट्रंक घेऊन असे त्याला दिसले.

''भाईजी!'' रंगाने हाक मारली.

ते थांबले. रंगा धावत आला. आपण पुढे आलो हे पाहून त्यांना त्या खिन्नतेतही हसू आले.

''द्या, मी घेतो ती ट्रंक.'' रंगा म्हणला.

''माझ्याजवळच ती असू दे.'' भाईजी म्हणाले.

दोघे आले. सामान सारे आणले गेले. सारे मित्र त्या नवीन घरी त्या सामानाच्या पसाऱ्यात सुतक्यासारखे बसले होते. ते सामान नीट लावावे असे कोणाच्याही मनात येईना. परंतु वयाने वडील भाईजीच उठले व

आवराआवरी करू लागले. मग सारेच लागले सामान लावायला. सामान लावून झाले. आणि बाहेर पत्र्यांवर अंथरुणे पसरून सारे बसले. आकाशांतील तारे त्यांच्याकडे पाहात होते.

''संध्या काय करीत असेल? रडत असेल का? तिच्या दुःखाला भाईजी, सीमा नाही. कोवळ्या मनाची संध्या.'' कल्याण म्हणाला.

''परंतु संध्या तुम्हा सर्वांपेक्षा समाधान मानायला शिकली आहे. आशेवर जगायला ती शिकली आहे. कल्पनेत रमायला शिकली आहे. प्रत्यक्ष परिस्थितीवर उड्डाण करून शांत राहायला ती शिकली आहे. अगस्तिकषी सात खारे समुद्र प्याले. त्याप्रमाणे संध्याही सर्व गोष्टी गिळायला शिकली आहे. हलाहल पचवायला शिकली आहे. संध्या म्हणजे प्रेमदेवता, शांतिदेवता, आशादेवता!'' भाईजी म्हणाले.

''भाईजी, किती करुण प्रसंग हा, नाही का?'' विश्वास म्हणाला.

''संध्या सारखं खोल आवाजात, क्षीण आवाजात म्हणे, ''द्या ना माझ्या जवळ बाळ, ठेवा ना कुशीत. माझ्या कुशीतील उबेनं ते हसेल, रडेल; माझ्या कुशीरतील उबेनं ते जिवंत होईल. आणा, माझ्याजवळ आणा बाळ.' भाईजी, किती करुण ते बोलणं आणि नेण्यासाठी बाळ उचलल्यावर तर ती निश्चेष्ट जणू पडली. 'अरेरे' हा एकच शब्द ती बोले. संध्येनं उच्चारलेला तो अरेरे शब्द आठवताच हृदयाची कालवाकालव होते. त्या तीन अक्षरांत जणूं शोकसागर भरलेले होते; अनंत दुःख त्यात सामावलेलं होतं. खरंच; अति करुण प्रसंग.'' कल्याण म्हणाला.

''होय हो कल्याण, खरोखरच करुण प्रसंग! परंतु तुम्ही धैर्यानं तोंड द्या. तोंड देतच आहात. आपल्या सर्व संसाराचे बळी देऊन शेवटी सर्व श्रमणाऱ्या जनतेचे करुण संसार आपणास आनंदाचे करायचे आहेत. आपण

नवीन समाजरचना करू. दारिद्र्याची हाय हाय नष्ट करू. सुख सर्वांच्या मालकीचं करू. त्या नवसमाजातील लहान मुलांची मुखकमळं तोंडासमोर आणा. मुलांची काळजी घेतली जात आहे; त्यांची जीवनं शास्त्रीय दृष्टीनं व प्रेमानं वाढवली जात आहेत असं चित्र आपल्या डोळ्यांसमोर खेळवू या. त्या ध्येयासाठी लढू या, पडू या, मरू या, जगू या. आपली सारी दु:खं मग आपण सहन करू. हे सारे करुण करुण प्रसंगही मग आपण शांतपणे सोसू. खरं ना?'' भाईजी म्हणाले.

''होय, भाईजी. सारे करुण प्रसंग सहन करू; साऱ्या संकटांतून जाऊ. आमच्या जीवनप्रवाहांना थांबायला, थबकायला वेळ नाही. क्रांतीच्या सागराकडे जाऊ दे त्यांना वेगानं धांवत.'' कल्याण म्हणाला.

''परंतु काही झालं तरी हे व्रण बुजणार नाहीत. एकच दु:ख आपण विसरू इच्छित नाही; विसरू शकत नाही. ते नेहमी हिरवं हिरवं राहतं. आपल्या अश्रूंनी सदैव टवटवीत राहतं आणि ते दु:खं म्हणजे प्रियजनांचे विरह आणि नवमातेच्या पहिल्या वहिल्या बाळाचं जन्मत:चं मरण म्हणजे तर दु:खाची परम सीमा. ते दु:ख संध्येच्या जीवनात अमर राहील, त्याची छाया सदैव राहील.'' विश्वास म्हणाला.

''खरं हो विश्वास, खरं.'' भाईजी म्हणाले.

''संध्ये, संध्ये!'' असे म्हणून कल्याणने उशीवर डोके ठेवले व ती उशी अश्रूंनी भिजली. आणि तिकडे दवाखान्यात खाटेवर दीनवाणी संध्या ''कल्याण, कल्याण, कसं रे होतं बाळ, अरेरे, अरेरे!'' असे म्हणून अखंड अश्रू ढाळीत होती! केवढा करुण प्रसंग!''

◆◆◆

श्री. छ. प्रतापसिंह महाराज ... नगर वाचनालय, सातारा.

## १८...

# भितुरडे पुणे

दुसऱ्या दिवशी सकाळी कल्याण दवाखान्यात जायला निघाला. संध्येला काय न्यायचे? खायला काय द्यायचे? काही तरी नेले तर पाहिजे. तिच्या पोटात दोन घास दवडले तर पाहिजेत. काय बरे न्यावे संध्येला करून?

''भाईजी, थोडा शिरा नेला करून तर?'' त्याने विचारले.

''चालेल. दोन पोळ्या ने व शिरा ने. लिंबाचे लोणचे आहे, ते ने.'' भाईजी म्हणाले.

भाईजींनी कढत कढत पोळ्या करून दिल्या. त्यांना त्यांनी बरेच तूप लावले. सांजाही त्यांनी केला. एका डब्यात भरून घेऊन कल्याण निघाला.

''कल्याण, संध्येला धीर दे. दोन घास तरी खा म्हणावं. भाईजींनी सांगितलं आहे असं सांग.'' भाईजी म्हणाले

कल्याण सायकलवर बसून गेला. रंगाही दुकानात गेला. भाईजी एकटेच घरी होते. त्यांनी केर काढला. भांडी जरा स्वच्छ धुतली. आणि पुस्तक घेऊन वाचीत बसले. तो बाळची आई आली.

''कुठं गेली सारी?'' तिने विचारले.

''कोणी तरी त्याचे मित्र आले होते. ते सारेच बाहेर गेले आणि कल्याण संध्येकडे गेला आहे.''

''वाईट झालं हो संध्येचं. गुणी पोर; ऐकून माझ्या डोळ्यात पाणी आलं. परंतु देवाची सत्ता, तिथं काय चालणार! भाईजी, हे साजूक तूप आणलं आहे व हे जुन्याचे तांदूळ आणले आहेत. ह्यांचा भात जरा हलका असतो. संध्येसाठी या तांदळांचा वेगळा भात करीत जा. काही दिवस संध्येला अगदी हलका आहार द्यायला हवा. जपावं लागेल. आहातच तुम्ही. संध्याकाळी बाळबरोबर मी जाऊन येईन तिच्याकडे.'' आई म्हणाली.

''किती तुमचा लोभ या सर्वांवर!'' भाईजी म्हणाले.

''बाळचे हे सारे मित्र. आणि बाळ म्हणजे माझा प्राण. तो या अशा चळवळीत पडला. कधी काय होईल त्याचा नेम नाही. मी तरी काय करू? बाळ कधी घरी आला म्हणजे मला समजावून सांगत असतो. जगासाठी ही मुलं धडपडत आहेत. धडपडू दे. परंतु बाळची प्रकृतीही बरी नसते. दमा, ताप, काही ना काही सुरू असतं. आजारीपणाची तो कधी पर्वा करीत नाही. ताप अंगात असूनही तो तासन् तास चर्चा करीत बसेल, आपलं म्हणणं पटवू पाहील. ध्येयासाठी वेडी झालेली मुलं पाहिली, म्हणजे आम्हाला स्वतःची लाज वाटते. आमचं सुखाचं जीवन. आम्ही घरी नीट खातपीत असतो; आणि ही पोरं हाल काढीत आहेत. बाकी आपण तरी कोण कोणाला किती पुरे पडणार? शेवटी देवच सर्वांना आहे. नाही का भाईजी?'' आई म्हणाली.

थोड्या वेळाने ती माऊली गेली. भाईजींनी शेगडी पेटविली. ते विचारात मग्न होते. ते मघा मित्र आले ते कोण? या सर्व लोकांचे काही तरी बेत दिसतात. सरकार यांना बाहेर राहू देईल का? आणि माझी काँग्रेस काय करणार? युद्धासंबंधी ते धीरोदात्त असे ऐतिहासिक पत्रक काँग्रेसने काढले. परंतु पुढे काय? प्रत्यक्ष चळवळ होईल का?

भाईजी जणू समाधीत होते. आणि बाहेर पाऊस आला. ते उठले, बाहेरची अंथरुणे त्यांनी घरात आणून ठेवली. घरात कोठे कोठे गळू लागले. ती नवीन जागा एरवी बरी होती. भरपूर उजेड होता. बाहेर पत्र्यांवर उभे राहिले म्हणजे सुंदर देखावा दिसे. भाईजी घरातील आवराआवर करीत होते; तो दवाखान्यातून कल्याण आला. पावसातून भिजतच आला.

'काय कल्याण, कसं आहे संध्येचं? ताप वगैरे नाही ना?''

''ताप नाही. परंतु फारच गळून गेली आहे. प्रसुतीच्या वेदना आणि त्याहून तीव्र अशा मनोमय दुःखाच्या वेदना. उन्हानं वेल गळून जावी तशी माझी संध्या झाली आहे. काही खाईना. परंतु शेवटी दोन घास भरवले आणि भाईजी, सांजाशिरा वगैरे नाही द्यायचा. अगदी हलकं अन्नं द्यायचं असं डॉक्टर व तिथल्या त्या बाई म्हणाल्या. त्या बाई फार प्रेमळ आहेत. तुम्हाला त्या ओळखतात. चाळीसगावला एकदा तुमचं व्याख्यान त्यांनी ऐकलं होतं. संध्येजवळ त्या बसतात, धीर देतात. संध्या शांत होत आहे. आणि विश्वास वगैरे कुठं गेले सारे?''

''कोणी तरी मित्र आले होते, त्यांच्याबरोबर विश्वास, बाळ वगैरे गेले. कुठं गेले ते मला माहीत नाही. ते गर्दीत होते.''

''मीही जाऊन येऊ का, भाईजी? तुम्हाला एकट्याला सारं करावं लागतं.''

''कल्याण, असं नको हो म्हणू जाऊन ये.''

कल्याणही गेला. पाऊस पडत होता. परंतु त्याला काय त्याची पर्वा? आगीत घुसणारी ती माणसें. ती का पावसातून जायला भितील? पाहा त्यांची कर्तव्यनिष्ठा, ध्येयाचा ध्यास. पत्नी दवाखान्यात पडलेली. काल तो तसा प्रसंग; परंतु सारी दुःखे गिळून, अश्रू गिळून कार्यासाठी धावपळ सुरूच आहे. कोपऱ्यात बसून मुळूमुळू रडणे नाही, काही नाही. घरात काय आहे, डाळतांदूळ आहेत की नाही, संध्येला सायंकाळी काय करून न्यायचे, कशाला विचार

करायला वेळ नाही. क्रांतीचे निस्सीम उपासक, क्रान्तीच्या निदिध्यासाने रंगलेले कर्मवीर!

बारा वाजून गेले. भाईजी वाट पाहात होते. पाऊस पडतच होता. रंगाही आला. परंतु अद्याप विश्वास वगैरेचा पत्ता नाही. शेवटी एकदाचे आले सारे. ओलेचिंब होऊन आले होते. सर्वांनी कपडे काढले. अंगे पुसून नवीन कपडे घालून सारे जेवायला बसले.

''कल्याण, आपण इथं राहायला आलो ही गोष्ट पोलिसांना कळली.'' विश्वास म्हणाला.

''तो सी. आय. डी. इथं घिरट्या घालीत होता.'' रंगा म्हणाला.

''अरे, आपण प्रसिद्ध व्यक्ती आहोत आपलं रक्षण करायला सरकार सदैव पाठीशी असतं.'' कल्याण म्हणाला.

''सरकार काय रक्षण करणार?'' भाईजी म्हणाले.

''आज हरणी नाही वाटतं आली?'' विश्वासने विचारले.

''नाही आली.'' भाईजींनी सांगितले.

''संध्येकडे जायला तिला सांगितलं असतं.'' तो म्हणाला.

''बाळ आपल्या आईला घेऊन तिच्याकडे जाणार आहे. तो आताच घरी गेला.'' कल्याण म्हणाला.

''बाळची आई इथं येऊन गेली. जुन्याचे तांदूळ व साजूक तूप देऊन गेली.'' भाईजींनी सांगितले.

''प्रेमळ आहे माऊली.'' कल्याण म्हणाला.

जेवणे झाली. सारे दमले होते. सर्वांच्या मनालाही शीण आलेला होता. सारे झोपले. तो हळूच दार उघडून कोणी तरी आले. कोण होते?'

त्या घराचा तो मालक होता. तो वृद्ध पेन्शनर होता. का आला तो?

काय काम? विश्वास एकदम जागा झाला. तो उठला.

''काय पाहिजे?'' त्याने विचारले.

''तुमच्याजवळ थोडं बोलायचं आहे. इकडे येता का?''

विश्वास त्याच्याबरोबर गेला. दोघांचे काही तरी बोलणे सुरू झाले. हळूहळू आवाज मोठा होत गेला. विश्वास रागाने बोलत होता. आता कल्याणही उठून तेथे गेला. सर्वांचे चांगलेच भांडण जुंपले.

''अहो, आज इथं आलो नाही तो का पुन्हा जायला सांगता? हा काय चावटपणा? एक महिना तरी आम्ही इथंच राहणार. इथून आम्ही जाणार नाही. काय करायचं असेल ते करा. नोटीस द्या आधी. जा म्हणून तुम्हाला सांगवता तरी कसं?'' विश्वास म्हणाला.

''अहो, मी पेन्शनर माणूस. माझी मुलं तिकडे मुंबईला नोकरीचाकरीला आहेत. इथं फक्त मी नि ती. दोघं म्हातारी माणसं. ते मघा पोलीस आले व विचारूं लागले. सांगितलं त्यांना की आलं आहे खरं बिऱ्हाड. ते तीनदा तीनदा दाराशी येतात. आजपर्यंत या घरात कधी पोलिस आला नाही. आम्हाला या गोष्टींची सवयच नाही. शिवाय जगात लढाई सुरू झालेली. आपलं सरकार लढाईत पडलेलं. आणि त्यातून आम्ही पेन्शनर. अहो, एकदम पेन्शनही हे बंद करायचे हो. काही न्याय का राहिला आहे या राज्यांत? तुम्हाला आम्ही जागा दिली, हाच भयंकर गुन्हा असं म्हणायचे. म्हणून म्हणतो की तुम्ही आपले जा. पुण्याला वाटेल तितक्या तुम्हाला जागा मिळतील. किती तरी नवीन जागा पर्वतीच्या बाजूला झाल्या आहेत. कृपा करा.'' तो म्हातारा पेन्शनर सांगत होता.

''अहो, पण तुम्ही सुशिक्षित आहात नि असे काय घाबरता? सरकारनं असं का जाहीर केलं आहे की, आम्हाला कोणी घर देऊ नये? जर कोणी

बिऱ्हाडाला जागा देईल त्याला दंड होईल, शिक्षा होईल, असं का सरकारी फर्मान निघालं आहे? उगीच का तुम्ही भिता? आले पोलीस तर येतील आमच्या खोलीत. तुमचं घर का जप्त होणार आहे?'' विश्वास समजावून सांगत होता.

''तसा मी भित्रा नाही हो. अहो, माझे चुलते टिळकांच्या राजकारणात होते. परंतु आता मी म्हातारा झालो आहे. म्हणून म्हणतो, की उगीच नको. तुम्हा तरुणांचं तसं मला कौतुक वाटतं. मीही आज तरुण असतो, तर तुमच्याबरोबर राहिलो असतो. परंतु वय झालं. आता चळवळ सुरू होईल असंही म्हणतात. धरपकडी होतील. आपल्या देशाची तयारीच नाही. वास्तविक अशा वेळी देश स्वतंत्र करायची संधी असते. लोकमान्य असते, तर आज देश स्वतंत्र करते. परंतु टिळक, एकच पुरुष झाला. अहो, मी चुलत्यांबरोबर जायचा त्यांच्याकडे. काय त्या चर्चा व ती खलबतं. मग केव्हा जाता तुम्ही? उद्या गेलेत तरी चालेल. परंतु जा बुवा. वाईट वाटतं मला सांगायला. परंतु आमचं वय झालं. हे पोलिस नको यायला दारात. सर्व आयुष्यात जे पाहिले नाही, ते म्हातारपणी नको पाहायला.''

''आम्ही काही जाणार नाही; हा काय फाल्तूपणा? पोलीस आणा व काढा आम्हाला बाहेर!'' कल्याण म्हणाला.

''आम्ही विश्वासानं तुम्हाला जागा दिली. परंतु तुम्ही असे असाल हे काय बरं आम्हाला माहीत? जरा शंका आली, की हे रात्रीचं सामान का आणतात? परंतु म्हटलं दु:खांत आहेत. वेळ नसेल जात. आणीत असतील सामान. पण जेव्हा सकाळी पोलिस आले, तेव्हा प्रकाश पडला. तुम्ही आधीच सांगतेत, तर मी जागा दिली नसती. इतके दिवस रिकामी आहे, आणखी काही दिवस पडती. आणि भाड्याचा लोभ थोडाच आहे मला? चांगली पेन्शन आहे. मुलं चांगली रोजगारी आहेत. परंतु म्हटलं सोबत होईल. आम्ही दोन पिकली पानं घरात. हाक मारायलाही कुणी नाही. तुम्ही बरेच मित्र मित्र

होता. बरं झालं असतं. आमच्या हिला तर काल तुम्ही बोलत होतेत तिच्याजवळ तर किती बरं वाटलं. म्हणाली, कशी छान आहेत मुलं. परंतु उपयोग काय? तुम्ही हे असे उपद्व्यापी. काही करा. जा. या पांढऱ्या केसांची तुम्हांला प्रार्थना आहे?'' म्हातारा गयावया करून म्हणाला.

कल्याण व विश्वास खोलीत आले. रंगाही खूप रागावला होता. काल येथे सामान आणले. आता जा पुन्हा कोठे मिरवणूक काढायीच? आणि नवीन घर पाहू तेथेही हेच प्रकार झाले तर? कोठे तरी ठाण मांडून बसलेच पाहिजे. हा काय चावटपणा! असे त्यांचे विचार चालू होते.

''कल्याण, आपण जाऊ या दुसरीकडे. त्या म्हाताऱ्याला कशाला त्रास? रागावून काय होणार? आपण त्यांची कीव करू या. आपला देख किती मागं आहे त्याची यावरून कल्पना येईल; यापेक्षा किसान कामगारही जरा धीट असतात. असं कसं हे पुणं? आणि ही म्हणे महाराष्ट्राच्या राजकारणाची राजधानी!'' भाईजी म्हणाले.

इतक्यात त्या म्हाताऱ्याची पत्नी आली. ती गोड बोलून सांगू लागली. तिला वाईट वाटत होते. तिने नवऱ्याची समजूत घालण्याचाही प्रयत्न केला, परंतु तिला यश आले नाही. ती विश्वासला म्हणाली, ''हे पाहा विश्वास, तुम्ही उद्याच जा असं नाही. चार दिशी गेलेत, तरी चालेल. चांगली जागा मिळेपर्यंत राहा हो. परंतु कुठं तरी दुसरीकडे बघा. त्यांचा स्वभाव हा असा. वयही झालं. कशाला त्यांना त्रास देतां? इथं पुन्हा दुसरं कोणी नाही की पोलीसबिलीस आले तर त्यांना जरा कोणी दरडावील; खरं ना? मला वाटलं की चांगला आधार व शेजार आला मुलांचा. घर भरलेलं दिसेल. जा–ये सुरू राहील. आम्ही घरात दोघं. सारं सुनं सुनं वाटतं. तुम्हांला भाजीसुद्धां दुपारची ठेवून दिली आहे; मुद्दाम थोडी जास्त केली होती. म्हटलं, होईल

मुलांना; हातांनी करतात. तिची बरी आहे ना प्रकृती? जरा संभाळा हो. वाईट झालं. तुम्ही सारे दुःखात, मी समजते; परंतु काय करायचं? चार दिशीं गेलेत तरी चालेल हो.''

असे म्हणून मी म्हातारी गेली. विश्वास तिला नाही म्हणू शकला नाही. म्हाताऱ्याचा त्याला राग आला. परंतु या म्हाताऱ्याच्या पत्नींचे बोलणे कसे सरळ! तिने भाजीही त्यांच्यासाठी ठेवून दिली होती! तिलाही मुले जीवी असे वाटत नव्हते. परंतु नवरा म्हातारा. उगीच मनाला लावून घ्यायचा म्हणूनही तिला काळजी.

विश्वास, कल्याण दुपारी पुन्हा फिरतीस जायला निघाले. परंतु भाईजी म्हणाले, ''कल्याण, जे घर पाहाल, तिथं आधी सांगून ठेवा की, 'कदाचित आमची चौकरी करण्याला पोलीस येतील. तुम्हाला तसा त्रास नाही. परंतु आधी सांगून ठेवलेलं बरं. नाही तर आम्ही बिऱ्हाड आणू आणि पुन्हा लगेच उठवा ब्हिऱ्हाड म्हणाल; द्यायची असेल जागा तर द्या,' असं हडसूनखडसून मग ठरवा घर. नाही तर रोज सामान न्यायचं, नीट लावायचं आणि पुन्हा उचलायचं, असं किती दिवस करणार?''

''दादा, वैनीकडे तुला नाही का जायचं?'' रंगाने विचारले.

''आता आधी घर जातो पाहायला, चार-पाच वाजल्यानंतर संध्येकडे जाईन. हरणी व बाळची आई जाणारच आहेत. भाईजी, भात निराळा करून ठेवा. तूपभात व लोणचं घेऊन जाईन. तुम्ही जरा विश्रांती घ्या. आमच्यासाठी तुम्हांला ही दगदग.'' कल्याण काकुळतीने म्हणाला.

''कल्याण, पुन्हा असे बोलणार असशील तर मी आजच निघून जातो. माझ्यामुळं तुम्हाला आभार का वाटतात? कितीदा सांगायचं की माझे व तुमचे संबंध केवळ औपचारिक नाहीत.'' भाईजींना वाईट वाटून ते बोलले.

''भाईजी, आभार नाही हो वाटत. परंतु तुम्ही किती काम करता, आम्हाला काहीच का वाटणार नाही? जातो हं आम्ही.'' असे म्हणून कल्याण व विश्वास गेले. रंगाही निघून गेला. भाईजी ते भाषांतर पुरे करीत बसले. त्यांना आता येथून जावे असे वाटू लागले. आपला आणखी यांच्यावर भार कशाला? त्यांच्याही जवळचे पैसे संपत आले होते. पुढे या सर्वांचे कसे होईल, कोठे राहतील, काय खातील, भाडे कोठून देतील? किती तरी विचार त्यांच्या मनात आले. आपण जावे कोठे तरी, रोज भिक्षा मागावी व मिळेल ते या तरुणांना पाठवावे, असे त्यांच्या मनात आले. ते भाषांतर तसेच ठेवून ते त्या खोलीत येरझारा करीत राहिले.

तिसऱ्या प्रहरी कल्याण व विश्वास घरी आले. दोन-तीन तास ते हिंडाहिंड हिंडले. अनेक घरे त्यांनी ठोठावली. परंतु यश आले नाही. कंटाळून ते घरी आले, अंथरुणावर पडले.

''विश्वास, मिळाली का जागा?'' भाईजींनी विचारले.

''या पुण्यात जागा मिळणं शक्य नाही.'' कल्याण म्हणाला.

''नमस्कार असो या पुण्याला?'' विश्वास संतापाने म्हणाला.

''नाही का मिळत घर?''

''नाही मिळत. तुमच्या सल्ल्याप्रमाणं वागू तर कुठंही घर मिळणार नाही. अनेक घरांतून गेलो. भाडं वगैरे सारं ठरे. परंतु 'पोलीस वगैरे येतील हो एखादे' असे आम्ही म्हणतांच 'तर मग नको' असं म्हणत. काय करायचं?'' विश्वास म्हणाला.

''आणि घरावरून मारे भगवे झेंडे आहेत. पुरंदरे कॉलनी वगैरे साऱ्या तपासल्या. वाटे की भगवा झेंडा घरावर आहे. काही निर्भयता असेल. परंतु पोलिसांचं नाव काढताच मालक नको म्हणत. आणि विश्वास, तो रे एक

म्हातारा. किती गोड बोलला. परंतु पोलीस येतील चौकशी करायला म्हणताच म्हणाला, ''तर मग नको. तसा मी भितो असं नाही. तुम्ही तरुणांनी नाही चळवळी करायच्या, तर कोणी? तुम्हीच खरं हिंदुस्थान. आमचं काय आता; दस गेले पाच राहिले. तुमचं तरुणांचं कौतुक राव. आमचं एवढंच भाग्य की आमच्या हयातीत तुमच्यासारखे तरुण घरंदारं सोडून चळवळी करू लागले आहेत. देशाला आशा आहे. हे प्राचीन राष्ट्र नेहमी का गुलाम राहील? अहो, आम्हालासुद्धा काही करावंस वाटतं. काही नाही होत, तर निदान भगवा झेंडा तरी लावावा. सरकारच्या डोळ्यात काही तो फारसा खुपत नाही. शिवाय हिंदुमहासभा सरकारला लढाईत मदत करायला तयारच आहे. म्हणून भगवा झेंडा दिला लावून. घराला जरा शोभाही येते. वारा सुटला म्हणजे किती छान दिसतो, सुरेख फडफडतो. भगवा झेंडा म्हणजे मराठ्यांच्या स्वराज्याचं स्मरण. भगवा झेंडा डोक्यावर घेऊन नाचलं पाहिजे. मनाचं समाधान होतं की, आपण थोडं तरी करतो आहोत. घरावर भगवा का होईना, झेंडा आहे. तुम्ही करा खटपट. तुम्ही लाल झेंड्याचे असाल. लाल रंग म्हणजे धोक्याची सूचना. लाल सिग्नल दाखवला की गाडी थांबली. तुम्ही फार पुढं गेलेले आहात. भगवा झेंडा सतराव्या–अठराव्या शतकातला. आम्ही अजून मागं आहोत. तुम्ही गेलेत फार पुढं. चांगलं आहे. परंतु आम्हा म्हाताऱ्यांना पुढं फार पाहवत नाही. मागंच राहणं बरं. श्रमणारांचं राज्य तुम्ही करणार ना? झालंच पाहिजे. गरिबांची दैना आहे हो. तुमची धन्य आहे. त्या पलीकडच्या बाजूला चौकशी करून बघा. मिळेल जागा. आणि डेक्कन जिमखान्यावर नाही का?' अशी त्या म्हाताऱ्याची टकळी सुरू होती. आम्हाला हसावं की रडावं समजेना.'' कल्याण सांगत होता.

''आणि कल्याण, ते तर कॉंग्रेसचेच गृहस्थ होते! केवढा त्यांचा वाडा!



हि.तुरडे पुणे

परंतु त्यांनीसुद्धा स्वच्छ सांगितलं की, 'तुम्हाला जागा मिळणार नाही. तुम्हा तरुणांचा नेम नाही. तुम्ही काही अहिंसेला बांधलेले नाही. तुमची ध्येयं निराळी, विचार निराळे. तुम्ही दुसरीकडेच पाहा. माझ्या घरावर तिरंगी झेंडा आहे. त्याची पवित्रता मला राखली पाहिजे.' काय आढ्यता! एवढाल्या इस्टेटी पवित्र राहूनच केल्या असतील! असतील मतभेद आमच्याशी, म्हणून का जागाही न द्यावी? बेटे काँग्रेसच्या नावानं आपली भीती लपवीत असतात. काँग्रेसचा आत्मा यांना कळतो तरी का? आपल्या देशातील काही धडपडणारे तरुण वणवण करीत आहेत, पोलीस त्यांची चौकशी करतात, म्हणून भित्रे लोक त्यांना जागा देत नाहीत; अशा वेळी स्वत:ला काँग्रेसचे म्हणवणाऱ्या या माणसाचं तरी कर्तव्य घर देणं हे होतं. 'या, राहा माझ्याकडे, आले पोलीस तर त्यांना काय ते उत्तर देईन.'' असं वास्तविक त्यांनी तरी म्हटलं पाहिजे होतं. परंतु त्यांनीही आम्हाला घालवून दिलं. हे का सत्य? ही का अहिंसा? का हा दंभ, ही भीती? भाईजी, काय ही आपल्या देशाची स्थिती? हे मोठमोठे वाडे, का ही कबरस्तानं? सारे भूतबंगले आहेत. जिवंत प्रेतं जणू या घरातून राहतात.'' विश्वास म्हणाला.

''मग आता काय करायचं, विश्वास? रागावून काय होणार? काँग्रेस ही जनतेची संस्था आहे. कांही गणंग व दांभिक असणारच तिच्यात. परंतु माझ्या काँग्रेसवर नको हो रागावू. पुन्हा जा पाहायला.'' भाईजी म्हणाले.

''आतां उद्या जाऊ पाहायला. आणि तुमचा मंत्र आता नको. 'ते पोलिस वगैरे येतील' असं आपणच आधी सांगायचं नाही. तशानं काही घर मिळणार नाही. या भितुरड्या पुण्यात मिळणार नाही. जे पुणं राजकारणाचं केंद्र मानतात, जिथं नेहमी सभा चालतात, जिथं नाना वर्तमानपत्रं, जिथं शेकडो मेळे, जिथं हजारो विद्यार्थी, जिथं लोकमान्यांसारखे अद्वितीय पुढारी झाले, त्या पुण्यातील

लोकांच्या मनात आजच्या काळात एवढी भीती, काळे डगलेवाल्यांचं इतकं काय? मग आम्ही खेड्यातील लोकांना कुठल्या तोंडानं हसावं? ते पोलिसांना भितात म्हणून त्यांना का नावं ठेवावी? रद्दी पुणं. भिकारडं, भितुरडं पुणं. पुण्याचा वरून सारा देखावा. शेणाची रंगीत फळं. वरून सुंदर रंग. आत शेण, वाळलेलं शेण. पुणं म्हणे भरभराटात आहे. महाराष्ट्राचं पॅरिस होत आहे. केवढाले बंगले म्हणे उठत आहेत. परंतु सारी विश्राममंदिरं, पेन्शनरी घरं, मरणधामं; चीड आली आज, भाईजी. पुण्याची नाडी कळली आज.'' विश्वास रागाने बोलत होता.

''विश्वास, का शिव्या देतोस? त्यांना काही होणार का आहे? काही व्हायचं असेल, तर शेतकरी–कामकरीच करतील. या सुशिक्षित नोकरीवाल्यांची नेहमी सरकारच्या चरणांकडे दृष्टी असायची. आम्हा पांढरपेशांना नेहमी हाच उद्योग. मुसलमान आले. आम्ही फारशी शिकून त्यांचे कारकून होऊन त्यांची राज्ये चालविली. इंग्रज आले. ताबडतोब इंग्रजींत तरबेज होऊन त्यांचा गाडा चालवू लागलो. आणि आता हिटलर येईल असं वाटून पांढरपेशे तरुण जर्मन भाषा शिकूं लागले. कॉलेजांतून जर्मन भाषा घेणाऱ्यांची धंदा म्हणे गर्दीच गर्दी! अशा पांढरपेशांवर ते तपस्वी, महर्षि इतिहाससंशोधक राजवाडे नुसते जळफळत. पांढरपेशांचा लोचट वर्ग असं ते म्हणत. विश्वास, म्हणून यांची आशा सोडा. तुमचं लक्ष शेतकऱ्यां–कामकऱ्यांकडे आहे. तेच योग्य. रागावू नकोस. उद्या मिळेल घर तिथं घ्या. माझा प्रयोग बंद करा. पुण्याच्या पांढरपेशांचे स्वरूप कळलं ना? त्यांचे अंतरंग कळलं ना? पुष्कळ झालं–'' भाईजी म्हणाले.

''भाईजी, मी संध्येकडे जातो. भात झाला आहे ना?'' कल्याणने विचारले.

''हो, झाला आहे. तूप घाल हो जरा बरंचसं. मेतकूटही ने हवं तर पुडी करून.'' भाईजी म्हणाले.


श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय, सातारा.

कल्याण भात घेऊन गेला. विश्वास झोपला. भाईजी काही लिहीत बसले. सायंकाळी हरिणी आली. संध्येला भेटून ती आली होती.

''भाईजी, विश्वास उगीचच निजला आहे ना?'' तिने विचारले.

''उन्हातून नवीन जागा पाहायला गेले होते.''

''का?''

''ही जागाही सोडायची. मालकानं जा म्हणून सांगितलं. पुन्हा सामानाची मिरवणूक.''

''हा काय त्रास?''

''ही गुलामगिरी हो, हरणे. हिंदुस्थानात माणसं नाहीत. मेंढरं आहेत.''

''उठवू का विश्वासला?''

''उठव आता. दिवे लागायची वेळ होईल. यावेळी झोपणं बरं नाही. पडसं होतं, सर्दी होते.'' भाईजी म्हणाले.

''विश्वास, अरे विश्वास!'' हरणीने हलवून हाका मारल्या.

''निजू दे गं मला.'' तो कुशीवर वळून म्हणाला.

''ऊठ रे, आपण फिरायला जाऊ.''

''हरणे, हिंडून हिंडून दमलो; पाय दुखायला लागले.''

''चेपू का जरा?''

''नको. तू संध्येकडे जाऊन आलीस का?''

''हो, आले.''

''कशी आहे?''

''बरी आहे. मधूनमधून तिचे डोळे अजून ओले होतातच. परंतु आता बरीच शांत झाली आहे.''

''हरणे?''

''काय, विश्वास?''

''चल, जाऊ फिरायला.''

''पण थकला ना आहेस?''

''फिरल्यानं, तुझ्याबरोबर फिरल्यानं थकवा जाईल; चल; भाईजी, येऊ जरा फिरून?''

''ये. मनमोकळेपणं बोला. जरा आनंदी होऊन ये.''

हरणी व विश्वास बाहेर गेली. भाईजी स्वयंपाकाला लागले. किती तरी दिवसांनी आज ते अभंग म्हणत होते. अभंगवाणी उचंबळून त्यांच्या तोंडातून बाहेर पडत होती. काही चरण ते घोळून घोळून म्हणत होते :

निराधार आम्ही तुझाचि आधार

अमृताचि धार तुझें नाव

तुझा म्हणुनियां आलो तुझे दारी

मी तव भिकारी भीक घाली

भीक घाली थोडी थोडी तरी राया

पडतो मी पायां दया करीं ।।निराधार।।

कोणाचा होता हा अभंग? भाईजी आळवून आळवून म्हणत होते. ''तुझा म्हणुनिया आलों तुझे दारी'' हा चरण ते घोळून घोळून म्हणत होते. तो समोर कोण होते? कोण येऊन उभे होते? विश्वास व हरणी दोघे उभी होती. शांतपणे उभी होती.

''भाईजी, कोणाच्या दारी? कोणाजवळ भीक मागता, कशाची मागता?'' विश्वासने सौम्य स्निग्ध शब्दात विचारले.

''तुझ्या दारी, प्रेमाची भीक; भाईजींना दुसरी कसली भूक आहे?''

''भाईजी, तुम्हाला सांगू एक गोष्ट?'' हरणीने विचारले,

''सांग.''

''आमचं लग्न ठरलं.''

''कधी?''

''येत्या आठ दिवसांत.''

''तुला नोकरी मिळाली का?''

''लग्न लावा, मग नोकरी देऊ असं सांगण्यात आलं.''

''लग्नानंतर तरी मिळेल याची काय खात्री?''

''ते फसवणार नाहीत असं वाटतं.''

''बरं झालं. मीही इथून लौकर जावं म्हणतो. पुरे आता इथं राहणं.''

''आम्हाला कंटाळलेत ना? प्रेम का कंटाळतं, भाईजी?''

''विश्वास, जगातील सारी अपुरी प्रेमं. परंतु तुमच्यावर प्रेम आहे म्हणूनच जावं म्हणतो. माझ्या प्रेमावर का केवळ जगाल? विश्वास माझ्याही जवळचे पैसे संपले. आपण खायचं तरी काय? माझाही आता तुमच्यावर एक बोजा. मी जातो कुठं तरी. काही मिळवून तुम्हांला पाठवता आलं तर पाहीन. नाही तर वाऱ्याबरोबर मनातील प्रेम तुम्हाला पाठवीन.'' भाईजी म्हणाले.

''भाईजी, मी जाते. जाते हं, विश्वास.'' असे म्हणून हरिणी गेली. कल्याण आला. रंगा आला. सारे जेवले. संध्येचे मन शांत होत होते. रात्री लौकरच सारे झोपले. दुसऱ्या दिवशी पुन्हा कल्याण व विश्वास घर शोधायला निघाले व शक्रवारात एक घर ठरवून ते आले. रंगाने एक खटारा सामानासाठी ठरवून आणला. कल्याण व विश्वास यांनी सामानाबरोबर जायचे नाही, असे ठरले. पोलिस बघायचे एखादे. ते दोघे सायकलवरून पुढे निघून गेले. रंगा व भाईजी सामान खटाऱ्यात घालून खटाऱ्याबरोबर निघाले. जाताना त्या पेन्शनरीणबाईला प्रणाम करून व तिचा आशीर्वाद घेऊन ते गेले. म्हाताऱ्यांचा आशीर्वाद असावा. दुसरे काही नसले तर नसले!

✦✦✦

## १९...
# हरिणीचे लग्न

दवाखान्यांत संध्येला ताप येऊ लागला. स्तनातील दुधाचाही त्रास होई. ती अधिकच अशक्त झाली.

''मला घरी घेऊन जा. कल्याण.'' संध्या म्हणाली.

''संध्ये, इंथ जितकी तुझी काळजी घेतली जाईल, तितकी घरी घेता येईल का? आणखी काही दिवस तू इथंच राहा. मग नेऊ हो. धीर धर उतावीळ नको होऊ.'' कल्याण समजूत घालीत होता.

''इथं मनाला चैन नाही पडत.''

''काही वाचं, पुस्तक देऊ पाठवून?''

''दे. श्यामची आई पुस्तक दे पाठवून.''

''पाठवीन.''

कल्याणने ते पुस्तक संध्येला दिले. संध्या ते वाची. तिने पूर्वी ते कितीदा तरी वाचले होते. परंतु आता पुन्हा वाचीत होती. तिला का आईची आठवण येत होती? किती तरी दिवसात आईचे पत्र आले नव्हते तिने तरी कोठे पाठविले होते? आईकडे जावे, तिच्याजवळ बसावे. आईचा हात

पाठीवरून, केसांवरून  फिरावा, असे का तिला वाटत होते? त्या पुस्तकातूनच ती मातृप्रेमाचा चारा खात होती व तृप्त होत होती. तेवढेच समाधान.

भाईजीही आता जाऊ म्हणत होते. संध्या घरी आली तर स्वयंपाक वगैरे करणार कोण? ती तर अशक्त व आजारी. यासाठी विश्वासने लौकर लग्न करावे असेच सर्वांचे म्हणणे पडले. म्हणजे मग हरिणी राहायला येईल; आणि आर्थिक प्रश्नही थोडा सुटेल. लग्न झाल्यावर तिला नोकरी मिळेल असे खात्रीपूर्वक वाटत होते.

हरणीची आई या लग्नाला तयार नव्हती. हरणीवर तिच्या आईचे प्रेम होते. तिने आणखी शिकावे व एखाद्या श्रीमंताशी लग्न लावावे असे तिच्या आंईला वाटत होते. मग काय करायचे? सरकारी पद्धतीने का लग्न लावायचे? तें हरणीच्या आईला सहन होणार नाही. मग काय करायचे?

एके दिवशी विश्वास अकस्मात आपल्या घरी गेला. त्याची सावत्र आई जरा आजारी होती.तो आईजवळ बसला.तिला बरे वाटले.

''आई, बाबांना एक विचारायला मी आलो आहे.''

''काय विचारणार आहेस?

''ते माझं लग्न लावायला तयार होतील का? नुसता वैदिक विधी तेवढा करायचा.''

''कोणाबरोबर लग्न?

''हरणीबरोबर.''

''परंतु तिच्या आईची मान्यता आहे का?

''तशी मान्यता नाही. परंतु लग्न लागताच आम्ही दोघं जाऊ व हरणीच्या आईच्या पाया पडू. ती का आशीर्वाद देणार नाही?''

''विचार त्यांना. ते तयार होतील.''

''कशावरून?''

''अरे, हरणीचे वडील व हे नेहमी म्हणायचे, की विश्वास व हरणी या दोघांचा जोडा सुरेख शोभतो. हरणीचे वडील असते, तर तुलाच ते ती देते. हरणीचे वडील व हे प्रिय मित्र होते. यांना आनंदच होईल. मित्राची इच्छा पूर्ण झाली असं यांना वाटेल, शिवाय अशी शिकलेली सून अनायासानं विनाखर्चानं मिळालेली कुणाला आवडणार नाही? तुम्ही इथं नाही राहिलात, तरी चारचौघांत तोंड भरून यांना सांगता तर येईल. विचारा त्यांना.''

आणि विश्वासने वडिलांजवळ गोष्ट काढली; आणि काय आश्चर्य! वडील खरोखरंच एकदम तयार झाले. लग्नाचे मुहूर्त आता नव्हते. परंतु ते म्हणाले, ''पवित्र व मंगल गोष्टीला काळवेळ पाहायला नको. 'अकालो नास्ति धर्मस्य। जिविते चंचले सति।।' विश्वास, मी सारी व्यवस्था करतो. तुम्ही दोघं तयार राहा म्हणजे झालं.''

संध्येचा ताप राहिला होता. परंतु तिला आमांश झाला. तिची प्रकृती सुधारेना. मनानेही तिने हाय घेतली होती. परंतु दवाखान्यातून घरी आणल्याने आणखीच प्रकृती बिघडली असती. कल्याण दवाखान्यात सकाळ–संध्याकाळ जात असे. तिच्याशी प्रेमाने बोलत बसे. विश्वासचे लग्न लौकरच होईल असे तिला त्यांने सागितले. संध्येला आनंद झाला. तिच्या तोंडावर थोडा रंग आला. किती तरी दिवसांनी अशी थोडी रंगच्छटा तेथे फुलली होती.

''कल्याण, हरिणीला आपण काय द्यायचं?'' संध्येने विचारले.

''काय द्यायचं, संध्ये?

''कल्याण, माझ्या ट्रंकेत एक रेशमी रुमाल आहे. तो मला आणून दे. मी त्यांच्यावर पडल्या पडल्या हरणीचं नाव घालीन व तिला देईन.''

''विश्वासचंही नाव घाल. 'हरिणी व विश्वास' असे त्यात गुंफ; आणि 'संध्या व कल्याण यांचेकडून' असंही लिही. म्हणजे आपली दोघांची त्या

दोघांना भेट असं होईल.''

''खरंच. छान होईल. आण हो. माझी सुई वगैरे सारं आणं. त्या गाठोड्यात असेल. कल्याण, त्या गाठोड्यात चिमण्या होत्या, काय काय तरी होतं. अरेरे!''

''मी पाहिलं हो सारं, संध्ये.''

''केव्हा?''

''सामान भरायच्या वेळी. संध्ये, उगी. नको, डोळ्यात पाणी आणू.''

''कल्याण, मधूनमधून हे पाणी काही दिवस येईलचं. एकदम येतात डोळे भरून. किती मी आशा खेळवल्या होत्या मनात. हे काय, तूही का रडत आहेस? नको रडू तुम्हा पुरुषांना रडणं शोभत नाही. ही बघ मी हसते. तूही हस. रडत नको हो जाऊ.''

संध्येचा हात हातात घेऊन कल्याण बसला होता. ती त्याच्याकडे बघत होती.

''कल्याण, भाईजी नाही मुळीच आले ते?''

''त्यांना तुझ्याकडे यायला धीर नाही होत.ते सारखी तुझी आठवण करतात. संध्ये ते लौकरच जाणार आहेत. तुझ्यामुळं इतके दिवस ते राहिले; नाही तर आजपर्यंत कधीही इतके राहिले नाहीत. त्याचं वर्तमानपत्रही सरकारनं बंद करून टाकलं. त्यामुळंही ते मोकळे होते. परंतु मोकळे असले,तरी एके ठिकाणीं राहणं त्यांना जमत नाही. ते नेहमीं हिंडत असतात. शेतकऱ्यांतून फिरत असतात.आता नाही ते आणखी राहणार.''

''हरणीच्या लग्नापर्यंत तरी राहतील ना?''

''राहतील.''

''जायच्या आधी मला म्हणावं भेटून जा.''

''तुला भेटल्याशिवाय नाही ते जाणार. त्यांचा आम्हाला इतके दिवस

किती उपयोग झाला! नि:शकपणं व निश्चितपणं आम्ही इकडे तिकडे जात होतो. वाटे, जणू घरात कोणी वडील माणूस काळजी घ्यायला आहे---''

''कल्याण, तू गेला होतास ना त्या कामासाठी, तर भाईजी माझ्यावर किती रागावले! म्हणाले, तू कसं त्याला जाऊ दिलंस? तू रडतीस तर तो जाता ना.''

''मग तू काय सांगितलंस?''

''सांगितलं की कल्याणचं संध्येशी लग्न लागलेलं आहे. तसंच क्रान्तीशीही लागलेलं आहे. त्याला संध्या आवडते, परंतु क्रान्तीचा त्याच्यावर अधिक हक्क आहे. क्रान्तीचा तो आहे ते माहीत असूनच मी त्याला माळ घातली. खरं ना कल्याण?''

''संध्ये, तुझ्यासाठीही जीव तुटतो हो.''

''मी नाही का म्हटलं? कल्याण, अलीकडे माझ्या मनात एक विचार येई व वाईट वाटे.''

''कोणता विचार?''

''तुझ्या संध्येचं बाळ देवानं नेलं, जन्मत:च त्याच्या गळ्याला देवानं नख लावलं, त्याप्रमाणं तुमच्या क्रान्तीच्या बाळाचंही होईल का? क्रान्तीचा जन्म होताच सरकार दडपील का? तुम्हाला नाही का रे कधी क्रांन्तीचा बाळ पाहायला मिळणार? तुमचे सारे उद्योग का विफल होणार?''

''संध्ये, आम्ही धडपडणारी मुलं. ज्याच्या त्याच्या हयातीतच सारं होईल. असं कसं मानावं? आपला देश केवढा , किती अडचणी! नि:शस्त्र लोक! दीडदोनशे वर्षाची गुलामगिरी! आम्ही जमीन नांगरीत आहोत. विचार पेरीत आहोत. पुढं येईल पीक. कर्तव्य केल्याचं आम्हांला समाधान! श्रमणाऱ्यांचे संसार सुखी व्हावे, सारी मानवजात सुखी व्हावी, सर्वांनी थोडं थोडं श्रमावं व उरलेल्या वेळात ज्ञानविज्ञानांत त्यांनी रमावं, कलामध्ये रंगावं, असं

आम्हाला वाटतं. हे उज्वल ध्येय आमच्या डोळ्यांसमोर आहे. ते डोळ्यांसमोर ठेवून जेवढं करतां येईल तेवढं करतो. एक नवीन मुलगा विचारांचा झाला. एक नवीन सोबती आमच्या पक्षात आम्ही आणला. तरीही आम्हाला स्वत:चं जीवन कृतार्थ झालं असं वाटतं आम्हांला आनंद होतो. संध्ये, वाईट नको वाटून घेऊ. आम्ही रडतच असू तर पदोपदी रडवणाऱ्या व अडवणाऱ्या निराशा आहेतच. परंतु भाईजी एक चरण म्हणतात.

कोण आता अडवील
कोण आता रडवील
अडवणूक करणारांची उडवू दाणादाण
या रे गाऊ सारे गान
या रे उठवू सारे रान

खरेच छान आहेत नाही, चरण?''

''भाईजी तुमच्या पक्षात नाहीत ना?''

''नाही. ते म्हणतात की अमक्यातमक्या पक्षाचा शिक्का असा माझ्या कपाळावर नको. जिथं दु:ख असेल, अन्याय असेल तिथं जावं; लढावं. जिथं लढणारे असतील त्यांना मिळावं. म्हणजे पुरे. मला मोकळा असू दे. वाऱ्याप्रमाणं मोकळा. परंतु त्यांची आम्हाला सहानुभूती आहे. किसान कामगारांची ते आता गाणी म्हणतात. गाणी करतात. आता देवासाठी ते रडत नाही बसत.''

''परंतु देवावर त्यांची श्रद्धा आहे.''

''असू दे. ती श्रध्दा गरिबांची मान उंच होण्याच्या विरुद्ध नाही. गरिबांच्या हृदयाचा, बुद्धीचा विकास होऊ नये, त्यांनी केवळ सदैव चिखलातच मरावं, सारखं काम करून कारखान्यातच नि:सत्व व्हावं असं त्यांच्या देवाला वाटत नाही; त्यांना मानू दे देव. त्या देवाची ज्या दिवशी त्यांना जरूर वाटणार

नाही, त्या दिवशी त्यांचा तो देव आपोआप गळेल. त्यांचा देव काही शनिमांहात्म्यांतील देव नाही. त्यांचा देव म्हणजे जवळजवळ विश्वाचा निर्गुण कायदा. ऋतसत्याचं तत्त्व. जरा दयाळू व प्रेममय तत्त्व, इतकंच. जाऊ दे. काही असो. भाईजी नेहमी गरिबांच्याच बाजूनं उभे राहतील.''

''कल्याण, माझ्या ट्रंकेत देव होता. तो फेकला नाहीस ना?''

''संध्ये, नाही हो, फेकला. ठेव तुझा देव. ज्ञानविज्ञानाचा स्वच्छ असा दिवा तुला मिळाला, म्हणजे मग ह्या देवाचा भ्रामक दिवा तू हाती धरणार नाहीस.''

''परंतु भाईजी म्हणत की, ज्ञानविज्ञानाचा दिवा तरी कुठं सर्व प्रश्नांवर प्रकाश पाडतो? असे राजयोगी आहेत, की जे इच्छेनं एकदम गुलाबाची फुलं निर्माण करतात. वाटेल ती वस्तू निर्मितात. विवेकानंदानी अशा सत्यकथा दिल्या आहेत. जर या सत्यकथा असतील, तर सारा तुमचा मार्क्सवाद थंडावतो, कोलमडतो,' असं भाईजी सांगत.''

''परंतु आज दहा हजार वर्षे मानवजात मरत आहे. असे कोणी राजयोगी दुनियेची उपासमार का थाबवीत नाहीत? इतके का दुष्ट आहेत ते? लाखो लोक दुष्काळांत मेले, यांनी धान्याची पोती कां निर्माण केली नाहीत? त्यांच्याजवळची ही सिद्धी जर सर्व जनतेच्या कामी येत नसेल, तर ती काय कामाची? आणि अशी फुलं का होतात, पेढे कसे निघतात, यावरही शास्त्र उद्या प्रकाश पाडील.

तेवढ्यानं कांही देव म्हणून कोणी आहे असं सिद्ध होत नाही.ज्याच्या नांवानं रडावं,ज्याला प्रार्थना करावी, असा कोणी दयामय, प्रेममय प्रभू आहे असं नाही सिद्ध होत. लहानपणी आईबाप असावेत असं मुलाला वाटतं. त्याप्रमाणं मानवजातीच्या बाल्यावस्थेत असा कोणी तरी जगाचा मायबाप असेल असं वाटतं व त्या विचारानं एक प्रकारचं संरक्षण वाटतं, समाधान

वाटतं. परंतु वाढती मुलं शेवटी आईबापाचं बंधन झुगारतात, त्याप्रमाणं मानवसमाजही ही देवाची अडगळ एक दिवस दूर करील.''

''कल्याण, अजून कोट्यवधी लोक देव मानतात. अद्याप मानवजात का बाल्यावस्थेत आहे?''

''हो, बाल्यावस्थेतच आहे. माणसं लहान मुलांप्रमाणंच एकमेकांजवळ पदोपदी भांडत आहेत, एकमेकांना बोचकारीत आहेत. समाजवाद सर्वत्र नीट स्थापन झाला, म्हणजे मानवसमाज बाल्यातून प्रौढ दशेला आला असं म्हणू. मग सर्वांची नीट वाढ होऊ लागेल. सर्वांचा विकास होऊ लागेल. संध्ये, काय हे मी बोलत बसलो?''

''बोल रे. तू माझ्याजवळ अशा गोष्टी कधीसुद्धा बोलत नाहीस. परंतु भाईजी बोलत असत. परंतु म्हणायचे, 'संध्ये, मला नाही हे सारं कळत. कल्याण, विश्वास, बाळ यांना अधिक माहिती आहे.' कल्याण, मी घरी आले म्हणजे अशी आपण बोलत बसू. आज तुला माझ्याविषयी अपार सहानुभूती वाटत आहे. म्हणून तू बोलत बसलास, खरं ना?''

''तसं नाही, संध्ये; सहज निघाल्या गोष्टी बोललो; मुद्दाम ठरवून का बोलायच असतं? सहज बोलणंचालणं निघतं, ते मौजेचं असतं. त्यात एक प्रकारचा मधुर आनंद असतो. अकपट, सात्त्विक आनंद. संध्ये, जातो आता मी.''

''जा, भाईजी वाट पाहात असतील. मी अजून संध्या इथं एकटी आहे. म्हणून बरं. नाही तर इतरांना आपल्या बोलण्याचा त्रास झाला असता.''

''आपण हळूहळूच बोलत होतो.''

''तरी कल्याण, तुमचं ते हळू बोलणं. भाई लोकांचं हळू बोलणं! तुम्हाला 'हळू' शब्द माहीत नाही.''

''जातो हं, संध्ये.''

''कल्याण गेला. आज संध्येला खूप आनंद झाला होता. ती एकदम उठली व तेथे जरा हिंडू लागली. बाहेर गॅलरीत येऊन कल्याणकडे पाहात होती. सायकलवरून कल्याण जात होता. कल्याणला काय माहीत, की संध्याराणी गॅलरीत येऊन त्याच्याकडे पाहात होती!

आणि हरणीच्या लग्नाचा दिवस ठरला. लग्नाची तयारी करण्याची जरूरच नव्हती. बाळच्या आईने हरणीला एक नवीन सुंदरसे पातळ घेऊन दिले. विश्वास आपल्या एका मित्राचे नवीन धोतर नेसला. विश्वास व हरणी गाडीतून विश्वासच्या घरी गेली. वडिलांनी वधूवरांचे स्वागत केले. भटजी आले होते. हरणी व विश्वास यांना फुलांच्या मुंडावळ्या बांधण्यात आल्या. विश्वासच्या तोंडावर आज सौम्य तेज होते. हरणीचे तोंड रक्त कमळाप्रमाणे दिसत होते. विश्वासचे काही मित्र आले होते. त्याच्या वडिलांनी काही मंडळीना बोलावले होते. विश्वासच्या आईने शेजारच्या बायकांना बोलावले होते. विश्वास लहानपणी त्यांनी पाहिलेले. दूध काढणारा व वाटणारा विश्वास. तो आता मोठा झाला होता, उंच झाला होता. त्या दोघांकडे आलेल्या बायका कौतुकाने बघत होत्या.

रंगा, लक्ष्मण, सदोबा वगैरे मंडळी होती. प्रभूही होता. एका बाजूला भाईजी बसले होते. मंत्र झाले; मंगलाष्टकेही सौम्य आवाजात झाली; आणि विश्वास व हरणी यांनी परस्परांना माळा घातल्या. सर्वांना आनंद झाला. साखर वाटण्यात आली. मंडळी गेली. विश्वासच्या वडिलांना खूप आनंद झाला होता, मुलगा शेवटी माझ्याकडे आला, माझे लग्न तुम्ही लावा असे म्हणाला, यात जणू त्यांचा विजय होता. त्यांना एक प्रकारचे समाधान वाटत होते. माझ्या मुलाचे लग्न मी लावले असे त्यांना अभिमानाने सांगता आले असते. विधिपुरस्सर समंत्र लग्न; कोठे सरकारी कचेरीत नाही. हेही एक त्या जुन्या मनाला समाधान होते. घरातील ते पहिले मंगल कार्य होते.

भाईजींजवळ ते बोलत बसले.

''तुमचं विश्वासवर प्रेम आहे. विश्वास सारं सांगत होता. परवा आला होता तेव्हा. तुमच्यासारखी माणसं त्याला लाभली, हे त्याचं भाग्य होय. तुम्ही आज इथं आलेत, मला आनंद झाला. नाही तर आमच्या घरी तुम्ही कशाला येतेत!'' वडील म्हणाले.

''तुमचा विश्वास उत्साही, ध्येयवादी आहे. कष्टाळू आहे. जे जे ध्येयासाठी, मोठ्या ध्येयासाठी, जातिधर्मनिरपेक्ष अशा मानवी ध्येयासाठी धडपडतात, त्यांच्याबद्दल मला नकळत साहजिक आपलेपणा वाटतो. लोहचुंबकाप्रमाणं असे कार्यकर्ते मला ओढून घेतात व मी त्यांचा जणू बंदा गुलाम होतो. असो. विश्वास व हरणी यावर तुमची कृपादृष्टी असू द्या.'' भाईजीनी सांगीतले.

''अहो, ती आहेच. विश्वास दूर होता, घरी येत नव्हता; तरी त्याच्याविषयी मला थोडं का वाटे? तो चांगलं बोलतो असं लोक म्हणत. एखादे वेळ मलाही वाटे, की त्याचं भाषण ऐकायला जावं परंतु अभिमान आड येई. वाटेतून जाताना एखाद वेळेस आम्ही समोरासमोरून येत असू. तर एकमेकाकडे न पाहता आम्ही जरा लांबूनच निघून जात असू; असं असलं तरी मूळची माया का नाहीशी होईल? शेवटी आतडं आतड्याला ओढतंच; आणि खरं सांगू का, आज मला एक प्रकारची कृतार्थता वाटत आहे. हरिणीचे वडील आज असते, तर त्यांना किती आनंद झाला असता! 'आमची एक तरी मुलगी तुमच्याकडे देऊच असं ते नेहमी म्हणायचे.'' असे म्हणता म्हणता विश्वासच्या वडिलांचे डोळे भरून आले. विश्वासचे कठोर वडीलही रडू शकतात एकूण!

विश्वास व हरणी सर्वांचे आशीर्वाद घेत होती. विश्वासच्या आईला परम आनंद झाला होता. तिनेच विश्वासला वाढविले होते. तिने त्याला लहानाचे

मोठे केले होते; तीच त्याला सदैव जपी. तीच त्याच्यावर सदैव मायेचे पांघरुण घाली; आणि विश्वास घरातून गेल्यावरही ती त्याच्याकडे कोणाला नकळत दूध पाठवी, कधी आंबे पाठवी. विश्वासची आठवण येऊन ती रडायची. त्याने खाल्ले असेल का, तो कोठे झोपला असेल, त्याची प्रकृती कशी असेल, किती तरी गोष्टी तिच्या मनात यावयाच्या. विश्वासचेही तिच्यावर फार प्रेम होते. विश्वास आईजवळ जरा बसला. तिने त्याच्या पाठीवरून हात फिरविला. विश्वास व हरणी यांच्या तोंडात तिने साखर घातली.

विश्वास व हरणी हरणीच्या आईकडे जाण्यास निघाली. त्यांच्या गळ्यात अजून ते फुलांचे घवघवीत हार होते. अक्षता अद्याप माथ्यावर होत्या. एक प्रकारचा पूर्णतेचा आनंद उभयतांच्या चेहऱ्यावर होता. दोघे टांग्यात बसली. निघाली.

''हरणे, तुझी आई काय म्हणेल?''

''आपणा दोघांना आशीर्वाद देईल. आपण जाऊ व एकदम तिच्या पाया पडू . पाय धरल्यावरही का आई रागावेल? तुझे वडीलही विश्वास, प्रेमळ झाले. मग माझी आई नाही का होणार? आपण श्रद्धेनं जाऊ, विश्वासानं जाऊ.'' आणि हरणीच्या आईचे घर जवळ जवळ येत चालले, तसतसे दोघांचे मन खाली-वर होऊ लागले. छातीची जरा धडधड सुरू झाली आणि टांगा थांबला. दोघे खाली उतरली. दार उघडेच होते. फार रात्र झाली नव्हती. नवाचा सुमार होता. हरणीची आई बसलेली होती. अंथरुणावर लहान भावंडे झोपलेली होती. दादा घरात नव्हता.

''आई, विश्वास व मी तुझा आशीर्वाद घ्यायला आलो आहोत. आम्ही एकमेकांना दोन तासापूर्वी माळ घातली. विश्वासच्या वडिलांनी नीट विधीपूर्वक लग्न लावलं. आम्ही तुझ्या पाया पडतो. आई आशीर्वाद दे.'' असे म्हणून हरणी आईच्या पाया पडली. विश्वासही पडला. हरणीची आई चकित झाली;


श्री. छ. प्रतापसिंह नगर वाचनालय, सातारा.

स्तंभित झाली. तिला काय बोलावे कळेना. दोघे आईजवळ बसली.

''आई !''

''हरणे, मला कळवलंही नाही.''

''मामांची व दादाची भीती वाटे; म्हणून कळवलं नाही. परंतु तू माझं हृदय जाणत होतीस. आई, मी सुखात असावं असं तुला नाही वाटतं? बाबा काय म्हणत ते आठव. विश्वास दूध घालायला आला म्हणजे काय बरं ते म्हणतं? त्या बाबांच्या शब्दांनी कधीच आमचं लग्न लावलं होतं. नाही का आई? दे तुझाही आशीर्वाद आम्हाला दे. विश्वासच्या वडिलांनी दिला, तूही दे.'' असे म्हणून हरणीने केविलवाण्या दृष्टीने आईकडे पाहिले.

''हरणे, विश्वास, माझा आशीर्वाद आहे हो. सुखानं राहा. तुमचा संसार सुखाचा होवो.'' असे म्हणून मातेने हरणीच्या डोक्यावरून, विश्वासच्या पाठीवरून हात फिरवला. ती उठली. त्या दोघांना तिने दोन पेढे दिले. घरात होतेच परीक्षेचे.

''आई, आम्ही जातो.''

''ये हो, हरणे.''

दोघे पुन्हा टांग्यात बसली आणि बाळच्या घरी आली. तेथून सारीजण एका प्रख्यात उपाहारगृहात गेली. तेथे सर्वांनी अल्पोपहार केला. मित्रांची अभिनंदपर भाषणे झाली. भाईजीही थोडे बोलले. ते म्हणाले, ''मी काय बोलू? माझं हृदय समाधानानं भरलेलं आहे. विश्वासबद्दल मला किती वाटतं ते तुम्हा सर्वांना माहीतच आहे. हरणीचाही स्वभाव मी जाणतो. अति मोकळ्या स्वभावाची ती मुलगी आहे. कधी कधी बोलता बोलता पटकन विश्वासलाही ती थापट मारायची ना संकोच, ना त्या खोट्या लाजलज्जा. हरणीने विश्वासला थापट मारली हे मी पाहिलं व मला धन्य वाटलं. वाटलं, किती निष्पाप मनाची आहे ही मुलगी! निष्पाप असल्याशिवाय असं कोणी

करणार नाही. अशी सहज अकृत्रिमता प्रकट होणार नाही. जिथं अशी सहजता असते, तिथं मोकळेपणाचा अमोल आनंद असतो. माझा एक मित्र आहे. त्याच्या जीवनात अशीच सहजता आहे. तो आपल्या पत्नीलाही बोलता बोलता पटकन् चापट्या मारील व 'समजतं का तुला, अगं वेडे, समजलं का?' असं मोठ्यानं हसत म्हणेल. त्या चापट्यांचं इतरांनाही काही वाटत नाही व त्याच्या पत्नीलाही त्यात काही गैर आहे, सदभिरुचीला सोडून आहे, असं वाटत नाही. कारण ती अकृत्रिम सहजता असते. परंतु माझ्या मित्राच्या ओळखीचा एक तरुण होता. त्याला वाटलं की, ते आपल्या पत्नीला अशा चापट्या मारतात, तर आपणही आपल्या पत्नीला प्रेमानं मारू व जरा नवीन प्रेमाचा प्रकार दाखवू; पराक्रम दाखवू. एके दिवशी माझा मित्र त्याच्या घरी गेला होता. त्या तरुणाला वाटलं की, आज करावा प्रयोग व आपलंही धाडस दाखवावं. दुसरेही एक–दोन स्नेही तिथं होते. त्याच्या पत्नीनं चहा, केळी वगैरे आणून ठेवलं. तेव्हा तो तरुण पटकन् म्हणतो, 'बिस्किटं नाही आणलीस ती? वेडी कुठली! आधी बिस्किटं आण.' व त्यानं प्रेमाचा आविर्भाव आणून तिला चापट मारली. त्याबरोबर ती पत्नी लाल झाली! हा काय पतीचा चमत्कारिकपणा? चार मित्रांच्या देखत असं काय हे वेडंवाकडं वागणं असं तिला वाटलं. आणि तो प्रेमवीरही शरमिंधा झाला. त्याचं तोंड फोटो घेण्यासारखं झालं. परंतु या हरणीच्या जीवनात सहजता आहे आणि सहजता निष्पाप जीवनातच संभवते. हरणीला आढ्यता नाही. पटकन् केर काढू लागेल, भाजी चिरू लागेल. ती धीट आहे, निर्भय आहे. एखाद्या डॉक्टरचाही हात इन्जेक्शन् देताना थरथरेल. परंतु हरणीचा हात कसा स्थिर व पुन्हा हलका! हरणे, वेळ आली तर विश्वासला अशीच इन्जेक्शन्स दे हो. विश्वास जरा रागीट आहे. त्याला आवर. स्थिर व निश्चयी स्वभावानं परंतु सौम्य व हळूवार रितीनं त्याला आवर. एकमेकांना सांभाळा. तुम्ही एकमेकांचे ब्रेक

आहात; लगाम आहात. एकमेकांविषयी संशय कधीही आणू नका. संशय आला, तर वेळीच बोला, तो निर्मूल करा. संशयाला एकदा जागा दिली तर तो वाढतो अणि एकदा का त्याची मुळं खोल गेली, म्हणजे मग त्याचं निर्मूलन करणं कठीण जातं. सृष्टीत नाना ऋतू आहेत. परंतु तुमच्या जीवनात प्रेमाचा, सहकार्याचा एक वसंतऋतूच सदैव फुलो. तुम्ही ध्येयवादी आहात. आजपर्यंत ध्येयाला पाणी घातलंत. आता दुप्पट जोरानं पाणी घाला. तुमची जीवनं कृतार्थ होवोत. तुम्ही आता स्वतंत्र राहाल. परंतु तुम्ही आपल्या घरी जात–येत जा. विश्वासचे वडील रागीट, परंतु त्यानीच परवा 'नसेल जागा मिळत तर इथं येऊन राहा.' असं सांगितलं. विश्वासच्या लग्नात त्यानीच पुढाकार घेतला. आणि हरणीची आई! तिची कदाचित निराशा झाली असेल. परंतु निराशा गिळून शेवटी तिनं तुमच्या तोंडात गोड पेढाच घातला. जात जा आईकडे. आपण आपलं कर्तव्य करावं. येत जाऊ नका असंच म्हणाली, तर नये जाऊ परंतु असं असूनही आजारी वगैरे आहेत असं कळलं, तर सारा अभिमान विसरून जावं व त्यांची सेवा करावी. मी तुम्हाला काय सागूं? तुम्हा सर्वाचा मेळावा पाहून मला आनंद होतो. कल्याण–संध्या. विश्वास–हरणी अशा ह्या ध्येयवादी, त्यागी, कष्ट व आपत्ती, दारिद्र्य व वाण यांना आनंदानं मिठी मारायला तयार असणाऱ्या जोड्या पाहिल्या की हृदय उचंबळून येतं व हिंदुस्थानच्या उज्ज्वल भवितव्याविषयी आशा वाटू लागते. या आशा तुम्ही पूर्ण कराल, पूर्ण करण्यासाठी धडपडाल, अशी मला आशा आहे. विवाह म्हणजे शेवटी विलास नसून विकास आहे. परस्परांचा सर्वागीण विकास व स्वतःच्या विकासानं समाजाचा विकास. विवाह म्हणजे सहकार्य, विवाह म्हणजे संयम, विवाह म्हणजे विकास,विवाह म्हणजे सेवा, विवाह म्हणजे दिवसेंदिवस पशुतेचा होम व ध्येयगिरीवर आरोहण. विश्वास–हरणे, मी तुम्हाला काय सांगू? तुमचं जीवन सुखमय, मंगलमय, सेवामय व इतरांनाही

आनंददायक व आदर्शरूप होवो असं मी इच्छितो. तुम्हाला आशीर्वाद देण्याइतका मी मोठा नाही. परंतु तुमचे मंगल मनोरथ पूर्ण होवोत, अशी मी माझ्या परमेश्वराला प्रार्थना करीत जाईन.''

भाईजींचे बोलणे संपले आणि तिकडे रेडिओवर सुंदर गाणे सुरू झाले. कोणते गाणे?

''तुम जागो भारतवासी''

हे ते गाणे होते. जणू हरणी व विश्वास यांना सावध राहा,जागृत राहा, असा संदेश मिळत होता. शुभमंगल व्हायला हवे असेल, तर सावधान असले पाहिजे. भारतांतील कोट्यवधी वधूंची उपासमार व दैन्य विसरू नका, असा जणू सावधान तेचा आदेश त्या गाण्यातून मिळत होता!

◆◆◆

## २०...
# भाईजी गेले

हरणी, विश्वास, रंगा, कल्याण सारी आता एकत्र राहात. हरणी आता स्वयंपाक करी. विश्वासही तिला मदत करी. भाईजींना आता कोणी काम करू देत नसत. परंतु हरणीला नोकरी मिळाली का? ज्यांनी कबूल केले होते, त्यांच्याकडे विश्वासने सातदा खेपा घातल्या. परंतु ते काहीच उत्तर देत ना. शेवटी एके दिवशी विश्वास रागावून त्यांना म्हणाला :

''हो का नाही ते सांगून टाका. मागं प्रथम म्हणालेत की हरणीची मॅट्रिकची परीक्षा होऊ दे, मग नोकरी देऊ. ती मॅट्रिक झाली. मग म्हणून लागलेत तिचं लग्न होऊ दे, मग नोकरी देऊ. आता तिचं लग्नही झालं. आता आणखी कोणती अट आहे?''

''हे पाहा, विश्वास, मी नोकरी देणार होतो; परंतु माझा इलाज नाही. तुम्ही मार्क्सवादी भाईलोक! सारे तुम्हाला नोकरी देण्याच्या विरुद्ध आहेत. मी एकटा काय करू?''

''या गोष्टी का तुम्हाला पूर्वीच माहीत नव्हत्या?''

''माहीत होत्या, परंतु मला आशा होती, की काही तरी करून हरणीला

लावून घेता येईल. परंतु माझे प्रयत्न फसले. मी दिलगीर आहे.''

विश्वास निघून गेला. त्याला वाईट वाटले. पुन्हा आर्थिक अडचण आली. पसारा तर मांडलेला. खोलीचे भाडे दोन महिन्यांचे द्यायचे राहिलेले. संध्या आजारी. भाईजी कफल्लक झालेले. काय करणार?

''विश्वास, काय म्हणाले रे ते?'' हरणीने विचारले.

''नाही मिळत नोकरी.'' विश्वास म्हणाला.

''मी शिकेनच आणखी; नाही नोकरी तर नाही.''

''आणि फी कूठून भरायची?''

''आई देणार आहे फी. मी पुष्कळ शिकावं असं आईला वाटत असे. मी अद्याप शिकायला तयार असेन, तर ती पैसे देणार आहे. तिच्याजवळ माझं बोलणं झालं आहे. तुझी हरकत नाही ना?''

''मी कशाला हरकत घेऊ?''

''मग तू असा निरुत्साही का दिसतोस?''

''हरणे, तुला नोकरी मिळेल या आशेवर आम्ही होतो. परंतु ती आशाही संपली. भाडं द्यायचं राहिलं आहे. वाण्याचे पैसे द्यायचे आहेत. संध्याही आता घरी येईल; तिला टॉनिक वगैरे द्यावं लागेल. कसं करायचं?''

''बाळच्या आईजवळ मी मागू का थोडे पैसे?''

''माग. मला तर ते धैर्य नाही.''

''विश्वास, हल्ली तुमच्या लोकात चर्चा चालल्या आहेत. माझ्या कानावर थोडंथोडं येतं. काय करायचं ठरलं?''

''अद्याप मतभेद आहेत. कोणी म्हणतात की युद्धविरोधी भाषणं करून सर्वांनी तुरुंगात जावं, कोणी म्हणतात की काम करीत असता, संघटना वाढवीत असता अटक झाली तर होऊ द्यावी. मुद्दाम तुरुंगात जायचं ध्येय करू नये.''

"भाईजींचं काय मत?"

"ते आमच्या पक्षाचे थोडेच आहेत!"

"मग त्यांचा कोणता पक्ष?"

"ते स्वतःला गांधीवादी म्हणतात. ते काँग्रेसचे एकनिष्ठ उपासक आहेत. ते म्हणतात की 'मला काँग्रेसची आशा आहे. गरिबांची, श्रमणाऱ्यांची बाजू अधिक उत्कटपणं काँग्रेस घेतल्याशिवाय राहणार नाही.' त्यांची श्रद्धा आमच्याजवळ नाही."

"ते काय करणार आहेत?"

"त्यांनी काँग्रेसच्या वैयक्तिक सत्याग्रहासाठी सत्याग्रही म्हणून नाव नोंदवून ठेवलं आहे. जर त्यांचं नाव पसंत झालं, तर ते सत्याग्रह करतील."

"होईल का त्यांचं नाव पसंत?"

"कदाचित् होईल. मी त्यांना पुष्कळ सांगितलं, की तुम्ही सुंदर पत्रकं लिहून द्या. आम्ही ती छापून वाटू. तुमची पत्रकं शेतकरी वाचतील. तुम्ही सोपं व हृदयस्पर्शी लिहाल. त्यात पांडित्य नसलं, शास्त्रीयता नसली, तरी सहृदयता व उत्कटता असेल. श्रमणाऱ्या जनतेला चेतवणी असेल. त्यांची हृदयं तुमची लेखणी पेटवू शकेल. का जाता तुरुंगात? पण ते ऐकत ना. मी त्यांच्याशी भांडलो, रागावलो. मला वाटलं होतं की भाईजी वश होतील. मला आजपर्यंत अहंकार होता, की भाईजींनी इतर कोणाचं न ऐकलं, तरी ते माझं ऐकतील. परंतु माझा अहंकार शेवटी गळला. भाईजी काही केवळ परशरण नाहीत. कांही बाबतीत ते कोणाचंही ऐकणार नाहीत असं दिसून आलं. मला वाईट वाटलं. परंतु भाईजींबद्दलचा आदरही वाढला. पूर्वी मला त्यांच्याविषयी प्रेम वाटे; परंतु तितका आदर नसे वाटत. वाटे की भाईजी असे कसे मवाळ, मृदू प्रकृतीचे. परंतु त्यांच्यातही कणखरपणा आहे. केवळ गुलाम ते नाहीत.

ते लौकरच आता जातील व त्यांचे नांव येताच ते सत्याग्रह करतील.''

''परंतु नाव येईपर्यंत ते काय करणार?''

''ते म्हणाले, मी गावोगाव प्रचार करीत जाईन. हातात घेईन एक झाडू, खांद्यावर तिरंगी झेंडा, खिशात काही औषध, असा हिंडत राहीन. गाव झाडावा, कोणी आजारी असला तर औषध द्यावं, रात्री सभा घ्यावी. पुन्हा दुसरा गाव. तोंडानं स्वातंत्र्याची गाणी म्हणत जावं. प्रचाराची गाणी. असा त्यांचा कार्यक्रम आहे.''

''आणि तू काय करणार? कल्याण काय करणार?''

''आम्ही भाईजींबरोबर हिंडून शेतकऱ्यांत संबंध जोडणार होतो. ठिकठिकाणी गट बांधणार होतो. परंतु भाईजींची आता आशा नाही. तेव्हा आम्ही दोघेच हिंडू. पायीच हिंडत जाऊ.''

''आणि संध्या?''

''संध्या व तू एकत्र राहाल व आम्हालाही थोडी मदत कराल असं वाटत होतं. परंतु आता काय? तुला नोकरी नाहीच मिळत.''

''विश्वास, मी शिकवणी करीन. एक मुलगी मला विचारीत होती.''

''परंतु ती एक शिकवणी कितीशी पुरणार? संध्या जर माहेरी गेली व तूही तुझ्या घरी आईकडे राहिलीस व शिकवणी केलीस, तर आहे थोडी आशा. त्या शिकवणीचे पैसे तू आम्हाला देऊ शकशील. परंतु संध्या आईकडे राहणार नाही.''

''आणि मीही माझ्या आईकडे नाही राहणार. मी आता स्वतंत्रच राहीन. तुम्ही गेलेत तर शिकवणी करीन, एकदा जेवीन. परंतु आईकडे नाही राहणार. इतके दिवस आईकडे राहण्यात संकोच वाटत नसे. परंतु आता तिथं राहायला संकोच वाटेल. एकदम परकेपणा जणू वाटतो.''



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

''हरणे, तूही नाही तर तुरुंगात चल. गावोगाव लढ्याची गीतं गात जा. जावं खेड्यात, द्यावी दवंडी, करावी सभा, म्हणावी गाणी. काय हरकत आहे? कॉलेजात शिकून आणखी काय होणार? नोकरी मिळाली असती, तर तीच करणार होतीस ना? मला तर असंच वाटतं. संध्याही जरा बरी झाली, तर तू व संध्या दोघी निघा प्रचाराला.''

''बघू, आपण विचार करू. नाही तर मी तुमची पत्रकं वाटीन. गावोगाव चिकटवीन. भिंतीवरून, झाडांवरून, सर्वत्र लावीन. चीन देशात साऱ्या सजीवनिर्जीव वस्तू प्रचार करीत आहेत. विद्यार्थी, स्त्रिया, पुरुष, मुलं साऱ्यांच्या तोंडावर देशाची गाणी, स्वातंत्र्याची गाणी. त्यांच्या देशातील भिंतीवरून पार्सापरिलाच्या व रक्तदोषांतकाच्या जाहिराती नसतात; तर साम्राज्यशाहीच्या अंताची गाणी लिहिलेली असतात. जपानची दुष्ट कृत्ये चितारलेली असतात. झाडांच्या बुंध्यावरून 'जपानी सत्ता नष्ट करा' हे मंत्र चितारलेले असतात. विश्वास, आपल्याकडे तसंच केलं पाहिजे. मी जाईन असं करीत. परंतु मी एकटी जाऊ का?''

''जा, भीती कसली? क्रान्तिकारकाला भीती माहीत नसते.''

''विश्वास, अद्याप धैर्य होत नाही, परंतु धैर्य केले पाहिजे.''

इतक्यात भाईजी बाहेरून आले.

''काय चालली आहेत राजाराणींची बोलणी?'' त्यांनी हसत विचारले.

''भाईजी, तुम्ही जाणार ना आम्हाला सोडून?'' हरणीने विचारले.

''मी सोडून जाणार यात आश्चर्य नाही. परंतु विश्वासही तुला सोडून जाणार आहे. हे खरं का?'' भाईजींनी विचारले.

''हो, आज ना उद्या सोडून जाणारच.'' हरणी म्हणाली.

''मग लग्न कशाला केलंत?'' भाईजींनी विचारले.

''संपूर्णपणे एकमेकांची होण्यासाठी. जगाच्या दृष्टीनंही एकमेकांची होण्यासाठी. भाईजी, तुम्ही संध्येला भेटून आलेत?''

''नाही; उद्या जाणार आहे. संध्येला भेटायला अद्याप मला धीर होत नाही.''

इतक्यात विश्वासचे कोणी मित्र आले. विश्वास त्यांच्याबरोबर निघून गेला. कल्याण केव्हाचा बाहेरच गेला होता.

''हरणे, तुला मी काय देऊ? माग. काही तरी मजजवळ तू माग. काही तरी तुला द्यावं, असं वाटतं आहे.''

''तुमचा आशीर्वाद द्या.''

''असलं शाब्दिक बोलणं नको.''

''मग काय मागू, भाईजी? न मागता तुम्ही सारं देतच आहात. काय द्यायचं तुम्ही ठेवलं आहे?''

''हरणे, माग ना काही तरी.''

''मला रिस्टवॉच द्या. मला फार हौस आहे.''

''खरंच का हौस आहे? देईन हो.''

''परंतु भाईजी, प्रेमाची भेट जपून ठेवावी लागते. तुमचं घड्याळ राहील का सदोदित मजजवळ? वेळ आली तर विकूनही टाकावं लागेल.''

''वीक. परंतु एक माझी आठवण तर राहील?''

''भाईजी, दुसऱ्या थोड्या का आठवणी आहेत तुमच्या?''

''ते काही असो. मी देईन हो घड्याळ.''

इतक्यात हरणीची एक मैत्रीण आली.

''भाईजी, मी बाहेर जाऊन येते हं; तुम्ही काही करू नका हं; मी येईन

लौकरच.'' असं म्हणून हरणी गेली आणि भाईजी एकटेच खोलीत होते. पुन्हा ते लौकरच एकटे निघून जाणार होते. त्यांचे नेहमीचे एकाकी जीवन पुन्हा सुरू होणार होते. इतके दिवस या मित्रमंडळात गेले. किती पटकन् गेले दिवस! किती प्रसंग, किती स्मृती! ते एकेक गोष्ट आठवू लागले. त्या तरुण मंडळात राहून तेही मनाने जरा तरुण झाले होते. हसू खेळू लागले होते. तेथे राहून त्यांचे कविहृदय पुन्हा थोडे जागे झाले होते. परंतु आता पक्षी उडून जाणार होता. त्यांना वाईट वाटत होते. परंतु येथे आता त्यांना राहवतही नव्हते.

दुसऱ्या दिवशी ते संध्येकडे जायला निघाले. जाण्याच्या तयारीने ते दारात उभे होते.

''भाईजी, संध्या तुम्हाला जाऊ देणार नाही.'' कल्याण म्हणाला.

''मी तिची समजूत घालीन.'' भाईजी म्हणाले.

''ती सारखी तुमची आठवण काढते.'' कल्याणने सांगितले.

भाईजी निघाले. दवाखान्यात आले. संध्या खाटेवर पडलेली होती. शांत होती आणि भाईजी तिच्याजवळ गेले. ते खाटेवर बसले. संध्येचा हात त्यांनी हातांत घेतला.

''भाईजी, अरेरे!'' असे म्हणून संध्येला रडू आले. तिचे डोळे शांतपणे भरून आले. भाईजींनी तिचे डोळे पुसले. तिच्या केसांवरून त्यांनी हात फिरवला. तिला थोपटले.

''संध्याताई, नको हो रडू. आपला काय बरं ईलाज?''

''असा कसा तुमचा देव, भाईजी?''

''त्याचे हेतू काय कळणार? अशा वेळीच संध्ये, श्रद्धेची कसोटी असते. आपल्या मनासारखं सारं होत आहे अशा वेळी ईश्वरावर श्रद्धा ठेवणं सोपं

आहे. परंतु आपत्ती कोसळत आहेत, संकटं येत आहेत, अशा मातीत मिळत आहेत, सुखस्वप्नं भंगत आहेत, अशा वेळीही जो श्रद्धा राखतो, तोच श्रद्धावान. उगी हो, संध्ये.''

इतक्यात तेथील त्या मुख्य सुतिकाबाई तेथे आल्या.

''भाईजी, तुम्ही मला ओळखीत नाही; परंतु मी तुम्हाला ओळखते. तुमचं एक व्याख्यान एकदा मी ऐकलं होतं. ते माझ्या कानात अद्याप गुणगुणत आहे. जे काही लहानमोठं कर्म कराल ते ईश्वराच्या पूजेसाठी आहे या भावनेनं करा, असं तुम्ही व्याख्यानात सांगितलं होतंत. भाईजी, मी इथं त्याप्रमाणं करायला धडपडत असते. तितकं यश येत नाही; परंतु प्रयत्न करते. मी संध्याताईनाही खूप धीर देते, शांत करू पाहते. परंतु अद्याप त्याचे अश्रू ताजे आहेत. भाईजी, जरा तिकडे येता थोडा वेळ?''

''संध्ये, मी जाऊन येतो हं.''

पलीकडे त्या बाईची खोली होती. कामाची कचेरी. भाईजी खुर्चीवर बसले. त्या बाईंनी भाईजींच्या हाती दोन पेढे दिले. भाईजींनी हातात घेतले.

''घ्यां ना, खा ना. मी दुसरं काय देते? ते पेढे खा व वर हे दूध प्या. तुम्ही संध्येच्या घरी स्वयंपाक करीत होतेत. तिला मऊ भात करून पाठवीत होतेत. तुम्ही पुरुष असून बाई बनलात. मी स्त्री असून या सर्वांची, इथं येणाऱ्या स्त्रियांची आई नाही का होऊ शकणार? होईन; मी होण्याचा प्रयत्न करीन; तुमचा आशीर्वाद द्या. खा ना ते पेढे, भाईजी.''

तिकडे संध्या रडत आहे. तिचे डोळे ओले आहेत, आणि मी का इकडे एकटा पेढे खात बसू, दूध पीत बसू? आणि संध्येला नेऊन दिला एक पेढा तर? तिला तो का गोड वाटेल? ती का पेढा खायच्या मनःस्थितीत आहे? बरे, पेढा ना घ्यावा, ना खावा, हे दूध न घ्यावे, तर ह्या भगिनीला वाईट

वाटेल. शेवटी भाईजींनी पेढे खाल्ले. ते दूध ते प्याले. तेथे सुपारी होती.

''सुपारी नको. मी खात नाही.'' ते म्हणाले.

''ही लवंग घ्या.''

''जातो मी.''

''ओळख ठेवा, कधी आलेत तर भेटत जा.''

भाईजी गेले व पुन्हा संध्याताईजवळ बसले. तिच्या डोक्यावरून ते हात फिरवीत होते. तिचे केस ते सारखे करीत होते. तिची बारीक झालेली बोटे ते पाहात होते. नख दाबून रक्त किती कमी झाले ते ते पाहात होते.

''संध्ये, बाळ आता मी जाणार आहे.''

''भाईजी, आणखी राहा असं कोणत्या तोंडानं मी सांगू? बाळ असतं तर सांगितलं असतं. परंतु या अभागिनीसाठी राहा असं कशाला सांगू? परंतु मनात वाटे, की मी घरी आल्यावर मग तुम्ही जावं. मला घरी तुमच्याजवळ दोन घास खाऊ द्या. मग तुम्ही जा. भाईजी, तुमचा आधार वाटतो हो.''

''संध्ये, खरंच का राहू? परंतु तुला घरी यायला बरेच दिवस लागतील. अद्याप तू बरी नाहीस.''

''आता मी घरी येईन, तेव्हाच बरी होईन. इथं सारखी बाळाची आठवण होते. आणि आता त्या दुसऱ्या बायका बाळंत झाल्या आहेत. त्यांची मुलं त्यांच्याजवळ पाळण्यात आहेत. मला माझं बाळ आठवतं. कसं होतं! इथं नकोच, भाईजी. मला घरी न्या. तुमच्याशी बोलेन, तुमचं बोलणं ऐकेन. कल्याणच्या मांडीवर डोकं ठेवीन. हरणीची थट्टा करीन. विश्वासला चिडवीन. मी लौकर बरी होईन. मला घरी न्या; आणि मग तुम्ही जा. माझं नाही का ऐकणार? भाईजी, तुम्ही सर्वांचं ऐकता. माझं नाही ऐकणार? मी कधी घातली होती का तुम्हांला गळ? मी तुमचं नेहमी ऐकते. तुम्हाला स्वयंपाकही करू दिला. आतां एवढं माझं ऐका.''

''बरं हो संध्ये, तू घरी ये, व मगच मी जाईन.''

''तुम्ही माझ्या केसांवरून हात फिरवू लागलेत की भाईजी, मला आजीची आठवण होते. माझी आजी का तुमच्यात आली आहे? मला तुमच्याबद्दल असं इतकं का बरं वाटतं? फिरवा ना केसांवरून हात. खरंच, आजीचाच जणू हात.''

''संध्ये, आता मी जाऊ?''

''इतक्या लौकर? किती दिवसांनी आलात. मी रोज तुमची वाट पाहायची; परंतु कल्याण सांगे की, त्यांना यायला धीर होत नाही. भाईजी, तुम्ही न् येताही येत असा. माझ्या स्वप्नात तुम्ही येत असा व 'संध्याताई, रडू नको बाळ,' असं म्हणत असा. तुमच्या तोंडून एकाद वेळेस सहज 'बाळ' शब्द निघतो, तो किती गोड वाटतो! साऱ्या लहानपणच्या स्मृती तो शब्द ऐकताच एकदम उचंबळून येतात. भीमेच्या तीरावर बाबा शेवटचं मजजवळ बोलत होते व मला बाळ म्हणून म्हणत होते. जाऊ दे भाईजी, कुठं काम असलं, तर जा हो!''

''कोणी तरी येणार होते माझ्याकडे; कोणी विद्यार्थी.''

''कशाला येणार होते?''

''ते चिठ्ठी ठेवून गेले होते. आम्हाला तुम्हाला पाहायचं आहे, एवढंच त्या चिठ्ठीत होतं. ते येतील व पुन्हा मी नाही असं पाहून निराश होऊन जातील. म्हणून जाऊ का?''

''जा हो!'' संध्या म्हणाली.

भाईजी घरी आले. घरी कल्याण, विश्वास व त्यांचे सारे मित्र बसलेले होते.

''हे आमचे भाईजी.'' कल्याणने नवीन मित्रांना सांगितले.

''तुम्ही त्यांना आपल्या पक्षात का घेत नाही?''

''विश्वासचे प्रयत्न चालले आहेत.''

''परंतु यश येण्याची आशा नाही.'' विश्वास म्हणाला.

''अच्छा. आम्ही जातो.'' ते नवीन मित्र म्हणाले.

कल्याण, विश्वास त्यांना दारापर्यंत पोचवायला गेले. नंतर पुन्हा ते वर आले.

''काय, भाईजी, केव्हा जाणार?''

''माझ्या जाण्याची तुम्हाला घाईशी?''

''जाण्याआधी मेजवानी करू.''

''कसली?''

''शिकरणीची.''

''संध्या घरी आल्यावरच मी जायचं ठरवलं आहे.''

''तिनं तुमचा निश्चय चालू दिला नाही एकूण?''

''तिच्यापुढं माझा निश्चय कसा टिकेल? कल्याण, संध्येला आता घरी आणावं असं वाटतं. तिच्या मनाला तिथं समाधान नाही. तिथं नवीन बाळंतिणी असतात. त्यांची मुलं पाहून संध्येला स्वतःचं बाळ आठवतं. ती दुःखी होते. ती घरी येऊ दे. इथं लौकरच बरी होईल. हसेल, खेळेल.''

''भाईजी, मला तर लौकरच बाहेर जावं लागणार. संध्या घरी येईल. परंतु मी तिच्याजवळ राहू शकणार नाही. हरणी आहे. रंगा आहे. ढकलतील गाडा. पक्षाची शिस्त मला पाळली पाहिजे. घरी कसा राहू?''

''विश्वास काय करणार?''

''तो बाहेर राहूनच पक्ष वाढवणार. सध्या तरी असं ठरवलं आहे.''

''नाही, तुम्ही फार दिवस बाहेर राहाल असं मला वाटत नाही. तयारीनं

असा. संध्या, हरणी यांची जी व्यवस्था करायची असेल, ती करून ठेवा.'' भाईजी म्हणाले.

''व्यवस्था काय करायची व आम्ही काय करू शकू? धडपडतील त्याही. स्वत:ची व्यवस्था त्या स्वत:च करून घेतील. त्यानंच त्यांचा विकास होईल. त्यांना आत्मविश्वास येईल. संध्येची मला काळजी नाही. कदाचित ती आईकडेही जाईल. ती न गेली, तिची आई येऊन तिला कदाचित घेऊनही जाईल.'' कल्याण म्हणाला.

''आणि हरणी शिकणार आहे. शिकू दे तिला. एकदा वाटत होतं की तिनंही हिडावं–फिरावं. परंतु तिला एकटीला तितकं धैर्य होईल असं नाही वाटत. अजून तसा तिला कधी अनुभव नाही, सवय नाही. परंतु तिला न राहवलं, तिला स्फूर्ती आली, तर तिनं खुशाल जावं सारं सोडून, जावं गाणी गात गावोगाव, सभा घेत गावोगाव,'' विश्वास म्हणाला.

''हरणी गेली कुठं?''

''तिच्या आईनं तिला बोलावलं होतं म्हणून गेली आहे. माझे वडीलही तिला शिकवण्यासाठी मदत करायला तयार आहेत. म्हणाले, तू नाही बी. ए. झालास, तर ती तरी होऊ दे. मुलगा नाही बी. ए. तर सून तरी. हरणीच्या आईचीही इच्छा आहे. जर कुठं नोकरी मिळाली मध्येला तर तिनं करावी. संध्येनं व तिनं एकत्र राहावं.'' विश्वास म्हणाला.

''रंगाही त्यांच्याबरोबर राहील.'' कल्याणने सांगितले.

''तुमचा रंगा खरंच मोठा प्रेमळ. आणि त्याला सारं समजतं. त्याच्या सारं लक्षात येतं. जेवतांना विश्वास, तू पाहिली आहेस का त्याची गंमत? मी काय करायचा, की दुपारची उरलेली भाकर वगैरे जेवायला बसताना ताज्या भाकरीच्या खाली ठेवायचा; आणि ती तुम्हाला नकळत पटकन् मी द्यायचा.


श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय, सातारा.

रंगाच्या हे ध्यानात आलं. त्यावेळेपासून तो आधीच ती घेऊन टाकतो. परवा हळूच बाजूला शिळा भात ठेवला होता. परंतु रंगानं तो उचलून घेतला. त्याला हृदय आहे. पुन्हा न बोलता सारं करील. संध्या, हरणी यांना त्याचा आधार होईल. राहतील तिघं.'' भाईजी म्हणाले.

अशी निरनिराळी बोलणी चालली होती. दिवस जात होते. एके दिवशी संध्येला घरी आणण्यात आले. खाटेवर तिचे अंथरुण घालण्यात आले. त्याच्यावर ती पडून राहिली. जवळ कल्याण बसला होता. आज पोटभर तिच्याजवळ तो बसला. संध्येने त्याच्या मांडीवर डोके ठेवले. ती शांतपणे पडून होती.

कल्याण व विश्वास यांचे पुढील बेत तिला कळले. तिला वाईट नाही वाटले. तिच्या तोंडावर समाधान होते. भाईजींजवळ बसून ती जेवली. हसत बोलत जेवली. ती बरी होऊ लागली. तिच्या तोंडावर तेज येऊ लागले. डोळेही चमकदार दिसू लागले.

''संध्ये, आईकडे ये ना जाऊन. बरं वाटेल. मनाच्या साऱ्या जखमा संपूर्णपणे भरून येतील. आम्ही किती केलं तरी आई ती आई. ये चार दिवस आईकडे जाऊन.'' भाईजी म्हणाले.

''तुम्ही म्हणता तसं मला एखादवेळेस वाटतं. परंतु जायला पैसे हवेत, भाईजी. कुठून आणायचे पैसे? इथं सारं उधारीवर चाललं आहे. ही माझी कुडी वीक म्हणून कल्याणला सांगणार आहे. दवाखान्यातच त्याला म्हटलं होतं. परंतु त्याच्या डोळ्यात पाणी आलं; परंतु जवळ ठेवून करायची काय?''

''तू घरी गेलीस व तुझ्या कानात कुडी नाहीत, हातांत बांगड्या नाहीत, असं आईनं पाहिलं, तर तिला काय वाटेल?''

''तिच्या मुलीचा तिला अभिमान वाटेल, की दागिन्यांत ही रमत नाही.

माझी आई नाही हो रागावणार. आणि कल्याण वगैरे कसे आहेत ते आईला माहीतच आहे. हाती सतीचं वाण घेतलेले हे फकीर आहेत, हे आई जाणून आहे.''

''संध्ये, तू आता बरी आहेस. मी आता जाऊ ना?''

''जा हो, भाईजी. प्रकृतीला जपा.''

''आमच्या प्रकृतीची काळजी आता सरकार घेईल.''

''तुरुंगात ना?''

''हो; तिथं कसली ददात नाही. एकच दु:ख तिथं असतं.''

''कोणतं?''

''–की बाहेर राहून आपणास काम करता येत नाही. शेतकरी, कामकरी यांच्यांत प्रचार करता येत नाही, त्यांची संघटना करता येत नाही. बाकी सारं तिथं सुखच आहे.''

''भाईजी, पुन्हा केव्हा भेटाल?''

''योग असेल तेव्हा. संध्ये तुमचे माझे असे जिव्हाळ्याचे संबंध येतील अशी कुणाला कल्पना तरी होती? पुढच्या गोष्टी कुणाला माहीत? एखादवेळेस खरंच मला वाटतं की आपण सारी बाहुली आहोत. ही विश्वशक्ती आपणास नाचवीत असते. ज्या गोष्टींची आपणास कल्पनाही नसते, त्या गोष्टी आपणाकडून ती करवून घेते. भेटू, पुन्हा भेटू. आठवणींच्या रुपानं भेट नेहमीच आहे. तू आनंदी राहा. पुन्हा खेळकर मैना हो.''

''जरा गंभीर मैना. आगीतून गेलेली मैना. दु:खाच्या खोल दरीचा ठराव घेऊन पुन्हा धीर करून उडू पाहणारी मैना. होय ना?''

''हो, किती छान बोलतेस तू!''

''तुम्ही गेल्यावर असं मला कोण म्हणेल? कोण करील असं कौतुक?

आजी म्हणायची हो 'संध्ये, किती छान बोलतेस.'' भाईजी, काही म्हणा. माझ्या आजीचा आत्मा तुमच्यात मिसळला आहे. त्यामुळं तुम्ही माझ्याकडे, आमच्याकडे खेचले गेलात. असेल का असं?''

''कोणाला माहीत?''

''एके दिवशी भाईजींनी हरणीच्या हातात रिस्टवॉच बांधले; आणि म्हणाले, ''हरणे! वेळप्रसंग आला तर विकून टाक हो. संध्येची कुडी गेली, बांगड्या गेल्या, तसं हे जाऊ दे. भाईजींनी दिलेलं, कसं विकायचं, असं नको म्हणू. मला आपलं वाटे की तुला काही तरी द्यावं. तुम्ही अजून तरुण मुलं आहात. काही हौस असते, इच्छा असते. तुमचं सारं मन दडपलेलं असतं. परंतु त्यामुळं मनाला तितकी प्रसन्नता नाही वाटत. वाटतं की विचारावी एखादी तुझी हौस; करावी पूर्ण. तितकंच दडपलेलं मन जरा मोकळं होईल. आपल्या सुप्त व गुप्त मनात अनंत चमत्कार चाललेले असतात. कुठं कशी कळ दाबली जाईल, एकदम कुठून कसे उत्साहझरे वाहू लागतील, किंवा बंद होतील, त्याचा नेम नसतो.''

आणि एके दिवशी भाईजी गेले. साश्रू नयनांनी गेले; संध्येच्या केसांवरून हात फिरवून, हरणीची पाठ थोपटून, कल्याणकडे सजल दृष्टीने पाहात व विश्वासचा हात दाबून ते गेले. एक स्निग्ध, सौम्य, मधुर मुके असे संगीत जणू तेथून गेले!

✦✦✦

## २१...

# सारे तुरुंगात

भाईजी निघून गेले. कल्याण नि विश्वास आपापल्या कामाला लागणार होते. पुढचे सारे ते ठरवीत होते. इतक्यात एके दिवशी त्यांच्या घरासमोर एक मोटर आली. पोलीस आले. विश्वास नि कल्याण चकित झाले. तुम्ही बाहेर फार दिवस राहू शकणार नाही हे भाईजींचे भविष्य खरे ठरले.

''संध्ये, जातो हं. पुन्हा वेळ येईल तेव्हा भेटू. आनंदी राहा.'' कल्याण सकंप वाणीने म्हणाला.

''हरणे, योग्य वाटेल त्याप्रमाणं तुम्ही सारं करा. तुम्ही एकमेकींना अंतर देऊ नका. आम्ही वागत होतो त्याप्रमाणे तुम्हीही वागा. रंगाही आधाराला आहे.'' विश्वास म्हणाला.

दोघांचे सामान बांधून देण्यात आले. काही कपडे, काही पुस्तके; दुसरे काय असणार सामान? मोटरीपर्यंत संध्या नि हरणी पोचवायला गेल्या. कल्याण, विश्वास आत बसले.

''अच्छा!'' दोघे म्हणाले.

मोटर क्षणात गेली. हरणी नि संध्या तेथे उभ्या होत्या. नंतर त्या खोलीत

आल्या. हरणी संध्येच्या गळ्यात गळा घालून रडली.

''उगी, हरणे. विश्वास पुन्हा लौकर भेटेल. लग्न झालं नाही तो तुरुंग. परंतु आपण हे सारं समजूनच आहोत. क्रान्तिकारक पती–पत्नीच्या मनोमय भेटी, मनोमय सुखसंवाद! मनोमय भेटीच्या वेळेसही क्रान्तीच आपलं तोंड पुढंपुढं करील.''

''संध्ये, ते तुरुंगात बसणार नि आपण का घरी राहायचं?''

''वेळ आली तर आपणही जाऊ.''

''वेळ आणली तर येईल.''

''बघू.''

दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात कल्याण नि विश्वास यांच्या अचानक आलेल्या अटकेसंबंधी उलगडा होता. इंदूरकडे बाळही पकडला गेला होता. बाळला अटक झाल्याचे ऐकून त्याच्या आईला अश्रू आवरेनात. बाळला दमा आहे, ताप आहे, त्याचे तुरुंगात कसे होईल, असे तिच्या सारखे मनात येई. परंतु संध्या नि हरणी या पोरींच्या संसाराचे चित्र डोळ्यांसमोर घेऊन ती स्वत:चे दु:ख विसरे; एके दिवशी ती त्या मुलांकडे आली. त्यांचे ती समाधान करीत होती.

''आई, किती दिवस हे तुरुंगांत राहणार?'' हरणीने विचारले.

''सरकार ठेवील तोवर.''

''चौकशीशिवाय तुरुंगात बेमुदत डांबून ठेवणं हा काय न्याय? ही काय माणुसकी?''

''हरणे, न्याय नाही म्हणून तर हे झगडे. एक दिवस न्याय येईल. तरुणांची ही तपश्चर्या का फुकट जाईल? ही बलिदानं व्यर्थ नाही जाणार. आणि आपले हे मुके अश्रू! हेही फुकट नाही जाणार. या बलिदानातून, या

अश्रूंतून क्रांतीच्या गर्जना उठतील; यातून ज्वाला पेटतील. जगातील दंभ, जुलूम, पिळवणूक, अन्याय, विषमता यांचं भस्म होईल.'' ती माता जणू भविष्यवाणी बोलत होती.

''आई, तुमची भविष्यवाणी आम्हाला धीर देवो.''

''माझी कुठली ही भविष्यवाणी? ही भविष्यवाणी त्या मुलांचीच. 'भविष्य राज्य तुम्हारा मानो। ऐ मजदूरों और किसानों' हा त्या मुलांचा मंत्र. माझा बाळ मला हे चरण शिकवी. म्हणायचा 'आई, जप करायचाच असेल, तर रामनामाचा नको करूस. किसान–कामगारांनो, तुमचं राज्य होऊ दे. तुमची क्रांती यशस्वी होऊ दे, असा जप कर.' या पोरांची किती तळमळ! नाही; ही बलिदानं फुकट नाही जाणार.'' ती आता श्रद्धेने म्हणाली.

''आई, तुम्ही आमच्याजवळच राहा ना!'' संध्या म्हणाली.

''तसं कसं राहायचं, संध्ये? तुम्हाला काही लागलं सवरलं, तर मागत जा हो. उपाशी नका राहात जाऊ. हे दहा रुपये आणले आहेत ते ठेवा. उत्साहानं राहा. संध्ये, तू आजारातून, बाळंतपणातून उठलेली. जप हो. पुन्हा नाही तर आजारी पडायचीस.'' असे सांगून आश्वासून बाळची आई गेली.

हरणीने आता कॉलेजमध्ये नाव घातले. ती एक शिकवणीही करी. तिची आई तिला मदत करी. विश्वासच्या वडिलांचीही थोडी मदत होई आणि संध्या काय करी? खाटेवर पडल्या पडल्या कल्याणची जुनी पत्रे काढून ती वाची. तो तिचा मेवा होता. अवीट मेवा.

परंतु हरणीचे मन हळूहळू अभ्यासात रमेनासे झाले. देशात सर्वत्र धरपकडी होत होत्या. एकूण एक भाईलोक उचलले गेले. लहान लहान मुलेही, ती समाजवादी असतील, क्रान्तीकारक असतील, अशा संशयावरून तुरुंगाच्या आत नेऊन ठेवण्यात आली. तेथे आता क्रान्तीच्या शिक्षणाचे वर्ग

सुरू झाले. तेथे अर्थशास्त्रावर, विरोध–विकासवादावर, स्टेट म्हणजे काय, यावर व्याख्याने होऊ लागली. भाई लोकांचे काम ते जातील तेथे सुरूच आहे. ते जातील तेथे त्यांचा प्रचार आहेच.

परंतु संध्या फिरून आजारी पडली. तिला एकाएकी खूपच ताप आला. आणि दोन दिवस झाले तरी ताप निघेना. डॉक्टर म्हणाला, ''हा दोषी ताप आहे.'' संध्या त्या तापात पडून राही. हरणी जवळ असे. तिला शिकवणीला जाता येत नसे. परंतु ज्या मुलीला ती शिकवी, ती मुलगी म्हणाली,

''मी तुमच्या घरी येत जाईन. तिथंच मला शिकवीत जा.''

''असं करशील तर किती छान होईल!''

ती मुलगी हरणीकडे येई. संध्येकडे बसून हरणी तिला शिकवी. मध्येच संध्येच्या तोंडात पाणी घाली. अशी शुश्रूषा चालली होती.

एके दिवशी संध्येने विचारले, ''हरणे, भाईजींना अटक झाल्याचं कुठं वाचलंस का गं?''

''नाही वाचलं. ते अजून बाहेरच असावेत.''

''त्याना लिहिशील पत्र? संध्येला एकदा भेटून जा, असं त्यांना लिही. विश्वास व कल्याण तर अडकून पडले आहेत. भाईजी मोकळे असले तर जातील भेटून. पुन्हा थोडेच भेटणार आहेत? मी काही आता वाचणार नाही, हरणे.''

''संध्ये, असं काय बोलतेस? तू बरी होशील. तुझ्या आईला लिहू का पत्र? इकडे तिला बोलावू?''

''आधी भाईजींना बोलाव.''

''त्यांचा पत्ता काय? ते कुठं फिरत असतील, देव जाणे!''

''त्यांच्या नेहमीच्या पत्त्यावर टाक पत्र. त्यांना मिळेल अशी आपण आशा करू.''

हरणीने भाईजींना पत्र टाकले. संध्या आता फार बोलत नसे. परंतु एके दिवशी राजबंदीचा अन्नसत्याग्रह म्हणून मोठ्या अक्षरांत वर्तमानपत्रांत बातमी आली. हरणी घाबरली. परंतु संध्येला तिने ती बातमी कळविली नाही. पण संध्येला ती वार्ता शेवटी कळलीच.

''हरणे, किती गं दिवस झाले त्यांच्या अन्नसत्याग्रहाला?''

''तुला कळलं वाटतं? आजचा आठवा दिवस.''

''आठ दिवस का विश्वास, कल्याण, बाळ वगैरे उपाशी आहेत?'' असे म्हणून संध्येने चमत्कारिकपणे पाहिले. ती एकदम उठून बसली. ती वातात गेली. ती ताडकन उभी राहिली. हरणी तिला आवरीत होती. ''सोड मला, तू कोण मला अटक करणार? मी क्रान्ती करणार! आगडोंब पेटवणार! कोण तू? भांडवलदार आहेस? तुला दूर झुगारून क्रांतीचा बावटा फडकवीन! कोण तू? साम्राज्यशाहीचा पोलीस? तुला अशी ढकलून निघून जाईन–'' संध्या त्वेषाने हातवारे करीत बोलत होती. हरणीने मोठ्या मुष्किलीने तिला आवरले. तिच्या डोळ्यातून पाणीही येत होते. तिने संध्येला अंथरुणावर पुन्हा निजविले. डोळे मिटून संध्या पडून राहिली. तिचे लक्षण ठीक दिसेना. मध्येच वात होई. मध्येच थोडी शुद्ध येई. हरणी मोसंब्याचा रस देत होती.

''नको गं मेला तो रस. ते तिकडे उपाशी मरत आहेत नि मी का रस पीत बसू'' ती म्हणाली.

''संध्ये, असं काय बरं? थोडासा तरी घे.'' हरणी म्हणाली.

''तुला वाईट वाटलं, हरणे? ओत तोंडात. हा बघ हा केला.''

हरणीने थोडा रस तोंडात घातला. असे दिवस जात होते आणि एके

दिवशी अकस्मात भाईजी आले. हरणीला बरे वाटले. रंगाला धीर आला. भाईजी आले ते संध्येच्या जवळ बसले. तिच्या डोक्यावर हात ठेवून डोळे मिटून ते बसले होते.

''कोण आहे माझ्याजवळ? कोण हे? इथं काय बसता? इथं कुणी नका राहू? जा सारे; बाहेर पडा; चळवळ करा; तुरुंग भरा. रान उठवा; पेटवा वणवा.'' असे म्हणून संध्येने भाईजींना ढकलले. ते तिला शांत करीत होते. तिने एकदम पाणी मागितले. त्यांनी तिच्या तोंडात पाणी घातले. स्थिर दृष्टीने तिने त्यांच्याकडे पाहिले; आणि एकदम ओळखून म्हणाली :

''भाईजी, माझे भाईजी!'' त्यांच्या मांडीवर तिने डोके ठेवले. निमूटपणे ती पडून होती. थोड्या वेळाने म्हणाली :

''भाईजी, मला बरं करण्यासाठी आलेत? होय ना? उगीच आलेत. ते तिकडे तुरुंगात अन्नसत्याग्रह करीत आहेत आणि आपण का भाईजी जगावं? मला मरण येऊ दे, भाईजी.''

''संध्ये, तू पडून राहा. केवळ मरणं एवढंच ध्येय नाही. योग्य वेळी विचारपूर्वक मरावं. बलिदान हीही एक पवित्र गोष्ट आहे. ती केरकचरा नाही. शांत राहा. बरी हो. तू बरी आहेस असं कळलं, तर त्या उपवासातही कल्याणला तुरुंगात जणू अन्न मिळाल्यासारखं वाटेल.''

''तुम्ही का माझ्या आजारीपणाचं त्याला कळवलं आहे?''

''हो.''

''का कळवलंत?''

''ते कर्तव्य वाटलं म्हणून.''

''सरकारकडे अर्ज करायला नाही ना सांगितलंत?''

''सांगितलं आहे. बिनशर्त सोडणार असतील तरच.''

''कशाला अर्ज?''

''त्यानं काही बिघडत नाही. परंतु कल्याण येणार नाही.''

''तो माझ्याजवळ आहेच. यायला कशाला हवा?''

''खरंच हो. आम्ही वेडी आहोत.''

भाईजी आले त्यावेळेपासून सर्वांनाच जरा बरे वाटले. बाळची आई, विश्वासची आई ह्याही समाचाराला येत, बसत व बघून जात. हरणीची आईही मोसंबी वगैरे पाठवी. संध्येला हळूहळू आराम पडू लागला. ताप उतरला. पुनर्जन्म झाला. तिकडे राजबंदीचा उपवासही सुटला. संध्येला यामुळे अधिकच आनंद झाला. एकदम तिच्या प्रकृतीत फरक पडला.

''आता मी लौकर बरी होईन, भाईजी.''

''होशील हो. परंतु हालचाल नाही हो करायची.''

''तुम्ही सांगाल तशी वागेन.''

''मी तुला तुझ्या आईकडे घेऊन जाणार आहे.''

''कशाला?''

''म्हणजे बरं. लौकर सुधारशील. आईच्या जवळ असणं हेच खरं टॉनिक.''

''बघू पुढं.''

परंतु भाईजींनाच एके दिवशी सकाळी पकड-वॉरंट आलं. ते संध्येला मऊ भात भरवीत होते. तो दारात पोलीस उभे.

''कोण पाहिजे?''

''आपणच!''

''असं का? ठीक तर. बसा हां!''

भाईजींनी तयारी केली. संध्या, हरिणी, रंगा सारी खिन्न व उदास झाली.

''रंगा, तू संध्येला घरी पोचव; तिच्या आईकडे. हे पैसे घेऊन ठेव. संध्ये, नाही म्हणू नकोस हां. प्रकृतीची काळजी घे. हरणे, जप ह; देव आहेच सर्वांना'' असे म्हणून ते निघाले. संध्येच्या केसांवरून, डोक्यावरून त्यांनी हात फिरविला. आणि गेले! मोटरीचा आवाज आला. गेली मोटर.

आणि एके दिवशी रंगा संध्येला माहेरी घेऊन गेला. तिच्या आईकडे तिला पोचवून तो परत आला. संध्या माहेरी होती. किती तरी दिवसानंतर ती आईला भेटत होती. किती तरी दिवस म्हणजे, फारसे नाहीत काही. वर्षा–दीड वर्षातीलच साऱ्या कथा.

''संध्ये, काय तुझी दशा?'' तिची आई म्हणाली.

''आता तू कर हो मला जाडीजुडी.'' संध्या बोलली.

इकडे हरणी दिवसेंदिवस अधिकाधिक अस्वस्थ होत चालली. इतके दिवस संध्येचे तिला बंधन होते. ती एक जबाबदारी होती. आता ती मोकळी झाली. कॉलेज सोडावे व गावोगाव गाणी म्हणत हिंडावे असे तिला वाटू लागले. तिने संध्येला आपली मन:स्थिती कळवली. संध्येने तिला लिहिले, ''जरा थांब, मला बरी होऊ दे. जायचंच, तर आपण दोघी जाऊ. माझ्याही मनात हेच विचार येत आहेत. कल्याण, विश्वास, यांची जी ध्येयं, त्यांचीच आपणही पूजा करू. त्यांचे मंत्र घोषवीत आपण सर्वत्र हिंडू. क्रांतीच्या यात्रेकरणी आपण होऊ. मी येईपर्यंत. थांब. थोडी कळ सोस.''

हरणीने घाई केली नाही. संध्येची वाट पाहात ती थांबली. थोडे दिवस गेले. संध्या बरी झाली. एके दिवशी ती आईला म्हणाली,

''आई, आता मला जाऊ दे. माझ्या कर्तव्यासाठी मला जाऊ दे. कल्याणचं काम हाती घ्यायला जाऊ दे.''

''जा हो, संध्ये. ज्यात तुमचा आनंद, ते करा. माझ्या प्रेमाची तहान लागली, तर येत जा. घोटभर पिऊन जात जा.'' ती माता म्हणाली.

एके दिवशी संध्या पुण्याला आली. हरणी नि ती बराच वेळ रात्री बोलत बसल्या, शेवटी प्रचारार्थ बाहेर पडण्याचे ठरविले. हरिणीने आपल्या आईला किंवा विश्वासच्या घरी कोणाला काही सांगितले नाही. त्यांनी रंगाला फक्त सांगतले होते.

''उठाव झेंडा बंडाचा' हे गाणे गात त्या तेजस्वी भारतकन्या खेड्यापाड्यांतून हिंडू लागल्या. परंतु एका स्टेशनवर त्यांना अटक झाली. त्यांना कृतार्थ वाटले. येरवड्याच्या तुरुंगात त्यांना स्थानबद्ध करून ठेवण्यात आले. कल्याण नि विश्वास ह्यांनी ती वार्ता वर्तमानपत्रात वाचली. दोघांनी आनंदाने उड्या मारल्या.

✦✦✦


श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

## २२...

# प्रणाम त्या धीरगंभीर संध्येला

महायुद्धाचे रंग क्षणाक्षणाला पालटत होते. आश्चर्यकारक घटना होत होत्या. जर्मनी व रशिया यांचा करार हा पहिला मोठा धक्का होता. रशियाने पोलंडवर शेवटी आक्रमण केले हीही एक चकित करणारी गोष्ट होती. युरोपातील सारी राष्ट्रे हळूहळू जर्मनीने आक्रान्त केली. फ्रान्सचा चुटकीसरशी फडशा उडाला. इंग्लंडवर भयंकर वैमानिक हल्ले सुरू झाले. परंतु एकाएकी सर्वांना स्तंभित करणारी वार्ता आली. जर्मनीने करार मोडून एकदम रशियावर स्वारी केली. सर्वांनी तोंडांत बोटे घातली. पश्चिम व मध्य युरोप पायाखाली तुडवून जर्मनी आता रशियाकडे वळला. युक्रेनवर हिटलरचा कधीपासून डोळा. रशियातील प्रयोग म्हणजे संस्कृतीचा सर्वात मोठा शत्रू असे हिटलर शेकडो वेळा म्हणे. तो प्रयोग नष्ट करण्यासाठी सर्व सामर्थ्यासह हिटलर रशियावर तुटून पडला.

हळूहळू इंग्लंड व रशिया यांचे सूर एक होऊ लागले. एकाच शस्त्रूविरुद्ध ते आता लढत होते. रशिया व इंग्लंड यांचे सहकार्य सुरू झाल्यावर कम्युनिस्टांनी कोणते धोरण ठेवावयाचे? सर्व देशांतील कम्युनिस्ट पक्षांनी

कसे वागावयाचे? हिंदी कम्युनिस्ट पक्षाने कोणत्या घोषणा करावयाच्या?

महायुद्ध सुरू झाले, तेव्हा काँग्रेसने एकदम लढा पुकारावा म्हणून हिंदी कम्युनिस्ट जोराने सांगत होते. काँग्रेसने राष्ट्रीय सरकारची मागणी केली, तेव्हा ''असली भीक काय मागता? लढा पुकारा'' अशा गर्जना करीत, त्यांनी काँग्रेसवर मोर्चे आणले. परंतु आता रशिया व जर्मनी यांचे रणकंदन सुरू झाले. आता ब्रिटीश सरकारजवळ कसे वागावे हा हिंदी कम्युनिस्टांसमोर प्रश्न होता. आमचे धोरणे पूर्वीचेच राहणार असे ते प्रथम म्हणत होते. परंतु कोठून तरी किल्ली पिरगळली गेली आणि हिंदी कम्युनिस्टांनी पवित्रा बदलला. हे युद्ध आता लोकयुद्ध आहे असे ते गर्जू लागले. ''रशिया ब्रिटिशांच्या बाजूला येताच युद्धाचे स्वरुप पालटले. युद्धाचे साम्राज्यशाही स्वरूप जाऊन त्यांचे लोकयुद्धात परिणयन झाले-'' असा सिद्धांत ते सर्वत्र मांडू लागले.

काँग्रेसने राष्ट्रीय सरकार मिळेना म्हणून तात्पुरता वैयक्तिक सत्याग्रह सुरू केला होता. महात्माजी सरकारला फार अडचणीत आणू इच्छित नव्हते. सत्याग्रही संकटाच्या वेळी शत्रूवर हल्ला चढवीत नसतो. परंतु सरकारला आपला विरोध आहे, हे दाखविण्यापुरता प्रतिकात्मक सत्याग्रह महात्माजींनी सुरु ठेवला होता.

परंतु महायुद्धात आणखी चमत्कार झाले. जपानने एकदम युद्ध सुरु केले. अमेरिकेशी बोलणी सुरू असतानाच पर्ल हार्बरवर जपानने हल्ला करून अमेरिकेचे बरेच आरमार नष्ट केले. अमेरिका युद्धात आली. जपानने भराभरा सारे जिंकून घेण्याचा सपाटा चालविला. आशियाचा सर्व पूर्व भाग जपानने अति अल्प काळात ताब्यात घेतला आणि ते सिंगापूर? कोट्यवधी, अब्जावधी रुपये ज्या सिंगापूरला बळकट करण्यासाठी खर्च झाले, ते सिंगापूर क्षणात पडले! ब्रिटिशांचा कधी झाला नव्हता असा पराजय जपानने केला आणि मलाया पडला. ब्रह्मदेश चालला. आणि हिंदुस्थानचे काय होणार?

जपानची स्वारी आली, तर हिंदुस्थान स्वतःचे संरक्षण कसे करणार? ज्या देशातील सरकार व जनता ही परस्परविरोधी आहेत, तो देश परिणामकारक प्रतिकार कसा करणार? हिंदुस्थानात राष्ट्रीय सरकार स्थापन झालेच पाहिजे. एरवी तरणोपाय नाही.

काँग्रेसशी वाटाघाटी करता याव्यात म्हणून सरकारने सारे सत्याग्रही सोडले. मौलाना अबुल कलम आझाद, जवाहरलाल वगैरे सारे बाहेर आले. जपान आला तर मी हातात तलवार घेऊन लढेन असे आझाद म्हणाले. वातावरण आशेचे वाटले आणि इंग्लंडमधून क्रिप्स वाटाघाटीसाठी येणार असे कळले. क्रिप्स हा समाजवादी. रशियाचं कौतुक करणारा. जवाहरलालचा मित्र. आशा वाढल्या. आणि क्रिप्स आले. दिल्लीला बोलणी सुरू झाली. परंतु सारे ओम्फस.

युद्धानंतर स्वातंत्र्य देऊ, असे सांगण्यात आले. परंतु आज काडीचेही स्वातंत्र्य द्यायला ब्रिटिश सरकार तयार नव्हते. क्रिप्स कदाचित तडजोड करता. परंतु ब्रिटिश नोकरशाहीने मोडता घातला. विरोधी भुते उभी करण्यात आली. जिनांना बाऊ करण्यात आला. क्रिप्सचे इंग्लंडमध्ये महत्त्व वाढले होते. हिंदी प्रश्नही तो सोडवता, तर चर्चिल हतप्रभ होऊन क्रिप्स पहिला मुत्सद्दी झाला असता. परंतु क्रिप्सचा बोजवारा उडवण्यात आला आणि हिंदी स्वातंत्र्याचाही.

काही मिळाले तर नाहीच. परंतु हिंदुस्थानचे असे भाग पाडा, असे भाग पाडा, वगैरे सुचवून आमच्यात अधिकच दुफळी या साम्राज्य सरकारने माजवली. महात्माजींना सात्त्विक संताप आला. राष्ट्र जगणार की मरणार असा प्रसंग आला असताही जी सत्ता फोडा व झोडा याच मार्गाचा अवलंब करते, त्या सत्तेची महात्माजींना चीड आली. ही सत्ता जाईल तेव्हाच ऐक्य होईल

असे ते म्हणाले. हिंदू–मुस्लिम ऐक्याचा खरा मार्ग म्हणजे ब्रिटिश सत्ता येथून जाणे.

आणि महात्माजी तेजस्वी असा ''चले जाव'' मंत्र शिकवू लागले. काँग्रेस का प्रचंड लढा करणार? कम्युनिस्टांना लढा नको होता. काँग्रेसला हे कम्युनिस्ट विरोध करतील असा जेव्हा सरकारला विश्वास आला, तेव्हा कम्युनिस्टांची त्यांनी सुटका केली. सुटका होताच ''काँग्रेस मुस्लिम एकजुटीने राष्ट्रीय सरकार'' ही त्यांची घोषणा सर्वत्र दुमदूमू लागली.

महात्माजींचा सूर चढू लागला. सध्याचे जिणे म्हणजे केवळ मरणे आहे असे ते म्हणाले. असल्या जीवनाला काडी लावून देणे बरे. स्वातंत्र्याशिवाय अत:पर जगणे म्हणजे पाप आहे, अशी उत्कट वाणी ते बोलू लागले. जवाहरलाल म्हणाले, ''महात्माजींच्या डोळ्यात मला अपार उत्कटता दिसली. त्यांची तगमग दिसली.'' महात्माजी म्हणाले, ''माझी झोप नाहीशी झाली.'' ''चले जाव'' घोषणा देशभर दुमदुमू लागली.

आणि शेवटी मुंबईस आठ ऑगस्टला तो स्वातंत्र्याचा ठराव झाला. महात्माजी सरकारबरोबर वाटाघाटी करणार होते. परंतु सरकारने महात्माजी व काँग्रेस कार्यकारिणी समितीचे सर्व सभासद यांना अटक करून नेले. देशभर भराभरा सर्वत्र धरपकडी झाल्या आणि जनतेने कधी केली नव्हती अशी चळवळ केली. प्रक्षुब्ध झालेल्या हिंदी जनतेने अहिंसक बंड केले. प्राणांची हिंसा जनतेने केली नाही. खासगी मालमत्ता लुटली नाही. कोठेही जातीय दंगे झाले नाहीत. प्राणांची हिंसा करावयाची नाही, हे सार्वभौम बंध स्वत:ला घालून घेऊन जनता सरकारशी लढत राहिली. ''करेंगे या मरेंगे'' हाच जनतेचा निर्धार होता.

देशात अशी अभूतपूर्व चळवळ चालली असता भाईजी कोठे होते?

कल्याण व विश्वास, संध्या नि हरणी सारी कोठे होती? कम्युनिस्ट सारे सुटले, तेव्हाच कल्याण, संध्या, विश्वास व हरणी यांची मुक्तता झाली होती. परंतु भाईजी तुरुंगातच होते. सत्याग्रह करण्यापूर्वीच त्यांना अटक झालेली असल्यामुळे सत्याग्रही सुटले, तेव्हा त्यांची मुक्तता झाली नाही. ते एकटेच त्या वेळी तुरुंगात होते; आणि ऑगस्टचा ठराव होण्यापूर्वी एके दिवशी कल्याण नि विश्वास तुरुंगात त्यांना भेटायला गेले. बराच वेळ भेट चालली. चर्चा झाली.

''भाईजी, तुमच्या सुटकेची खटपट आम्ही चालविली आहे.'' विश्वास म्हणाला.

''सुटका होणार नाही. मी काही कम्युनिस्ट नाही.'' ते म्हणाले.

''परंतु कम्युनिस्टांचे मित्र आहात. तुम्ही आमच्याबरोबर काम करीत असा. कामगारांच्या बाजूनं लढ्यात उभे राहात असा.'' कल्याण म्हणाला.

''मी तुमचा मित्र असलो तरी आधी काँग्रेसचा मी सेवक आहे आणि काँग्रेसचे विचार कोणत्या दिशेनं जात आहेत ते तुम्हांला माहीतच आहेत. देशात लौकरच प्रचंड वणवा पेटणार. स्वातंत्र्यासाठी हिंदी जनताही स्वतःचं बलिदान करते असं जगाला दिसेल,'' भाईजी उचंबळून म्हणाले.

''भाईजी, आज लढा करणं वेडेपणा आहे. देशात राष्ट्रीय सरकार स्थापण्याची खटपट करावी. मुसलमानांशी ऐक्य करावं.'' कल्याण म्हणाला.

''पूर्वी लढा करा असं तुम्हीच म्हणत असा. लढ्यातून ऐक्य येईल असं तुम्ही म्हणत असा.'' भाईजी म्हणाले.

''परंतु आज परिस्थिती बदलली आहे. रशिया, चीन यांना आपण पाठिंबा दिला पाहिजे. संकुचित राष्ट्रीयता सोडून व्यापक आंतरराष्ट्रीय दृष्टी आपण घेतली पाहिजे.'' कल्याण म्हणाला.

''परंतु रशिया, चीन यांना आपण कशी मदत करणार? आपणाला राष्ट्रीय लष्कर उभारता येत नाही. आपणाला काडीची सत्ता नाही. ब्रिटिशांच्या हाताला हात लावणं यापलीकडे आपणास काही करता येणार नाही. रशियातील महान प्रयोग वाचावं असं काँग्रेसलाही वाटतं. परंतु त्यासाठी आपण आधी स्वतंत्र झालं पाहिजे. एरवी आपण काय करू शकणार? रशियाला ब्रिटिशांची मदत व्हावी म्हणून तुम्ही ब्रिटिशांना आज दुखवू इच्छित नाही. जनतेला तसं सांगा. उगीच लोकयुद्धाच्या आरोळ्या नका मारू. चाळीस कोटी हिंदी जनतेला जिथं ब्रही काढता येत नाही, तिथं हे लोकयुद्ध आहे असं कितीही सांगितलंत, तरी कोणाला खरं का वाटेल? आपण आधी सर्व शक्ती ओतून स्वतंत्र झालं पाहिजे.'' भाईजी म्हणाले.

''ते स्वातंत्र्य या महायुद्धातून, लोकयुद्धातून येईल.'' कल्याण म्हणाला.

''मला शंका आहे. आपण होऊनच आपली बंधनं तोडायला हवीत.''

''युद्धानंतर स्वातंत्र्य न मिळालं, तर आपण सारे मिळून प्रचंड लढा करू. इतके दिवस आपण कळ सोसली; आणखी थोडे दिवस जाऊ दे.'' विश्वास म्हणाला.

''नरकात एक दिवसही अधिक राहा असं सांगणं पाप आहे. आणखी काही दिवस असेच गुलाम राहा असं तुम्हाला सांगवतं तरी कसं? आणि कल्याण, मी खरं सांगू का, तुम्ही काँग्रेसच्या लढ्यात कधीही सामील होणार नाही. ज्या लढ्याची सुत्रं तुमच्या हाती नाहीत, तुमच्या हाती यायची शक्यता नाही, त्या लढ्यात तुम्ही कधीही भाग घेणार नाही. त्या लढ्याची तुम्ही विटंबना कराल. काँग्रेस जेव्हा लढा करीत नसेल, तेव्हा तुम्ही आपला जहालपणा दाखविण्यासाठी लढा पुकारा म्हणून गर्जना कराल आणि काँग्रेसचा लढा सुरू होताच त्या लढ्याचा विचका करीत बसाल. मुस्लिम लीगशी पूर्वी

जेव्हा काँग्रेस वाटाघाटी करायला जाई, तेव्हा तुम्ही म्हणत असा की, ‘त्या नबाबी संस्थेजवळ काय वाटाघाटी करायच्या? मुस्लिम बहुजन समाजात काँग्रेसनं घुसावं. ऐक्य लढ्यांतून येईल.'' परंतु आज काँग्रेस लढ्यासाठी तयार होत असता तुम्ही म्हणता की, ‘मुस्लिम लीगचं मागणं मान्य करा.’ सदैव काँग्रेसला विरोध करीत राहणं ही एक तुमची नीती आहे. आणि मी तर काँग्रेसचा उपासक. मरताना ओठांवर काँग्रेस काँग्रेस शब्द नाचो अशी आशा मी मनात खेळवत असतो. या देशाच्या स्वातंत्र्यासाठी आजपर्यंत काँग्रेसच लढत आल. जगाला ऊब मिळावी म्हणून सूर्य अहोरात्र जळत असतो, त्याप्रमाणं या चाळीस कोटी लोकांना ऊब मिळावी म्हणून काँग्रेस सदैव बलिदान करीत आले आहे; आणि महान बलिदानासाठी आज पुन्हा उभी आहे. देशाची प्रतिष्ठा सांभाळणारी ही एकच महान संस्था आहे. विश्वास, कल्याण, तुम्ही काही म्हणा. तुमच्या मताचा मी होणं शक्य नाही. रशियातील तुमचे क्रांतिकारकही ‘स्वदेश, मातृभूमी’ असे शब्द उच्चारीत आहेत; आणि आपण मात्र गुलाम असूनही पोकळ आंतरराष्ट्रीय गप्पा मारायच्या. सारा चापटपणा आहे. तुम्ही जा. माझ्या सुटकेची तुम्ही खटपट नका करू. माझी सुटका कदाचित होणारही नाही. आपले संबंध बाह्यत: तरी संपले. पूर्वीच्या प्रेमळ स्मृतींचा सुगंध मनात राहील. माझ्या तरी राहील. कधी एकटा असेन, तेव्हा त्या स्मृती येऊन उचंबळेनही. असो. तुम्ही आनंदात राहा. सुखी असा. तुमची निष्ठा घेऊन तुम्ही जा. मला वाईट वाटत आहे. परंतु उपाय काय?'' भाईजींच्या डोळ्यात पाणी आले.

ते मित्र गेले. मुलाखत संपून भाईजी आपल्या खोलीत आले. ते विचार करीत येरझारा करीत होते. काँग्रेसचा महान् लढा येणार असे त्यांना नक्की वाटले. आपण मागितलेले सरकारने दिले नाही, तर कधीही स्वस्थ बसू नये, अशी शिकवण आजपर्यंत महात्माजींनी दिली आहे. इतर संस्था आणि काँग्रेस

यांच्यातील हाच महत्त्वाचा फरक आहे. काँग्रेस केवळ ठराव करणार नाही. पोकळ मागणी करणार नाही. क्रिप्सजवळ किती मिळते घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. ते काही नाही. राष्ट्राने उभे राहिलेच पाहिजे. कोणावर विसंबून राहण्यात अर्थ नाही. हा स्टॅलिनच सांगे की, क्रान्ती बाहेरून आयात करता येत नसते. आम्हीच सारी शक्ती एका विवक्षित क्षणी ओतून क्रान्ती करण्यासाठी उठले पाहिजे. उद्या म्हणे युद्धानंतर स्वातंत्र्य आपोआप येईल! वेडे! अशी स्वातंत्र्ये येत नसतात. उद्यांच्या शांतता परिषदेत आमच्या स्वातंत्र्यासाठी कोण भांडणार आहे? कोणी नाही. अमेरिका गप्प बसेल. रशिया तसाच. कोणी कोणासाठी नाही. आम्ही कोणावरही अवलंबून राहण्यात अर्थ नाही. ज्याने त्याने स्वत:च्या पायांवरच उभे राहिले पाहिजे. माझी काँग्रेस आंधळी नाही. संकुचित राष्ट्रीयतेला ती उराशी धरून बसणारी नाही. या जगात खरी आंतरराष्ट्रीय दृष्टी असलेली जर कोणती संस्था असेल, तर ती माझी काँग्रेसच आहे. जपानने चीनशी युद्ध सुरू केले, तेव्हा सर्वाआधी चीनविषयी सहानुभूती कोणी दाखविली? इंग्रजी व्यापाऱ्यांची शिष्टमंडळे जपानशी चुंबाचुंबी तेव्हा करीत होती. अमेरिका युद्धोपयोगी सामान जपानला खुशाल विकत होती. त्या अमेरिकन विमानांत बसून जपान चिनी गावे भस्मसात करीत होता. अशा वेळी काँग्रेसने जखमी चिनी सैनिकांची सुश्रूषा करायला पथके पाठविली. स्पेनमधील त्या यादवीच्या वेळी शेतकरी–कामगार पक्षाला काँग्रेसने धान्य पाठविले. जगातील फॅसिझमचा पदोपदी कोणी धिक्कार केला असेल, तर तो काँग्रेसनेच. आजही आम्हाला स्वातंत्र्य मिळाले, तर या फॅसिझमविरोधी महायुद्धांत आम्ही भाग घेऊ असे काँग्रेसने हीर केले. परंतु ४० कोटी लोकांच्या प्रतिनिधींना न विचारता येथील व्हाईसरॉय साऱ्या राष्ट्राला एकदम युद्धाच्या खाईत लोटतो. एकाच्या हाती सारी सत्ता. हा फॅसिझम नव्हे का? हे यद्ध फॅसिझमविरोधी असेल, तर आधी हिंदुस्थानला राष्ट्रीय सरकार द्या. हे युद्ध फॅसिझमविरोधी आहे असे

तेव्हा पटेल. वास्तविक स्वातंत्र्य मिळाल्यावरही आम्ही एकदम युद्धात सामील झालेच पाहिजे असे नाही. स्वातंत्र्य ही काही सौद्याची गोष्ट नाही. तो सर्व राष्ट्राचा जन्मसिद्ध हक्क आहे. जर्मनी, जपान आमच्या देशावर चालून आले, तर आम्ही पाहू असे काँग्रेस म्हणू शकेल. अमेरिका का एकदम युद्धात सामील झाली? रशिया का एकदम युद्धात आला? ईजिप्त, तुर्कस्तान, आयर्लंड हे देश तर तटस्थच राहिले. हिंदुस्थानने स्वातंत्र्य मिळाल्यावरही एकदम का म्हणून या महायुद्धात भाग घ्यावा? महात्माजीसारखी महान विभूती शांततेसाठी जर्मनी, जपान यांच्याजवळ बोलणी करायलाही जाईल. स्वतंत्र हिंदुस्थानच्या थोर वकिलाच्या शब्दाला का काही किंमत नसेल? परंतु काँग्रेस वकिली डावपेच करीत बसली नाही. आमचे स्वातंत्र्य द्या, आम्ही युद्धात भाग घेतो, असे तिने स्पष्ट सांगितले. संकुचित राष्ट्रीयता तिच्याजवळ नाही, याचा हा पुरावा नाही का?

माझ्या काँग्रेसची दृष्टी म्हणजे जणू योग्याची दृष्टी आहे. योगी ज्याप्रमाणे अर्धोत्मीलित दृष्टी ठेवतो, तशी काँग्रेसची दृष्टी. योगी केवळ आत स्वत:कडेच पाहात नाही, किंवा केवळ बाहेर जगाकडेच पाहात बसत नाही. तो दोहोचे भान राखील. स्वत:कडे पाहील व जगाकडेही पाहील. तशी माझी काँग्रेस आहे. काँग्रेस स्वत:च्या देशातील स्थिती काय आहे तेही पाहते नि आंतरराष्ट्रीय प्रश्न काय आहेत, तेही पाहते. स्वत:च्या देशातील सत्ता आपल्या हाती असल्याशिवाय आंतरराष्ट्रीयदृष्ट्या आपण पै किंमतीचे आहोत, ही गोष्ट काँग्रेस ओळखते.

फिरता फिरता भाईजी थांबले. त्यांनी सद्‌गदित होऊन काँग्रेसला प्रणाम केला.

* * *

देशांत स्वातंत्र्याच्या लढ्याची टिप्परघाई चालली होती; आणि भाईजी एके दिवशी अकस्मात सुटले! आश्चर्य. त्यांच्यावर वॉरंट कसे बजावण्यात आले नाही? ते कम्युनिस्टांचे मित्र आहेत असे का सरकारला वाटले? जोपर्यंत कम्युनिस्ट लढा लढा म्हणून ओरडत होते, तोपर्यंत भाईजी त्यांचे मित्र होते. परंतु भारताची मान उंच करणारा तेजस्वी स्वातंत्र्यसंग्राम सुरू असता, त्या संग्रामाची ज्यांनी टिंगल चालविली होती, त्यांच्याबरोबर भाईजी कसे राहतील?

भाईजी सुटले. ते सर्वत्र हिंडूफिरू लागले. विश्वास नि कल्याण यांना भेटू इच्छित होते. भाईजींचे मन आपण वळवू असे त्यांना वाटत होते. परंतु भाईजींचा पत्ता त्यांना मिळेना. शेवटी एकदा भाईजींना त्यांचा निरोप मिळाला. भाईजी भेटू इच्छित नव्हते. देशातील दिव्य बलिदानाचा उपहास करणाऱ्यांना कसे भेटायचे? देशार्थ मरणाऱ्यांना 'बरे झाले; पंचमस्तंभी मेले', असे जे म्हणतात, त्यांचे तोंड कसे पाहायचे? श्री. महादेवभाई देवाघरी जावोत, आचार्य भन्साळी प्रायोपवेशन करोत, महात्माजी आगाखान पॅलेसमध्ये तिळतिळ मरोत, तरीही ज्यांना काही वाटले नाही, त्यांच्याशी काय बोलायचे? परंतु प्रेमळ भाईजी! ते शेवटी भेटले. विश्वास नि कल्याण यांनी त्यांच्याबरोबर खूप चर्चा केली. शेवटी भाईजी म्हणाले:

''कल्याण, तुमचं म्हणणं नाही रे मला पटत; आणि तुमचा दंभ तर मला चीड आणतो. तुम्ही स्वच्छ सांगा की, 'आज आम्हास ब्रिटिशांना दुखवायचं नाही.'' उगीच लोकयुद्धाच्या थापा का मारता? आपल्या देशांतील प्रांतिक स्वायत्तता ही काय किमतीची आहे, ते पाहिलंतच. सिंधमधील थोर अल्लाबक्षांना क्षणात मुख्य प्रधानपदावरून हाकलून देण्यात आलं; आणि फझलुल हक्कांची तीच दशा. आपणास काडीचं स्वातंत्र्य नाही. हिंदुस्थानची इतकी मानखंडना

झाली नसेल. दु:खाचा पेला आज काठोकाठ भरला आहे. थेंबही अधिक मावायला जागा नाही. यश वा अपयश!. राष्ट्राची प्रतिष्ठा म्हणून काही वस्तू आहे. लढता लढता कदाचित कॉंग्रेस मरेल, नेस्तनाबूद होईल; परंतु हिंदी स्वातंत्र्यासाठी लढताना ती नष्ट झाली असा इतिहास म्हणेल. विश्वास, कॉंग्रेस पुढाऱ्यांना सोडा अशा अर्जावर तुम्ही सह्या गोळा करता. सह्यांच्या पाठीमागं संपाचा हातोडा–कोयता उगारलेला नसेल, तर या सह्यांना पै किंमतही नसते, हे का तुम्हाला माहीत नाही? साधे पगारवाढीचे प्रश्न असतात तिथं सह्यांचे अर्ज न पाठवता, तुम्ही संपाचं हत्यार उगारता आणि आज ह्या सह्यांचं कागदी थोतांड रे कुठून आणलंत? हा सारा दंभ आहे. महात्माजीसारखे राष्ट्रनिर्माते कोंडले जातात, तरी तुम्ही एक दिवसाचाही निषेध संप करीत नाही. देशात चिमुरं होतात; आचार्य भन्साळी उपवास करतात; आणि आज महात्माजी दिव्य करीत आहेत. तरीही तुम्ही स्वस्थ, जा तुम्ही. तुम्ही जणू या देशाचे नाही; मी तुमचा सहकारी होतो, याची मला लाज वाटते. तुम्ही माझा उपयोग करून घेतलात. तुमचं खरं स्वरूप मी ओळखलं नव्हतं. कॉंग्रेसबद्दल तुम्हाला कधीही आदर नव्हता. ते कॉंग्रेस सोशॅलिस्ट मला आदरार्ह वाटतात. तेही मार्क्सवादी आहेत. परंतु रशियाचे ते गुलाम नाहीत. स्टॅलिनच्या धोरणावर त्यांनी हिंदी धोरण लोंबकळत ठेवलं नाही. त्यांनी कॉंग्रेसची कधी अप्रतिष्ठा केली नाही. महात्माजींसारख्या जगद्वंद्य विभूतीची त्यांनी कधी टिंगल केली नाही. कॉंग्रेसची शक्ती वाढावी म्हणून ते झटले, झटतात. अहिंसेची मर्यादा सांभाळून ते लढत आहेत आणि तुम्ही जयप्रकाशांसारख्या थोर कार्यकर्त्यांविषयीही 'हे जपानला अनुकूल आहेत, त्यांना पकडा' असे सांगता; तुम्हाला लाज वाटायला हवी. सरकारलाही या कॉंग्रेसच्या लढ्यात जपानला अनुकूल असं काही आढळलं नाही. परंतु तुम्ही वाटेल ते विष पेरता. एवढा तुमचा अध:पात कसा झाला? आपला प्रतिस्पर्धी म्हटला म्हणजे मग वाटेल

त्या मार्गानं, वाटेल तो प्रचार करून त्याला जमीनदोस्त करायचं अशी कम्युनिस्टी नीती असते असं मी ऐकत होतो. परंतु ते प्रत्यक्ष आज माझ्या अनुभवाला येत आहे. अरेरे! विश्वास, कल्याण, मला माहीत आहे, की उद्या तुम्ही माझ्याविरुद्धही प्रचार कराल : 'भाईजी बारगळले, ते बावळट आहेत, फेका त्यांना दूर,' वगैरे वाटेल ते बोलाल. ठीक. तुमचं कर्तव्य तुम्हाला. माझं मला. या स्वातंत्र्याच्या लढ्यात माझा हा देह पडावा व या माझ्या मातीचं सोनं व्हावं अशी मला इच्छा आहे. मला तुमचा राग येतो. परंतु तरीही प्रार्थनेच्या वेळी 'माझा कल्याण, माझा विश्वास, यांना सुखी ठेव; त्यांना निराश नको करू.' अशी मी प्रार्थना करीत असतो. तुम्हीही त्यागी आहात. उद्या तुम्हीही देशासाठी मराल; परंतु आज मरायला येत नाही याचं वाईट वाटतं. आज भारतमातेची विटंबना चालली असता तुम्ही स्वस्थ आहात याचं वाईट वाटतं. आज भारतमातेसाठी मरायला कोण उभं आहे?''

''भाईजींचे डोळे भरून आले. थोड्या वेळाने ते पुन्हा म्हणाले

'' आता. प्रेम मनात राहिलं तर ठेवू या; परंतु आपले पंथ आजपासून अलग झाले.''

''भाईजी, विचार करा. लढा करायचाच, तर काही योजना तरी नको का?'' कल्याण बोलला.

''तुम्ही मागं लढा पुकारा असं ओरडत होतेत, तेव्हा कोणती योजना तुमच्याजवळ होती? मी मागं एकदा कामगारांचा प्रश्न सुटावा म्हणून प्राण हाती घेऊन उभा राहिलो होतो. तेव्हा तुमच्या एका आवडत्या थोर कामगार पुढाऱ्यानं मला लिहिलं होतं, 'भाईजी, अशा रीतीनं मरणं आम्हाला पसंत नाही. उद्या स्वातंत्र्यांच्या युद्धात रस्त्यारस्त्यांत बॅरिकेडस् रचून आपण लढू, लढता लढता मरू.' मग आज जो देशात महान् स्वातंत्र्यसंग्राम चालला आहे, त्यात लोकांनी हेच प्रकार नाही का ठायी ठायी केले? तुमच्याजवळ तरी

दुसऱ्या कोणत्या योजना आहेत? आणि नि:शस्त्र राष्ट्राजवळ असणार तरी कुठल्या? उगीच मुद्दे मांडीत बसू नका. स्वच्छ सांगा की, ''रशिया युद्धात असल्यामुळं ब्रिटिशांना आम्ही मुळीच आज दुखवणार नाही. रशिया ही आमची पहिली मातृभूमी; ती जगली पाहिजे.'' दुसरे दांभिक प्रचार करू नका. परंतु प्रामाणिकपणा नि सत्य यांचं तर तुम्हाला वावडं. जाऊं दे. कशाला अधिक बोलू? मला आता गेलं पाहिजे. इथं अधिक थांबणं बरं नव्हे. विश्वास, कल्याण, जातो मी.''

''बरं तर. आम्ही शेवटचा यत्न करून पाहिला.'' ते म्हणाले.

कल्याण नि विश्वास परत पुण्याला आले. विश्वास कामासाठी कोठे तरी तसाच गेला. खोलीत कल्याण एकटाच आला.

''कल्याण, भाईजी बरे आहेत ना? काय म्हणतात ते?'' उत्सुकतेने संध्येने विचारले.

''ते आपला हट्ट सोडायला तयार नाहीत. ते आज आंधळे झाले आहेत. उघडतील, एक दिवस ह्या सर्व भावनांध देशभक्तांचे डोळे उघडतील. केवळ भावनेच्या भरी पडून कार्य होत नसतं, ही गोष्ट त्यांना कळेल.'' कल्याण म्हणाला.

''परंतु भाईजीचं म्हणणं खरं नाही का? देशातील अनन्वित प्रकार पाहून कोणाला संताप येणार नाही? मलाही वाटतं की, या स्वातंत्र्ययुद्धात भाग घ्यावा. देशातील लाखो लोक प्रचंड लढा लढत असता आपण का घरी बसावं?''

''संध्ये, तुला काही कळत नाही. हा का स्वातंत्र्याचा लढा आहे? ही का क्रांती? ही केवळ हाराकिरी आहे. मूर्खपणानं मरण आहे. आम्ही सांगत होतो, तेव्हा त्यांनी लढा केला नाही; आणि युद्धाचं स्वरूप पालटल्यावर,

आणि देशात इंग्रजी लष्करी सामर्थ्य अपरंपार वाढल्यावर हे लढा पुकारतात!''

''जणू तुम्ही लढा पुकारा म्हणत होतेत, तेव्हा लढा सुरू झाला असता तर यशस्वीच झाला असता! इंग्रजांची लष्करी सत्ता आज वाढली असली तरी तेव्हा नव्हती असं नाही; आणि त्या वेळी काँग्रेसने लढा सुरू केला असता, तर काही तरी निमित्त काढून तुम्ही पुन्हा दूर राहिले असतेत. तुमचं राजकारण मला आता समजू लागलं आहे.''

''संध्ये, तू असं काही बोलत जाऊ नकोस. पक्षाच्या शिस्तीच्या हे विरुद्ध आहे. राजकारण म्हणजे गंमत नाही. तिथं डावपेच असतात. नाना प्रकारची भाषा वापरावी लागते.''

''परंतु थोडी तरी सत्यता नको का?''

''तू केव्हापासून सत्य–अहिंसेची दीक्षा घेतलीस? भाईजी देऊन गेले की काय?''

''सत्याची उपासना संध्येला कोणी शिकवायला नको.''

''संध्ये, तू एका कम्युनिस्टाची पत्नी आहेस, हे सत्य आधी ध्यानात ठेवून वागत जा; बोलत जा.''

''कल्याण, उद्या मी या चळवळीत पडून तुरुंगात गेले तर? देशाची मानखंडना नि विटंबना पदोपदी होत असता तुम्ही हे लोकयुद्ध म्हणता तरी कसं? निष्पाप रक्त सांडलं जात असता, सतीचे अश्रू गळत असता, आपण का एकमेकांना मिठ्या मारीत बसायचं?''

''मिठ्या नाही मारायच्या, लोकयुद्धाचा तुफानी प्रचार करायचा; ही पंचमस्तंभी चळवळ हाणून पाडायची.''

''काँग्रेस का पंचमस्तंभी? श्री. जयप्रकाशांसारखे का पंचमस्तंभी? मागं तुमच्या कम्युनिस्ट पक्षावरही सरकारनं बंदी उठवली, तर आचार्य


श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

नरेंद्रदेवांनी पत्रक काढून आनंद व्यक्त केला होता. कॉंग्रेस समाजवादी पक्षाची थोडी दिलदारी शिका. प्रतिपक्षी म्हटला, की काहीही करून त्याला बदनाम करणं ही आसुरी नीती आहे.''

''तू मला शिकवायला नकोस. जयप्रकाशासारख्या देशद्रोह्याच्या नावापाठीमागं श्री. उपपद लावायला तुला काही कसं वाटत नाही? पक्षाच्या कोणा सभासदानं तुझं बोलणं ऐकलं तर? तू जपून बोलत जा–वागत जा. नाही तर खरंच तुझ्याजवळचा संबंध मला सोडावा लागेल.''

''काय बोलतोस, कल्याण?''

''मी खरं ते सांगतो. आमचं आधी पक्षाशी लग्न लागलेलं असतं. पक्षाचं धोरण म्हणजे आमचा वेद, आमचं शास्त्र. पक्षाची शिस्त म्हणजे आमचा प्राण. पक्षाचं धोरण चूक की बरोबर ते आम्ही पाहात नाही. वरचे पुढारी ठरवतात. आम्ही त्या धोरणाचा ते सांगतील ते मुद्दे घेऊन प्रचार करतो. पक्षाच्या विरुद्ध असणाऱ्यांशी आम्ही संबंध ठेवीत नाही. आमच्यातील एखादा एकांडा शिलेदार निघाला, तर आम्ही त्यावर संपूर्ण बहिष्कार घालतो. तिथं दयामाया नाही. स्वतःची पत्नी का असेना, ती जर पक्षाविरुद्ध जाऊन काही करील, तर तिचा त्याग करणं हीच आमची नीती.''

''कल्याण, कसं हे तुला बोलवतं? तुला का काही भावना नाहीत?''

आम्ही क्रांतिकारक भावनांना मारून टाकतो. वैयक्तिक भावना आम्ही नष्ट करतो; क्रांतीला पेटवतील अशा भावना फक्त ठेवतो. कोमल, प्रेमळ, हळूवार, रडक्या भावना आम्ही फेकून देतो. संध्ये, आमचे एक थोर कम्युनिस्ट कार्यकर्ते आहेत. त्यांची मी एकदा एक गोष्ट ऐकली होती. त्यांची तान्ही मुलगी वारली. तिला त्यांनी एका पिशवीत घातलं. त्यांनी सायकल केली. एका बाजूला तान्ह्या मुलीचा मृतदेह आत असलेली ती पिशवी त्यांनी अडकवली

व दुसरीकडे बाजारातील सामान आणण्यासाठी घेतलेली पिशवी अडकवली आणि ते निघाले. वाटेत त्यांना एक मित्र भेटला. हे सायकलवरून उतरले. ''पिशवीत रे काय?'' मित्राने विचारलं. मेलेली मुलगी. वाटेत तिची व्यवस्था लावून, तसाच पुढं बाजारात जाईन, असं त्या कार्यकर्त्यांनं उत्तरं दिली. तो मित्र चकित झाला. संध्ये, क्रांतिकारकांना असं व्हावं लागतं. कठोरपणा त्यांना शिकावा लागतो.''

''कल्याण, माझं बाळही का तू असंच भाजीपाल्यासारखं पिशवीत घालून नेलंस? आणि लगेच मंडईत गेलास?''

''नाही, संध्ये. मी रडत गेलो. बाळ जिवंत होईल का असं छातीची ऊब देऊन वाटेत जाताना मी करून पाहात होतो. संध्ये, मी अद्याप कच्चा आहे. मी पक्का क्रांतिकारक नाही.''

''असाच कच्चाच राहा. पक्का नको होऊस. कल्याण, काय बोलू, काय सांगू? जाऊ दे हे बोलणं. मला नाही ऐकवत. परंतु हल्ली माझ्या मनाचा कोंडमारा होतो. भाईजींचं करणं मला बरोबर वाटतं. परंतु तुझं प्रेम तरी कसं तोडू? तुम्ही पुरुष कर्तव्यासाठी प्रेम झुगारता. भाईजींनी तुमचे प्रेमबंध तोडले. तू माझा त्याग करायला तयार झालास; परंतु मी काय करू? मी का तुझा त्याग करू? आणि स्वत:च्या आत्म्याची मी हाक ऐकू? परंतु कुठं आहे माझा स्वत:चा असा मुक्त, स्वतंत्र आत्मा? माझा आत्मा कधीच तुझ्यात मिसळून गेला आहे. परंतु जर मिसळून गेला आहे, तर हे तुझ्याशी विरोध असे स्वतंत्र विचार माझ्या मनात का येतात? कल्याण, संपूर्णपणे दुसऱ्यात मिळून जाणं शेवटी कठीणच आहे.''

''संध्ये, मी तुला स्वातंत्र्य देतो. घे. तुला मी गुलाम करू इच्छित नाही. गुलामगिरीविरुद्ध तर आपण लढत आहोत. तुला या लढ्यात पडावं असं



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय सातारा
दाखल क्र. ग्रंथानुक्रमांक
पाने ३८५

वाटत असेल, तर तू खुशाल जा. परंतु कल्याणचा नाद सोडून मग जा. माझी आठवण काढून मग रडत बसू नकोस. तू माझ्या कर्तव्याच्या आनंदात मस्त राहा.''

''कल्याण, तुला सोडून मी कशी जाऊ, कुठं जाऊ? नाही ती इच्छा; नाही ते मला धैर्य. संध्या शेवटी तुझी आहे. तू देशाचा आहे, जगाचा आहेस. परंतु मी केवळ तुझी. तू एक मला पुरेसा आहेस. भाईजींची आठवण येऊन वाईट वाटेल. देशातील चिमुर ऐकून जीव तडफडेल. परंतु शेवटी जीव तुझ्याभोवती रुंजी घालीत राहील. मी माझ्या मनात डोकावून पाहीन तर सर्वत्र तूच भरून राहिलेला दिसशील. खरं ना?''

''संध्ये, उगीच मनाला लावून घेऊ नकोस. तुझी प्रकृतीही बरी नाही. या वेळचं तरी बाळंतपण नीट पार पडो. प्रसन्न राहा. माझं ऐक; तू आता जरा पड. मी बाहेर जाऊन येतो हो.''

संध्येला प्रेमाने निजवून कल्याण बाहेर गेला. पंरतु संध्या निजली नव्हती. कल्याण बाहेर गेला नि तिचे अश्रूही बाहेर धावून आले.

* * *

एके दिवशी वार्ता आली की भाईजी अचानक पकडले गेले. ती वार्ता ऐकून संध्या सचिंत झाली. इतक्यात कल्याण बाहेरून आला.

''संध्ये, भाईजींना अटक झाली ही गोष्ट खरीच.''

''आणि आपण मात्र घरी!''

''संध्ये, भाईजींना अटक झाली त्याचा आनंद मान. तुरुंगांत जाऊन बसले; बरं झालं. बाहेर कुठं मोर्चात जाते, गोळीबारांत, लाठीमारात घुसते तर? आता बसतील तुरुंगात देवाला आळवीत. शांतपणं विचार करतील, लिहितील, वाचतील.''



(ग्रंथ) ...

''नाही तर उपास करायचे.''

''तेथील मित्र त्यांना तसं करू देणार नाहीत. त्यांच्याभोवती तिथं नवीन तरुण गोळा होतील. त्यांचे नवे प्रेमबंध निर्माण होतील. ते प्रेम भाईजींना वाचवील.''

''कुणाला माहीत? मला आपलं वाईट वाटतं. भाईजी बाहेर असते तर? होणाऱ्या बाळाला ते पाळण्यात घालते; ते गाणी करते.''

''ते सुटून आल्यावर तुझं बाळ पाहतील.''

''परंतु ते येतील का आपल्याकडे?''

''आमच्याकडे नाही आले, तरी संध्येकडे येतील. तुझे अश्रू त्यांना ओढून आणतील.''

भाईजी तुरुंगात होते. त्यांचे कशात लक्ष नसे. ना वाचनात, ना लेखनात. ते फारसे कोणाशी बोलत नसत. त्यांचे हसणे जणू लोपले. त्यांचा आनंद जणू अस्ताला गेला. देशातील स्वातंत्र्याचा महान लढा मंदावला म्हणून का त्यांना वाईट वाटत होते? परंतु यश का एकदम येते? आणि अहिंसक जनतेने एवढा मोठा लढा केला ही का अभिमानाची गोष्ट नव्हती?

१८५७ नंतर नि:शस्त्र झालेली हिंदी जनता इतक्या त्वेषाने अशी कधी उठली होती का? महायुद्धाच्या काळात कोणत्या दडपलेल्या देशांतील जनता अशी उठली, इतके दिवस झगडत राहिली? लढा मंदावला, तरी मान खाली घालण्याची जरुरी नव्हती. दीडशे वर्षांत पारतंत्र्यांत राहिलेल्या हिंदी जनतेचा आत्मा जिवंत आहे हे जगाला पुन्हा दिसून आले. हे हिंदी राष्ट्र मुमर्षू नाही, हे राष्ट्र मरणार नाही. चीन, हिंदुस्थान ही राष्ट्रे हजारो वर्षे जगली तरी ती म्हातारी नाहीत. जणू अद्याप बाल्यावस्थेतच ती आहेत. वाढत आहेत. आपसात मुलांप्रमाणे भांडत असली, तरी ती पुढे जातील. चीन, हिंदुस्थान! महान राष्ट्रे!

शांतिप्रिय राष्ट्रे! सर्वांना जवळ घेणारी राष्ट्रे! जगाला कधीही त्रास न देणारी राष्ट्रे! ही राष्ट्रे स्वातंत्र्याने शोभतील. आज ना उद्या.

भाईजी, खिन्न नका होऊ. तुम्ही तुमचे आवडते आकाश पाहा. तारे पाहा. संध्याकाळचे रंग पाहा. पावसात नाचा. चिमण्या–कावळ्यांबरोबर बोला. तुरुंगांतील वाळूमधील रंगीत खडे ते तुमचे हिरे गोळा करा. हसा, खेळा. नाचा, कुदा. मधून गंमतीने रुसा. आनंदी राहा. दु:ख कशाचे करता? शेवटी सारे चांगले होईल. तुमची श्रद्धा तुम्हाला असे नाही का सांगत?

भाईजींना फारसे कधी कोणाचे पत्र येत नसे. ते तेथील नवीन तरुण मित्रांना म्हणत, ''तुम्ही सुटल्यावर मला रोज पत्रं पाठवा. मोठमोठी पत्र. सध्या तुम्हाला पत्र येतात ती मलाच असं मी समाधान मानीत असतो.''

परंतु एके दिवशी सुंदर अक्षरांत पत्ता लिहिलेले एक पत्र आले.

''भाईजी, तुमचं पत्र. तुमचं पत्र.'' असे म्हणत मित्र धावत आले. ते पत्र हातात घेऊन ते दूर गेले. कोणाचे होते ते पत्र? ते संध्येने लिहिलेलें पत्र होते. भाईजींबरोबर हळूवार हृदयाने आपणही ते पत्र वाचू या :

''प्रिय भाईजींचे सेवेशी

संध्येचे सप्रेम भक्तिमय प्रणाम.

''तुम्हाला मी काय लिहू? किती तरी दिवसांत तुम्हाला मी भेटले नाही; तुम्हाला पत्रही लिहिले नाही. तुम्हाला भेटणे, तुम्हाला पत्र लिहिणे हासुद्धा गुन्हा आहे. इंग्रज सरकारच्या दृष्टीने नव्हे. परंतु कल्याणच्या पक्षाच्या दृष्टीने. त्याचे मन तुम्ही जाणता. परंतु पक्षाची शिस्त आहे ना? भाईजी, तुम्हाला हे सारे समजतेच; परंतु आज राहवेना, म्हणून हे पत्र लिहीत आहे. कितीदा तरी वाटे, की आपण स्वातंत्र्याच्या लढ्यात सामील व्हावे; परंतु लढ्यात पडले असते, तर कल्याणला सोडावे लागले असते! आणि कल्याणला सोडून



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

संध्येचे कल्याण कसे व्हायचे? कल्याण माझ्या रोमरोमांत आहे. त्याला कसे सोडू, कसे तोडू? मी घरीच राहिले. तुमची आठवण येऊन डोळ्यात पाणी येई. भाईजी, तुम्ही तुरुंगात गेल्यापासून मी गोड खाल्ले नाही. कल्याण चिडतो, संतापतो. परंतु मी सारे सहन करते. सारे सहन करणे हाच स्त्रियांचा पुरुषार्थ. होय ना?

''भाईजी, तुम्हाला माहीत नसेल. परंतु तुमची संध्या लौकरच बाळंत होईल. तुमच्या संध्येला आशीर्वाद पाठवा. सारे सुखरूप पार पडो, म्हणून प्रार्थना करा. का तुम्ही रागवाल, संतापाल? देशात स्वातंत्र्याचे बाळ जन्माला यावे म्हणून सर्वांनी बलिदान करण्याच्या वेळेस त्यांनी का आपल्या घरी नवीन पाळणे हालवावे? असे का तुम्ही म्हणाल? खरे म्हणजे आम्ही घरी असणे पाप आहे. आम्ही मेले पाहिजे होते. निदान तुरुंगात तरी येऊन बसले पाहिजे होते. परंतु देशात अग्निदिव्य होत असता आम्ही घरी सुखोपभोगांत दंग होतो. अरेरे! भाईजी, खरेच का तुम्हाला राग येईल?

''परंतु मी मनाने खरोखर स्वातंत्र्याच्या लढ्यात होते. मी घरी नव्हते. एक प्रकारे तुरुंगातच होते. तुम्ही रागावू नका. संध्येची कींव करा. परंतु तुम्ही रागवाल असे मी मनात आणणे म्हणजेच तुमचा अपमान करणे आहे. तुम्ही रागावणार नाही. संध्येला तुम्ही रोज मनाने आशीर्वाद पाठवील असाल.

''आणि भाईजी, सुटल्यावर तुम्ही या हो. त्या वेळी माझे बाळ असेल त्याला खेळवायला या. चिमणीची गाणी म्हणायला या. तुम्ही याल तो बाळ मोठे झालेले असेल. तुम्ही ते खेळवा. त्याला घेऊन फिरायला जा. त्याला सृष्टिसौंदर्य दाखवा. याल ना? आईप्रमाणे या संध्येच्याही केसांवरून हात फिरवायला याल ना? तुम्ही का पक्षोपपक्ष पाहाल? कल्याण म्हणाला, भाईजी आता आपल्याकडे येणार नाही. खरे का हे? तुम्ही नाही आलेत, तर मी

तुमच्याकडे येईन. त्यावेळी झगडा थांबलेला असेल. मने शांत व समतोल झालेली असतील. त्यावेळी मी तुमच्याकडे आले, तर कल्याणचा पक्ष काही रागावणार नाही. का हे विरोध वाढतच जातील? देवाला ठाऊक!

''परंतु तुम्हीच याल. संध्येसाठी याल, तिच्या बाळाला बघायला याल. तोंवर मी बाळाला तुमच्या गोष्टी सांगेन. तुमच्या आठवणी सांगेन; परंतु त्याला समजतील का? समजतील. बाळ हसेल.

''तुम्ही तुरुंगात दु:खीकष्टी असता असे ऐकले. असे नका करू. तुम्ही दु:खी असणे म्हणजे शेकडोंना दु:खी करणे. तुम्हीच ना म्हणत असा की नेहमी आनंदी असावे? तुम्हीच ना म्हणत असा 'संध्ये, मी नेहमी हसत असतो. हसणं हा माझा खरा धर्म. बाकी तात्पुरती वादळं.' मग कुठे गेले तुमचे हसणे? हे कम्युनिस्ट दूर राहिले म्हणून का तुमचे हसणे लोपले? शेवटी लढा मंदावला, म्हणून का तुम्ही दु:खी होता? परंतु कर्तव्य करणे एवढे आपले काम असे तुम्हीच म्हणत असा. मी का तुम्हाला शिकवावे, सांगावे? परंतु तुम्ही हसत राहा. तुम्ही आनंदी आहात असे ऐकले म्हणजे मला आनंद होईल. भाईजी, तुमची संध्या हातीपायी नीट सुटावी, तुमच्या संध्येची सुलभ प्रसुती व्हावी असे तुम्हांला वाटते ना? उद्या बाळ-बाळंतीण सुखरूप असावीत असे वाटतें ना? तर मग आनंदी राहा. तुम्ही दु:खी आहात, कष्टी आहात, रडत बसता, निराश होता, मरणाचे विचार मनात आणता, हे ऐकून हृदयात चर्र होते. मला मग काही सुचत नाही. तुमची दिवस भरत आलेली संध्या जर सारखी अशांत व सचिन्त राहील, ना नीट खाईल, ना पिईल, तर उद्या सारे नीट कसे व्हायचे? खरे ना? म्हणून या संध्येसाठी हसा. आनंदी राहा. मला पत्र लिहा. मी तुमच्या मुलीसारखी जणू आहे. तुमच्या लहान बहिणीसारखी आहे. लिहा पत्र. मला आशा द्या. आनंद द्या. 'संध्ये, येईन हो तुझ्याकडे, तुझं बाळ पाहायला येईन. तुझ्या हातचं जेवायला येईन. तुझ्यासाठी मी आनंदी राहीन. तूही आनंदी

राहा. मनाला काही लावून नको घेऊ. असे लिहा. लिहाल ना?

''भाईजी, तुम्ही का आता दुसऱ्या पक्षात जाणार? कल्याण म्हणत होता. भाईजी, तुम्ही मोकळे राहा. सत्य हे पक्षातीतच असावे. खरेच, तुम्ही कोणत्याही पक्षात नका जाऊ. पक्षात गेले की नाही म्हटले तरी थोडा पक्षाभिमान येतो. अभिनिवेश येतो. प्रहार सोसावे लागतात, करावे लागतात. टीका, प्रतिटीका. तुम्हाला हे कसे मानवेल? तुम्ही मोकळेच राहा. जेथे लढा असेल, अन्यायाविरुद्ध जुलुमाविरुद्ध लढा असेल, तेथे जात जा. परंतु शेवटी मला काय समजते? मी वेडी आहे.

''कोणत्याही पक्षात न जाऊ तर आपणास एकटे एकटे वाटते, असे तुम्ही मागे म्हणाला होता. निराधार वाटते. ते खरे आहे. परंतु एखाद्या पक्षाच्या शिस्तीत घालून घ्याल, तर तेथे तुमचा जीव गुदमरेल. ही गोष्टही खरी. शेवटी योग्य ते तुम्ही करा.

''आज विश्वास, कल्याण कोणी येथे नाही. हरिणीही येथे नाही. मी एकटी आहे. सायंकाळ झाली आहे. खिडकीतून दूर सुंदर रंग दिसत आहेत. तुम्ही असतेत, तर काव्य केले असतेत; नि ते म्हटले असतेत. परंतु मी पत्र लिहिता लिहिता मध्येच हृदय भरून येऊन थांबते व समोर बघते. पुन्हा जरा शांत होऊन लिहू लागते आणि किती लिहू? मनातले सारे रामायण-महाभारत मला या लहानशा पत्रात का लिहिता येईल? आणि मी मनातील सारे लिहू तरी शकेन का? आणि ते सारे लिहिणे कोणाला आवडेल तरी का?

''मी आता पुरे करते हे पत्र. तुमच्या प्रेमळ आशीर्वादाची मी अपेक्षा करते. तुम्ही आनंदी राहाल अशी आशा करते.

तुमची
संध्या.

ते पत्र हातात धरून भाईजी बसले होते. ते पत्र ते पुन्हा वाचीत. पुन्हा मुकाट्याने बसत. मध्येच ते डोळे मिटीत. त्यांच्या डोळ्यातून ते अश्रू का घळघळले? भाईजी आता उठले. ते एकटेच फिरू लागले.

दिवस संपला. आता रात्र आली. तरीही भाईजी बाहेरबाहेरच होते.

''भाईजी, आज तुम्ही इतके दुःखी का? कोणाचं आलं ते पत्र?'' किसनने येऊन विचारले.

''संध्येचं पत्र.''

''कोण ही संध्या.''

इतक्यात आणखीही प्रेमळ मित्र तेथे जमले; आणि भाईजी संध्येची ती हकीगत सांगू लागले; तिच्या आठवणी ते सांगू लागले. आठवणी सांगता सांगता ते रंगले. मध्येच ते गहिवरत, बोलायचे थांबत; आणि पुन्हा ती गीता सुरू होई. आणि मग शेवटी म्हणाले :

''गड्यांनो, अशी हो ही संध्या आहे. संध्येप्रमाणंच रमणीय व गंभीर, प्रशान्त व प्रसन्न, पावन नि सोज्ज्वळ, तिचं मी किती वर्णन करू? दुःखातही सुख मानणारी, कष्टांना न कंटाळणारी, उपासमारीतही हसणारी, दागदागिने दूर करणारी, पती कदाचित फाशी जाईल असं दिसत असताही त्याला त्याच्या कार्यार्थ जायला परवानगी देणारी, विपत्तीतही विनोद करणारी, हास्य पिकविणारी, रात्री उठून देवाची मूर्ती जवळ घेऊन त्याची करुणा भाकणारी, परंतु पतीला देव आवडत नाही म्हणून त्या देवाला ट्रंकेतच ठेवून त्याचं दर्शन घेणारी, थोर मनाची, उदार हृदयाची, सेवेसाठी सदैव तत्पर, त्यागी, प्रेमळ, धीर व गंभीर अशी ही संध्या आहे. प्रणाम त्या थोर प्रेममयी संध्येला! प्रभू तिला सदैव सुखात ठेवो!''

◆◆◆

## साने गुरुजींची ग्रंथसंपदा

- नामदार गोखले चरित्र
- श्यामची आई
- श्यामची पत्रे
- धडपडणारी मुले
- धडपडणारा श्याम
- कुमारांपुढील कार्य
- साक्षरतेच्या कथा
- श्रमणारी लक्ष्मी
- राष्ट्रीय हिंदू धर्म
- स्वप्न आणि सत्य
- कला म्हणजे काय
- त्यागातील वैभव
- भारतीय संस्कृती
- स्वदेशी समाज
- लोकमान्य टिळक
- गुरुजींचे उपदेश
- देवाघरच्या फुलांनो
- दारूबंदीच्या कथा
- फुलांचा प्रयोग
- सोराब नि रुस्तम
- भारतीय नारी
- यती की पती
- भगवान श्रीकृष्ण
- चित्रा नि चारु
- घामाची फुले
- देशबंधू दास
- गोड निबंध
- निळा पक्षी
- खरा मित्र
- करुणादेवी
- मोरी गाय
- तीन मुले
- नवजीवन
- विश्वदर्शन
- समाजधर्म
- गीताहृदय
- कावळे
- शबरी
- यज्ञ
- विश्राम
- दुर्दैवी
- मिरी
- पत्री
- कुरल
- साधना
- क्रांती
- सती
- संध्या
- गोप्या
- दुःखी
- मनूबाबा
- श्याम
- माझी दैवते
- दिगंबर राय
- सोनसाखळी
- बेबी सरोजा
- आपले नेहरू
- श्री शिवराय
- स्त्री जीवन
- सुंदर कथा
- अमोल गोष्टी
- रामाचा शेला
- स्वगीर्य ठेवा
- जीवनाचे शिल्पकार
- इस्लामी संस्कृती
- इतिहासाचार्य राजवाडे
- कल्की अथवा संस्कृतीचे भवितव्य
- गोष्टीरूप गांधीजी
- महात्मा गांधीजींचे दर्शन
- बापूजींच्या गोड गोष्टी
- सुंदर पत्रे - भाग १,२,३
- विश्व-भारती
- मानव जातीची हाक
- महात्मा गौतम बुद्ध
- कालीमातेची मुले
- आपण सारे भाऊ
- नवा प्रयोग
- गोड शेवट

अभिनंदन प्रकाशन
१४९५, बी वॉर्ड, इंदुमती अपार्टमेंट,
गुलाब गल्ली, मंगळवार पेठ, कोल्हापूर - १२.
दूरध्वनी : ०२३१-३२९६९०९, मो.: ९४२३०४१९६५